प.पू. महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का

जन्म
शके १७६९ इ.स.१८४७

निर्याण
आश्विन शु.०३ शके १८१९
इ.स.१८९७

श्रीगोविंदाप्पा येळसर हे निंबरगी गावात रहाणारे सद्गृहस्थ होते. त्यांच्या पत्नीचे नाव भगवंतौव्वा. या भगवंतौव्वांना श्रीनिंबरगीकरमहाराजांचा अनुग्रह होता. या दांपत्याचे पोटी शके १७६९ (इ.स.१८४७) मध्ये एक मुलगी अवतीर्ण झाली. या मुलीचे नाव 'लक्ष्मी' असे ठेवले. ही लक्ष्मी म्हणजेच आमच्या महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का.

श्रीलक्ष्मीबाईअक्का या लहानपणी आपले आईबरोबर महाराजांच्या प्रवचनास जात असत. यांच्या घरची थोडी विपन्नावस्था होती. श्रीलक्ष्मीबाईअक्कांना एक धाकटा भाऊ होता. या दोन मुलांचा सांभाळ करणे भगवंतौव्वा यांना अवघड जाऊ लागले. त्यामुळे ही गोष्ट त्यांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या कानावर घातली. त्या महाराजांना म्हणाल्या 'महाराज, माझी मुलगी आपण पदरात घ्याल काय?' याप्रमाणे महाराजांनी श्रीलक्ष्मीबाईअक्कांना आपले जवळ ठेऊन घेतले. श्रीलक्ष्मीबाईअक्का या महाराजांच्या समवेत कायम असायच्या. त्यांना साधनेची गोडी लागू लागली व त्यांची साधनसिद्धता पाहून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना अनुग्रह दिला. श्रीलक्ष्मीबाईअक्का महाराजांच्या घरातील पडेल ते काम करायच्या आणि उरल्या वेळेत साधन करायच्या. एक भाकरी व एक चिंचेचे बुटुक दिवसभरात खाऊन त्यांनी अघोर साधन केले.

एकदा श्रीलक्ष्मीबाईअक्कांची प्रकृती बिघडली, तेव्हा औषध म्हणून महाराजांनी काही वनस्पती ठेचून पंचपात्रीभर रस श्रीलक्ष्मीबाईअक्कांना घेणेस सांगितले. तेव्हा श्रीलक्ष्मीबाईअक्का म्हणाल्या, 'महाराज, तुमची कृपा हेच माझे औषध आहे. मला हे औषध मुळीच नको.' हे ऐकल्यावर महाराज म्हणाले, 'तुम्हाला नको तर नको, हेच औषध आम्ही घेतो.' असे म्हणून महाराजांनी ते औषध स्वतः प्राशन केले आणि आश्चर्य असे श्रीलक्ष्मीबाईअक्कांची प्रकृती दुरूस्त झाली.

दासबोधात 'खडे मांडून शिकविले' असा एकेठिकाणी उल्लेख आहे. 'तसा खडा तरी मला द्या' अशी अक्कांनी महाराजांना विनंती केली. याप्रमाणे महाराजांनी आपल्या कपाळावर हात फिरवून एक खडा काढून दिला. तो अक्कांनी आपल्या गळ्यात ताईत म्हणून घातला. चिमडला श्रीलक्ष्मीबाईअक्का येऊन राहिल्यावर चिमडच्या महाराजांनी या खड्यातील निम्मा भाग मागितला. 'सगळाच खडा तुमचा आहे. निम्मा तरी कशाला करता' असे अक्का म्हणाल्या. हे ऐकून चिमडच्या महाराजांना वाईट वाटले आणि काही दिवसातच तो ताईत व खडा नाहिसा झाला. मठात शोधाशोध केली. पण सापडला नाही. यावेळी श्रीचिमडचेमहाराज हे रबकवीला गेले होते. तेथून आल्यावर त्यांना लक्ष्मीअक्का थोड्या नाराज दिसल्या. त्याबाबत विचारता ताईत व खडा सापडत नसलेचे त्या म्हणाल्या. हे ऐकून चिमडचे महाराज म्हणाले, 'अक्का, खड्यापैकी निम्मा खडा

आम्हाला द्याल तर ताईत व खडा मिळेल.' अक्कांनी याला संमती देताच तो खडा त्यांच्या समोर येऊन पडला. यावरून या खड्याचे महत्त्व किती होते हे कळल्यावाचून रहात नाही.

अक्कांसह श्रीनिंबरगीकरमहाराज प्रवासाला बाहेर पडले होते. प्रवास करता करता ते चिमड येथे आले. साधुमहाराजांचा सध्या जेथे मठ आहे, तेथे पूर्वी ओसाड जागा होती. या जागेवर महाराज आले आणि या जागेवर त्यांनी कापूर लावला आणि तुम्हीही तुमच्या हाताने थोडा कापूर यात टाका असे महाराज श्रीलक्ष्मीबाईअक्कांना म्हणाले. हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'आपण कापूर टाकलात तर मग मी कशाला कापूर टाकला पाहिजे?' तेव्हा महाराज म्हणाले, 'सांगितल्याप्रमाणे आपण करावे.' यानुसार अक्कांनी कापूर घातला. यावेळी महाराज म्हणाले की, 'अक्का ही जागा आता तुम्हाला उजाड दिसते आहे, पण आणखी काही काळाने या जागेवर सत्पुरुषाचे मंदिर होणार आहे आणि मठ होणार आहे. इतकेच नव्हे तर आणखी काही दिवसांनी तुलाही त्या मठातच रहावे लागणार आहे.' हे वाक्य पुढे खरे ठरले. या जागेवरच श्रीसाधुमहाराजांचे मंदिर बांधले आणि मठ झाला.

श्रीनिंबरगीकरमहाराजांनी आपल्या निर्याणकाळापूर्वी थोडे दिवस अक्कांना विचारले, आमचे पश्चात तुमचे संगोपन बरोबर होणार नाही, त्यातून बायकांची गोष्ट. यासाठी तुम्हाला पुरूष करून काडसिद्धांचे स्थानी अगर दुसरीकडे ठेवतो. त्यास तुमची संमती आहे काय? असे विचारताच, अक्कांनी विचार करून सांगते असे उत्तर दिले. दुसरे दिवशी त्या महाराजांना म्हणाल्या की, पुरुषाचा देह घेतल्याने दुसरा जन्म घेतल्यासारखे होऊन आजपर्यंत केलेले साधन व्हावे तसे सुफलित होणार नाही. हे ऐकून महाराज म्हणाले, 'तुम्ही अशाच रहा'.

श्रीचिमडचेमहाराज निंबरगीला महाराजांचे दर्शन घेण्यास गेले असता, महाराज श्रीलक्ष्मीबाईअक्कांकडे बोट दाखवून म्हणाले, रामभाऊ, आतापर्यंत आम्ही या अक्काला पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळले आहे. यापुढे आमचा भरवसा नाही, तेव्हा आमचे पश्चात तुम्ही अक्कांना आपल्या बहिणीप्रमाणे सांभाळायचे आहे. महाराजांनी देह ठेवल्यानंतर चिमडचे महाराज श्रीलक्ष्मीबाईअक्कांना चिमडला घेऊन आले व अक्कांनी चिमडमध्ये निर्वाणापर्यंत आपले आयुष्य व्यतीत केले.

इ.स. १८९१ साली श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवला. देह ठेवणेपूर्वी श्रीचिमडच्या महाराजांनी श्रीलक्ष्मीबाईअक्कांना या मठाची जबाबदारी आता तुमच्यावर आहे असे सांगितले. त्याप्रमाणे श्रीलक्ष्मीबाईअक्का इ.स. १८९१ पासून मठाचा कारभार पाहू लागल्या. चिमडच्या मठाच्या समोरच एक तुळशी वृंदावन आहे. त्या वृंदावनाजवळ त्या बसलेल्या असायच्या. श्रीचिमडच्या महाराजांची मुले अगदी लहान होती. श्रीमाईसाहेबमहाराज याही सोबत होत्या. या सर्वांचा सांभाळ श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी केला.

श्रीचिमडच्या महाराजांच्या पश्चात महाराजांना वचन दिल्याप्रमाणे अक्कांनी ४ वर्षे प्रपंच व परमार्थ सांभाळला. इ.स. १८९५ साली अक्कांची प्रकृती बिघडली. आपला अंतकाळ जवळ आला आहे हे त्यांनी

ओळखले. त्यांना श्रीनिंबरगीकरमहाराज म्हणाले होते की, ''अक्का, तुझ्या मातोश्रींचे देहावसान झाल्यावर तू या भूतलावर २ वर्षे राहशील.'' अक्कांच्या मातोश्रींचे देहावसान होऊन दोन वर्षे झाली होती. त्यामुळे त्या, मी लवकर देहत्याग करणार असे जवळच्या व्यक्तींना सांगू लागल्या.

इ.स. १८९५ च्या सप्टेबर महिन्यात श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे चिमडला गेले होते. तेथे गेल्यावर अक्का देह ठेवणार आहेत असे त्यांना कळले. तेव्हा त्यांनी अक्कांचे पाय धरले व म्हणाले, 'अक्का, तुम्ही असे करू नका, चिमडच्या महाराजांची मुले लहान आहेत. मठाची जबाबदारी तुमच्यावर आहे. त्यामुळे आपण आणखी काही वर्षे रहावे.' हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'हणमंता, आपल्या मुलांची काळजी वहायला श्रीचिमडचे महाराज समर्थ आहेत.' श्रीतात्यासाहेबमहाराज व भक्त मंडळींनी त्यांना अत्यंत आग्रह केला. शेवटी सर्वांचा आग्रह व निष्ठा पाहून अक्का म्हणाल्या, 'मी जास्तीत जास्त २ वर्षे राहिन.' त्याप्रमाणे अक्का २ वर्षे चिमडला होत्या.

इ.स.१८९७ साल उजाडले. निरवानिरव करण्यास त्यांनी सुरवात केली. चिमडच्या महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीदाजीसाहेबमहाराज यांना अक्कांनी सर्व माहिती दिली आणि उपस्थित सर्व भक्तमंडळींना सांगितले की, 'बाबानो यापुढे श्रीदाजीसाहेबच मठपती होऊन संप्रदाय चालविणार आहेत. तुम्ही सगळ्यांनी त्यांच्या आज्ञेत रहावे.'

श्रीचिमडच्या महाराजांचे द्वितीय चिरंजीव श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे बेळगावला शिकायला होते. त्यांना चिमडास घेऊन येण्यास एका शिष्याला पाठविले. श्रीनारायणमहाराजांना घेऊन तो गृहस्थ आला. श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी श्रीनारायणमहाराजांना जे काही सांगायचे ते सर्व सांगितले.

इ.स. १८९५ सालातील अश्विन शुद्ध प्रतिपदा उजाडली. या दिवशी मी देह ठेवणार आहे असे त्या म्हणाल्या. पण याच दिवशी चिमडच्या महाराजांच्या पत्नी प.पू.मातोश्री आईसाहेबमहाराज या अस्पर्श राहिल्या. हे कळताच श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी निर्याणाचा बेत रद्द केला आणि दोन दिवस पुढे ढकलला आणि सर्वांना सांगून सवरून, सर्वांचा निरोप घेऊन, महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी वयाच्या ५० व्या वर्षी म्हणजेच आश्विन शु. तृतीया शके १८१९ इ.स. १८९७, बुधवारी सकाळी ९.४५ वाजता महाप्रयाण केले.

***

प.पू.श्रीचंद्रशेखर तथा अण्णामहाराज केळकर

जन्म
कार्तिक शु.५,शके १८६६
दि.२३.१०.१९४४

निर्याण
अधिक आश्विन शु.०७ शके १९४२
दि.२३.०९.२०२०

माझे आजोबा प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व माझी आजी सौ.सीतावहिनी केळकर यांच्या पोटी कार्तिक शुद्ध ५ (पांडव पंचमी) शके १८६६, दि.२३.१०.१९४४ रोजी इचलकरंजी येथे गोवंडे यांचे घरी एक पुत्ररत्न जन्माला आले. बारश्या दिवशी त्याचे नांव '**चंद्रशेखर**' असे ठेवणेत आले. यावेळी एक विशेष घटना घडली. प.पू.श्रीदादामहाराज कोटणीस यांना बारश्याच्यावेळी श्रीलक्ष्मीबाई अक्का यांनी आपल्या वस्त्राची (साडीची) शिवलेली कुंची घातली होती. ती कुंची कोटणीसांचे घरी जतन करून ठेवली होती. जेव्हा आमच्या अण्णांचे बारसे ठरले त्यावेळी प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या कन्या, कल्लव्वाक्का यांनी ती कुंची आमच्या श्रीअण्णांच्या मस्तकी घातली. याचाच अर्थ श्रीअण्णांना श्रीलक्ष्मीबाई अक्का यांचा कृपाप्रसाद श्रीकल्लव्वाक्का यांच्या माध्यमातून प्राप्त झाला. या संदर्भात आमचे श्रीदासराममहाराज यांनी खालीलप्रमाणे नोंद करून ठेवली आहे :- ''**चंद्रशेखरचे बारसे थाटाने इचलकरंजीत झाले. कोटणीसदादांना लक्ष्मीअक्कांनी मस्तकी बारशात घातलेली कुंची कल्लव्वाक्कांनी चंद्राचे मस्तकी घातली. श्रीतात्यासाहेबांनी भक्तवत्सलता सिद्ध केली. यामुळे तो कीर्तन परंपरा चालवील यात मला शंका नाही.**''

पुढे श्रीअण्णांचे बालपण त्यांचे आजोबा श्रीमामामहाराज, आजी सौ. इंदिराबाई केळकर व आई-वडील श्रीदासराममहाराज व सौ. सीतावहिनी यांचे सानिध्यात आनंदात जाऊ लागले. पुढे श्रीदासराममहाराज यांना सूर्यकांत, अनल व अनिलप्रभू असे तीन सुपुत्र झाले. त्यामुळे या चौघा भावंडांना आपल्या घराण्यातील परंपरा, संस्कार यांचे सहजच धडे मिळाले. त्यामुळे त्यांचे जीवन हे विशिष्ट विचारांनी घडत जाऊ लागले. सौ. सीतावहिनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील आनंदाने संसार करीत होत्या. त्यांना ही चारही मुले त्यांच्या कामात मदत करत असत. त्या काळात अनेक कष्टाची कामे करावी लागत. सौ. वहिनी आपली दमणूक बाजूला ठेऊन, ही मुले दमली आहेत असे म्हणून त्यांना खाऊ-पिऊ घालत आणि सर्वांना अभिमानाने सांगत की, 'मी जे काही चार घास मुलांना देते, ते ही चारही मुले आनंदाने गोड मानून खातात. कारण माझ्या मुलांच्या मुखात अमृत आहे.' श्रीदासराममहराज हे कीर्तन, निरूपण, प्रवचन इत्यादिंमध्ये रंगून गेलेले असत.

श्रीअण्णांचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण सिटी हायस्कूलमध्ये झाले. कॉलेजसाठी त्यांनी कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. काही दिवस राहिले. परंतु नेहमी अनेक माणसांच्यात राहण्याची सवय असल्याने त्यांना तेथे रहाणे मानवले नाही. तसेच सायंकाळी घरातील नित्यकीर्तन ऐकण्याची सवय असल्याने तीही अस्वस्थता वाटू लागली. या कारणाने ते पुढील शिक्षण घ्यायचे नाही या विचाराने सांगलीत परत आले. मग काही दिवसांनी श्रीमामांनी अण्णांच्या नोकरीसाठी सांगली शिक्षण संस्थेत शिफारस केली. त्याप्रमाणे अण्णांना या संस्थेत नोकरी मिळाली.

योग्य वेळी श्रीअण्णांचा विवाह, श्री. घारपुरे यांच्या चि.शैला या कन्येशी झाला. लग्नानंतर माझ्या आईचे नांव 'रोहिणी' असे ठेवणेत आले. कालांतराने अण्णांना पहिली ज्योती नावाची कन्या झाली. पण ती अल्पवयीन ठरली. त्यानंतर माझा (दीपक) व अंजनी हिचा जन्म झाला.

सांगली शिक्षण संस्थेमध्ये नोकरी करत असताना त्यांचेवर फार जबाबदारी असे. सर्व संचालक मंडळ यांची मने सांभाळावी लागत. तसेच बाहेरची संस्थेशी संबंधित असणारी माणसेही सांभाळावी लागत. याचा उत्तम समतोल श्रीअण्णांनी कौशल्याने राखला. ऑफिसमध्ये काम करताना त्यांची शिस्त, विनयशीलता, वक्तशीरपणा, टापटीप व नोंदणीची पद्धत ही वाखाणण्यासारखी आदर्श होती. कोणत्याही कामात शंका राहणार नाही याची ते दक्षता घेत. या साऱ्या विशेष गुणांमुळे त्यांचेवर सर्व संचालकांची व सहकाऱ्यांची मर्जी बसली. या साऱ्यामुळे सहजच त्यांचे सहकारी, शिपाई यांच्या आचार-विचारात उत्तम बदल घडले. आमचे अण्णा सर्वांना जपत असत. कोणास काही हवे-नको ते पाहून त्यास मदत करीत असत. अडी-अडचणीचेवेळी स्वतः जास्त काम करून सांभाळून घेत असत. थोडक्यात आमचे अण्णा हे संस्थेतील सर्वांना प्रिय व हवेहवेसे असे व्यक्तिमत्व होते. अशा पद्धतीने अण्णांनी या संस्थेत ३६ वर्षे झोकून देऊन काम केले व श्रीदादांच्या प्रकृतीच्या कारणामुळे त्यांनी चार वर्षे आधी स्वेच्छा निवृत्ती घेतली. संस्थेने त्यांना '**आदर्श सेवक**' पुरस्कार देऊन गौरविले होते.

श्रीअण्णांना त्यांचे पितृदेव श्रीदासराममहाराज यांचा अनुग्रह एका गणेशचतुर्थीला, शनिवार या दिवशी प्राप्त झाला. त्याप्रमाणे त्यांचे साधन सुरू झाले. नोकरी करीत असताना देखील शाळेतील जबाबदारी सांभाळून सायंकाळी नित्यकीर्तनासाठी आवर्जून वेळेवर येत असत. श्रीदादांच्या कीर्तनात पहिल्यापासून श्रीअण्णांनी पेटीची उत्तम साथ केली. नुसती पेटीच वाजविली असे नव्हे तर, कीर्तनात येणारे अभंग, चरण त्यांना मुखोद्गद होते. पेटी वाजवता वाजवता ते चरण उत्तम पद्धतीने खड्या आवाजात म्हणत असत. श्रीदादांचा कीर्तनातील विषय हा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण, अनुभवजन्य असा असे. तो सर्व विषय सर्वांगाचे कान करून आमच्या अण्णांनी चित्तात साठवला, नव्हे तो मुरलाच गेला. व्यावहारिक दृष्टीने श्रीदासराममहाराज यांचे साठीशांत, एक्काहत्तरी, पंचाहत्तरी, सहस्रचंद्रदर्शन असे सोहळे अण्णांनी आपल्या कुटुंबियांसह उत्तम नियोजन करून आनंदाने, थाटात साजरे केले. त्याबरोबरच श्रीदादांच्या कीर्तनाचा रौप्यमहोत्सव, त्रितपमहोत्सव व श्रीरामनिकेतन येथील कीर्तनाचा अमृतमहोत्सव असे पारमार्थिक सोहळे देखील तितक्याच उत्कृष्ट पद्धतीने अण्णांनी साजरे केले.

साधारण १९९० म्हणजेच श्रीदादांच्या ७०-७१ वयानंतर श्रीदादा फारसे बाहेर जात नसत. त्यामुळे श्रीदादांच्या आज्ञेने अण्णा बाहेरील अनेक ठिकाणी प्रवचन-कीर्तनासाठी जात असत. त्यांचे प्रवचन-कीर्तन ऐकून श्रोत्यांना दादांचे कीर्तन ऐकतोय असे जाणवत असे. श्रीदादांच्या शेवटच्या काळात अनेकवेळा रात्री अण्णांना जागरण होत असे. तरी देखील अण्णांनी श्रीदादांची मनोभावे, हसतमुखाने सर्वतोपरी सेवा केली. कोणतीही कसर ठेवली नाही. श्रीदादांनी २५ जुलै, २००१ रोजी कीर्तनाचे अनुसंधानात देह ठेवला. त्याचे

दुसऱ्या दिवशी पासून म्हणजेच २६ जुलै, २००१ पासून आपल्या घरात सुरू असलेले नित्य अखंड हरिकीर्तन श्रीअण्णांनी पुढे चालू ठेवले. श्रीअण्णांचे कीर्तन म्हणजे सर्वसामान्य श्रोत्यांना सुलभ भाषेत मिळणारे नवनीतच होते. सर्वप्रकारचा विषय ते अत्यंत मार्मिक व सोप्या भाषेत श्रोत्यांच्या चित्तात बिंबवत असत. श्रीदासराममहाराज यांच्या समाधी स्थापना सोहळ्याचेवेळी श्रीगुरूलिंगजंगममहाराज यांचे अधिकारी पणतू प.पू.श्रीगुरूलिंगप्पामहाराज यांनी आमचे अण्णांना, साधकांना अनुग्रह देण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे आमच्या श्रीअण्णांनी अनेक साधकांना अनुग्रह देऊन मार्गदर्शन केले व त्यांना कृतार्थ केले.

श्रीअण्णांनी वार्षिक उत्सव, वर्षभरातील संतांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, अधिक महिन्यातील विशेष कार्यक्रम अशा साऱ्याचे उत्तम नियोजन केले व प्रत्येक कार्यक्रम हा अत्यंत समर्पक पद्धतीने साजरा केला. अण्णांच्या विशेष स्वभावामुळे विविध संप्रदायातील अनेक संतांना ते आपलेसे वाटत. प्रत्येक भेटीमध्ये उभयतांचे प्रेम उचंबळून येई व अष्टसात्विक भाव निर्माण होत असत. सर्व संतांनी आमच्या अण्णांचा 'अण्णा म्हणजे निर्मळ, प्रेमळ, सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व' असा अनेकवेळा उल्लेख केलेला आहे. अण्णांचे ठिकाणी धर्म, पंथ, जात, संप्रदाय या कशाचाच भेद नव्हता. त्यांना सर्वजण सारखेच होते.

इतक्या साऱ्या व्यापातूनही ते कुटुंबातील सर्वांकडे बारकाईने लक्ष देत असत. त्यांची विचारपूस करीत असत. त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे पदार्थ, वस्तु आणून देत असत. नातवंडांवरही त्यांचे विशेष प्रेम होते. आपले पितृदेव श्रीदासराममहाराज लिखित वाङ्मयावरील अनेक ग्रंथांचे संपादन, प्रकाशन श्रीअण्णांनी केले.

आमच्या कुटुंबियांनी अण्णांची साठीशांत, एक्काहत्तरी पंचाहत्तरी असे सोहळे करण्याचा मानस जेव्हा जेव्हा व्यक्त केला, तेव्हा तेव्हा ते एकच म्हणाले की, 'माझा कोणताही विशेष सोहळा करायचा नाही' व त्याप्रमाणे साठीशांतीच्यावेळी त्यांनी आपला सोहळा न करता, चिमड यात्रा आयोजित करून तेथे कीर्तनसेवा केली. तसेच एक्काहत्तरी व पंचाहत्तरीच्या निमित्ताने आपण एकत्र साधन करू व प्रसाद भोजन करू असा मानस व्यक्त केला व त्याप्रमाणेच हे दोन्ही सोहळे घरगुती पद्धतीनेच साजरे केले गेले.

पुढे पुढे अण्णांचा गुडघेदुखीचा त्रास वाढू लागला. तरी त्यावर मात करत ते सर्व नित्यक्रम कटाक्षाने पार पाडत असत. कधीही त्यांची कोणत्याही कार्यक्रमासाठी अनुपस्थिती नसे. डेरवण येथे त्यांच्या दोन्ही गुडघ्यांची प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली. त्यासाठी त्यांना आठ दिवस तेथे रहावे लागले. तरी देखील त्यांनी दवाखान्यात आपला कीर्तनाचा नेम कटाक्षाने सांभाळला. हे पाहून तेथील डॉक्टर व सर्व स्टाफ हे खूपच अवाक् झाले. त्यांनाही अण्णांचे विशेषत्व - संतत्व जाणवले. तसेच त्यांचे दोन्ही डोळ्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशनही झाले. याहीवेळी त्यांचा नित्य कीर्तनाचा नेम चुकला नाही.

इ.स. २०२० साली श्रीदासराममहाराज यांची जन्मशताब्दि श्रीअण्णांच्या नियोजनाखाली व मार्गदर्शनाखाली अनेक विशेष कार्यक्रमांसह, प्रवचन कीर्तनांसह थाटात साजरी होत होती. याच दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. तपासणी

केली असता, लगेचच बायपास ऑपरेशन करण्याची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. परंतू, हे मेजर ऑपरेशन असल्याने व त्यासाठी अनेक दिवस कीर्तनाचा नेम अंतरेल या कारणासाठी अण्णांनी ऑपरेशन करण्यास नकार दर्शविला. या परिस्थितीमुळे जन्मशताब्दि महोत्सव कसा पार पडणार याची मला काळजी वाटू लागली. परंतु त्यांच्याच आशीर्वादाने हा उत्सव निर्विघ्नपणे उत्तमरितीने चालू होता. बायपास करून घेणेसाठी सर्वांनी व डॉक्टरांनी खूपच आग्रह धरला. त्यावर शेवटी श्रीअण्णा म्हणाले की, मला गुरूतृतीया पर्वकाळाचे कीर्तन करायचे आहे. त्यासाठी मला घरी सोडा. उत्सव संपल्यानंतर मी ऑपरेशन करून घेईन. त्याप्रमाणे डिस्चार्ज देणेची परिस्थिती नसताना देखील अण्णांच्या आग्रहाने डॉक्टरांनी डिस्चार्ज दिला. अत्यंत अशक्तपणा असून, बोलण्याची ताकद नसतानाही श्रीअण्णांनी गुरूतृतीयेच्या पर्वकाळाचे कीर्तन रात्री १०.३० ते १२.३० पर्यंत धुमधडाक्यात केले, याचे आजही आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटते.

उत्सव संपल्यावर कोल्हापूर येथे अण्णांचे बायपास ऑपरेशन पार पडले. तेथेही त्यांचा कीर्तननेम चुकला नाही. त्यानंतर हळूहळू अण्णांची तब्येत पूर्ववत झाली. परंतु मार्च २०२० साली कोरोना परिस्थितीमुळे लॉकडाऊन सुरू झाला. त्यामुळे लोकांचे येणे-जाणे थांबले. कीर्तनही मर्यादित श्रोत्यांच्या उपस्थितीत थोडक्यात करावे लागले. नेहमी असंख्य माणसांच्यात राहण्याची सवय असल्याने या परिस्थितीचा त्यांचे मनावर फार परिणाम झाला. त्यातच त्यांना पुन्हा छातीत दुखू लागले. तपासणीअंती ऑपरेशनचेवेळी घातलेल्या टाक्यांपैकी एक टाका उसवला आहे व पुन्हा ऑपरेशन करून घ्यावे लागेल असे डॉक्टरांनी सांगितले. त्यासाठी अण्णांना पुन्हा कोल्हापूर येथे नेले व जरुरीप्रमाणे ऑपरेशन करून घेतले. परंतु त्यानंतर फार काही सुधारणा झाली नाही. या साऱ्यामुळे त्यांची प्रकृती खूपच नाजूक झाली होती, तरी देखील अधिक महिन्यापासून मी मंदिरात कीर्तन सुरू करणार असा त्यांनी निश्चय व्यक्त केला व त्याप्रमाणे मंदिरात कीर्तन सुरू देखील केले. हा सप्टेंबर महिना व अधिक आश्विन महिना होता.

दि.२२ सप्टेंबर, २०२० या दिवशी रात्री अण्णांना भयंकर धाप लागली. कफ साठला. जागरणही झाले. पहाटे त्यांना थोडी झोप लागली. सकाळी उठल्यावर ते आवरण्याची गडबड करु लागले. कारण त्यावेळी लॉकडाऊन मुळे सकाळी ८-८.३० दरम्यान नित्यकीर्तन असे. अण्णांना खूपच धाप लागली असल्याने मंदिरात जाणे अशक्य होते. म्हणून रामकुटीतच त्यांनी २३ सप्टेंबरचे नित्यकीर्तन केले. त्यानंतर त्यांच्या इच्छेविरुद्ध पण आवश्यक असल्याने अण्णांना भारती हॉस्पिटलमध्ये दाखल केले. कोरोनाची बंधने असल्यामुळे त्यांच्या संपर्कात कोणासही जाता येत नव्हते. अण्णांना बरे वाटावे अशी आम्ही महाराजांकडे मनोमन प्रार्थना करत होतो. परंतु विधिलिखित काही वेगळेच होते. श्वसनसंस्था खूपच नाजूक झाली होती आणि त्याठिकाणी संसर्गही फार झाला होता. त्यामुळे खूप उपचार करूनही यश आले नाही. शेवटी अधिक आश्विन शु.७ शके १९४२ मंगळवार दि.२३.०९.२०२० रोजी सायंकाळी ४.४५ वाजता आपले पितृदेव व सद्गुरू श्रीदासराममहाराज यांच्या स्मरणात व कीर्तनाच्या अनुसंधानात आमच्या अण्णांनी वयाच्या ७६ व्या वर्षी महाप्रयाण केले.

***

श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री

जन्म
श्रावण व.८, शके १७७७ (गोकुळ अष्टमी)
सोमवार दि.०३.०९.१८५५

निर्याण
आश्विन व.०३ शके १८२७
दि.१६.१०.१९०५

श्रीबाळकृष्णपंत कुलकर्णी हे बाळेकुंद्री येथे रहात होते. ते मोठे कर्तबगार पुरूष होते. ते रोज अन्नदान करीत. त्यांच्या घरी रोज पुराण, कीर्तन, गुरुचरित्राचे पारायण असायचे. या श्रीबाळकृष्ण पंतांना चार पुत्र झाले. त्यापैकी थोरले श्रीरामचंद्रपंत हेही शूरवीर होते, मातृपितृभक्त होते. या श्रीरामचंद्रपंतांचा विवाह बेळगाव जवळील दड्डी येथील श्री. नृसिंहपंत कुलकर्णी यांची कन्या गोदाक्का यांचेशी झाला. गोदाक्कांचे सासरचे नाव 'सीता' ठेवणेत आले. या दांपत्याचेपोटी श्रावण वद्य अष्टमीला (गोकुळ अष्टमी) शके १७७७ सोमवार दि. ०३.०९.१८५५ रोजी दड्डी येथील मातुलगृही पुत्ररत्न जन्माला आले. गोकुळाष्टमीला जन्म म्हणून मुलाचे नांव 'श्रीकृष्ण' ठेवणेत आले. परंतु श्रीकृष्णाच्या वडिलांच्या घरी सगळे दत्तोपासक असल्याने या मुलाचे नाव बदलून त्याला 'दत्तू' असे म्हणू लागले आणि तेच नाव पुढे रूढ झाले. आणि हे 'दत्तू' म्हणजेच आमचे 'श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर' होत.

श्रीपंतमहाराज हे बालपणापासूनच हुशार होते. त्यांची स्मरणशक्ती फार चांगली होती. आठव्या वर्षी त्यांचा व्रतबंध झाला. बाळेकुंद्रीत शिक्षणाची सोय नसल्याने श्रीपंतमहाराजांना दड्डी येथे त्यांचे मामांकडे पाठविणेत आले. दड्डी येथे कानडी शाळा असल्यामुळे पंतांचे प्राथमिक शिक्षण कानडीमधून झाले. पण मामांच्या घरची मातृभाषा ही मराठी असल्याने त्यांना मराठीचा अभ्यास करणे सोपे झाले. लहानपणापासून पंतांना अध्यात्मिक ग्रंथ वाचनाची आवड निर्माण झाली. देवपूजा ते नित्यनेमाने करीत असत. श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वती यांच्यावर त्यांची श्रद्धा जडली. इ.स.१८७२ च्या सुमारास पंत हे प्राथमिक शिक्षण संपून इंग्रजी शिक्षणासाठी बेळगाव येथील 'लंडन मिशन स्कूल' या शाळेत दाखल झाले. या काळात त्यांची 'बालावधूत' या सिद्धपुरुषाची भेट झाली आणि कृपेचा लाभ झाला. या श्रीबालावधूतांना 'बालमुकुंद' असेही संबोधितात. या श्रीबालमुकुंदानी कईगुद्दी येथे पंतांना अनुग्रह केला. हा दिवस होता आश्विन व. १२ (गुरूद्वादशी) इ.स. १८७५. यानंतर श्रीबालमुकुंदांनी पंतांकडून योगसाधना व उपासना करवून घेतली. पुढे काही दिवसांनी श्रीबालमुकुंदांनी पंतांना सात दिवस एकटे बसवून, प्राणवायू ब्रह्मांडात नेऊन परत पूर्वस्थितीत आणण्याचा क्रम समजून दिला. याप्रमाणे श्रीपंतांनी साधना केली.

यानंतर श्रीबालमुकुंदांनी पंतांना आज्ञा केली की 'तू हा अवधूत संप्रदाय पुढे चालव.' हा मार्ग चालविण्यास तूच एक योग्य पुरूष आहेस. यानंतर श्रीबालमुकुंदांनी पंतांच्या मस्तकावर हात ठेवला व म्हणाले, 'तुझ्या वाचेतून जे निघेल ते सत्य होईल. संत महंत तुझ्या भेटीला येतील' आणि इतर भक्तांना उद्देशून

म्हणाले, 'हा सांगेल तसे ऐकत जाल व त्याचे आज्ञेत रहाल तर तुमचे कल्याण होईल.' याप्रमाणे पंतांनी इ.स.१८७९ पासून अनुग्रह द्यायला सुरवात केली.

श्रीपंतमहाराज हे त्या काळातील पब्लिक परीक्षा पास झाले होते. या काळात याला फार मान होता. म्हणून त्यांनी शिक्षकाच्या जागेसाठी 'लंडन मिशन स्कूल'मध्ये अर्ज केला. त्याप्रमाणे त्यांना शिक्षकाची नोकरी लागली. यानंतर इ.स.१८८० मध्ये ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. श्रीपंतांचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर, त्यांचा विवाह त्यांच्या मामांची मुलगी कु.यमनाक्का यांचेशी वैशाख व.१ इ.स. १८८२ साली झाला.

इ.स.१८८९ साली पंतांचे सद्गुरू श्रीबालमुकुंद यांनी देह ठेवला. सद्गुरूंनी देह ठेवल्यानंतर पंतांच्या विचारशक्तीला मोठी चालना मिळाली. त्यांच्या मनात अनेक अध्यात्मिक विचार घोळू लागले आणि त्यांनी उपनिषदे, गीता, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांचा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. यानंतर राजयोगाचा अभ्यास केला आणि तारकयोग प्राप्त करून पूर्णता गाठली.

श्रीपंतांचे आजोबा श्री.बाळकृष्णपंत यांना आपण संन्यासदीक्षा घ्यावी व संसार सोडून निजात्मसुख भोगावे असे मनाने वाटू लागले. त्याप्रमाणे ही मनोकामना त्यांनी पंतांपुढे मांडली. पंतांनीही त्यांना संन्यासदीक्षा घेणेस अनुमती दिली. याप्रमाणे संन्यासदीक्षा घेणेचा दिवस ठरला व संन्यासदीक्षा देण्यास अधिकारी पुरूष कोण? असा प्रश्न निर्माण झाला. बरीच खलबते झाली. पण पुढे होऊन कोणी दीक्षा देईनात. शेवटी पंतांचे मावसभाऊ श्रीगणपतराव पंतांना म्हणाले, 'श्रीबालावधूतांची दीक्षा त्रिलोकात पवित्र आहे. त्याचा तू अधिकारी. मग आजोबांना उपदेश द्यायला तुझ्याशिवाय कोण अधिकारी आहे?' याप्रमाणे श्रीपंतांनी आपल्या आजोबांना संन्यासदीक्षा दिली.

श्रीपंतांना दि. २१.०१.१८९१ रोजी पुत्ररत्न झाले. त्याचे नाव बाळाराम ठेवले. पण हा पुत्र अल्पायुषी ठरला. दि.०९.०९.१८९२ रोजी बाळारामाचे देहावसान झाले. इ.स. १९०३ साली त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि पुढीलवर्षी म्हणजेच इ.स.१९०४ साली त्यांच्या पत्नी सौ. यमनाक्का या निवर्तल्या. याचे पंतांना अतीव दुःख झाले.

श्रीपंतांनी आपल्या आयुष्यात भरपूर पदे, अभंगरचना, दोहे केले. ते 'दत्तप्रेमलहरी' या ग्रंथाच्या रुपाने उपलब्ध आहेत. श्रीपंतांचे अनेक अधिकारी शिष्य आहेत. पण त्यातील प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर हे प्रमुख होत. त्यांनी खऱ्या अर्थाने पंतांचे पश्चात अवधूत संप्रदाय चालविला.

१९०४ च्या अखेरीस श्रीपंतांच्या प्रकृतीत जास्त बिघाड झाला. त्यांना उदराची व्यथा जडली. १९०५ सालचा गोकुळाष्टमीचा उत्सव हा श्रीपंतांच्या उपस्थितीतला शेवटचा उत्सव होता. पंत कफनी वगैरे घालून

भजनात बसलेले होते. भजन म्हणण्याचीही त्यांच्या अंगात शक्ती नव्हती. तरीही त्यांनी 'जागृती जागृती जागृती। दत्त जन्माची स्मृति ।।ध्रु।।' हे पद म्हटले आणि ते शेवटचेच ठरले. यानंतर ते फारसे बोलेनासे झाले. फक्त मधून मधून बाळ किंवा बाळप्पा एवढेच शब्द उच्चारित. पण त्यांची वृत्ती मात्र शांत आणि आनंदी होती. यावेळेलाच परगावहून एक गृहस्थ अनुग्रह मागावयास आला. हे बघून पंत म्हणाले, 'अरे माझ्या बाळाप्पांनी, मी त्यांची आज्ञा पाळतो की नाही हे बघण्यासाठी याला पाठविले आहे रे' असे म्हणून त्या गृहस्थाला अनुग्रह दिला. हा श्रीपंतांचा शेवटचा शिष्य.

शेवटी श्रीपंतांना श्वास लागला. उपस्थित भक्तमंडळींनी 'ॐ नमःशिवाय' या मंत्राचा जप सुरू केला. श्रीपंतांच्या मातोश्रींनी आणि बंधुभगिनींनी त्यांची विधिवत पूजा केली आणि श्रींचे तीर्थ यांच्या मुखात घातले. श्रीपंतांनी शेवटी सगळ्यांकडे प्रेमदृष्टीने पाहिले आणि आश्विन व. ३ शके १८२७ दिनांक १६.१०.१९०५ रोजी वयाच्या ५१ व्या वर्षी महानिर्वाण केले.

***

श्रीदासराममहाराज कृत श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री यांची आरती

आरती अवधूता । आदिनाथा गुरूदत्ता ।
देवाधिदेव तुम्ही । बालमुकुंद सत्ता ।।१।।
अदेह खरे तुम्ही । म्हणोनिया विदेह ।
जगदोद्धारालागी । दावियेला काय देह ।।२।।
करवीरी तव मूर्ती । जेथे सिद्धांची वसती ।
सागरापरी लीला । दासराम कळेचिना जगती ।।३।।

प.पू.श्रीराधाबाईअक्का

निर्याण
आश्विन व. ३/४ शके १८०९
इ.स. १८८६

श्रीराधाबाईअक्कांचा जन्म सुमारे २०० वर्षांपूर्वी झाला. श्रीराधाबाईअक्कांचे माहेरचे आडनांव वेंगुर्लेकर होते. वयाच्या ८ व्या वर्षी श्रीराधाबाईअक्कांचा विवाह झाला. श्रीराधाबाईअक्का पतीबरोबर संसार करु लागल्या. श्रीराधाबाईअक्कांच्या वयाच्या चाळीसाव्या वर्षापर्यंत त्यांचे पतीराज होते. त्यानंतर ते निवर्तले. श्रीराधाबाईअक्कांना एक कन्या होती. तिला हरिपूर येथील गद्रे घराण्यात दिली. श्रीराधाबाईअक्कांना एक दीर होता. त्याला सारखे फेपरे यायचे. या दीराला सांभाळण्याची जबाबादारी श्रीराधाबाईअक्कांवर आली. राधाबाईअक्का शिकलेल्या नव्हत्या. त्यामुळे पतीराजांच्या निधनानंतर आपण व जवळ असणारा दीर या दोघांनी आता काय खावे, असा मोठा प्रश्न राधाबाईअक्कांसमोर निर्माण झाला. शेवटी अन्नत्याग करावा हा विचार त्यांचे मनात आला. अशास्थितीत शेजारधर्म या नात्याने लोकांनी यांना आग्रहाने खायला घातले. याप्रमाणे १४ दिवस हा उपक्रम सुरू होता. पण १४ दिवस झाल्यावर मात्र, कोणाचेही न ऐकता श्रीअक्कांनी पुन्हा अन्नत्याग केला. अन्नपाणी वर्ज्य केले आणि त्या अवस्थेत भगवंताचा धावा करू लागल्या. आश्चर्य असे की, पंधराव्या दिवशी श्रीअक्कांचे स्वप्नात एक तेजःपुंज ब्राह्मण आला आणि तो ब्राह्मण म्हणाला, ''तू काही शोक करू नकोस. आता तू नाम (अनुग्रह) घे.'' हे वाक्य ऐकल्यावर श्रीअक्का म्हणाल्या, 'महाराज अशा अवस्थेत मी कोणाकडे जाऊ आणि कोणाकडून नाम घेऊ ते मला सांगा.' हे ऐकल्यावर तो ब्राह्मण म्हणाला, 'मीच तुझा गुरू आहे. मीच तुला नाम देतो.' हे वाक्य ऐकल्यावर श्रीअक्कांनी त्या ब्राह्मणाचे पाय धरले. तेव्हा त्या ब्राह्मणाने श्रीअक्कांचे कानात तारकमंत्राचा उपदेश केला. ही सर्व स्वप्नातील घटना घडल्यानंतर अक्कांना जाग आली. हे जरी सर्व घडलेले असले तरी अक्कांसमोर आपण व आपल्या दीराने काय खायचे? हा प्रश्न उभा होताच. पण निर्धाराने आणि धीराने अक्कांनी या परिस्थितीला तोंड दिले आणि पुढच्या आयुष्याची दिशा आखली. त्याप्रमाणे पाऊलही टाकले. चार बिघे जमीन श्रीअक्कांच्या वाटणीला आली होती. त्यातच पेरणी करून त्यातील उत्पन्नातून उदरनिर्वाह चालविला आणि त्या जोडीला भगवंताचे नामस्मरण निष्ठेने सुरू केले.

श्रीअक्का या कृष्णभक्त होत्या. कृष्णावर अतोनात निष्ठा होती. मुखात सारखे गोपाळकृष्णाचे नाम असायचे. भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत असत. भिक्षेतील अन्न आधी आपल्या दीराला द्यायचे आणि त्यांना वाढून उरले, तर आपण भक्षण करायचे असे दिवस त्यांनी काढले.

श्रीअक्कांनी घरात एक देशी गाय पाळली होती. गाईला जोंधळे खाऊ घालायचे आणि तिच्या शेणातून पडलेल्या जोंधळ्याची भाकरी गोमूत्रात करावी आणि ती खावी, अशी तपश्चर्या त्यांनी सुरू केली. ही तपश्चर्या त्यांनी एक नव्हे, वीस वर्षे केली.

श्रीराधाबाईअक्कांना श्रीकृष्णाची आत्यंतिक ओढ असलेने, त्या कृष्णनामात रंगून गेलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना कृष्णदर्शन केव्हा होईल असे झाले होते. श्रीअक्कांची भक्ती पाहून गोपाळकृष्णालाच अक्कांकडे यावे वाटले. जो ब्राह्मण पूर्वी श्रीअक्कांचे स्वप्नात आला होता, तोच पुन्हा अक्कांचे स्वप्नात आला आणि म्हणाला, 'मी विष्णुरूप आहे. मी आपणहून तुझ्याकडे येत आहे. तू अन्नदान कर.' हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'माझ्या जवळ पैसा नाही, मग मी अन्नदान कसे करणार?' हे ऐकल्यावर तो ब्राह्मण म्हणाला, 'तू भिक्षा मागून अन्नदान कर. मी येताच माझी स्थापना कर.' हे वाक्य ऐकल्यावर अक्कांना मनोमन पटले की, पूर्वी जो स्वप्नात अनुग्रह दिला तो ब्राह्मण म्हणजे साक्षात गोपाळकृष्णच होता.

सांगली संस्थानचे अधिपती श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब पटवर्धन यांना स्वप्नात श्रीकृष्णाने दर्शन दिले आणि त्यांना सांगितले की, मी आपलेकडे कोठीमध्ये बरीच वर्षे आहे. त्यामुळे मला आता येथे करमत नाही. म्हणून मला तुम्ही येथून तीन मैलांवर असणाऱ्या श्रीहरिपूरक्षेत्री श्रीराधाबाईअक्का यांचेकडे पोहोचते करा. मला तेथे जाणेची उत्कंठा आहे. तेथे माझे सारे कोडकौतुक पुरे होणार आहे. ही गोष्ट स्वप्नात घडलेली असलेने प्रथम सरकारांनी याकडे कानाडोळा केला. पण भगवान गोपाळकृष्णांनी परत त्यांना स्वप्नात जाऊन आठवण करून दिली. मला श्रीराधाबाईअक्कांकडेच जायचे आहे असे सांगितले. परत आठवण करून दिली आहे म्हटल्यावर मात्र स्वतः श्रीमंत हरिपूर येथे आले आणि त्यांनी श्रीराधाबाईअक्कांना स्वप्न दृष्टांत सांगितला. हे ऐकून अक्कानांही फार आनंद झाला. सरकारी लवाजम्यासह पालखीतून श्रीमंतांनी ही कृष्णाची मूर्ती मोठ्या थाटामाटाने हरिपूरास आणली.

श्रीमंतांनी श्रीराधाबाईअक्कांची परिस्थिती काय आहे हे पाहिले होते. त्यांची परिस्थिती पाहून श्रीमंतांचे डोळे अक्षरशः पाणावले व केवळ भक्तीला भुलून भगवान येथे आले आहेत हे ओळखून, राधाबाईअक्कांची योग्यता जाणली. श्रीकृष्णाची स्थापना करण्याच्या दृष्टीने आपण तुम्हाला सर्वतोपरी सहकार्य देऊ व देवळालाही काही उत्पन्न कायमचे देऊ, असे श्रीमंतांनी राधाबाईअक्कांना सांगितले.

आता गोपाळकृष्णाचे देऊळ कोठे बांधावे हा प्रश्न राधाबाईअक्कांसमोर होता. हरिपुरात भोई लोकांची वस्ती वेशीचे आतील बाजूस होती. श्रीमंतांनी या भोई लोकांना दुसरीकडे घरे देऊन ती जागा कृष्णमंदिरास दिली. भिक्षेवरच अक्कांनी देऊळ बांधले व भगवंताची शास्त्रोक्त पद्धतीने स्थापना केली. पुढे जुजबी सभामंडपाचे काम केले.

श्रीराधाबाईअक्कांची योग्यता ही सामान्य नव्हती. त्या मोठ्या अधिकाराच्या स्त्री होत्या. एक दिवस कोल्हापूर येथील खर्डेकर नावाचे गृहस्थ अक्कांकडे आले. ते १५० एकर जमिनीचे मालक होते. सदर जमीन गहाण ठेऊन त्यांनी पैसे कर्जाऊ घेतले होते. कोर्टामध्ये या जमिनीबद्दल वाद सुरू होता. यासंदर्भात तो श्रीअक्कांकडे आला आणि म्हणाला, 'तुमचा गोपाळकृष्ण याबद्दल काय सांगतो कां पहा.' अक्का मंदिरात बसल्या होत्या. अक्का म्हणाल्या, 'तू माझे मागून ये आणि येताना पावले मोजत ये.' याप्रमाणे तो अक्कांच्या मागे पावले

मोजत आला. अक्का देवळातून बाहेर येऊन बाहेरील रस्त्यावर आल्या आणि एकदम थांबल्या आणि किती पावले झाली? असे खर्डेकरांना विचारले. खर्डेकर म्हणाले, 'अक्का ६० पावले झाली.' हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'एकूण जमिनीपैकी ६० एकर जमीन सुटेल' आणि आश्चर्य असे कोर्टदरबारी निर्णय होऊन खर्डेकरांची ६० एकरच जमीन सुटली.

पूर्वी सांगली येथे सरकारी गणपतीचे महोत्सवात मोठ्या प्रमाणावर रमणा होत असे. रमणा म्हणजे महाप्रसाद देऊन दक्षिणा वाटणे. ऋषीपंचमीस रमणा ठरलेला असायचा. पावली पावली दक्षिणा मिळत असे. त्याकाळी पावलीला मोठी किंमत होती. पूर्वी पैशाला किंमत असलेने एका जेवणाकरता फार लांबून माणसे येत असत. हरिपूरचे पट्टीचे जेवणारे मुंबईपर्यंत जाऊन त्यावर पैसे कमवत असत. एकावर्षी तिथीचा गोंधळ झालेने आदले दिवशीच रमणा आहे असे समजून, ३०० माणसे याकरता जमा झाली. सरकार दरबारी सगळी गडबड उठली. तेथील लोकांनी सांगितले की, 'हरिपूरला नित्य अन्नदान होत असते. तेथे तुम्ही जावा, तेथे तुमची चांगली सोय होईल व उद्या तुम्ही आमचेकडे रमण्यास या.' याप्रमाणे ही सगळी माणसे हरिपुरास अक्कांकडे आली. तोपर्यंत अक्कांनी अन्नदान करुन आपली थाळी पालथी घातलेली होती. लोकांनी सांगलीमधे घडलेली घटना श्रीअक्कांना सांगितली. अक्का डगमगल्या नाहीत. अक्कांनी त्या सर्व लोकांना संगमावर स्नान करुन या म्हणून सांगितले. त्याप्रमाणे सगळी माणसे स्नानासाठी संगमावर गेली. तोपर्यंत अक्कांनी यांच्या जेवणाकरता लागणारे सर्व सामान दामले यांचे दुकानातून आणले आणि दोघा माणसांना कोथळीला जाऊन दोन घागरी तूप घेऊन या म्हणून सांगितले. त्याप्रमाणे ती दोघे कोथळीला गेली. इकडे अक्कांनी हा हा म्हणता स्वयंपाकाची तयारी केली. पाट-पाणीही केले. मंडळी आली पण कोथळीस गेलेल्या माणसांना परत येणेस वेळ लागला. देवाजवळ दोन पाण्याने भरलेल्या घागरी ठेवलेल्या होत्या. अक्का म्हणाल्या, 'आता भोजनास उशीर झाला आहे. तेच तूप म्हणून वाढण्यास घ्या. पंगत सुरू होऊ दे.' आश्चर्य असे की, त्या घागरीतील पाण्याचे तूप झाले होते. सर्वांचे आकंठ भोजन झाले आणि हात धुणेस बाहेर येतात तोच कोथळीहून तुपाच्या घागरी आल्या. हे बघून अक्का म्हणाल्या, 'कृष्णामाईनेच मगाशी तूप दिलेले आहे. त्यामुळे हे तूप आता कृष्णामाईलाच द्या.' त्याप्रमाणे दोन घागरी तूप संगमावर जाऊन ओतले आणि पुनः पाण्याच्या दोन घागरी देवाजवळ आणून ठेवल्या. हे बघितल्यावर सगळेच आश्चर्यचकित झाले. अक्कांना नमस्कार करुन सगळे लोक तेथून सांगलीस रमण्यासाठी परत आले.

प.पू.सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर हे सद्गुरू शोधार्थ बाहेर पडले आणि थेट हरिपूरला श्रीराधाबाईअक्कांकडे आले. श्रीअक्कांनी त्यांना मिरजेला श्रीअण्णाबुवा यांचेकडे पाठविले. तेथून ते श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज, श्रीमाणिकप्रभू, श्रीरामकृष्ण परमहंस, अशा महापुरुषांकडे जाऊन शेवटी श्रीतुकामाई यांचेकडे येहेळगावी गेले आणि त्यांचेकडून अनुग्रह घेऊन चैतन्यरुप झाले. हे सगळे सांगायचे कारण हेच की नामावतारी श्रीगोंदवलेकरमहाराज सर्वप्रथम अक्कांकडे आले, यावरून अक्कांची योग्यता कळून आल्याशिवाय रहात नाही.

श्रीराधाबाईअक्का या रात्र रात्रभर भजन करत आणि भजन करता करता देहभान विसरून जात. अक्कांच्या भजनात स्वतः गोपाळकृष्ण मुरली वाजवत असे. याचा प्रत्यय श्री. विनायक चिंतामण खाडिलकर या गृहस्थांना आला. हे गृहस्थ सांगलीहून हरिपूरला पायी येत होते. हरिपूरच्या वेशीजवळ राधाकृष्ण मंदिर असलेने, वेशीत पाऊल टाकताच केवड्याचा घमघमघाट त्यांना आला. त्यानुसार ते मंदिराचे दाराजवळ आले आणि दाराचे फटीतून आत बघितले तर, एक प्रकाशाचा किरण त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिला. त्यामुळे आणखी बघावे अशी इच्छा निर्माण झाली. त्याप्रमाणे बघितले असता अक्का भजनात रंगून गेल्या आहेत, त्यांचे मांडीवर नाग आहे आणि तो डोलत आहे. त्याच्या मुखात लालमणी आहे आणि त्याचा प्रकाशाचा झोत बाहेर येत आहे, असे दृश्य दिसले. तसेच कृष्णाचा मुरलीरव त्यांना ऐकू आला. हे बघून त्यांचे देहभानच हारपून गेले आणि पहाटेपर्यंत ते तेथेच उभे राहिले. अक्कांचे पहाटे भजन संपले. अक्कांनी दरवाजा उघडला तो समोर खाडिलकर उभेच होते. ते अक्कांना म्हणाले, 'अक्का, अहो तुमच्या भजनाच्यावेळी नाग तुमच्या मांडीवर डुलत होता. तुम्हाला भीती कशी वाटली नाही?' हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'अहो खाडिलकर, मीही माणूसच आहे, मीही फार भित्री आहे. मग मला भिती वाटणार नाही कां? पण मी देहावर नसलेने मला भिती वाटली नाही.' हे उत्तर ऐकून खाडिलकर चकित झाले व त्यांनी राधाक्कांचे पाय धरले. अशा श्रीराधाबाईअक्कांनी अनेक लीला केल्या. पण विस्तारभयास्तव त्या येथे देता आलेल्या नाहीत.

श्रीअक्कांचे भजनात जसा केवड्याचा सुगंध दरवळू लागला, तसा अक्कांचा कीर्तीसुगंधही सर्वत्र पसरत चालला. अनेक संतसज्जन त्यांचेकडे येऊन गेले. कल्याण येथील सुप्रसिद्ध संत श्रीराम मारुतीमहाराज यांचे सद्गुरू श्रीबाळमुकुंदमहाराज, हे इंदूरहून शेपन्नास शिष्यांसह वर्तमान हरिपूर येथे केवळ श्रीराधाबाईअक्कांचे दर्शनास आले होते. त्यावेळी श्रीराधाबाईअक्का परगावी गेल्या होत्या. त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय माघारी जायचे नाही असा त्यांनी निर्धार केला. श्रीबालमुकुंद हे फेर धरुन उत्तम भजन करीत. श्रीराधाबाई अक्कांचे कृष्णमंदिराशेजारीच त्यांचे भजन सुरू झाले. रात्र रात्र भजन सुरू होते. सुमारे १५ दिवस अक्कांना यावयास लागले, तरी बालमुकुंदांनी हरिपूर सोडले नाही. शेवटी अक्का आल्या. हे बालमुकुंदाना कळले. बालमुकुंद म्हणाले, 'अक्का आज मी तुमचेपुढे भजनसेवा करणार आहे.' हे ऐकून अक्का म्हणाल्या, 'बालमुकुंद, तुम्ही मी यायच्या आधी १५ दिवस जिथे भजन करत होता, तेथेच मी येईन. भजन तिथेच होऊ दे.' याप्रमाणे अक्का भजनास आल्या. भजन पहाटेपर्यंत रंगले. भजनानंतर अक्का मंदिराकडे निघाल्या असता, बालमुकुंदांनी अक्कांचे दर्शन घेतले आणि त्यांच्या पदकमली प्रेमाश्रुंचा अभिषेक घातला. अक्का म्हणाल्या, बालमुकुंद, 'तुमचे भजन आज फारच चांगले झाले. गोपाळकृष्णाला ते फारच आवडले.' हे बोलून अक्का मंदिराकडे आल्या. अक्का मंदिरात आल्या असतील तोच एकजण अक्कांकडे आला आणि म्हणाला, अक्का, श्रीबालमुकुंद कसेतरीच करीत आहेत. तुम्ही एकदा येऊन पहा. याप्रमाणे परत अक्का आल्या व त्यांनी बालमुकुंदांकडे पाहिले. बालमुकुंद म्हणाले, 'अक्का, येतो आता'. अक्का म्हणाल्या, 'या मग, आता मीही लौकरच येणार आहे.' हे दोघांचे चाललेले

बोलणे उपस्थितांना कळले नाही. हे बोलणे झाले असेल नसेल, तोच श्रीबालमुकुंदांनी वैकुंठगमन केले. त्यांच्या पार्थिव देहास हरिपूर संगमावरच अग्निसंस्कार केले व तेथे त्यांच्या पादुकाही स्थापन केल्या. बालमुकुंद हरिपुरास का आले? ते १५ दिवस का थांबले? या सगळ्या अतर्क्य घटना आहेत. यावरून एकच निष्कर्ष काढता येईल की, श्रीबालमुकुंदांना श्रीअक्कांचे दर्शन घेऊनच देह ठेवायचा होता. याप्रमाणे श्रीबालमुकुंदांनी पौष वद्य १० शके १८०८, इ.स. १८८६ या दिवशी पहाटेचेवेळी देह ठेवला.

संतमहात्म्यांची काळावर सत्ता असते. संतमहात्मे हे इच्छामरणी असतात. श्रीराधाबाई अक्कांचे नामस्मरण हे अहर्निश सुरूच होते. ''हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।'' हा महामंत्र रात्रंदिवस त्यांचा सुरूच होता. मधून मधून त्या ''श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।। प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ हे नाथ नारायण वासुदेव ।।'' हेही त्या म्हणत असत. श्रीराधाबाईअक्कांनी देह ठेवणेचे ठरविले. याची सूचना त्यांनी बालमुकुंदांचे वेळी दिली होती. याप्रमाणे आश्विन वद्य तृतीयेचा दिवस उजाडला. गोपाळकृष्णाचे नामस्मरणात आश्विन वद्य तृतीया युक्त चतुर्थी शके १८०९, इ.स. १८८६ या दिवशी श्रीराधाबाईअक्कांनी महाप्रयाण केले. सकळीकडे मोठा आकांत झाला. ज्यावेळी अक्कांनी देह ठेवला, त्यावेळी मूर्तीतील गोपाळकृष्णाच्या डोळ्यातून अश्रू आले. भगवंतालाही अक्कांचा विरह सहन झाला नाही. अक्कांवर हरिपूर यथील संगमावर अंत्यसंस्कार करणेत आले व बालमुकुंदांचे शेजारी श्रीअक्कांच्या पादुकांची स्थापना करणेत आली.

''कशी जाहली कृष्णस्वरूप राधा । जिचे नाव घेता नुरे देहबाधा ।
भजनामृते पूर्व होऊनी ठेला । नमस्कार हा भक्तिभावे पदाला ।।१।।''

--श्रीदासराममहाराज केळकर

***

श्रीदासराममहाराज कृत राधाबाईअक्का यांची आरती

आरती कृष्णराधा । करु आपुलिया छंदा ।
देहभाव नुरे जेथे । पावुनिया स्वानंदा ।।ध्रु।।
ब्रह्मचैतन्यासरिसे । तव भेटीसी आले ।
केडगाव नारायण । समाधान पावले ।।१।।
हरिपुरी भजनात । झाली अघटित लीला ।
दासराम आठवी ते । साथ करी मुरलीवाला ।।२।।

श्रीदीक्षितस्वामी ऊर्फ श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज

जन्म
चैत्र शु. १ (गुढीपाडवा)
शके १७८८ इ.स. १८६६

निर्याण
आश्विन वद्य ७ शके १८४९
इ.स.१९२७

कोल्हापूर जिल्ह्यात श्रीक्षेत्र नृसिंहवाडी आहे. या नृसिंहवाडीपासूनच जवळ वेदगंगा नदीचे तीरावर शंकरापूर नावाचे गाव आहे. या गावात श्रीलक्ष्मणशास्त्री या नावाचे सत्शील ब्राह्मण रहात होते. हे यज्ञयाग करीत असत. म्हणून ते दीक्षित या आडनावाने प्रसिद्धीस आले. यांचे घराण्यात दत्त भक्ती होती. त्यांचा नरसोबावाडीला पौर्णिमेला व शनिवारी पायी जाणेचा नेम होता. लग्नाचे वय झाले नंतर त्यांचा विवाह अहिल्यादेवी नामक कन्येशी झाला. लक्ष्मणशास्त्री हे मुख्यतः भागवत कथन, पूजाअर्चा, यज्ञयाग, श्रीगुरूंच्या सेवेतच काळ घालवीत. अशा या लक्ष्मणशास्त्रींचे पोटी चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडवा शके १७८८ इ.स. १८६६ रोजी दुपारी १२ वा. एक पुत्र अवतीर्ण झाला. बाराव्या दिवशी या मुलाचे नांव 'नारायण' ठेवणेत आले. हा नारायण म्हणजेच आमचे 'श्रीदीक्षितस्वामी ऊर्फ श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज' होत.

या श्रीनारायणाची लहानपणापासूनच तल्लख बुद्धी होती. मिरज येथे त्यांचे इयत्ता ५वी पर्यंत इंग्रजी शाळेत शिक्षण झाले. त्यानंतर ते बी.ए.पर्यंत शिकले. शिक्षण पूर्ण झालेवर त्यांचा वाराणसी नामक कन्येशी विवाह झाला. श्रीनारायणांना पाश्चात्य पोषाखात विशेष रुची होती. एक दिवस एक गृहस्थ त्यांना भेटले व या पाश्चात्य पोशाखाबद्दल नापसंती व्यक्त केली आणि घराण्याच्या आदर्शाची आठवण करून दिली. याचा श्रीदीक्षितस्वामींवर खोलवर परिणाम झाला आणि त्यांनी तो विदेशी पोशाख व इंग्रजी पुस्तके एका नाल्यात फेकून दिली आणि धोतर आणि शर्ट असा पेहराव धारण केला. त्यांच्या पत्नीला हा आपल्या पतीमध्ये झालेला बदल मान्य नव्हता. पण श्रीनारायणांनी त्याकडे दुर्लक्ष केले. थोडे दिवसांनी त्यांनी भगवद्गीता आणि एकनाथी भागवत वाचणेस प्रारंभ केला.

श्रीनारायणांचे वडील श्री. लक्ष्मणशास्त्री यांना वृद्धापकाळाने शंकरापूरहून नृसिंहवाडीला जाणे कठीण होऊ लागले. तेव्हा एक दिवस संगमावर उभे राहून अत्यंत आर्तपणे लक्षणशास्त्रींनी दत्तात्रेयांची आळवणी केली आणि आश्चर्य असे की, त्यांचे समोर साक्षात् दत्तात्रेय षड्भुज, एकमुखी, हातात कमंडलू, खालील हातात माला, मधल्या हातात डमरू, त्रिशूळ आणि वरील हातात शंख आणि चक्र, अंगावर छाटी आणि कमरेला लंगोटी अशा वेशात अवतीर्ण झाले. दत्तात्रेयांना या वेषात पाहून श्रीलक्ष्मणशास्त्रींनी त्यांचे पायावर अक्षरशः लोळण घेतली. तोंडातून शब्द फुटेना. हे पाहून साक्षात् दत्तात्रेयांनी त्यांना जवळ घेतले, कुरवाळले आणि म्हणाले, 'तू काही काळजी करु नकोस, मी तुझ्या कुळात मनुष्यरूपाने अवतार धारण करेन. यापुढे तू

नृसिंहवाडीला यायचे कष्ट घेऊ नकोस असे म्हणून कृष्णामाईतील तीन गोटे घेतले आणि हे माझे रूप आहे, हे समजून याची स्थापना करावी आणि पूजा करावी'. ते गोटे लक्ष्मणशास्त्रींच्या हातात ठेऊन श्रीदत्तात्रेय अंतर्धान पावले. त्याप्रमाणे श्रीलक्ष्मणशास्त्रींनी त्यांची स्थापना केली.

श्रीलक्ष्मणशास्त्रींचा श्रीटेंबेस्वामीमहाराजांशी घनिष्ठ परिचय होता. त्यांची नृसिंहवाडी येथे भेट आणि बोलणेही व्हायचे. श्रीलक्ष्मणशास्त्रींनी प.पू.श्रीटेंबेस्वामींना आपला पुत्र नारायण, याला मार्गदर्शन करणेची विनंती केली. त्याप्रमाणे श्रीटेंबेस्वामींनी या नारायणाला मार्गदर्शन केले. श्रीटेंबेस्वामींनी सांगितल्याप्रमाणे ते स्नान, संध्या वैश्वदेव, स्मर्ताग्नि इ. ब्रह्मकर्म करू लागले. त्यानंतर त्यांनी सद्गुरूंच्या सानिध्यात विविध उपनिषदे, जीवनमुक्ती विवेक इ. ग्रंथांचे अध्ययन केले. श्रीटेंबेस्वामींनी संन्यास घेतला आणि नारायणाने आदर्श गृहस्थाश्रम स्विकारला. रोज ५ घरी जाऊन ते शुष्क भिक्षा मागू लागले. सुरवातीला त्यांच्याच गावी त्यांना खूप त्रास झाला, पण काही काळानंतर लोक ते केव्हा भिक्षेला येतात याची प्रतिक्षा करु लागले. काही काळानंतर त्यांनी अन्न संतर्पण, यज्ञ, दान इ. जादा कर्म सुरू केले. त्यानंतर काही लोक शास्त्रार्थ समजून घेणेकरिता त्यांचेकडे येऊ लागले. तर काही लोक त्यांना छोटे टेंब्येस्वामी म्हणू लागले.

एकदा गावात प्लेगची मोठी साथ आली. त्यात त्यांची पत्नी व एकुलता एक मुलगा मरण पावला. यांनाही प्लेगची लागण झाली होती. पण यातून ते बरे झाले. नारायणांनाही श्रीटेंव्येस्वामींकडून दंड संन्यास दीक्षा पाहिजे होती. त्याप्रमाणे नारायणांनी श्रीटेंबेस्वामींना रात्री झोपताना आपल्याला दंड देणेची प्रार्थना केली. पण श्रीटेंबेस्वामी म्हणाले, 'आम्हाला आज्ञा नाही. इतर कोणाकडून दंड घ्यावा' असे म्हणून श्रीटेंबेस्वामी छाटी पांघरून झोपी गेले. त्यांचे पायाशी नारायण रात्रभर अश्रू गाळत उभे होते. आपल्या शिष्याची दृढ निष्ठा पाहून श्रीटेंबेस्वामी म्हणाले, 'नारायणा, अजून येथेच उभा आहेस? जा, तयारी कर दंड दानाची.' हे वाक्य ऐकल्यावर नारायणाने श्रीटेंबेस्वामींचे पाय धरले आणि नृसिंहवाडी येथे दंडदान झाले व त्यांचे नांव 'श्रीमन्न नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज ऊर्फ दीक्षितस्वामी' झाले. त्यांना नृसिंहवाडीत राहूनच उपासना करणेची आज्ञा झाली. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, प.पू.श्रीटेंबेस्वामींनी संपूर्ण हयातीत केवळ या दीक्षितस्वामींनाच संन्यास दंड दीक्षा दिलेली होती. यानंतर श्रीदीक्षितस्वामींनी विलक्षण गुरूसेवा केली. या गुरूसेवेचे श्रीटेंबेस्वामी कायम कौतुक करत असत. गरूडेश्वर येथे असताना श्रीटेंबेस्वामींनी श्रीब्रह्मानंदस्वामींना जीवनमुक्तीची लक्षणे शिकवली आणि अभ्यासही करवून घेतला. एकदा श्रीटेंबेस्वामी श्रीब्रह्मानंदस्वामींना म्हणाले, 'स्वामी, आपण कधी नृसिंहवाडीला गेला आहात काय? गेला नसाल तर एकदा जाऊन या. तेथे आपल्याला शिकवलेल्या जीवनमुक्त लक्षणांची साक्षात् मूर्तीच आम्ही स्थापन करुन ठेवली आहे. ते तिथलेच आहेत, पण त्यांना कोणी ओळखत नाही. आपल्यापेक्षाही ते काकणभर अधिक आहेत.' या वाक्यावरून श्रीदीक्षितस्वामींचा अधिकार कळून येतो.

श्रीटेंबेस्वामी हे शेवटचे दिवसात श्रीक्षेत्र गरूडेश्वरला होते. गरुडेश्वरला जाणेचे अगोदर नृसिंहवाडीला असताना त्यांनी दीक्षितस्वामींना आपल्या पादुका, प्रसाद म्हणून दिल्या होत्या. त्या पादुका आजही औरवाड येथे श्रीदत्त अमरेश्वरमंदिरात पूजेत आहेत. या पादुकांची पूजा ते नित्यनेमाने करीत. पुढे गरुडेश्वर येथे वास्तव्य असताना श्रीटेंबेस्वामींची तब्येत बिघडली. तेव्हा इकडे श्रीदीक्षितस्वामी निरनिराळे काढे आणि मात्रा करून त्या पादुकांवर घालत असत. ही गोष्ट एका गृहस्थाने बघितली होती. तो गृहस्थ गरूडेश्वरला गेल्यावर त्याने ही गोष्ट श्रीटेंबेस्वामींच्या कानावर घातली. ही गोष्ट ऐकून श्रीटेंबेस्वामींच्या डोळ्यातून पाणी आले. त्यांनी त्या गृहस्थाला सांगितले, 'त्यांना सांगा तुम्ही इतके दिवस केलेल्या अपूर्व सेवेमुळेच आमचे आयुष्य एक महिनाभर अधिक वाढलेले आहे. आता मात्र देवाची आज्ञा झाली आहे. तेव्हा देह सोडणे प्राप्त आहे. आता ही सेवा पुरी करावी'. हा निरोप त्या गृहस्थाने दीक्षितस्वामींना सांगितल्यावर त्यांनी पादुकांवर काढा घालणे बंद केले. एक दिवस श्रीटेंबेस्वामी म्हणाले, 'आम्ही संपूर्ण जग फिरलो, पण श्रीदीक्षितस्वामी ऊर्फ श्रीनृसिंहसरस्वतीसारखा ज्ञानाला सुपात्र व परम गुरूभक्त शिष्य दुसरा पाहिला नाही'.

एक दिवस त्यांचेवर वाडीतील पुजाऱ्यांनी चोरीचा आळ घेतला आणि नृसिंहवाडी सोडून जाणेस सांगितले. ही देवाची इच्छा समजून त्यांनी नृसिंहवाडी सोडली आणि ते जवळील औरवाड या गावी येऊन राहिले. तेथे त्यांनी श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि तेथेच प.पू.श्रीटेंबेस्वामींच्या पादुका स्थापन करुन 'श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ' निर्माण केले व तिथेच उपासना सुरू केली. त्यांनी अनेक पदरचना केल्या व त्यांनी '**जय जय श्रीमत् गुरूवर स्वामीन् परमात्मन देवा**' ही संस्कृत आरती श्रीटेंबेस्वामींवर रचली. श्रीटेंबेस्वामींच्या आज्ञेनुसार त्यांनी भ्रमंती करुन वैदिक धर्म वाढविण्याचे कार्य केले. त्यांनी गरुडेश्वर, नाशिक, विदर्भ, अलाहाबाद, काशी या ठिकाणी दौरा केला. यानंतर श्रीदीक्षितस्वामींनी थोड्याच दिवसात अयोध्या येथे जाणेचा निर्णय घेतला आणि ते तेथे गेले आणि तेथेच आश्विन वद्य सप्तमी शके १८४९ इ.स.१९२७ साली देह ठेवला.

***

प.पू.श्रीगोपाळराव दीक्षित

निर्याण
आश्विन व.११ शके १८१४
इ.स.१८९२

श्री. सदाशिव रामचंद्र दीक्षित हे सांगली येथे रहावयास होते. नोकरीच्या निमित्ताने ते मुधोळास जाऊन स्थायिक झाले. त्यांच्या पोटी पुत्ररत्न जन्माला आले. याचे नाव 'गोपाळ' असे ठेवणेत आले. हे गोपाळ म्हणजेच आमचे श्री गोपाळराव दीक्षित.

श्रीगोपाळराव दीक्षित यांचे मुधोळ येथे शिक्षण पूर्ण झाल्यावर इ.स. १८७८ चे सुमारास नोकरी लागली. ते प्रथम काही दिवस मुधोळकर सरकारांकडे शिलकी सामानाकडील कारकून होते. त्यानंतर त्यांची बदली खासाहुजूर कचेरीत झाली होती. श्रीगोपाळरावांना तालमीचा मोठा शोक होता. त्यांचे बोलणे चालणे डौलदार आणि स्वभाव अत्यंत विनोदी व मनमिळाऊ होता. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे मुधोळला रहायला होते. श्रीगोपाळराव व श्रीतात्यासाहेब हे साधारणतः समवयस्क आणि समानशील असलेने त्यांचे सख्य जमले आणि या सख्यतेचे पर्यवसान पराकाष्ठेच्या घरोब्यात झाले. श्रीगोपाळरावांची घरची परिस्थिती संपन्न होती असे नाही, पण प्रपंच बेताचाच असलेने त्यांना दारिद्याची झळ बसली नाही. श्रीगोपाळरावांची आनंदी वृत्ती असल्यामुळे प्रापंचिक अडचणीची त्यांनी कधी पर्वा केली नाही. श्रीतात्यासाहेबमहाराज जेव्हा खिन्न मनःस्थितीत असायचे, तेव्हा श्रीगोपाळराव त्यांना धीर देऊन त्यांची समजूत काढत असत.

श्रीगोपाळराव दीक्षित यांनी साक्षात्कारी सत्पुरुषांचा अनुग्रह मिळावा म्हणून कोटी लिंगार्चन केले होते. याचे फळ म्हणूनच त्यांना इ.स. १८८९ साली श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या निमित्ताने मुधोळ येथे चिमडचे श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज यांचा अनुग्रह लाभला. अनुग्रह झालेल्या दिवसापासून त्यांनी जमिनीला पाठ लावली नाही आणि रात्र रात्र साधन केले. श्रीगोपाळराव दीक्षितांनी आपल्या घरी वैकुंठचतुर्दशी दिवशी श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांच्या पादुका स्थापन केल्या होत्या. या पादुकास्थापनेच्या वाढदिवसाचे दिवशी श्रीचिमडचेमहाराज त्यांचे घरी जात असत.

श्रीगोपाळराव दीक्षित, श्रीतात्यासाहेबमहाराज व मुधोळ येथील इतर भक्तमंडळी शनिवारी कचेरीचे काम आटोपून चिमडला वस्तीला जात असत. अशाच एका शनिवारी या सर्व मंडळींना चिमडला पोहोचण्यास सायंकाळी थोडा उशीर झाला. तोवर श्रीचिमडच्या महाराजांचे प्रवचन सुरू झाले होते. चिमडच्या मठात त्यावेळी दिव्याची, गॅसबत्ती, हरिकेन कंदिल इ. ची सोय नसलेने महाराजांनी एक मेणबत्तीचा तुकडा उजेडासाठी लावला होता. तो तुकडा पुरता पाव इंच पण नव्हता. या भक्त मंडळीतील एकाला असे वाटले की, आता हा मेणबत्तीचा तुकडा प्रवचन होईपर्यंत कसा टिकायचा? हे श्रीचिमडच्या महाराजांनी ओळखले व ते म्हणाले,

'बाबारे, हा स्नेह आहे. तो आटायचा नाही' आणि आश्चर्य असे की तो मेणबत्तीचा तुकडा २ तास, प्रवचन होईपर्यंत तसाच तेवत होता.

श्रीगोपाळराव दीक्षित, श्रीतात्यासाहेबमहाराज व इतर भक्तमंडळींचा चिमडमध्ये तळ असला की प्रत्येक जण मठातील कामे आनंदाने करीत असत. मठात पाणी भरणे, केर काढणे, कांडप, दळप इ. सर्व कामे ही भक्तमंडळी करीत असत. एक दिवस श्रीगोपाळराव दीक्षितांकडे दळणेचे काम आले. पण ते काम चुकवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तेव्हा श्रीतात्यासाहेबमहाराजांनी दळणाचे काम श्रीगोपाळरावांना करायला लावले.

एकदा श्रीचिमडचे महाराज श्रीगोपाळराव दीक्षित व श्रीतात्यासाहेबमहाराजांना घेऊन आसंगीस एका भक्ताचे घरी गेले. तेथे एके दिवशी सायंकाळी महाराजांनी या दोघांना आपल्या कंबरेस मिठी मारण्यास सांगितले. त्याप्रमाणे या दोघांनी मिठी मारताच, महाराज आकाशात उंच उभे आहेत आणि आपले पाय जमिनीवरून सुटून आपण अधांतरी लोंबकळत आहोत, असा या दोघांना भास झाला. यावरून श्रीचिमडचेमहाराज आपल्या पाठीशी आहेत हे या दोघांना कळून चुकले.

मुधोळ येथे श्रीचिमडच्या महाराजांची शिष्यमंडळी भरपूर होती. त्यामुळे ते अधूनमधून मुधोळला जात. बहुधा त्यांचा ३ दिवस मुक्काम पडायचा. यातील पहिल्या दिवशी मुक्काम श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचेकडे, दुसऱ्या दिवशी श्रीगोपाळराव दीक्षितांकडे आणि तिसऱ्या दिवशी श्रीतात्यासाहेबांकडे असायचा. इ.स. १८८८ सालच्या मे महिन्यात मुधोळकर सरकार महाबळेश्वरला रहायला गेले होते. तेव्हा त्यांच्या सोबत त्यांनी श्रीगोपाळराव दीक्षित आणि श्रीतात्यासाहेबांना नेले होते.

मुधोळमधील नोकरी सुटल्यावर इ.स.१८८८ साली श्रीगोपाळराव हे ५-६ महिने चिमडमठातच येऊन राहिले. पुढे एके दिवशी श्रीचिमडच्या महाराजांनी अकस्मात श्रीगोपाळरावांना बोलावले आणि श्रीगोपाळरावांना सांगलीत जाऊन रहाण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते सांगलीतच स्थायिक झाले. सांगलीत असताना ते आपल्या घरातील मुलांबरोबर सोंगट्या खेळायला बसले. मुलांनी त्यांना दान टाकणेस सांगितले. त्यांनी दान टाकणेसाठी फासा हातात घेऊन कानाजवळ नेताच त्यांना भावसमाधी लागली आणि त्या अवस्थेत ते चार तास होते. सांगलीत आल्यावर श्रीगोपाळरावांनी आपला बहुतेक काळ ईशचिंतनात किंवा साधनेत व्यतीत केला आणि परमार्थातील पूर्ण सिद्धता प्राप्त करून घेतली.

श्रीगोपाळराव दीक्षितांना श्रीरामचंद्र या नावाचे चिरंजीव होते. त्यांनाही श्रीचिमडच्या महाराजांचा अनुग्रह होता. श्रीलक्ष्मीबाई अक्का या श्रीरामचंद्ररावांना 'दादा' म्हणत. श्रीलक्ष्मीबाईअक्का यांचेवर श्रीरामचंद्ररावांची अपार निष्ठा होती. श्रीलक्ष्मीबाईअक्का चिमड येथे ज्या खोलीत रात्री साधनेस बसत, तेथे श्रीरामचंद्रराव दीक्षित

हे २ चमचे तेल घालून लहान पणती लावून ठेवत असत. हे बघून अक्का म्हणायच्या, अहो दादा, माझ्या डोळ्यासमोर सारखा प्रकाश आहे. मला पणती लागत नाही. तेव्हा श्रीरामचंद्रराव म्हणायचे अक्का, सभोवताली सगळी झाडी आहे, किडा मुंगी यायची शक्यता आहे. पणती असू दे. त्याप्रमाणे दोनच चमचे तेल घातलेली पणती सकाळपर्यंत तेवत असे.

इ.स. १८९१ साली श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवला. महाराजांनी देह ठेवल्यावर श्रीगोपाळराव वारंवार म्हणत, 'आता संसारात मजा राहिली नाही.' श्रीचिमडच्या महाराजांच्या निर्याणानंतरचा इ.स. १८९२ सालातील चिमड येथील दिवाळी पांडवपंचमीचा रथोत्सव जवळ आला. यावेळी श्रीगोपाळराव हे उदराच्या व्याधीने अत्यवस्थ होते. श्रीतात्यासाहेबमहाराज हे आश्विन वद्य एकादशीस चिमडला जाणार होते. जाण्यापूर्वी ते श्रीगोपाळरावांना भेटायला आले. श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणाले, 'गोपाळराव, आजच मी चिमडला उत्सवाला चाललो आहे, माहिती असावी.' हे ऐकून श्रीगोपाळराव श्रीतात्यासाहेबमहाराजांना म्हणाले, 'हणमंतराव, आजच रात्री आम्ही महाप्रयाण करणार आहोत, आम्हास पोचवून मगच तुम्ही चिमडला जावा.' याप्रमाणे श्रीतात्यासाहेबमहाराजांनी चिमडला जाणेचा बेत १ दिवस पुढे ढकलला आणि आश्चर्य असे श्रीगोपाळरावांनी आश्विन व.११,शके १८१४ इ. स. १८९२ रोजी रात्री महाप्रयाण केले. या एकादशीचे दिवशी रात्री चिमडला पंचपदी सुरू होती, त्यावेळी लावलेला कापूर एकदम विझला. हे पाहून श्रीलक्ष्मीबाईअक्का जवळच्या मंडळींना म्हणाल्या, 'गोपाळराव दीक्षित आताच सांगलीत कैलासवासी झाले. चिमडमहाराजांचा कल्याण गेला.' श्रीगोपाळरावांची अंत्ययात्रा आटोपून श्रीतात्यासाहेबमहाराज दुसरे दिवशी चिमडला गेले, तेव्हा त्यांना श्रीलक्ष्मीबाईअक्का आदल्या रात्री काय म्हणाल्या हे कळले.

***

श्रीदासराममहाराज कृत गोपाळराव दीक्षित यांचा निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके अठराशे चौदात । आश्विन वद्यात एकादशी ।।१।।
गोपाळराव दीक्षित प्रयाण करिती । द्वितीय प्रहर रात्रौ पहिले तासी ।।२।।
चिमडमहाराजांचे कल्याण म्हणोनी । गौरवित जनी लक्ष्मीआक्का ।।३।।
सांगलीसी देह ठेविता प्रचिती । चिमडी कर्पूरज्योती निमालीसे ।।४।।
गुरू रामरूपी मिळोनिया गेले । हनुमंते देखिले नवल हे ।।५।।
नाही केला मठ नाही शिष्य केले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।६।।

श्रीसद्‌गुरू श्रीसिद्धरामेश्वरमहाराज, पाथरी

जन्म
शके १८१०
ऑगस्ट इ.स.१८८८

निर्याण
आश्विन व.११ शके १८५८
दि.९.११.१९३६

प.पू.श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील पाथरी या गावी इ.स. ऑगस्ट १८८८ मध्ये झाला. त्यांच्या जन्मानंतर पाचवे दिवशी (पाचवी) त्यांच्या आजीच्या स्वप्नात श्रीशिवयोगी सिद्धरामेश्वर आले आणि त्यांनी सांगितले की, ''हा माझा अंश असून, याचे नाव सिद्धरामेश्वर असे ठेव.'' त्याप्रमाणे आजीबाईंनी सिद्धरामेश्वर हे नाव ठेवले. त्यांना लहानपणापासून परमार्थाची आवड होती. वयाच्या १०व्या वर्षी शिवयोगी सिद्धरामेश्वरांनी त्यांना दर्शन देऊन, प्रसाद म्हणून गुळात भिजविलेल्या डाळीचा प्रसाद दिला.

श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांचे शालेय शिक्षण थोडेच झाले. घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी विजापूर येथील अडत दुकानात 'गुमास्ते'ची नोकरी धरली. पुढे ते आपल्या कर्तबगारीने हेडमुनीम झाले.

श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे विजापूर गावी सप्ताहानिमित्त नेहमी जाणे-येणे असे. असेच एके दिवशी श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांना श्रीभाऊसाहेबमहाराजांचे दर्शन झाले आणि त्याच दिवशी इ.स. १९०६ मध्ये त्यांना अनुग्रह मिळाला. श्रीभाऊसाहेबमहाराज हे सोमवार व गुरुवारी अनुग्रह (नाम) देत असत. पण श्रीसिद्धरामेश्वरमहाराज हे त्यांचेकडे शनिवारी अनुग्रह घेणेस गेले. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी यांची पात्रता ओळखली आणि श्रीभाऊसाहेबमहाराज म्हणाले, ''हा फार भाग्यवान असून ह्याच्याने जगावर प्रकाश पडणार आहे. याकरिता याला आजच (शनिवारी) अनुग्रह देतो आणि याची आठवण म्हणून शनिवारीही अनुग्रह देणेस सुरवात करतो.'' याप्रमाणे श्रीभाऊसाहेबमहाराजांचा यांना अनुग्रह प्राप्त झाला आणि महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी साधन करून सिद्धता प्राप्त करून घेतली.

हिंचगिरी येथे होणाऱ्या तीनही सप्ताहास श्रीसिद्धरामेश्वरमहाराज जात असत. त्यांनी सद्‌गुरूंची अनन्यभावे सेवा केली. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी देह ठेवल्यानंतर श्रीसिद्धरामेश्वरांनी अल्पाहारावर राहून साधन केले. योगवसिष्ठ, शंकराचार्यांचा सदाचार, वाक्यवृत्ती इ. ग्रंथांना सूक्ष्म अभ्यास केला आणि लोकोद्धाराचे कार्य चालू केले.

श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांचे वक्तृत्त्व अस्खलित, अनुभवपूर्ण व परिणामकारक होते. महाराजांची निरूपण शैली इतकी सरळ आणि गोड होती की, लहान मुलेसुद्धा वेदांतासारखा गुह्य विषय सुलभरितीने ग्रहण करीत.

'आधि ब्रह्म प्रत्यक्ष दावा । मग तुम्ही वेदांत गावा ।।१।।' या उक्तीप्रमाणे श्रोत्यांना प्रत्यक्ष अनुभव येईल अशारितीने ते स्पष्टीकरण करीत असत.

श्रीसिद्धरामेश्वरमहाराज हे कोणाकडूनही काहीही घेत नसत. त्यांची रहाणी फार वैभवशाली होती. त्यांचे विविध तऱ्हेचे पोशाख व त्यांच्या कलापूर्ण आणि सुंदर नित्योपयोगी वस्तू यांनी लोकांचे मन वेधून घेतले जाई. त्यांनी आपल्या सद्‌गुरूंचे स्थानही वैभवकलापूर्ण वस्तूंनी सजवले होते. श्रीशिवयोगी सिद्धरामेश्वरमहाराज आणि श्रीभाऊसाहेबमहाराज यांच्या समाधींना त्यांनी चांदीचे मखर, चांदीचे मुखवटे, व सोन्याची किरीटे केली होती. चांदीची पालखी तयार करून घेतली होती.

श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांनी अध्यात्म प्रसाराचे कार्य अवघे १२-१३ वर्षेच केले. पण ते कायम स्वरूपाचे व अमर ठरले. त्यांनी अल्पकाळातच अनेक पूर्णज्ञानी व अधिकारी शिष्य तयार केले. त्यात प्रामुख्याने प.पू. श्रीगणपतरावमहाराज कन्नूर, श्रीकाडसिद्धेश्वरमहाराज व श्रीविलासानंद हे प्रमुख शिष्य होते. इतर पुष्कळ शिष्य सोलापूर, बागेवाडी, मुंबई,विजापूर इ. ठिकाणी आहेत.

अशा या श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांनी आपल्या शिष्यांना शेवटी विज्ञानस्थितीचा उपदेश केला आणि मुंबई येथे आश्विन व. ११ शके १८५८ दि. ९ नोव्हेंबर, १९३६ रोजी वयाच्या ४८ व्या वर्षी आपला देह ठेवला. त्यांची कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बसवन-बागेवाडी येथे समाधी आहे.

***

वे.शा.सं. श्री. लक्ष्मणशास्त्री दीक्षित

निर्याण
कार्तिक शु.०७ शके १८२८
इ.स.१९०६

श्री. लक्ष्मण दीक्षित यांचा जन्म सांगली येथे झाला. ते लहानपणापासून विरक्त होते. सकाळी लवकर उठायचे आणि कृष्णाबाईच्या स्नानाला जायचे. स्नान झाल्यावर हरिहरांची पूजा करायची आणि प्रदोषकाळी शिवदर्शन घ्यायचे असा त्यांचा नेम होता. लहानपणीच ते वेदाध्ययन करू लागले. अग्निसेवा करायचे आणि 'यज्ञेश्वराय नमः' असा नामघोष करून कोरान्न मागायचे. सर्वाभूती शिव आहे असे जाणून ते दररोज नव्या अतिथीला पंक्तिला घेऊन भोजन करायचे व अतिथीलाही संतुष्ट करायचे. श्री. लक्ष्मण दीक्षितांचे अंतःकरणात हरिहर भेद नव्हता. ते नरहरी आणि सदाशिव या दोघांचीही उपासना करायचे. त्यामुळे ही दोन्ही दैवते त्यांच्यावर प्रसन्न होती. श्री.लक्ष्मण दीक्षितांना मंत्रपठण करण्याची आणि श्रवण करण्याची मोठी आवड होती. बरेच वेळा ते वेगवेगळ्या दिवशी वेदघोष करत असत. प्रदोषकाळ असेल तर शिवमंदिरात जाऊन ते नंदादीप लावत असत आणि त्यानिमित्त ते ब्राह्मणांना काही दान देत असत. अशी सेवा त्यांनी चार तपाहून अधिक काळ केली.

एक दिवस ते पायी काशीयात्रेला काही लोकांबरोबर जायला निघाले. हे दररोज शिवलिंगाची पार्थिव पूजा करीत. मातीचे लिंग स्वतः तयार करायचे आणि त्याची पूजा करायची. काशीयात्रेला जात असताना ते अशी पार्थिव पूजा करत बसले. त्यामुळे त्यांच्याबरोबर असणारी मंडळी त्यांना सोडून पुढे निघून गेली. यावेळी स्वतः काशीविश्वनाथ घोडेस्वाराचे रूप घेऊन आले. त्यांना या घोडेस्वाराने आपल्या घोड्यावर बसवले व जेथे मंडळी उतरली होती, तिथे नेऊन सोडले. काशीला गेल्यावर त्यांना पुरेसे कोरान्न मिळेना. त्यामुळे त्यांची उदरपूर्ती होईना. हे बघून स्वतः काशीविश्वनाथाने त्यांची भोजनाची व्यवस्था केली. तसेच सांगलीतील सदाशिव नामक गृहस्थाने श्रीलक्ष्मण दीक्षितांचे नावे काशीला रक्कमेची हुंडी पाठविली. ही सगळी काशीविश्वनाथाची लीला आहे असे ते म्हणाले. काशीत गंगास्नान केल्यावर ती गंगा घेऊन ते रामेश्वरला गेले आणि तिथे गंगा अर्पण केली.

अशी ही काशीयात्रा करून श्रीलक्ष्मण दीक्षित सांगलीला परत आले. परत आल्यावर ते हिवतापाने (शीतज्वर) आजारी पडले. काया अगदी शुष्क झाली. परंतु भगवान शंकरांच्या कृपाशिर्वादाने ते या तापातून मुक्त झाले.

सांगलीच्या पटवर्धनसरकारांनी महादान द्यायला काढले होते. ते घेणेसाठी इतर राज्यातील बरेच पुरोहित आले होते. एक तेलंगण ब्राह्मण हे दान घेणेकरिता तेलंगणाहून आला होता. सरकारांना या श्री. लक्ष्मण

दीक्षितांना ते दान द्यायचे होते. म्हणून त्यांनी सरकारांकडून दान स्विकारले आणि या महादानात आपल्या कनवटीचा एक रूपाया काढून घातला व ते सर्व दान त्या तेलंगण ब्राह्मणाला देऊन टाकले. केवढी ही विरक्त वृत्ती!

रघुनाथ या नावाचा ब्राह्मण पुत्र श्रीलक्ष्मण दीक्षितांकडे अध्ययनाला राहिला होता. त्याला वेदातील सर्व शिक्षण देऊन शिवदीक्षा दिली आणि धन्य केले. या रघुनाथवर त्यांचे पुत्रवत प्रेम होते. त्याला प्रेमाने 'रघु' या नावाने हाक मारीत. लक्ष्मीबाई नावाच्या बाईला बरेच दिवस पुत्रसंतान नव्हते. ती बाई श्रीलक्ष्मण दीक्षितांकडे आली. त्यांनी त्या बाईचे ओट्यात प्रसाद घातला आणि आश्चर्य असे की, थोड्याच कालावधीत त्या लक्ष्मीबाईंना पुत्ररत्न झाले. अशा भक्तिबळाच्या जोरावर त्यांनी अनेक लीला केल्या. 'ॐ नमःशिवाय' या षडाक्षरी मंत्राचा रोज १२००० जप करीत. या मंत्रातच ते कायम रमलेले असायचे. 'ॐ नमः शिवाय' हा तारक मंत्र आहे हे सगळ्यांना सांगायचे. ते हयात असतानाच त्यांच्या पत्नी, त्यांचा मुलगा व सून हे निवर्तले होते, तरी त्यांनी आपली तितिक्षा (शांती) आणि स्थैर्य ढळू दिले नाही. अशा परिस्थितीत त्यांचे नातू श्रीवासुदेव दीक्षित व त्यांची पत्नी उमा हे दोघे लहान असूनही त्यांनी श्रीलक्ष्मण दीक्षितांची सेवा केली.

एक दिवस त्यांचे घरी चोर आले आणि सगळे दागदागिने व द्रव्य लुटून घेऊन गेले. पण यांनीही 'ही शिव इच्छा असेल' असे म्हणून शांती ढळू दिली नाही. ही बातमी सरकारांच्या राजमातांना कळली. त्यांनी बरेच धन या श्री.लक्ष्मण दीक्षितांना देऊ केले, पण ते मिळालेले धन त्यांनी ब्राह्मण भोजन घालून खर्च करून टाकले.

अशा या श्री.लक्ष्मण दीक्षितांकडून माझे खापर पणजोबा श्रीअनंतराव केळकर ऊर्फ नाना यांनी पार्थिव पूजा घेतली होती. याप्रमाणे नाना पार्थिव पूजा नेमाने करीत असत. पुढे श्री.लक्ष्मण दीक्षितांना शरीर वैकल्यामुळे कृष्णास्नानाला जाता येईना, तेव्हा आमचे श्री.नाना हे त्यांना पाठीवरून कृष्णेच्या स्नानाला नेत असत. स्नान झाल्यावर संध्येची तयारी करून देत. पार्थिव पूजेसाठी लिंग करून देत व मग शेवटी त्यांना घरी पोहोचवीत असत. अशी हालहाल सेवा श्री.नानांनी केली. माझे पणजोबा श्रीमामामहाराज केळकर यांना जेव्हा प्लेगच्या गाठी उठल्या, तेव्हा त्यांना श्रीलक्ष्मण दीक्षितांनी 'शिवनंदी स्तवन मालिका' म्हणायला सांगितली. ही मालिका म्हटल्यामुळे आमच्या मामांचे प्राण रक्षण झाले.

अल्पसंतुष्ट आणि कोणत्याही गोष्टीचा संग्रह न करणे अशी त्यांची वृत्ती असलेने, त्यांना कशाचीही इच्छा नव्हती. साऱ्या इच्छा शुष्क झाल्या होत्या. प्रणवाचा ध्यास लागलेने, त्यांना देहाचे भान राहिले नव्हते. शेवटी त्यांनी जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिनही अवस्थांचा अनुभव घेतला. जागृतीत त्यांना सदाशिवाचा ध्यास लागला होता, स्वप्नावस्थेत त्यांना सदाशिवाचे रूप दिसत होते आणि सुषुप्ती अवस्थेत ते शिवपदी लीन व्हायचे. असा त्यांचा बरेच दिवस क्रम चालला होता.

श्री.लक्ष्मण दीक्षितांनी चार आश्रमापैकी पहिले तीन म्हणजे ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम हे अनुभवले होते. शेवटी त्यांनी संन्यासाश्रम स्विकारून, प्रणवाभ्यास करून, ते परमहंस पदाला पोहोचले. शेवटचे तीन दिवस ते संन्यासाश्रम स्विकारून ब्रह्मीभूत झाले. तपोबळामुळे त्यांची कांती सोन्यासारखी पिवळी झाली होती. शेवटी ते व्याघ्रासनावर बसले, भगवे वस्त्र धारण केले, शेजारी दंड कमंडलू ठेवलेला आणि अशा अवस्थेत कार्तिक शु. ७ शके १८२८ म्हणजेच इ.स. १९०६ साली श्रीलक्ष्मण दीक्षितांनी समाधी घेतली.

यानंतर आमच्या श्रीनानांनी त्यांची सांगली येथील विष्णुघाटावर समाधी बांधली व तेथे त्यांच्या संगमरवरी पादुका स्थापन केल्या. त्यांची पुण्यतिथी ती. नाना साजरी करीत असत.

***

श्रीदासराममहाराज कृत श्रीलक्ष्मणशास्त्री दीक्षित यांची आरती

आरती दीक्षितस्वामी । सर्वश्रेष्ठ झाला तुम्ही ।
तुमच्यामुळे ज्ञान मज । झाले अंतर्यामी ।।ध्रु।।
पुण्यतिथी आज तुमची । विष्णुचिया घाटावरी ।
नाना करिती म्हणोनी । शरण **राम** अंतरी ।।१।।

प.पू. श्रीनीळकंठभारतीमहाराज

जन्म
श्रावण व. ८ शके १८०४
इ.स. १८८२

निर्याण
कार्तिक शु. ११, शके १९०६
बुधवार दि.१६.११.१९८३

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात कोलवडी हे गाव आहे. या गावात श्री. आबाजी ज्योती जगदाळे नावाचे सत्शील गृहस्थ रहात होते. यांच्या पत्नीचे नांव सौ. गुणाई असे होते. या सातारा जिल्ह्यातील अनपटवाडी गावच्या होत्या. या दांपत्याला बरेच दिवस संतान नव्हते. संतान व्हावे एवढ्या हेतूने त्यांनी कोलवडी गावानजीक असणाऱ्या ज्योर्तिलिंगाच्या, दर पौर्णिमेला वाऱ्या केल्या आणि केवळ ज्योर्तिलिंगाच्या कृपेने या दांपत्याचे पोटी अनपटवाडी येथे श्रावण वद्य अष्टमी (गोकुळाष्टमी) शके १८०४ इ.स.१८८२ रोजी सकाळी ९.०० वाजता पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बाराव्या दिवशी या बाळाचे नाव नीळकंठ असे ठेवणेत आले. हा नीळकंठ म्हणजेच आमचे 'प.पू.श्रीनीळकंठभारती महाराज' होत.

सौ. गुणाई यांना साक्षात् ज्योर्तिलिंगाने घोडेस्वाराच्या रूपात येऊन दर्शन दिले होते आणि मीच तुझ्या पोटी जन्म घेईन असे सांगितले होते. घरची परिस्थिती बेताची असलेने नीळकंठभारती हे इयत्ता चौथीपर्यंतच शिकले. कालांतराने उदरनिर्वाहाकरता त्यांनी १९०८ साली सातारारोड येथील कूपर कारखान्यात नोकरी पत्करली. त्यावेळी त्यांना १० पैसे मजूरी होती. पुढे ते लवकरच मुंबईला गेले व तेथे त्यांनी बॉम्बे पोर्ट ट्रस्टमध्ये (गोदीमध्ये) मुकादमाची नोकरी स्विकारली. नोकरी करता करता महाराजांनी तेथील कष्टकरी, माथाडी कामगार यांची संघटना उभारली आणि त्यांना बलोपासना व व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवला. कूपर कारखान्यता नोकरी करत असतानाच त्यांचा अनपटवाडी येथील सौ.राजाई गणपत भोसले नामक कन्येशी विवाह झाला. विवाहानंतर सौ. राजाई हेच नाव कायम ठेवणेत आले. विवाहानंतर वर्ष-दीडवर्षात त्यांना पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नांव हनुमंत ठेवणेत आले. सौ. राजाई यांना गोदीतील कामगार 'आईसाहेब' म्हणत असत.

श्रीनीळकंठमहाराज ६ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे देहावसान झाले. त्यामुळे त्यांच्या आईनेच काबाडकष्ट करून महाराजांचा सांभाळ केला. महाराजांच्या आईने श्रीसद्गुरू तात्यासाहेब वासकरमहाराज, पंढरपूर यांच्याकडून वारकरी पंथाची माळ घातली होती. श्रीनीळकंठमहाराज हे लहान असताना आईबरोबर श्रीवासकरमहाराजांच्या दर्शनाला गेले होते. तेव्हा श्रीवासकर महाराजांनी या श्रीनीळकंठमहाराजांनाही माळ घातली. महाराज १२ वर्षांचे असताना त्यांची आई आजारी पडली आईने महाराजांना चारधामचे तीर्थ आणणेस सांगितले. जवळ पैसा नव्हता. तेव्हा महाराजांनी आपले शेत गहाण ठेऊन चार धाम यात्रा केली आणि तीर्थ आणले. ते आणलेले तीर्थ आईच्या मुखात घातले आणि त्यानंतर आईने देह ठेवला. केवढी ही मातृभक्ती! श्रीमहाराजांचा मुलगा हनुमंत याच्या जन्मानंतर काही दिवसात महाराजांच्या पत्नी आजारी पडल्या. म्हणून महाराज पत्नीला घेऊन पत्नीच्या आजोळी म्हणजे फलटण जवळील धुमाळवाडी येथे आले

आणि तेथे आल्यावर काही दिवसातच सौ.राजाई यांनी इहलोकीची यात्रा संपवली.

यानंतर मात्र महाराजांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. ईश्वरी साक्षात्कार व्हावा अशी ओढ निर्माण झाली. यातूनच ते प.पू.श्रीवासकरमहाराजंचेकडे गेले आणि संन्यास घेणेबाबत मनोदय त्यांचेपुढे व्यक्त केला. श्रीवासकर महाराजांनी त्यांना सोनंद या गावी जाणेस सांगितले. या सोनंद गावी दशनामपंथी श्रीगोविंदभारती महाराज होते. नीळकंठभारतीमहाराजांनी सोनंद गावी जाऊन त्यांचे दर्शन घेतले व त्यांच्या सेवेत तिथेच राहिले. श्रीनीळकंठमहाराजांची वैराग्यवृत्ती, निष्ठा व सेवाभाव बघून श्रीगोविंदभारतींनी यांना दशनामपंथी संन्यास दीक्षा दिली व त्यांना तपश्चर्येसाठी गाणगापूरला जाणेस सांगितले. याप्रमाणे त्यांनी गुरूआज्ञेने गाणगापुरी येऊन ३६ वर्षे खडतर तपश्चर्या केली. तपश्चर्येच्या पहिल्या १२ वर्षात ते फक्त पाच घरे भिक्षा मागत असत. त्यातील एक भाग गायीला, एक भाग नदीला देऊन, तिसरा भाग ग्रहण करीत असत. पुढील १२ वर्षात फक्त कपभर दूध पिऊन त्यांनी योगाभ्यास केला व ते योगीराज बनले. पुढील १२ वर्षे पेलाभर लिंबाचा रस पिऊन तपश्चर्या केली. अशी तीन तपे खडतर तपश्चर्या केल्यावर साक्षात् श्रीदत्तगुरूंनी दर्शन दिले व महाराजांना कामधेनूरुपी झोळी, भस्म व रुद्राक्ष दिले व जगदोद्धाराचे कार्य करणेची आज्ञा केली. तसेच 'माझे जेव्हा स्मरण कराल तेव्हा आर्त पुरवेन' असे सांगितले. असे सांगून दत्तगुरू गुप्त झाले आणि श्रीगोविंदभारती तेथे प्रगट झाले. त्यांनी नीळकंठमहाराजांना भारती नाथपंथाचा अधिकार देऊन आपले उत्तराधिकारी नेमले व त्यांचे 'गुरू श्रीनीळकंठभारती' असे नामकरण झाले. भारतात जे दशनाम पंथ आहे त्यातील भारती पंथाची ही दीक्षा आहे.

यानंतर श्रीनीळकंठभारती हे जगदोद्धार कार्याकरता गाणगापुरातून बाहेर पडले. तेथून भ्रमंती करत सोनंद, धुमाळवाडी, किन्हई, फलटण, अंबले, बर्गेवाडी इ. ठिकाणी वास्तव्य करून ते श्रीविठ्ठलवाडी येथे कायम वास्तव्यास आले. बरेचदा ते सांगलीसही येत असत.

श्रीमद्भागवताच्या आधारे त्यांनी बायोगॅस संशोधन आपले शिष्य श्रीदाजीसाहेबमहाराज यांचे हस्ते करविले. याला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्व प्राप्त झाले. सरकार दरबारी त्याचे योग्य मूल्यमापन होऊन, त्याला चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून 'हरीमालिनी पुरस्कार' तत्कालीन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. मनमोहनसिंग यांचे हस्ते प्राप्त झाला. यावरून त्यांचे भागवताचे चिंतन, मनन किती असेल याचा अंदाज करता येईल.

श्रीनीळकंठभारतींना भक्तगण 'बाबा' म्हणत. ते संतमार्गीचे वाटाडे होते. पंढरपूर, ज्योतीबा, गाणगापूर, नृसिंहवाडी इ. त्यांची नित्य दर्शन वारीची ठिकाणे होती. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, हरिविजय, शिवलीलामृत इ. ग्रंथ त्यांच्या आवडीचे होते. ते स्वतः या ग्रंथांचे पारायण करीत आणि भक्तांनाही पारायण करणेस उद्युक्त करीत. त्यांची रसाळवाणी, अमृतवाणी होती. त्यामुळे श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात. अनेक निरक्षरांना देखील पारायणाची प्रेरणा देऊन त्यांनी साक्षर बनवले. शरीर सामर्थ्याशिवाय अध्यात्मिक ज्ञान लाभत नाही हे जाणून, त्यांनी समर्थ रामदासांप्रमाणे अनेक भक्तांना बलोपासनेची दीक्षा दिली. बाळपणापासून त्यांनी स्वतः व्यायाम, कुस्ती खेळून शरीर कमावले होते. सांगलीच्या केंगणेश्वरी मंदिरात

स्वतः सांगलीकर सरकारांनी त्यांचा ज्येष्ठ मल्ल म्हणून गौरव केला होता. पारतंत्र्याच्या कठीण काळात त्यांनी सर्वसामान्य लोकांना देशप्रेम व बलोपासना शिकवून त्यांची राष्ट्रनिष्ठा जागवण्याचे मोठे कार्य केले. श्रीनीळकंठभारतींनी स्वतः भारतीपंथाचे असूनही त्यांनी दत्तात्रेय, श्रीराम, विठ्ठल-रुक्मिणी इ. देवतांची ७०हून अधिक मंदिरे बांधली.

निर्गुण निरंजन साक्षात्कारानंतरही श्रीमहाराज हे श्रीगाडगेमहाराज, नित्यानंदस्वामी, सेवागिरीमहाराज, समाजगिरीमहाराज, नारायणगिरीमहाराज, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज, डॉ. उपळेकरमहाराज अशा अनेक संतमहात्म्यांच्या सहवासात राहिले. भक्तीचे सहज वर्म हाती आल्याने महाराजांनी आपल्या साधकांना कोणतीही योगसाधना न सांगता नामस्मरण, संतसंग, सत्ग्रंथांचे पारायण अशी सोपी आणि सुलभ साधना सांगितली. अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता, भोंदुगिरी, व्यसनीपणा याविरुद्ध सर्व समाजामध्ये जागृती निर्माण करुन, त्यांना भक्तीमार्गाला लावणेचे कार्य त्यांनी केले.

इ.स. १९८१ साली श्रीनीळकंठभारती सांगलीवाडी येथे श्रीदाजीसाहेब गावडे यांचे घरी आले होते. तेथे श्री. श्रीपतीबुवा धोंगडे आले होते. यावेळी श्रीपतीबुवा नीळकंठभारतींना म्हणाले, महाराज, सांगली येथील गावभागात एक संत राहतात. त्यांचेकडे ५० वर्षे उलटून गेली तरी अखंड नित्य कीर्तन परंपरा सुरू आहे. त्यांच्या वडिलांनी अखंड ३८ वर्षे कीर्तन केले व त्यांचे पश्चात त्यांचे चिरंजीव श्रीदासराममहाराज ती अखंड कीर्तनाची परंपरा चालवत आहेत. तेव्हा तुम्ही त्यांच्याकडे याल का? हे ऐकून श्रीनीळकंठभारतींनी आनंदाने संमती दिली आणि त्याच दिवशी श्रीदाजीसाहेब, श्रीनीळकंठभारती व श्री. श्रीपतीबुवा असे तिघेजण श्रीरामनिकेतनमध्ये आले. वाड्याच्या उंबऱ्याच्या आत पाऊल टाकताच श्रीनीळकंठभारती म्हणाले, ''अरे, हा तर चित्तशुद्धीचा कारखाना आहे व ज्ञानेश्वरमाऊलींनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात जो निगूढ मठ सांगितला आहे, तो हाच आहे.'' यानंतर श्रीनीळकंठभारतींनी श्रीदाजीसाहेबांना येथे नित्यकीर्तन श्रवण करण्यास यावे अशी आज्ञा केली. श्रीनीळकंठभारतींच्या विनंतीला मान देऊन श्रीदादांनी विठ्ठलवाडीला येणेचे मान्य केले व यथावकाश श्रीदादा विठ्ठलवाडीला जाऊन आले.

ज्या दिवशी रामसंजीवनी सौ. सीतावहिनी रामराय केळकर यांनी देह ठेवला, त्या दिवशी पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे श्रीनीळकंठभारती हे धुमाळवाडी येथे हरिनाम सप्ताहास जाणेसाठी स्टॅण्डवर आले होते. त्यांचेबरोबर कीर्तनकार श्री. कोंडीबुवाही होते. एस.टी. आल्यावर मात्र श्रीनीळकंठभारतींनी आपला विचार बदलला व ते श्री. कोंडीबुवांना म्हणाले, 'मला तातडीने सांगलीला बोलावणे आले आहे, तेव्हा तुम्ही एकटेच जावा. मी परवा दिवशी तुम्हाला भेटतो.' याप्रमाणे श्रीनीळकंठभारती हे तडक सांगलीला श्रीदाजीसाहेबांच्या घरी आले आणि सांगू लागले, ''अहो दाजी, एका महान पतीव्रतेचे, सतीचे म्हणजे सौ.सीतावहिनींचे महानिर्वाण झाले आहे. आपणास ताबडतोब तिकडे निघायला पाहिजे.'' याप्रमाणे सर्वजण श्रीरामनिकेतनमध्ये आले व सर्वांनी सौ.सीतावहिनींचे दर्शन घेतले. त्याचवेळी श्रीपतीबुवांनी सौ. सीतावहिनींच्या तळपायाला केशर लावून त्यांच्या पदकमलांचा ठसा कागदावर उमटवून घेतला. तो आजही श्रीरामनिकेतनमध्ये पूजेत आहे.

श्रीनीळकंठभारती आपले पूर्वनियोजित काम सोडून तातडीने सौ.सीतावहिनींच्या दर्शनाला आले, यावरून सौ.सीतावहिनींचा असामान्य अधिकार स्पष्ट होतो.

श्रीदासराममहाराज श्रीदाजीसाहेबमहाराजांना म्हणायचे, 'दाजीसाहेब, गेल्या जन्मी थोडक्या कारणांमुळे तुमचा मोक्ष चुकला आहे. तुम्ही माझे पाचवे पुत्र आहात. म्हणून श्रीनीळकंठभारतींनी तुम्हाला मजकडे सोपविले आहे.' श्रीनीळकंठभारतींचा गौरव करताना श्रीदादा कीर्तनात एक वाक्य सांगत असत की, ''श्रीदत्तात्रयांचा महाराष्ट्रातील साईबाबांनंतर जर कोणता अवतार असेल, तर तो म्हणजे श्रीनीळकंठभारती होत.'' श्रीनीळकंठभारती हे श्रीदासराममहाराजांना फार मानत.

इ.स.१९८२ मध्ये श्रीनीळकंठभारतींनी श्रीदासराममहाराजांचे समोर आपल्या समाधीचा विषय काढला. त्यावेळी श्रीदासराममहाराज म्हणाले, 'महाराज, दाजीसाहेब, शाम पवार इ. तरुण मंडळी परमार्थाला लागली आहेत. त्यामुळे आपण आणखी १० वर्षे तरी समाधी घेण्याचा विचार करू नये.' हे ऐकून श्रीनीळकंठबाबा काही बोलले नाहीत. पुढे बरोबर १ वर्षाने समाधी घेण्याच्या ५ दिवस अगोदर म्हणजे शनिवारी, ते श्रीदासराममहाराजांना भेटायला आले आणि म्हणाले, 'दादा आम्ही आता वैकुंठ प्रयाण करतो. तेव्हा आपण आम्हाला निरोप द्यावा.' हे ऐकून श्रीदासराममहाराज म्हणाले, 'मागच्यावर्षी आपले अजून १० वर्षे राहायचे असे बोलणे झाले आहे आणि त्यातील फक्त १ वर्ष आत्ता उलटले आहे.' हे ऐकून श्रीनीळकंठबाबा म्हणाले, 'खरे सांगू का दादा तुम्हाला, मला १० वर्षांपूर्वीच निजधामाचा आदेश आला होता. पण मी यांच्यासाठी राहिलो आहे. आपण आता मला आनंदाने परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे.' हे ऐकून श्रीदासराममहाराज विचारमग्न झाले. एवढ्यात श्रीरामनिकेतनमधील अखंड कीर्तनाचा साक्षीदार असणारा श्रीगोंदवलेकरमहाराजांचा फोटो खिळ्यातून निसटला व तसाच भिंतीला टेकून उभा राहिला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे फोटोला काहीही इजा झाली नाही. हे पाहून श्रीनीळकंठबाबा म्हणाले, 'दादा, गोंदवलेकरमहाराजांनीही माझ्या म्हणण्याला होकार दिला आहे. आपणही आनंदाने परवानगी द्यावी.' हे ऐकून श्रीदासराममहाराजांना भरून आले. दोघांनी एकमेकांना आलिंगन दिले व साश्रुनयनांनी श्रीदासराममहाराजांनी परवानगी दिली. क्षेमालिंगन झाल्यावर त्या दोघांनी आपल्या उजव्या हाताचा अंगठा एकमेकांच्या अंगठ्याला लावला व दोघेही एका वेगळ्या अवस्थेत गेले. सगळीकडे स्तब्धता होती. नंतर श्रीनीळकंठभारती श्रीदासराममहाराजांचा निरोप घेऊन विठ्ठलवाडीला परत गेले.

येथून गेल्यावर ५ व्या दिवशी म्हणजे कार्तिक शु. एकादशी, बुधवार, शके १९०६, दि.१६.११.१९८३ या दिवशी वयाच्या १०१व्या वर्षी विठ्ठलवाडी येथे त्यांनी समाधी घेतली.

***

प.पू.श्रीआनंदमूर्ती ब्रह्मनाळकर

जन्म
शके १५५०,
इ.स. १६२८

निर्याण
कार्तिक शु. १४, शके १६१८
इ.स.१६९६

कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील वारणा नदीच्या काठी 'भेडसगाव' या नावाचे खेडेगाव आहे. या गावात रवळभट्ट नावाचे सत्शील ब्राह्मण रहात होते. हा काळ साधारणतः १४ व्या शतकातील आहे. या श्रीरवळभट्टांकडे वृत्ति जोशीपणाची, भिक्षुकीची होती. पुढे प्रपंच व उदरनिर्वाहाच्या सोयीसाठी हे घराणे सांगली जिल्ह्यातील, तासगांव तालुक्यातील विसापूर या गावी रहावयास आले. तेथे त्यांनी विसापूर, हातनूर व हातनोली या तीन गावांची वृत्ति मिळविली. तेथून पुढे त्यांना आगळगावी येऊन रहाण्याविषयी निमंत्रण आले. त्याप्रमाणे ते आगळगावी येऊन राहिले व जवळपास असणाऱ्या १७ गावांची जोशीपणाची वृत्ति त्यांना मिळाली. पुढे वृत्तिसंबंधी भाऊबंदांमध्ये वाद/तंटा निर्माण झाला. त्यामुळे या घराण्यातील एक पुरुष श्रीनरसिंहभट्ट हे इ.स.१५५३चे सुमारास ढालगाव या गावी रहावयास आले. या श्रीनरसिंहभट्ट यांचे नातू बाळंभट्ट हे पट्टीचे वैदिक होते. त्यांना विजापूरच्या मुसलमानी दरबारापर्यंत मान्यता होती. या श्रीबाळंभट्टांचे पोटी शके १५५०, इ.स.१६२८ मधे एक पुत्र जन्माला आला. बाराव्या दिवशी त्याचे नांव 'अनंत' असे ठेवणेत आले. हा अनंत म्हणजेच 'अनंतभट्ट किंवा अनंतभडजी किंवा आनंदमूर्ती' होत.

श्रीआनंदमूर्ती यांचे मौजीबंधन ढालगाव ता. मिरज या गावी झाले. श्रीआनंदमूर्तींनी वैदिक पठणाचा अभ्यास आपल्या पितृदेवांच्या मार्गदर्शनाखाली केला. वयाच्या १५-१६ वर्षापर्यंत त्यांनी दशग्रंथ पठण केले. ज्योतीषशास्त्रात ते पारंगत झाले. वयाच्या १५ व्या वर्षीच आनंदमूर्तींचा विवाह सखू नामक कन्येशी झाला आणि कालांतराने या दांपत्यास 'कृष्ण' नामक पुत्ररत्न झाले.

श्रीरघुनाथस्वामी हे रामेश्वर यात्रेसाठी बाहेर पडले असता, भ्रमण करत करत सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील ढालगाव गावी आले. या गावाजवळील अग्रणी नदीच्या काठी दुपारी स्नानसंध्येस उतरले. स्नान करून नदीकाठी व्याघ्राजीन घालून ध्यानस्थ बसले. काही वेळाने गावातील लोक पाणी नेणेसाठी नदीवर आले. रघुनाथस्वामी दूर बसले होते. त्या लोकांना रघुनाथस्वामी न दिसता, तो वाघच आहे असे वाटले. म्हणून पाणी न घेताच ते परत आले. त्यांनी गावचे अधिकारी विजापूर दरबारचे कमावीसदार श्रीअप्पाजीपंत यांचेकडे वर्दी दिली. त्याप्रमाणे वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी अप्पाजीपंत हे त्यांच्या पदरी असलेल्या शेपन्नास शिबंदी लोकांसह शिकारीच्या तयारीने नदीकाठी आले. आपल्याला बघून वाघ आहे तसाच स्थिर आहे, हालचाल करत नाही म्हटल्यावर अप्पाजीपंत पुढे गेले. तेव्हा त्यांना हा वाघ नसून कोणीतरी सिद्धपुरूष वाघाचे कातड्यावर बसलेला दिसला. तेथे जाऊन अप्पाजीपंतांनी त्या साधुपुरूषास साष्टांग नमस्कार घातला व पुढे उभे राहिले. रघुनाथस्वामींनी ध्यान उत्थापन करून डोळे उघडले व खुणेच्या संकेताने तुम्ही कोण व मला नमस्कार का करत आहात? असे विचारले. तेव्हा अप्पाजीपंतांनी, 'आपण माझे घरी येऊन मला पुनीत करावे. मजवर कृपा करावी' अशी प्रार्थना केली. यावेळी रघुनाथस्वामींचे मौनव्रत असलेने त्यांनी अप्पाजीपंतांना

जमीनीवर लिहून आपल्या तीर्थयात्रेची माहिती कथन केली. काशी येथील गंगाजलाच्या ११ कावडी खांद्यावरून वाहून रामेश्वराला जलाने रुद्राभिषेक केला आहे. आता ही १२ वी खेप आहे. याची सांगता झाल्याशिवाय कोणाकडेही जाता येत नाही, किंवा मौनही सोडता येत नाही. हे जमिनीवर लिहिलेले वाचून अप्पाजीपंतांनी आपण यात्रा पूर्ण करून परतीचेवेळी मला दर्शन देऊन कृतार्थ करावे अशी विनंती केली. हे ऐकून रघुनाथस्वामींनी पन्हा जमिनीवर लिहिले की, 'चालू शके १५६७ मध्ये पार्थिव संवत्सरातील माघ पौर्णिमेच्या पहिल्या प्रहरी तीन वर्षांच्या बाल रुपात मी तुला दर्शन देईन,' असे सांगून रघुनाथस्वामी तेथून पुढे गेले. याप्रमाणे अप्पाजीपंत स्वामी येण्याची आतुरतेने वाट पहात होते आणि माघ शु. पौर्णिमेला दिवस उगवला. देवपूजा आटोपून ते स्वामींची वाट पहात बसले. इतक्यात गौरवर्णी, सुवर्णाचे अलंकार ल्यालेले, वाघनख कंठात धारण केलेले, कमरेला करदोटा, अंगात अंगरखा अशा वेषात एक देखणे बाळ अंगणात अवतरले. अप्पाजीपंतांनी हे बघितले आणि ते आनंदित झाले. अंतरीची खूण पटली. त्यांनी त्याची चौरंगावर बसवून यथासांग पूजा केली. चरणावर मस्तक ठेवले आणि मस्तक उचलून पाहतात तो, पूर्वी पाहिलेली स्वामींची मूर्ती दिसू लागली. ती मूर्ती पाहताक्षणीच अप्पाजीपंत अनुग्रह देणेस योग्य आहेत हे जाणून रघुनाथस्वामींनी त्यांना वृत्तीवर आणले आणि एका शुभ मुहूर्तावर त्यांना अनुग्रह दिला. अप्पाजीपंतांचे घरी रघुनाथस्वामींनी थोडे दिवस मुक्काम केला. यावेळी दोघांमधे परमार्थ चर्चा चालत असे. अप्पाजीपंतांनी श्रीरघुनाथस्वामींचा अनुग्रह घेतला, ही बातमी अनंतभडजींना त्यांचे पत्नीमार्फत कळली. ही बातमी कळल्यावर अनंतभटजींना राग आला आणि रागाने मुठी आवळत ते म्हणाले, 'थांबा, या गुरूद्रोह करणाऱ्या अप्पाजीपंताला चांगलाच धडा शिकवतो.' असे म्हणून अनंतभडजी अप्पाजीपंतांचे वाड्यावर आले. शिपायाकडे खाली अप्पाजीपंतांची चौकशी केली, तेव्हा ते माडीवर असलेबाबत त्याने अनंतभडजींना सांगितले. वर जाऊन बघतात तो रघुनाथस्वामी आणि अप्पाजीपंत दोघे बोलत होते. हे दोघे काय बोलतात हे प्रथम ऐकू व नंतर आपण आत जाऊ असा विचार अनंतभडजींनी केला. म्हणून ते दाराला कान लावून ऐकू लागले. श्रीरघुनाथस्वामी हे श्रीअप्पाजीपंताना आपले जीवनातील साध्य काय? आणि आत्मस्वरूपप्राप्तीचा मार्ग कोणता? याबद्दल मार्गदर्शन करत होते. हे मार्गदर्शन जस जसे अनंतभडजी ऐकू लागले, तसतसा त्यांचा रागाचा पारा खाली आला आणि दाराच्या फटीतून रघुनाथस्वामींची मूर्ती पाहिली मात्र, त्यांनी झटकन दार उघडले आणि स्वामींच्या पायावर लोळण घेतली आणि उद्धार करा, असे म्हणाले. हे बघितल्यावर रघुनाथस्वामी म्हणाले, 'अहो अनंतभडजी, आपण तो वेदोनारायण, आम्हीच आपले चरण वंदिले पाहिजेत.' आपले ठिकाणी असणारा ज्ञानाचा अहंकार जावा म्हणूनच स्वामींचे हे बोलणे आहे हे जाणून अनंतभडजी म्हणाले, 'स्वामी, आपण माझे डोक्यावर हात ठेऊन अभय द्याल तरच मी पाय सोडीन.' रघुनाथस्वामींनी अनंतभडजींना अभय वचन दिले. मिरज तालुक्यातील ढालगाव या गावी बेलगंगा नदीच्या काठावर रघुनाथस्वामींनी अनंतभडजींचे मस्तकावर हात ठेवला व 'तत्त्वमसि' या महावाक्याचा बोध करुन उपासनेचा महामंत्र दिला आणि श्रीराम उपासना सांगितली. त्याप्रमाणे श्रीअनंतभडजींनी अत्यंत निष्ठेने उपासना चालविली.

श्रीअनंतभडजींनी रघुनाथस्वामींचा गुरूपदेश घेतल्याचे त्यांचे वडिल श्रीबाळभट्टांना कळले. याचा श्रीबाळभट्टांना अत्यंत राग आला. श्रीअनंतभडजींना ते नाही नाही ते बोलले आणि त्यांनी अनंत भडजींना हे

घर सोडून जाणेची आज्ञा केली. वडिलांचे हे सर्व बोलणे ऐकून श्रीअनंतभडजींना अत्यंत वाईट वाटले. आपल्या वडिलांना नमस्कार करुन त्यांनी आपली पत्नी सखू व दोन महिन्याचा मुलगा कृष्णा यासह घर सोडले आणि चालत चालत ते वसगडे मार्गे ब्रह्मनाळ या गावी आले. त्यांचे बरोबर श्रीरघुनाथस्वामी होते. कालांतराने एक दिवस श्रीरघुनाथस्वामी हे काखेत व्याघ्राजीन, कमंडलू आणि पायात खडावा घालून अचानक निघाले. त्यांचेबरोबर जाणेस अनंतभडजी निघाले, परंतु रघुनाथस्वामींनी त्यांना माझे बरोबर तुम्ही येऊ नये असे सांगितले. हे बघून श्रीअनंतभडजी म्हणाले, 'स्वामी परत केव्हा येणार?' तेव्हा स्वामींनी हाताची ३ बोटे दाखविली आणि ते निघाले. अनंतभडजींना वाटले स्वामी तीन दिवसांनी येणार. म्हणून ते वाट बघत बसले. चौथा दिवस उजाडला पण स्वामी आले नाहीत. म्हणून ते स्वामींच्या शोधार्थ बाहेर पडले. वसगडे सोडून त्यांना ३ वर्षे पूर्ण होणार होती. वाटचाल करता करता ते कोल्हापूर चिकोडी मार्गे संकेश्वरला आले. गावाबाहेर एका घराच्या ओसरीवर विसावले, तोच आतून एक म्हातारी बाहेर आली आणि त्यांची विचारपूस केली. श्रीअनंतभडजींनी त्यांना मी गुरूशोधार्थ भटकत भटकत इथपर्यंत आलेचे सांगितले. तेव्हा ती म्हणाली, 'अरे तुझा तो गुरू दिसायला कसा आहे ते तरी मला सांग.' तेव्हा त्यांनी आपल्या रघुनाथस्वामींचे वर्णन त्या म्हातारीला सांगितले. हे ऐकून ती म्हातारी म्हणाली, 'तू सांगितल्याप्रमाणे एक जटाधारी संन्यासी या गावाबाहेरच्या जंगलात बरेच दिवस वसती करून आहे. जवळच वेळूचे बेट आहे. तेथे तो कायम ध्यान लावून बसलेला असतो. तोच तुझा गुरू असेल तर उद्या जाऊन बघ.' दुसऱ्या दिवशी लवकर उठून आपले सगळे आवरून श्रीअनंतभडजी त्या जंगलात गेले. समोर बघतात तो स्वामी समाधीस्थ बसलेले दिसले. त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. स्वामींचे ध्यान उत्थापन होईपर्यंत अनंतभडजी तिथेच बसून राहिले. बऱ्याच वेळाने रघुनाथस्वामींचे ध्यान उत्थापन झाले. अनंतभडजींनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. अनंतभडजींना बघून स्वामींनी त्यांना प्रेमाने हृदयापाशी कवटाळले. ते वारंवार डोक्यावरून हात फिरवू लागले. परत अनंतभडजींनी गुरूचरणाला मिठी मारली. स्वामींनी त्यांना उठवले आणि स्वामी म्हणाले, 'अनंता, काय योग आहे बघ. माझ्यासाठी अनंत कष्ट झेलून तीन वर्षे सारी सृष्टी धुंडाळलीस, धन्य आहे तुझी. तुझे खरे प्रेम प्रपंचावर आहे का परमार्थावर याची मी परीक्षा बघितली. तू माझ्या कसोटीला उतरलास. आता तू माझा खरा शिष्य झालास. तुझी भक्ती व अपार गुरूनिष्ठा पाहून मला अतीव आनंद झाला आहे. याची स्मृती म्हणून आजपासून आम्ही तुझे ''आनंदमूर्ती'' असे नाव ठेवित आहोत. या नावानेच तुझी ख्याती साऱ्या दिगंतात पसरेल. तुला श्रेष्ठ अशा ब्रह्मानंदाची प्राप्ती होईल, असा माझा आशीर्वाद आहे. तुझ्या मुखातून निघणारे शब्द खरे होतील. ही तीन वर्षे तपश्चर्या करून मी जोडलेले सर्व पुण्य तुझ्या सात पिढ्यांपर्यंत उपयोगी पडेल.' तेथून पुढे हे दोघे मजल दरमजल करत वसगडे येथे कृष्णा-वेरळा नदीच्या काठावर आले. शके १५८९ मधील श्रावण महिना होता. कृष्णेचे विशाल पात्र आणि बहरलेल्या वृक्षांचा रमणीय परिसर रघुनाथस्वामी न्याहाळत होते. पण आनंदमूर्तींना यावेळी त्यांच्या पहाण्यात वेगळाच भाव दिसला. समोर पहात रघुनाथस्वामी म्हणाले, 'अनंता! साप आता कातीला आला आहे. आपल्या छातीवर हात ठेवून पुढे म्हणाले या कातीचा भार आता सहन होत नाही. तिच्या विसर्जनासाठी या सारखे दुसरे ठिकाण नाही.' हे बोल ऐकताच, आनंदमूर्तींच्या मनात चर्रर्र झाले. त्यांचा निजधामास जाणेचा विचार

आनंदमूर्तींनी ओळखला आणि दोघेही पुढे चालू लागले. पुढे भाद्रपद शु. द्वितीया, शके १५८९ इ.स.१६६७ वार रविवार या दिवशी रघुनाथस्वामी मृगाजीनावर पद्मासन घालून ध्यानाला बसले आणि या ध्यानावस्थेतच रघुनाथस्वामींनी देह ठेवला. स्वामींच्या इच्छेप्रमाणे ब्रह्मनाळ येथे संगमावर पार्थीव देहाला अग्नि देणेत आला आणि पुढील सर्व उत्तरक्रिया आनंदमूर्तींनी पार पाडली. काही दिवसांनी रघुनाथस्वामींच्या दहनभूमीवर समाधी बांधणेचे आनंदमूर्तींनी ठरविले. आराखडा तयार केला आणि त्याप्रमाणे गवंडी कामास लागले. बरेचसे काम पूर्ण झाले. पण आश्चर्य असे झाले की अनेकवेळा प्रयत्न करूनही वृंदावन डोलत असल्यामुळे, अखेरचा थर आणि कळस आम्हाला बसवताच येत नाही अशी तक्रार गवंड्यांनी आनंदमूर्तींकडे केली. आनंदमूर्तींनी गवंड्यांना घरी जाणेस सांगितले आणि स्नान केले. बरोबर आणलेले स्वामींचे कातडी जोडे त्यांनी त्या अर्धवट बांधलेल्या वृंदावनाजवळ ठेवले आणि नमस्कार केला. हात जोडून ते म्हणाले, 'स्वामी, आपण हे काय आरंभले आहे? आपण आपल्या अनंताची एवढी इच्छा देखील पूर्ण करणार नाही काय?' आनंदमूर्ती एक दिवस-रात्र न हालता अन्नपाण्यावाचून बसून राहिले आणि निर्धाराने ठाण मांडून बसले आणि आश्चर्य असे की, आनंदमूर्तींना स्वामींचा स्पर्श जाणवला व आवाज ऐकू आला, 'अनंता, तुझी इच्छाच असेल तर वृंदावनाचे काम पूर्ण होईल.' आणि याप्रकारे काम पूर्ण झाले. दरवर्षी आनंदमूर्ती आपल्या सद्गुरूंची पुण्यतिथी उत्साहात साजरी करत असत. दुसरे वर्षी रघुनाथस्वामींच्या पुण्यतिथीला वडगावचे जयरामस्वामी, समर्थ रामदासस्वामी आणि रंगनाथस्वामी निगडीकर आले होते. समाधीसमोर श्रीरामदासस्वामींचे कीर्तन सुरू होते आणि समर्थ कीर्तनात सद्गुरूमहिमा वर्णन करत होते. 'गुरू असावा तर रघुनाथस्वामींसारखा आणि शिष्य असावा तर आनंदमूर्तींसारखा' असे ते कीर्तनात म्हणाले. कीर्तन रंगात आले असतानाच श्रीरघुनाथस्वामींचे वृंदावन डोलू लागले आणि ते स्वतः समर्थ, जयरामस्वामी आणि रंगनाथस्वामी यांनी पाहिले आणि श्रोतृवर्गानेही पाहिले.

आनंदमूर्ती आपले सद्गुरू श्रीरघुनाथस्वामींच्या चर्मी पादुकांची रोज पूजा करीत. ही गोष्ट गावातील लोकांना कळली. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे ही गोष्ट गावातील लोकांना खटकली व गावातील काही लोक त्यांच्याकडे आले व म्हणाले, 'आपण चर्मी पादुकांची पूजा करता असे आम्हास कळले आहे. हे खरे आहे का?' हे ऐकून आनंदमूर्ती म्हणाले, 'मी रोज भगवद्गीतेची पूजा करतो.' हे ऐकल्यावर गावातील मंडळी म्हणाली, आपण खोटे बोलत आहात. आपण आपली समळी उघडून दाखवा.' तेव्हा त्यांनी सद्गुरूंची मनोमन प्रार्थना केली व समळी उघडून दाखविली. समळी उघडताच तेथे चर्मी पादुकांऐवजी भगवद्गीतेची पोथी दिसून आली. हे पाहताच गावातील लोक चकित् झाले व नाईलाजाने तेथून निघून गेले. पण आनंदमूर्तींना पूजेसाठी सद्गुरूंच्या चर्मी पादुकाच पाहिजे होत्या. तेव्हा आनंदमूर्तींनी सद्गुरूंची प्रार्थना केली की, 'आपल्या चर्मी पादुकाच मला पाहिजे आहेत.' त्याबरोबर भगवद्गीतेची पोथी नाहिशी होऊन, तेथे पूर्वीप्रमाणेच सद्गुरूंच्या चर्मी पादुका दिसू लागल्या.

इ.स.१६७० मध्ये जयरामस्वामी हे आनंदमूर्तींकडे रहावयास आले होते. रघुनाथस्वामींनंतर आनंदमूर्ती त्यांनाच स्वामींच्याजागी मानत. अकस्मात् 'जयजय रघुवीर समर्थ' अशी गर्जना ऐकू आली. समर्थ आलेचे समजले. समर्थांना आनंदमूर्तींनी नमस्कार केला व आत बोलावले. समर्थ म्हणाले, 'चाफळ, सातारा, कराड, नाशिक इ. ठिकाणी राममंदिरे झाली आहेत. मिरज प्रांतात अजून राममंदिर अथवा मठ नाही. तो आपण

स्थापन करावा या हेतूने मी आलो आहे.' हेतू ऐकल्यावर तिघांना फार आनंद झाला व तिघे मिरजेला आले. एका गृहस्थाचे घरी रामदासस्वामींचा रात्रीचेवेळी सत्संग सुरू होता आणि त्या रस्त्याने सुभेदार दिलेरखान चालला होता. काय चालले आहे हे पहावे या हेतूने तो बाहेर उभे राहून ऐकू लागला. आतमध्ये सत्संग या विषयावर समर्थांचे कीर्तन सुरू होते. सत्संगतीचे महात्म्य समर्थ वर्णन करत होते. हे ऐकून दिलेरखान आपल्या किल्यात आला आणि दुसरे दिवशी शिपाई पाठवून, त्याने आनंदमूर्ती आणि जयरामस्वामी यांना बोलावून घेतले. दोघांचा सत्कार केला आणि म्हणाला, 'काल मी आपले घरी एकाचे कीर्तन ऐकले. त्यात त्यांनी सांगितले की खरी सत्संगती साधली तर त्याला आत्म्याचे दर्शन होते. मलाही ते दर्शन व्हावे अशी इच्छा आहे. आता तुम्हीच मला तुमचा राम दाखवा नाही तर वाईट परिणाम होतील.' हे ऐकून दोघे म्हणाले, 'आमचे रामदासस्वामी स्नानाला गेले आहेत. ते आत्यावर काय ते बघू.' हे ऐकून सेवक पाठवून खानाने समर्थांना बोलावून घेतले आणि तुम्ही तुमचा राम दाखवावा आणि तुम्ही काल कीर्तनात सांगितलेले कथन खरे करावे असे दिलेरखान म्हणाला. तेव्हा समर्थांनी खानाला सांगितले, 'बाबा, रामदर्शन तसे सहजा सहजी होत नाही. विशिष्ट साधना करावी लागते. संतांनी सांगितलेला मार्ग आक्रमण करावा लागतो.' हे ऐकल्यावर खान म्हणाला, 'तुमचा संतांचा मार्ग दाखवा, नाहीतर मी तुम्हा तिघांना भ्रष्ट करीन.' समर्थ डळमळले नाहीत. तिघेही उठले आणि किल्याच्या तटाच्या बाजूस येऊन उभे राहिले. तटाच्या सभोवती शत्रूवर मारा करण्यासाठी काही छिद्रे असतात, तशी छिद्रे होती. आनंदमूर्तींनी खानाला हाक मारली. खान आला. समर्थांनी 'जय जय रघुवीर समर्थ' असे म्हणत सूक्ष्मरूप धारण केले आणि त्या छिद्रातून जाऊन खाली उतरले. त्यांचे पाठोपाठ आनंदमूर्ती आणि जयरामस्वामी यांनी सूक्ष्म रूप धारण करून, तेही दोघे छिद्रातून खाली उतरले आणि खालून या तिघांनी खानास हाक मारली आणि म्हणाले, 'आम्ही ज्या मार्गाने आलो, त्याच मार्गाने तू खाली ये.' हे ऐकून खानाला दरदरून घाम आला. तिघांचे सामर्थ्य कळले आणि त्याने खाली येऊन या तिघांची क्षमा मागितली. 'आपण येथे मिरजेत मठ बांधून वास्तव्य करावे. मी आदिलशहाकडून आपणास जमीन आणि द्रव्य देणेची व्यवस्था करतो. आपण नाही म्हणू नये,' असे खान म्हणाला. समर्थांना हेच पाहिजे होते. यथावकाश मिरजेत राममंदिर आणि मठ बांधून या मठावर मठपती म्हणून समर्थांनी वेण्णाबाईंची नियुक्ती केली.

इ.स.१६७२ साली अचानक एक दिवस एक घोडेस्वार आला आणि त्याने आनंदमूर्तींना नमस्कार केला. लखोटा देऊन तो परत गेला. लखोटा उघडून बघतात तो त्यामधील पत्रात, 'तुम्हास टाकोटाक वडगावला बोलावले आहे' असा मजकूर होता. आनंदमूर्तींनी लगेच घोडा काढला आणि त्यावर आरूढ होऊन ते वडगावला गेले. वडगावला जयरामस्वामींच्या मठाच्या दालनात प्रवेश करताच, त्यांना एका आसनावर समर्थ रामदासस्वामी आणि एका आसनावर श्रीरंगनाथस्वामी बसलेले दिसले. वातावरण मोठे गंभीर होते. जयरामस्वामी गादीवर पडून होते, असे दृश्य दिसले. त्यांना आनंदमूर्तींनी नमस्कार केला. जयरामस्वामी कण्हत होते. जयरामस्वामींनी समर्थ, आनंदमूर्ती आणि रंगनाथस्वामी यांना नमस्कार केला आणि म्हणाले, 'आम्हाला नेणेकरिता देवदूत विमान घेऊन आले आहेत. आम्हाला आज्ञा द्यावी.' जयरामस्वामींनी 'रामकृष्णहरि' हे भजन सगळ्यांना करायला सांगितले आणि जयरामस्वामी ध्यानस्थ बसले व त्या अवस्थेतच जयरामस्वामींनी समाधी घेतली. जयरामस्वामींनी देह ठेवला हा आनंदमूर्तींच्यावर दुसरा मोठा आघात होता.

यानंतर कालांतराने आनंदमूर्ती सांगलीला वास्तव्याला आले. पण वसगडे येथील आनंदमूर्तींच्या मठाचाही व्याप वाढला होता. ब्रह्मनाळ गावच्या इनामीची सनदही छत्रपती राजाराममहाराजांच्याडून त्यांना सन्मानपूर्वक देणेत आली होती. हा सर्व व्याप त्यांची दोन मुले पहात होती. बऱ्याचवेळा आनंदमूर्ती हे वास्तव्यास वसगडे येथील मठातच असायचे. दिवाळीच्या सुमारास ते परत सांगलीला आले. वैकुंठ चतुर्दशीचा दिवस उजाडला. सकाळी स्नान वगैरे केले. धूतवस्त्र परिधान केले आणि देवपूजेला बसले. सभोवती सगळे ब्राह्मण मंडळ बसलेले होते. रुद्राभिषेक सुरू होता आणि एवढ्यात एक तेजस्वी ब्राह्मण त्यांच्या जवळ आला आणि त्याने पंचांग उघडले. पंचाग पाहून तो आनंदमूर्तींना म्हणाला, 'आज वैकुंठ चतुर्दशी शुभतिथी आहे. आपल्या निर्याणास आजचा दिवस योग्य आहे.' हे ऐकून क्षणभरच महाराजांनी डोळे झाकले आणि लगेच उघडून त्या ब्राह्मणास नमस्कार केला व म्हणाले, 'ठीक आहे, आपण हे सांगण्यासाठी इथवर येण्याचे कष्ट घेतलेत, हे माझे परम भाग्य आहे. आपल्या आज्ञेप्रमाणे होईल.' हे ऐकल्यावर ब्राह्मण जसा अचानक आला, तसा तडक निघून गेला. ब्राह्मणांचे पठण झाल्यावर महाराज तेथील उपस्थितांना म्हणाले, 'आज आम्ही सर्वांचा कायमचा निरोप घेणार. आमचे महाप्रयाणाची तयारी करावी. आपली नित्यकर्मे आटपून त्वरित आपण येथे यावे आणि आमचे निर्याण झाल्यावर आमचे शवास ब्रह्मनाळ येथे नेऊन रघुनाथस्वामींचे समाधीजवळ अंत्यसंस्कार करावा.' हे ऐकल्यावर उपस्थितांना धक्काच बसला. त्यातील काही ब्राह्मण म्हणाले, 'महाराज, तो आलेला ब्राह्मण म्हणजे काय देव लागून गेला आहे?' हे ऐकल्यावर महाराज म्हणाले, 'अरे तो ब्राह्मण नसून साक्षात् ब्रह्मदेवच ब्राह्मण वेषात आले होते. आपला विश्वास बसत नसेल तर त्याला शोधून आणा.' सगळ्यांनी सगळी सांगली धुंडाळली, पण शोध लागला नाही. महाराजांनी परत स्नान केले. घरच्या लोकांच्या आग्रहाखातर थोडे दूध घेतले. अंगावर कांबळी घेतली आणि देवघरातील बैठकीवर येऊन बसले. सर्व शिष्यगण, ब्राह्मण मंडळी आणि काही गुरूबंधू मठात गोळा झाले. त्या सगळ्यांना आनंदमूर्तींनी, 'अखंड साधना सुरू ठेवा, रामरायाला विसरू नका' असे सांगितले व सर्वांना भजन सुरू करणेस सांगितले. रामाचे स्मरण करत त्याच्या जयघोषात आम्ही रघुनाथस्वामींच्या भेटीस जाऊ असे ते निर्वाणीची भाषा बोलले. रघुनाथस्वामींच्या पादुकांवर एक फूल वाहून, थोडा वेळ डोळे झाकून तटस्थ बसले. थोड्यावेळाने आनंदमूर्ती एका विशिष्ट अवस्थेतून भानावर आले. त्यांनी सर्वांना लवून नमस्कार केला. सर्वांना 'श्रीराम जयराम जयजयराम' या मंत्राचा जप करणेस सांगितले. शेवटी 'सीताकांतस्मरण जयजयराम' असा सगळ्यांनी घोष केला. आनंदमूर्तींनी आपले मस्तक रघुनाथस्वामींच्या पादुकांवर ठेवले आणि कार्तिक शुद्ध चतुर्दशी शके १६१८ म्हणजेच इ.स. १६९६ रोजी रघुनाथस्वामींच्या पादुकांवरच मस्तक ठेऊन वयाच्या ६८ व्या वर्षी महाप्रयाण केले. नंतर त्यांना ब्रह्मनाळला आणणेत आले व रघुनाथस्वामींचे समाधी शेजारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करणेत आले. पुढे लवकरच त्या जागेवर वृंदावनाची स्थापना कऱ्हाड येथील निरंजनस्वामींचे हस्ते करण्यात आली.

दि.७ मार्च, १९५४ रोजी प.पू.श्री श्रीधरस्वामीमहाराज हे श्रीआनंदमूर्ती यांच्या दर्शनाकरिता ब्रह्मनाळ येथे गेले असताना, त्यांनाही रघुनाथस्वामींच्या समाधी बरोबरच आनंदमूर्तींच्या समाधीलाही डोल आल्याचा अनुभव आला. याची साक्ष आजही भक्तांना अनुभवास येते.

***

प.पू.श्रीशिवलिंगव्वाअक्का (जत)

जन्म
शके १७८९,
इ.स.१८६७

निर्याण
कार्तिक व.०१ शके १८५२
दि.२.११.१९३०

श्रीराचय्यास्वामी हे जत संस्थानातील ममदापूर या गावचे रहिवासी होते. ते चिम्मलगी मठाशी निगडीत होते. जतमध्ये श्री.आरळी नावाचे मोठे व्यापारी रहात होते. त्यांची जतमध्ये एक स्वतंत्र मठ असावा व त्या मठावर एक स्वतंत्र जंगम असावा अशी इच्छा होती. त्या इच्छेप्रमाणे त्यांनी जतमध्ये एक स्वतंत्र जागा घेऊन जंगम मठ बांधला. या मठावर जंगमस्वामी म्हणून त्यांनी श्रीराचय्या स्वामी यांना बोलावून घेतले व तेथे त्यांची व्यवस्था केली. याप्रमाणे श्रीराचय्यास्वामी आणि त्यांच्या पत्नी सौ. बसव्वा हे तेथे रहायला आले. या दांपत्याच्या पोटी शके १७८९,इ.स. १८६७ मध्ये एक कन्यारत्न अवतीर्ण झाले. या कन्येचे 'शिवलिंगव्वा' असे नाव ठेवण्यात आले. या शिवलिंगव्वा म्हणजेच आमच्या 'प.पू. श्रीशिवलिंगव्वाअक्का' होत.

श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर हे वतनदार देशपांडे असल्याने, त्यांना वतनाच्या कामानिमित्त वरचेवर जतला जावे लागे. काही वेळा त्यांना जतला मुक्काम करावा लागे. यावेळी महाराज हे श्रीराचय्यास्वामींचे जंगम मठात मुक्काम करायचे. असेच एक दिवस श्रीभाऊसाहेबमहाराज या जंगम मठातील सोप्यावर पोथी वाचत बसले होते. समोरच अंगण होते आणि त्या अंगणात ५-६ लहान मुली आपापसात खेळत होत्या. श्रीमहाराजांच्या पोथीकडे या मुलींचे अजिबात लक्ष नव्हते. या मुलींच्यात शिवलिंगव्वाही होत्या. अचानक श्रीभाऊसाहेबमहाराजांची दृष्टी शिवलिंगव्वांवर गेली. त्यांनी शिवलिंगव्वांना 'शिवाक्का' म्हणून हाक मारली. हाक मारताच शिवलिंगव्वा श्रीमहाराजांसमोर उभ्या राहिल्या. महाराज एकदम म्हणाले, 'मुली शिवाक्का, तुला मी नाम द्यावे म्हणतो.' 'तू ते घेतेस नां?' असा प्रश्न श्रीमहाराजांनी त्यांना विचारला. सुरवातीला श्रीशिवलिंगव्वांनी मानेने खुणावून नकार दिला, पण तो भाग्याचा क्षण त्यांना टाळणे अशक्य झाले आणि श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीशिवलिंगव्वांना कर्णद्वारे नाम दिले.

देवावर श्रद्धा व भक्तीबद्दल प्रेम हे श्रीशिवलिंगव्वांचे उपजत गुण होते. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्या साधनही करू लागल्या होत्या. त्यामुळे त्यांचे मनात संसाराबद्दल उदासीनता निर्माण झाली. लग्नाचे वय झाले म्हटल्यावर त्यांचे आई-वडिल त्यांचेजवळ लग्नाचा विषय काढू लागले. पण त्या लग्नास तयार होईनात. शेवटी आई-वडिलांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांना प्रार्थना करून त्यांचे मन वळविणेची प्रार्थना केली. याप्रमाणे श्रीमहाराजांनी त्यांना लग्न करून घेणेस सांगितले. केवळ आपल्या गुरूंची आज्ञा म्हणून श्रीशिवलिंगव्वा लग्न करणेस तयार झाल्या. याप्रमाणे श्रीशिवलिंगव्वांचा विवाह जत तालुक्यातील उमराणी गावातील, श्री.परय्या नामक गृहस्थांचे चिरंजीव श्री. करबसय्या यांचेशी झाला. लहान वयात लग्न झालेने उपवर होईपर्यंत त्यांना सासरी पाठविले नाही. उपवर झाल्यावर (मोठ्या झाल्यावर) त्यांना सासरी

पाठविणेचा विचार सुरू झाला. मात्र त्यांनी सासरी जाण्यास नकार दिला. परत ही तक्रार श्रीभाऊसाहेबमहाराजांपर्यंत गेली. शेवटी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्या उमराणी गावी सासरी गेल्या.

यथावकाश श्रीशिवलिंगव्वांना एक पुत्र झाला. त्याचे नांव 'दंडय्या' ठेवणेत आले. त्यानंतर त्यांना कन्या झाली. तिचे नाव 'भागव्वा' ठेवणेत आले. प्रपंचात व आपल्या मुलाबाळात मन अडकल्याने नामाकडे आणि नेमाकडे जेवढे लक्ष द्यायाला पाहिजे होते, तितके लक्ष त्यांना देता आले नाही. पण श्रीभाऊसाहेबमहाराजांवरील श्रद्धा आणि गुरुवचननिष्ठा ही कायम होती.

श्रीशिवलिंगव्वांच्या पुढील आयुष्यात भरून न येणारे असे दोन दुःखद प्रसंग घडले. त्यांचा मुलगा श्री. दुंडय्या याचे अचानक देहावसान झाले आणि लगेचच थोड्या दिवसात मुलगी भागव्वाही निवर्तली. याचे त्यांना अतोनात दुःख झाले. मनस्थिती ढासळली, हे पाहून श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना 'संसार ही माया आहे. मायामोहाच्या पाशात अडकून पडल्यास हाती आलेले अमोलिक रत्न नाहीसे होईल' इ. उपदेश केला. त्याप्रमाणे श्रीशिवलिंगव्वा दुःखातून सावरल्या.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी कठोर साधन केले. यामुळे श्रीमहाराजांच्या शिष्य मंडळीत श्रीशिवलिंगव्वांबद्दल आदरभाव होता. एकीकडे साधनातील मिळणारा आनंद व दुसरीकडे प्रापंचिक अडचणी असा काळ त्यांच्या जीवनात आला. त्यांच्या पतीने राहते घर गहाण ठेऊन कर्ज काढले. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावत गेली आणि अशा परिस्थितीतच त्यांचे पती श्री. करबसय्या यांना इ.स.१९०४ चे दरम्यान देवाज्ञा झाली. होता तो आधारही नाहिसा झाला. त्यामुळे श्रीशिवलिंगव्वांना परमार्थाशिवाय दुसरे कशाचेच बंधन राहिले नाही. आपले पती निवर्तल्यानंतर त्यांनी परपुरुषाचे मुख पहायचे नाही असा निश्चय केला आणि हा निश्चय त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत पाळला. परपुरुषाशी बोलायचे झाल्यास त्या पडद्याआड बसून बोलत असत. मोह अक्षात (डोळ्यात) आहे असे श्रीभाऊसाहेबमहाराज म्हणायचे. अक्षानेच पाहिले नाही तर मोह होणारच नाही, म्हणून परपुरुषाकडे बघायचे त्यांनी सोडून दिले. जतमधील एक व्यापारी श्रीशिवलिंगव्वांच्या दर्शनास आला व त्यांचेकडे दर्शन मागू लागला. तेव्हा त्या म्हणाल्या, 'अरे, माझे दर्शन हवे असल्यास त्याला स्त्री होऊनच आले पाहिजे, तरच मिळेल.'

इंचगिरीला गेल्यावर त्यांची नेमाला बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली असे. श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या समाधीच्या मागे पडवी होती. त्या पडवीच्या भिंतीत मोठा खोल कोनाडा होता, त्या कोनाड्यात श्रीशिवलिंगव्वा नेमास बसत. पण त्या कोनाड्यालाही पडदा लावलेला असे.

श्रीशिवलिंगव्वांची अध्यात्मिक योग्यतेची आणि अधिकाराची कीर्ती सगळ्या जत गावात पसरली. जतच्या राणीसाहेब यांच्याही कानावर ही कीर्ती गेली. या राणीसाहेब श्रीशिवलिंगव्वांना आपल्याकडे बोलावून घेत व काही अध्यात्मिक गोष्टी ऐकत. त्यामुळे या दोघींचा घरोबा निर्माण झाला. त्यांच्या आर्थिक परिस्थितीची माहिती राणीसाहेबांना झाली. त्यामुळे राणीसाहेबांनी त्यांची जतमधील एका शाळेत शिक्षिका म्हणून

नेमणूक केली. यावेळी श्रीशिवलिंगवांचे वय ४३ वर्षे होते. शाळेला नोकरीला जातानाही त्या गावाच्या बाहेरील रस्त्याने जायच्या, म्हणजे परपुरुषाचे दर्शन होत नसे.

श्रीशिवलिंगव्वा ह्या श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा अधिकारी शिष्या होत्या. त्या हातावर कापूर लावून श्रीमहाराजांची आरती करायच्या. श्रीगुरूदेव रानडेसाहेब, श्रीअंबुरावमहाराज हे त्यांना मानायचे. श्रीभाऊसाहेबमहाराज हे भक्तीप्रसारार्थ बाहेरगावी जायचे, त्यावेळी सर्व शिष्यांसमवेत श्रीशिवलिंगव्वाही असायच्या. आपल्या मनाप्रमाणे भक्तीचा प्रसार झाल्यास पंढरपूरला जाऊन नवस फेडायचा असा श्रीभाऊसाहेबमहाराजांनी नवस केला होता. या नवसाप्रमाणे भक्तीप्रसार झालेने श्रीमहाराज हे इ.स.१९०९-१९१० साली पंढरपुरास गेले होते. यावेळीही शिवलिंगव्वा त्यांचे बरोबर होत्या. श्रीदासबोधावर श्रीशिवलिंगव्वा प्रवचन करायच्या. त्यांनी कानडी भाषेत बरीच पदे व अभंग केले. प.पू.श्रीगुरूदेव रानडेसाहेब यांच्या पत्नी सौ. सीताबाई यांचेवर त्यांचे विशेष प्रेम होते. त्यांना वेळोवेळी नेमाबद्दल त्या मार्गदर्शन करायच्या. प.पू.श्रीगुरूदेवांच्या कन्या शकुंतला रानडे यांना श्रीशिवलिंगव्वांचा अनुग्रह होता.

अशा या श्रीशिवलिंगव्वांना शेवटी मारिका आजार झाला. या आजारातून आपण वाचणार नाही ही त्यांना जाणीव झालेने, त्यांनी आपले नावावरील असणारी मिळकत आपल्या बहिणीच्या नावे मृत्यूपत्राने करून दिली आणि कार्तिक व. १ शके १८५२, दि.०२.११.१९३० रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी श्रीशिवलिंगव्वा शिवैक्य झाल्या.

***

श्रीदासराममहाराजकृत श्रीशिवलिंगव्वा यांची आरती

शिवलिंगव्वा नामे जतेमाजी जहाली ।
योगिनी बहु मोठी कशी भाग्यशाली ।
भाऊराव कृपेने उपासना केली ।
परपुरुषा न च पाही ऐसी माऊली ।।१।।
जयदेवी जयदेवी जय जय जय माते ।
आरती ओवाळू तुजला गुणवंते ।।ध्रु।।
निद्रा नाही परी जे नेमातचि रमली ।
कर्पूर जी तळहाती गुरुपुढती उजळी ।
गुरूनाथांचे पायी वंदितसे भाळी ।
सद्भक्तीपद ते **दासराम** न्याहाळी ।।२।।

प.पू.श्रीगंगाधरसिंग दीक्षित

जन्म
शके १८२०
इ.स.१८९८

निर्याण
कार्तिक व.११ शके १९०९
दि.१७.११.१९८७

श्री. रघुनाथराव सिंग या नावाचे सत्पुरुष कर्नाटक राज्यातील शिरगुप्पी येथे रहात होते. मूळचे ते राजपुतान्यातील होते. त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता. या श्री. रघुनाथरावांना चिमडच्या प.पू.सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह लाभला होता. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे ते नित्यनेमाने साधन करीत असत. यामुळे महाराजांची त्यांचेवर विशेष मर्जी होती. एका गृहस्थाने या रघुनाथरावांना प्रश्न केला की, ''तुम्हाला साधे आसन तरी घालता येते कां?'' हा प्रश्न ऐकल्यावर रघुनाथराव म्हणाले, 'कोण म्हणतो येत नाही म्हणून?' हे ऐकल्यावर तो गृहस्थ म्हणाला, 'आम्हाला तेच पहायचे आहे, बसून दाखवा.' याप्रमाणे रघुनाथराव साधनेला बसले आणि त्यांनी श्वास वर घेतला मात्र, त्यांचे आसन एक हातभर अंतराळी झाले. श्वास वर घेतला की ते हातभर अंतराळी व्हायचे व खाली सोडला की जमीनीवर स्थिर व्हायचे हे बघितल्यावर मात्र तो गृहस्थ म्हणाला, 'महाराजांची तुमच्यावर इतकी मर्जी कां आहे ते मला आत्ता कळले.' अशा या श्रीरघुनाथरावांचा कृष्णाकाठी (सध्या गावभागातील विसावा चौकाजवळ) प्रशस्त मोठा वाडा होता. या वाड्याला 'सिंगांचा वाडा' म्हणूनच लोक ओळखायचे.

श्रीचिमडच्या महाराजांच्या निर्याणानंतर रघुनाथराव हे सांगलीला स्थायीक झाले. मूळचे यांचे आडनांव 'सिंग' आहे. ते कनोज ब्राह्मण होते पण चिमडच्या महाराजांचा अनुग्रह म्हणजे दीक्षा रघुनाथरावांना मिळाली म्हणून सांप्रदायिक लोक त्यांना दीक्षित म्हणू लागले. तेच आडनाव पुढे रुढ झाले.

श्री.रघुनाथराव दीक्षित यांचे यथावकाश लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नांव गंगव्वा होते. त्यानंतर त्यांना चार पुत्र व तीन कन्यारत्न झाले. सदाशिवराव, महादेवराव, गंगाधरराव व विश्वनाथराव अशी मुलांची नांवे आहेत.

यापैकी शके १८२०, इ.स.१८९८ साली श्रीगंगाधररावांचा जन्म शिरगुप्पी येथे त्यांचे घरी झाला. श्रीरघुनाथराव हे तालीमबाज असलेने लहानपणापासूनच श्री. गंगाधररावांना तालमीची आवड होती. रोज सूर्यनमस्कार घालणे, जोर, बैठका, उंचउडी, करेला, कुस्ती हे व्यायाम प्रकार गंगाधरराव करीत असत. शिक्षणातही गंगाधरराव हुशार होते. ते इंटरपरीक्षा उत्तर्ण झाले होते. सांगलीतील सुप्रसिद्ध मल्ल श्री. हरिनाना पवार यांना व्यायामाचे बाळकडू गंगाधररावांनीच पाजले. तसेच हरी नानांवर अध्यात्मिक प्रवृत्तीचे चांगले संस्कारही केले. यथावकाश श्रीगंगाधररावांना गावातील लोक गंगाधरकाका या नावाने ओळखू लागले.

पुणे येथे महाराष्ट्रातील व्यायामपटूंची व्यायाम परिषद भरवली होती. त्या परिषदेमध्ये एक मोठा करेला (लाकडी गदा) ठेवला होता. जो कोणी हा करेला फिरवून दाखवेल, त्याला सरकारचे मानपत्र व बक्षिस ठेवले होते. या परिषदेला गंगाधरकाका गेले आणि त्यांनी तो करेला फिरवून दाखवला. त्यात त्यांनी पहिला नंबर मिळविल्याने छत्रपती शाहूमहाराजांचे हस्ते त्यांना मानपत्र व बक्षिस देणेत आले. गंगाधरकाकांनी फिरविलेला तो करेला आजसुद्धा सांगलीतील श्री. हरि नाना पवार यांचे तालमीत असून, तो आजपर्यंत नावाजलेल्या पैलवांना देखील फिरवता आलेला नाही. हा करेला फिरविणाऱ्यास बक्षिसही ठेवलेले आहे. पण ते बक्षीस आजतागायत कोणीही मिळविलेले नाही.

माझे आजोबा प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांना व्यायामाची आवड नव्हती. पण श्री. गंगाधरकाका यांच्याकडून जोर बैठका काढून घेऊ लागले. सुरवातीला काही सूर्यनमस्कार व काही जोर व बैठका काढून घेऊ लागले. पण नंतर नंतर रोज दिडशे जोर आणि तीनशे बैठका काढून घेऊ लागले. असे ४ महिने दिनक्रम चालला होता. यावेळी श्रीदासराममहाराजांचे बरोबर श्री. पंढरीनाथ कुलकर्णी मणेराजुरीकर व्यायाम करणेस असत. नंतर नंतर श्री. गंगाधरकाकांनी श्रीदासराममहाराजांना दोनशे जोर आणि चारशे बैठका काढणेस सांगितले. तेव्हापासून 'मी व्यायाम हा शब्द देखील काढला नाही' असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत असत.

अशा श्री.गंगाधरकाकांना चैत्र शु.९ इ.स.१९१७ रोजी श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे ते रोज साधना करीत असत. दरवर्षी श्री. गंगाधरकाका हे चिमडला रथोत्सवाला जायचे. तसेच गंगाधरकाका हे चिमडच्या श्रीनारायणमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे वेळ घेऊन ध्यानास बसत. श्री. गंगाधरकाका हे दररोज श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनास जात होते. इ.स.१९१४ साली कृष्णेला महापूर आला, त्यावेळी ते कवलापूरात होते. तर ते कवलापूरहून पोहोतच कीर्तनाला येत आणि पोहत परत जात. ही खरी कीर्तननिष्ठा आहे. याबाबत आमचे श्रीदासराममहाराज म्हणतात की, हजारो श्रोते एका पारड्यात व गंगाधरकाका एका पारड्यात घातले तर, कोणाचे वजन जास्त भरेल हे सांगणेची जरुरी नाही.

गंगाधरकाकांच्या मातोश्री गंगव्वा या एक दिवस तात्यासाहेबमहाराजांना म्हणाल्या, 'महाराज, तुमचा गंगाधर अत्यंत खोडकर आहे. कोणाचे ऐकत नाही. मनात येईल तसे वागतो. त्याला राग फार आहे. आपण त्याला चार शब्द सांगून समजवावे आणि त्याला शांत करावे.' याप्रमाणे महाराजांनी एक दिवस गंगाधरकाकांना विचारले, 'अरे गंगाधर, हे असे किती दिवस चालणार?' यानंतर मात्र गंगाधरकाका शांत झाले.

गंगाधरकाका हे दररोज श्रीतात्यासाहेबमहाराजांची पादसेवा करायला जायचे. त्यावेळी काही वेळा श्रीतात्यासाहेबांचे हात-पाय चेपताना त्यांचे बोटही आत जात नसे इतके ते टणक लागायचे, तर काही वेळा कापसासारखे मऊ लागायचे. अशी अवस्था ब्रह्मरूप महात्म्यांची असते.

गंगाधरकाका यांचे पिताजी श्री. रघुनाथराव यांनी श्री. दत्तोपंत दीक्षित यांना तालीम शिकविली म्हणून ''माझ्याकडून काही गुरूदक्षिणा घ्या'' असे ते श्री. रघुनाथरावांना म्हणत. परंतु रघुनाथरावांनी कधीच

गुरूदक्षिणा मागितली नाही. नंतर ते गंगाधरकाकांनाही गुरूदक्षिणा मागा असे म्हणायचे. तेव्हा गंगाधरकाका म्हणाले, ''योग्य वेळ आली की मी गुरूदक्षिणा मागेन, आत्ता नको.''

कृष्णाकाठी 'संध्यामठ' या नावाने मोठी मळी व मोकळी जागा होती. ती श्री. दत्तोपंत दीक्षित यांचे मालकीची होती. या संध्यामठात श्रीतात्यासाहेबमहाराजांचे कीर्तन झाले, त्यावेळी ते या कीर्तनात म्हणाले की, ही जागा विश्रांतीला फारच चांगली आहे. पुढे श्रीतात्यासाहेबमहाराजांनी रविवार पौष व.६ इ.स.१९२४ रोजी महाप्रयाण केले. त्यांची अंत्ययात्रा निघाली. अमरधामचे रस्त्यावर अंत्ययात्रा आली. एवढ्यात श्री.गंगाधरकाका एकदम आडवे आले व त्यांनी ही यात्रा थोपविली व ते दत्तोपंत दीक्षितांकडे गेले आणि म्हणाले, 'तुझी मळी मला गुरूदक्षिणा म्हणून दे.' त्याप्रमाणे श्रीदत्तोपंतांनी बक्षिसपत्राने ही जागा श्रीगंगाधरकाकांना दिली आणि या जागेवर श्रीतात्यासाहेबमहाराजांचा दहनविधी पार पडला.

या दहनभूमीच्या जागेवर श्रीतात्यासाहेबमहाराजांची समाधी बांधावी असा विचार गंगाधरकाकांचे मनात आला आणि त्याप्रमाणे हालचालही सुरू झाली. पाया लवकर लागेना. आज जेवढी इमारत दिसती आहे, त्यापेक्षाही खोल पाया खणणेत आला. याकामी श्री.शंभूराव इनामदार, शंकरराव ताम्हनकर, भाऊ भटजी बापट इ. अनेक तालीमबाज लोकांनी फार परिश्रम घेतले. श्रमदानातून ही समाधीची इमारत उभी राहिली. मंदिराला तळघर करणेत आले व दगडी चौथरा करणेत आला. त्या चौथऱ्यावर लाकडी पेटी ठेऊन श्री. बाबू भटजी बापट यांनी श्रीतात्यासाहेबांच्या पादुका आणल्या होत्या, त्याची स्थापना करणेत आली. रात्रीच्यावेळी उजेड असावा म्हणून आमच्या श्रीमामामहाराजांनी एक म्युन्सिपालटीचा कंदील आणून तेथे डांबावर लावून ठेवला होता.

श्री. गंगाधरकाकांचा विवाह थोडा उशीरा झाला. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे ताकपिठ्या विठोबापुढे इ.स.१९४२ साली सौ. गिरीजाबाई यांचेबरोबर विवाह झाला. त्यानंतर त्यांना यथावकाश मुलगा झाला, पण तो लवकरच निवर्तला. याचे गंगाधरकाकांना फार वाईट वाटले. सौ. गिरीजाबाईंना प.पू.नारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह प्राप्त झाला.

श्रीगंगाधरकाका हे दरवर्षी मोठ्या थाटात श्रीतात्यासाहेबांचा पुण्यतिथी उत्सव साजरा करत. या उत्सवाकरता हनुमान समाधी मंदिरात श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर, श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे खास करुन येत असत. तसेच चिमडमहाराजांचे शिष्य श्री. वामन भटजी बाळेकुंद्रीकर हेही महोत्सवाला येऊन १५ दिवस रहात असत. तसेच प्रामुख्याने प.पू.गुरुवर्य श्रीमामासाहेब दांडेकर, फुटाणेमहाराज, नारायणमहाराज मळणगांवकर, पांडुरंगमहाराज ताम्हनकर इ. महात्मेही या उत्सवास येत असत. उत्सवकाळात गंगाधरकाका हे अनाथ आश्रमातील सर्व विद्यार्थ्यांना बोलवत असत. ही मुले करुणाष्टके म्हणत असत. यानंतर सगळ्यांना दुग्धपान दिले जाई. या पुण्यतिथी उत्सवात केळकर घराण्याच्या कीर्तनाचा पहिल्यापासून मान आहे. श्री. गंगाधरकाका यांचे मनात श्रीमामामहाराज व श्रीदासराममहाराज यांचे विषयी नितांत आदर व स्नेह होता.

उत्सवातील शेवटच्या दिवशी लळिताच्या प्रसंगी ते फारच भावूक होत. श्रीमामा व श्रीदादा यांना ते प्रेमाने अत्तर लावीत. आरती झाल्यानंतर आता पुढील वर्षी कीर्तनास या असे प्रेमाने सांगत. विरह सहन न झाल्यामुळे ते श्रीमामा व श्रीदादा यांना सोडावयास घरापर्यंत येत. परत जाताना पुन्हा पुन्हा फिरफिरून मागे पहात. असे त्यांचे वेगळे ऋणानुबंध होते.

इ.स. १९८१ साली गंगाधरकाकांनी चिमड येथे साधुमहाराजांच्या समाधीच्या मागे प.पू. श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांची समाधी स्थापन केली. त्यानिमित्त तेथे प.पू.श्रीदासराममहाराजांचे समाधी समोर कीर्तन झाले.

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या समाधीमागे औदुंबर लावणेत आला होता. या औदुंबर वृक्षाला पारकट्टा करावा अशी इच्छा श्री. दत्तात्रय कर्णेकर यांच्या मनात उत्पन्न झाली. त्याप्रमाणे त्यांनी गंगाधरकाकांकडे परवानगी मागितली. त्यांनी लगेच परवानगी दिली. त्याप्रमाणे पारकट्टा बांधणेत आला. याचा शुभारंभ दि.९.११.१९८७ रोजी सकाळी ७.३० वाजता श्रीदासराममहाराजांचे हस्ते नारळ फोडून झाला व प.पू.श्रीअण्णांच्या हस्ते हळद-कुंकू, बुक्का व फुले वाहण्यात आली आणि या पारावर ''तात्या-मामा-काका निजधाम'' असे खोदलेली पाटी बसविणेत आली. (तात्या म्हणजे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, मामा म्हणजे श्रीमामामहाराज केळकर आणि काका म्हणजे श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर.) या कार्यक्रमाला स्वतः गंगाधरकाका व सौ. गिरीजाकाकू उपस्थित होत्या. उभयतांना हा कार्यक्रम बघून फार आनंद झाला. गंगाधरकाकांना चालताना दोन माणसांचा आधार घेऊन चालावे लागे. पण या समारंभाला कोणाचाही आधार न घेता घरातून भराभरा चालत आले. याचे सर्वांना आश्चर्य वाटले. प.पू.श्रीअण्णांचा हात आपल्या हातात घेऊन गंगाधरकाकांनी डोळ्यातून पाणी काढले आणि गंगाधरकाकांनी आमच्या प.पू.श्रीअण्णांना ''मौज दिसती रे'' हे पद म्हणणेस सांगितले.

यानंतर मात्र गंगाधरकाकांनी अन्न-पाणी कमी केले. नुसत्या पाण्याच्या घोटावर ते ४-५ दिवस होते. कार्तिक व. एकादशी दि.१७.११.१९८७ चा दिवस उजाडला. सकाळी गंगाधरकाकांनी गिरीजाकाकूंना बोलावले आणि 'श्रीतात्यांचेकडे लक्ष द्या' असे सांगितले. त्यांच्या अंगातून घाम येऊ लागला. सायंकाळी गंगाधरकाकांना हॉस्पिटलमधे नेणेत आले, पण त्यांच्यावर उपचार होणेचे आतच त्यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी आपला देह ठेवला.

त्यांचे स्मरणार्थ समाधी मंदिरात तीन कमानींपैकी मधल्या कमानीत, श्रीगंगाधरकाका यांचे नावे दि.०२.०१.१९८८ रोजी वृंदावन (पादुका) बसवणेत आले. त्याची स्थापना चिमडचे श्री. पांडोबा यरगट्टीकर यांचे हस्ते करणेत आली.

***

कु. ज्योती चंद्रशेखर केळकर

जन्म
आश्विन व.७, शके १८९४
इ.स.१९७२

निर्याण
मार्गशीर्ष शु.०४ शके १८९६
(विनायकी) दि.१७.१२.१९७४

श्री.चंद्रशेखर राम केळकर व सौ. रोहिणी चंद्रशेखर केळकर यांचा विवाह औदुंबर पंचमी दि.२६.०२.१९७० रोजी सांगली येथे झाला. विवाहानंतर दोन वर्षांनी आश्विन व.७ शके १८९४ म्हणजेच इ.स. १९७२ साली या दांपत्याला कन्यारत्न झाले. प्रथेप्रमाणे १२ वे दिवशी या कन्येचे बारसे झाले व तिचे 'ज्योती' असे नाव ठेवणेत आले. हे नाव श्रीदासराममहाराज केळकर यांनी सांगितलेवरून ठेवले होते. ही ज्योती म्हणजेच 'कु. ज्योती चंद्रशेखर केळकर'.

ज्योतीला लहानपणापासून देवाधर्माची आवड होती. देवाला फुले वहायची, श्रीदासराममहाराज(दादा) कीर्तन करू लागले की पळत पळत येऊन ती श्रीदादांच्या जवळ बसत असे. इतरवेळीसुद्धा ती बराच काळ श्रीदादांच्या जवळ आणि मागेपुढे असायची. ज्योती नेहमी मंदिरात बसून 'सद्गुरूनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।' हे भजन म्हणत असे. परंतु ज्योती ही अल्पायुषी होती.

चि. ज्योतीचे आयुष्यात भाद्रपद शु.षष्ठीला कपिला षष्ठी आली होती. सांगलीवाडीस विठोबा देऊळात अखंड वीणा उभा रहावयाचा होता. ते देऊळ सांगलीचे राजेसाहेबांनी बांधले आहे. जेथे काही अखंड असे एकही दिवस खंड न होता चालले आहे, त्यांचे हातूनच ही वीणा उभा रहावी अशी श्री. आकाराम पाटलांची इच्छा होती. दिंडी काढणेचे ठरले. सरकारी छबीना आजपर्यंत गणपतीचे देवळा बाहेर गणेशचतुर्थीशिवाय कधीही गेलेला नाही. पण तो या सांगलीवाडीच्या लोकांना, हे देऊळ राजेसाहेबांनी बांधलेले व ही दिंडी गणपती उत्सवात होती यादृष्टीने हा छबीना या दिंडीला दिला. माझे आजोबा श्रीदासराममहाराज केळकर यांचेकडून वीणा उभा करणेचा असेच वरील दृष्टीने ठरल्याने ही दिंडी श्रीदासराममहाराजांना नेणेकरिता आमचे घरी लवाजम्यासह आली. विठोबाची पालखी, भालदार, चोपदार वगैरे सर्व आमचे घरात आले. विठोबाने श्रीज्ञानेश्वमाऊलींची व श्रीमामांची गाठ घेतली. मामांना भेटायला विठोबा आला आहे असे सर्वजण म्हणू लागले. घरात अशी येथेच फक्त पालखी आली. ज्योतीला फार फार आनंद झाला व 'आजोबा, आपल्या दारात हत्ती आला आहे बघा' असे ती सांगू लागली. ती आनंदाने किती नाचली, याची कल्पनाच करता येणार नाही. आश्विनपासून तिची प्रकृती तितकीशी बरी नव्हती. तिला पुढे ताप आला, गोवर झाला. तो बाहेरही पडला. डॉ. एन. आर. आपटे यांचे औषध चालू होते. ते परगावी गेल्याने डॉ. दातार यांचेही औषध चालू होते. खोकल्याची भीती दोघांनाही वाटत होती व त्यांनी आपलेकडून त्याची काळजीही घेतली होती. ईश्वराची ईच्छा कोणाला समजणार? पुण्याहून श्री.अनलकाकांनी म्हणजे ज्योतीच्या काकां नी घेतलेले खेळण्यातील हेलीकॅप्टर आणले, ते ज्योतीला फार आवडले व जाणेचे आधी दोन-तीन दिवस शनिवारी विमान उडव म्हणून

तिने भाऊकाकाजवळ हट्ट धरला होता. प्रत्यक्ष तो बालहट्ट वाटला, पण ते विमान उडल्याशिवाय ज्योतीने भाऊकाकाला घरी जाऊ दिले नाही. रविवारी ज्योती म्हणाली, 'आजोबा, तुम्हाला पोळ्या करून घालू का?' आजोबा म्हणाले, 'घाल हं बाळ. मी खातो.' तिचा एक लहान पोळपाट, लाटणे व बसावयास पाट होता. तिने पोळ्या लाटल्या. आजीने तव्यावर भाजून दिल्या. सुंदरच पोळ्या, बालप्रेमाने केलेल्या. आजोबांनी खाल्या व डोळे पाण्याने भरून आले. सोमवारचा एकच दिवस मधे गेला. गोवर पूर्णपणे बाहेर पडलेला होता. डॉक्टरांनी आंघोळ घाला म्हणून सांगितलेले. आता काही काळजी नाही म्हणून तिला सोमवारीच दुपारी ११ नंतर आंघोळही घातली. मंगळवारी सकाळी सात वाजता ज्योती म्हणाली, 'आजोबा तुम्ही आता कीर्तन करा.' श्रीदादा म्हणाले, 'ज्योती तुझा काहीतरी हट्ट असतो गं. कीर्तन संध्याकाळी असते. आता आरती असते. तू आरतीला येणार ना?' मग ती म्हणाली, 'नको बाई, आत्ताच कीर्तन करा.' मग श्रीदादा म्हणाले, 'ज्योती तुझे काहीतरीच असते गं. काय करायचे सांग बरे.' मग ती म्हणाली, 'मी तुमच्या मांडीवर बसते.' दादा म्हणाले, 'बैस, कोण नको म्हणतो आहे.' मग ती तासभर मांडीवर बसली. येवढा वेळ ती दादांच्या मांडीवर कधीच बसली नव्हती. त्यामुळे फार आश्चर्य वाटले. त्यात पांडवगीता, समश्लोकी गीता, महिमा साराष्टक, हरीपाठ, तेहत्तीशी, गीतेतील पंधरावा अध्याय, बारा अभंग आणि गुरुलिंग गीता म्हणली. तासाच्या पुढे वेळ गेला. आठ-साडेआठ वाजले. तिला उलटी झाली, तेव्हा दादांनी आमच्या आईला सांगितले, 'तिला आत घेऊन जा व ती ओकली आहे तेवढे काढून घे, मी नेमाला बसतो आहे.' आत नेतात तोच दरवाज्यापाशी पुन्हा उलटी झाली. कफ अतिशय दाट बेडकासारखा होता. ज्योतीने घाबरे केले. आदले दिवशीच परमप्रिय ती. किसनराव भिडे, ती.प.पू.श्रीमामांचे एक प्रेमी रात्रौ परलोकास गेले होते. माझे पितृदेव ती.चंद्रशेखरअण्णा सकाळी सात-साडेसातला आले होते व तो नुकतेच आडवे झाले होते. श्री. अनिलकाकांनी त्यांना जोरात हाक मारली. तेव्हा दादा त्यांना म्हणाले, 'अरे, तो आत्ताच निजला आहे आहे, निजू दे त्याला का हाक मारतो आहेस?' 'दादा, ज्योतीने घाबरे केले आहे' असे श्री.अनिलकाका म्हणाले. आत जाऊन पाहतात तो ज्योतीने मान टाकलेली. अंग काळे-निळे झालेले. थंडगार. दादांनी अप्पाच्या वाडीचा अंगारा लावला, रामेश्वराचे स्मरण करून तीर्थ घातले, अंगारा लावला. सहज दादांचे तोंडून शब्द गेले, 'दहा मिनिटात उपचार व्हायला पाहिजेत, तर मुलगी हाती लागेल.' महाराजांचे कृपेने चटकन् कोणीतरी रिक्षा आणावयास गेले. कोणी डॉक्टरांना बोलवायला गेले. इकडून रिक्षा व तिकडून डॉक्टर घालेवाडीकर आले. ताबडतोब उपचार झाल्यामुळे ज्योतीस बरे वाटू लागले.

डिसेंबर १९७४ चा महिना उजाडला. ज्योतीला कफाचा त्रास सुरू झाला. त्यातच तिला गोवर (ताप) आला. या अवस्थेतही ती, माझे आजोबांचे म्हणजेच श्रीदादांचे मांडीवर कीर्तन करतेवेळी, तसेच ध्यानाला बसले असताना जाऊन बसायची. श्रीमती गोडबोले काकू या नावाच्या आजी सिटी हायस्कूलरोडवर रहायच्या. त्या दररोज आमचेकडे दर्शनाला यायच्या. त्यांना एक दिवस ज्योती म्हणाली, 'आजी, मला न्यायला अंगणात विमान येणार आहे व मी या विमानात बसून जाणार आहे.' याचा अर्थ ज्योतीने आपले निर्याण निश्चित केले होते.

दिनांक १७.१२.१९७४ हा दिवस उजाडला. सकाळपासून ज्योतीला कफाचा त्रास जास्त जाणवू लागला. या दिवशी सकाळी ज्योती व मी (दीपक चंद्रशेखर केळकर) दोघे मिळून '**सद्गुरूनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।**' हे भजन मंदिरात बसून म्हणत होतो. त्यावेळी माझे आजोबा प.पू. श्रीदादा आमच्या प.पू.श्रीअण्णांना (माझ्या वडिलांना) म्हणाले, 'चंदा, बघ दोघे मिळून कसे भजन करत आहेत.'

त्या दिवशी माझी आजी ती.प.पू.सौ.सीतावहिनी ही ज्योतीला दिवसभर मांडीवर घेऊन बसली होती. कंदिलावर कापड गरम करून ती ज्योतीच्या छातीवर शेकत बसली होती. यावेळी आमचे घरात प.पू. श्रीअण्णांच्या मावशी ती. श्रीमती उषाताई भावे होत्या. संध्याकाळ झाली म्हटल्यावर त्या आपल्या घरी जायला निघाल्या. हे बघून ज्योती त्यांना म्हणाली, 'आजी, तू आज घरी जाऊ नकोस', असे म्हटल्यावर त्याही घरी जायच्या थांबल्या.

अशा या ज्योतीने मार्गशीर्ष शु. ४ (विनायकी) शके १८९६ मंगळवार दि.१७.१२.१९७४ रोजी रात्री ९.४५ वा. 'सद्गुरूनाथ माझे आई । मजला ठाव द्यावा पायी ।।' हे भजन म्हणत आमचे आजीचे मांडीवर वयाच्या फक्त दुसऱ्या वर्षी देह ठेवला.

हे ऐकून सगळीकडे हाहाकार झाला. ज्यावेळी ज्योतीने आपला देह ठेवला, त्यावेळी माझे आजोबा प.पू.श्रीदादा हे पडवीत बसले होते. त्यावेळी त्यांना मंदिराच्या खिडकीतून वीज चमकून बाहेर गेलेली दिसली. यावरून ती मुक्ताबाईप्रमाणे वीजेमध्ये गुप्त झाली. ज्यावेळी ज्योतीला अंत्यसंस्कारासाठी नेणेची वेळ आली, तेव्हा आमच्या प.पू.श्रीअण्णांनी ज्योतीस (स्वतःच्या मुलीला) साष्टांग नमस्कार घातला व नंतर तिला घाटावर नेणेत आले. केवढे आश्चर्य!

नाथभक्त श्रीशंकरमामा शिपूरकर यांनी आपला शोक संदेश पाठविला. त्यात ते म्हणतात, 'कै.ज्योतीने, अवघ्या दोन वर्षाच्या मुलीने नामस्मरणात देहत्याग करणे हे मुक्ताबाईप्रमाणेच आहे.' सर्वांना परंपरेचे महत्व काय असते हे शिकवून गेली, तर आमचे आजोबा प.पू.श्रीदादा म्हणतात, 'कै.मामांच्या ज्योतीतच विलीन होऊन भक्तिमार्गाचे परंपरेस प्रोत्साहन देऊन गेली.' श्रीदादांनी तिच्यावर खालीलप्रमाणे आर्या केली आहे.

'हासत नाचत प्रेमे वैकुंठा पातली स्वये ज्योती ।
सद्गुरुनाथा प्रार्थुनी न कळे पायी कधीच ठेली ती ।।१।।'

या सर्व गोष्टीवरून ज्योती ही पूर्वजन्मीची योगिनी असावी व उर्वरीत (शेष) साधन पूर्ण करणेकरिता जन्माला आली असावी असे वाटते.

***

प.पू.सद्‌गुरू श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर

जन्म
शके १८११, इ.स.१८८९

निर्याण
मार्गशीर्ष शु.०६ शके १८५४
(चंपा षष्ठी) इ.स.१९३२

श्रीरामचंद्ररावजीमहाराज यरगट्टीकर व सौ. मातोश्री माईसाहेबमहाराज या दांपत्याच्या पोटी शके १८११, इ.स. १८८९ साली पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाच्या कानाला जन्मतःच मोठी भोके होती. म्हणून श्रीलक्ष्मीबाईअक्का म्हणाल्या, 'हा कानफाट्या योगी चिमडमहाराजांच्या पोटी जन्माला आला आहे.' या मुलाचे नाव 'उद्धव' ठेवणेत आले. हा उद्धव म्हणजेच आमचे प.पू.सद्‌गुरू श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर.

श्रीउद्धवरावजीमहाराज लहानपणी सारखे रडायचे म्हणून श्रीचिमडच्या महाराजांनी मुलाचे नाव 'उद्धव' ठेवण्यास सांगितले आणि 'मठाच्या शेतातील पाखरांना न हाकलता त्यांना धान्य खाऊ दे' असेही सांगितले. असे केल्यावर हा मुलगा रडायचा थांबला.

शिक्षणासाठी श्रीउद्धवरावमहाराज काही दिवस सांगलीत आले होते. यावेळी त्यांचा प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचेशी संपर्क आला आणि ते दोघे सहाध्यायी झाले. श्रीतात्यासाहेबमहाराजांचे मेहुणे श्री. शामराव कुलकर्णी यांच्या कन्येशी इ.स.१९०८ साली चिमड येथे श्रीउद्धवरावमहाराजांचा विवाह झाला. यथावकाश श्रीउद्धवरावमहाराजांना एक मुलगी व दोन मुले झाली.

श्रीउद्धवरावमहाराजांचा वेष अगदी साधा असे. चेहरा कायम प्रसन्न असायचा. ते मितभाषी होते. त्यांचे प्रपंचाकडे फारसे लक्ष नव्हते. ते कायम साधनेत निमग्न असत. ते अजानबाहू होते. त्यांनी श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी यांचेकडून अनुग्रह घेतला. अनुग्रह घेतल्या घेतल्या त्यांना समाधी लागली. ते एका विशिष्ट अवस्थेत होते. त्यांनी रात्र रात्र साधना करून निद्रेवर विजय मिळविला. श्रीउद्धवरावमहाराज हे पूर्ण अधिकाराचे होते. पण त्यांनी कोणालाही अनुग्रह दिला नाही. त्यांना ज्योतिषशास्त्राचे उत्तम ज्ञान होते. श्रीदासराममहाराज केळकर हे त्यांना गोरक्षनाथांचे अवतार म्हणत.

एकदा श्रीनारायणमहाराज हे परगावी जायचे होते. त्यामुळे त्यांनी श्रीउद्धवरावमहाराजांना हाक मारली आणि सांगितले, 'उद्धवा, मी परगावी जाणार आहे. तुझे मठात लक्ष असू दे.' मठात लोक श्रीसाधुमहाराजांच्या दर्शनास येत आणि समोर नजराणा ठेवत. श्रीउद्धवरावमहाराजांनी तो नजराणा आतसुद्धा उचलून ठेवला नाही. त्यापाशी ते बसून होते. ही गोष्ट परत आल्यावर श्रीनारायणरावमहाराजांना कळली. त्यांनी प्रश्न केला, 'उद्धवा, असे का केलेस?' त्यावेळी, 'तुम्ही मला फक्त लक्ष ठेवण्यास सांगितले होते' असे श्रीउद्धवरावमहाराजांनी निष्कपट उत्तर दिले.

इ.स. १९२२ साली श्रीतात्यासाहेबमहाराज, नानबा फडणीस, गोपाळराव कोटणीस, श्रीनारायणमहाराज

व इतर सर्व अनुग्रहित मंडळी निंबरगी यात्रेस गेली होती. त्यावेळी त्यांचेसमवेत श्रीउद्धवरावमहाराजही गेले होते.

श्रीचिमडमहाराजांनी इ.स.१८८० साली चिमड येथे श्रीनिंबरगीमहाराजांच्या सल्याने जुजबी इमारत बांधली. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी काही विशिष्ट जागी रुईचे बी पेरले होते. या जागेवर इमारत बांधायची असेल तर बांधा असे महाराजांनी सांगितले होते. हद्दीबाहेर इमारत बांधून त्यामध्ये राहिल्यास पीडा होईल असे सांगितले होते. याप्रमाणे इमारत बांधली गेली. पण मोघे वगैरे शिष्यमंडळींनी या हद्दीच्या बाहेर सोयीस्कर होईल अशी इमारत बांधली. या बांधलेल्या इमारतीमधील एका खोलीमध्ये श्रीउद्धवरावमहाराज राहू लागले. काही दिवसांनी त्यांच्या प्रकृतीस काही ना काही उपद्रव होण्यास सुरवात झाली. त्यांना वाताचे झटके येऊन ते बेशुद्ध पडू लागले. हे पाहून श्रीतात्यासाहेबमहाराजांनी ज्या खोलीत श्रीउद्धवरावमहाराज रहात होते, तेथून त्यांना मूळ इमारतीत आणून ठेवण्याचा सल्ला श्रीनारायणमहाराजांना दिला. याप्रमाणे केल्यावर त्यांच्या प्रकृतीस काही दिवसातच आराम पडला.

श्रीउद्धवरावमहाराजांना श्रीनारायणमहाराजांकडून पारमार्थिक उपदेश हवा होता. याबाबत त्यांनी श्रीनारायणमहाराजांना विचारणा केली होती. पण त्यांनी स्पष्ट नकार दिला होता. काही निकटवर्ती साधकांनी श्रीउद्धवरावांना उपदेश करण्याबाबत श्रीनारायणमहाराजांना भीड घातली. तेव्हा श्रीनारायणमहाराज म्हणाले, 'बंधुभाव व शिष्यभाव हे एकत्र नांदू शकत नाहीत. एक दुसऱ्याचा मारक आहे. बंधुभावाचा जोर झाला तर परमार्थ बुडेल व शिष्यभावाचा जोर झाला तर व्यवहार बिघडेल. मला दोन्ही बिघडू द्यावयाचे नाहीत. म्हणून मी उपदेश देऊ शकत नाही.' परंतु शेवटी श्रीउद्धवरावमहाराजांची अधीरता पाहून श्रीनारायणमहाराजांनी त्यांना काय सांगावयाचे ते सांगितले व समजावूनही दिले.

आपले भूतलावरील कार्य संपले असे वाटू लागल्याने त्यांनी निजधामास जाणेचा बेत ठरविला. या सुमारास श्री.माधवराव उकिडवे हे चिमडहून परत निघाले होते. त्यांना श्रीउद्धवरावमहाराज म्हणाले, 'तुम्ही ८ दिवस रहाल तर बरे होईल.' पण श्री.उकिडवे यांना रहाणे शक्य नव्हते. श्रीउद्धवरावमहाराजांची व्याधी बळावत चाललेली होती आणि बरोबर आठवे दिवशी म्हणजे मार्गशीर्ष शु. ६ (चंपाषष्ठी) शके १८५४ इ.स. १९३२ रोजी वयाच्या ४३व्या वर्षी श्रीउद्धवरावमहाराजांनी देह ठेवला. यावेळी 'चिमडचा आत्मा गेला' असे उद्‌गार चिमडमधील मंडळींनी काढले.

***

प.पू. सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर

जन्म
ज्येष्ठ शु.१०, शके १७७५
इ.स.१८३३

निर्याण
मार्गशीर्ष शु.११ शके १८१३
इ.स.१८९१

कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यात, परसगड तालुक्यापैकी मुरगोड महालात यरगट्टी हे गाव आहे. या गावात श्री. अंताजी त्रिंबक हुद्दार या नावाचे भारद्वाज गोत्री देशस्थ ब्राह्मण रहात होते. यांच्या पत्नीचे नाव सौ. कृष्णाबाई. पुढे श्री.अंताजीपंत हे वकीली करण्यास खानापूर गावी गेले. हे कुटुंब रामदासी पंथाचे होते. या दांपत्याच्या पोटी यरगट्टी येथे ज्येष्ठ शु. १० शके १७७५ इ.स. १८३३ या दिवशी पुत्ररत्न जन्माला आले. त्याचे जन्म नांव योगेश्वर होते. बारशा दिवशी या मुलाचे नाव 'रामचंद्र' ठेवणेत आले. हे 'रामचंद्र' म्हणजेच आमचे प.पू.सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर. यांनाच चिमड गावचे नावावरून 'चिमडमहाराज' म्हणून ओळखले जाऊ लागले. यरगट्टी या गावाचे नावावरून त्यांचे यरगट्टीकर हे आडनाव पडले.

श्रीचिमडमहाराजांचा ८ व्या वर्षी व्रतबंध झाला. त्यांचे वडील खानापूरला असलेने ते वयाच्या ११ व्या वर्षी शिक्षणासाठी त्यांचेकडे जाऊन राहिले व तेथेच त्यांनी विद्याभ्यास केला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांचा खानापूर-बलवडी गावातील श्री.बचारामपंत यांच्या कन्येशी विवाह झाला. सासरी मुलीचे नाव 'सीता' असे ठेवणेत आले. या सीताबाई म्हणजेच आपल्या प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर होत.

इ.स.१८५७ साली श्रीचिमडमहाराज हे मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले आणि लगेचच त्यांना सातारा सबॉर्डिनेट जज्ज कोर्टात कारकुनाची नोकरी लागली. काही काळाने ही नोकरी सोडून त्यांनी विटे येथे दुसरी नोकरी स्विकारली. एकदा श्रीचिमडमहाराज विट्यात आपल्या खोलीत झोपलेले असताना, अचानक मध्यरात्री आढ्यावरून एक मोठा साप त्यांना दंश करण्यासाठी खाली येऊ लागला होता. साप चावला असता तर श्रीचिमडमहाराजांवर दुर्धर प्रसंग ओढवला असता. त्यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराज हे निंबरगीत गुप्त झाले व विट्यात महाराजांच्या घरी प्रगट झाले. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीचिमडमहाराजांना अंथरूणातून बाहेर काढले व ते श्रीचिमडच्या महाराजांना म्हणाले, 'उठा, तुमचा मृत्यू टळला आहे. आता त्वरित परमार्थमार्गास लागा.' एवढे बोलून श्रीनिंबरगीकरमहाराज गुप्त झाले. परंतु श्रीचिमडमहाराजांना आपल्याला उठवायला आलेले महापुरूष कोण असतील? असा विचार निर्माण झाला आणि त्या महात्म्याचे दर्शन केव्हा होईल अशी तळमळ श्रीचिमडमहाराजांना निर्माण झाली. ही घटना घडेपर्यंत निंबरगीकरमहाराज कोण? हे त्यांना माहित नव्हते. विटे येथे मिळणाऱ्या पगारात घरखर्च भागत नसलेने त्यांनी ही नोकरी सोडून जत संस्थानात नोकरी पत्करली.

श्रीचिमडमहाराज हे जत संस्थानात नोकरीस असलेने त्यांना उमदी या गावी वरचेवर जावे लागे. त्यावेळी उमदी येथे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे वास्तव्य होते. ते वाचासिद्ध म्हणून तेथे प्रसिद्ध होते. त्यांच्या दर्शनास श्रीचिमडमहाराज जात असत. श्रीचिमडमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांना अनुग्रह करणेची विनंती केली. तेव्हा श्रीसाधुमहाराजांनी त्यांना निंबरगीस श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेकडे नेले. तेथे गेल्यावर श्रीनिंबरगीकरमहाराजांना पहाताच, 'याच महात्म्याने आपल्याला सर्पदंशापासून वाचवले आहे' हे त्यांच्या लक्षात आले. श्रीचिमडमहाराजांनी महाराजांच्या पायाला एकदम मिठी मारली. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी विचारले, 'काय रामभाऊ, परमार्थमार्गाला लागला की नाही?' तेव्हा श्रीचिमडमहाराज म्हणाले, 'महाराज, त्याकरताच मी येथे आलो आहे.' तेव्हा श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांच्या मुखाने श्रीचिमडमहाराजांना अनुग्रह दिला.

श्रीसाधुमहाराजांवर त्यांची आत्यंतिक निष्ठा बसली आणि त्यांनी सांगितलेप्रमाणे ते साधना करू लागले. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक साधन केले. ते रात्री साधनाला जोत्याकडेला बसायचे. दोरीची एक गाठ शेंडीला आणि दुसरी गाठ खुंटीला मारलेली असायची. साधनात एकाद्या वेळेस पेंग आली तर दोरीचा हिसडा बसावा आणि साधन सुरू रहावे असा त्यांचा हेतू असायचा.

पुढे कालांतराने श्रीचिमडमहाराजांनी जत संस्थानातील नोकरी सोडली आणि त्यांनी सातारा जिल्ह्यातील मायणी कोर्टात नोकरी पत्करली. नंतर काही काळाने ही नोकरी सोडून परत ते विटा गावी नोकरीस आले. अनुग्रह झालेपासून दरवर्षी पौष महिन्यात ते निंबरगीला महाराजांचे दर्शनास जात असत. ती त्यांची पायी वारी होती. त्यांच्यापासून चालत आलेली वारीची पद्धत आजही सुरू असून यरगट्टीकर कुटुंब व त्यांचे शिष्य पौषात पायी निंबरगीला जातात.

कालांतराने श्रीचिमडमहाराजांची साधनसिद्धता पाहून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना पंचवीस माणसांपर्यंत अनुग्रह देण्याची आज्ञा केली. श्रीनिंबरगीकरमहाराज श्रीचिमडच्या महाराजांना श्रीएकनाथमहाराजांचे अवतार आहेत असे म्हणत असत. एकदा श्रीचिमडमहाराज निंबरगीला गेले असताना श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पुराण सुरू होते, म्हणून श्रीचिमडमहाराज त्यांचे पुढे हात जोडून उभे होते. ते महाराजांसमोर कधीही बसले नाहीत. एकदम श्रीनिंबरगीकरमहाराज म्हणाले, 'रामभाऊ तुम्ही प्रवचन करा.' हे वाक्य ऐकल्यावर श्रीचिमडमहाराजांना घाम फुटला. त्यांचे तोंडून शब्द बाहेर येईनात. हे बघून महाराज म्हणतात, 'हे रामभाऊ एकनाथमहाराजच आहेत, म्हणून ते गुरूला किती भीत आहेत बघा.'

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांनी देह ठेवण्यापूर्वी चिमड येथील अनुग्रहितांना सांगून ठेवले होते की, 'मी गेल्यावर तुम्ही विटे गावी जा आणि तेथून रामभाऊ यरगट्टीकरांना चिमडास रहाण्यास घेऊन या.' याप्रमाणे श्रीसाधुमहाराजांनी निर्याण केल्यावर भक्तमंडळी श्रीचिमडमहाराजांकडे गेली व त्यांनी

श्रीसाधुमहाराजांची इच्छा त्यांच्या कानावर घातली. श्रीचिमडमहाराज निंबरगीस गेले असता श्रीनिंबरगीकमहाराजांनीही त्यांना चिमडला जाऊन रहाण्याची आज्ञा केली. याप्रमाणे श्रीचिमडमहाराज हे इ.स.१८८० च्या सुमारास आपली पत्नी व एक लहान मुलीसह केवळ गुर्वाज्ञा म्हणून, चिमडास येऊन राहिले. जेथे ते राहिले, ते स्मशान होते. तेथे पर्णकुटी बांधून श्रीचिमडमहाराज राहिले.

श्रीचिमडच्या महाराजांचे प्रामुख्याने श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीबाबासाहेब मुजुमदार, श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी, श्रीविष्णुपंत आपटे, श्रीवामनकाका कोटणीस, श्रीगोपाळरावजी दीक्षित, श्रीगोपाळकाका कोटणीस, श्रीदत्तोपंत कुंभोजकर इ. अधिकारी शिष्य होते. श्रीचिमडच्या महाराजांनी श्रीनिंबरगीकरमहाराजांना उद्देशून अनेक प्रासादिक पदरचना केल्या. त्या इतक्या हृदयस्पर्शी आहेत की, त्या वाचल्या किंवा ऐकल्यानंतर अंतःकरण भरून येते व प्रेमाश्रू पाझरतात. या संदर्भात श्रीदासराममहाराज म्हणत, 'चिमडच्या महाराजांची पदे ऐकून दगडालाही पाझर फुटेल, मग माणसाला पाझर फुटणार नाही का?'.

इ.स. १८९० साली श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी परळी, आळंदी व देहू या स्थानास दर्शनासाठी आपण सर्वांनी जावे अशी इच्छा श्रीचिमडमहाराजांपुढे व्यक्त केली. त्याप्रमाणे श्रीचिमडमहाराज सर्व शिष्यांसह प्रथम साताऱ्याला गेले. तेथून सज्जनगड व तेथून आळंदीला गेले. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीतून, 'चला, लवकर आटपा आणि निजधामाला परत या.' असा आदेश ऐकावयास आला. तसेच 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी वोळंगिल्या ।।' असा चरण ऐकावयास आला. श्रीरामभाऊमहाराजांनी हा चरण श्रीलक्ष्मीबाईअक्कांना सांगितला व त्यांना विचारले, अक्का, तुम्हास समाधीतून काही ऐकायला येत आहे कां? त्यावर श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी, तसाच चरण ऐकावयास येत असल्याचे सांगितले. हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आदेश शिरसावंद्य मानून, श्रीचिमडमहाराज देहूला न जाता सांगलीमार्गे चिमडला रवाना झाले.

चिमडला आल्यावर श्रीचिमडमहाराजांनी देह ठेवायचे ठरविले आणि निरवानिरव करणेस प्रारंभ केला. आपले ज्येष्ठ चिरंजीव श्रीदाजीसाहेबमहाराज यांचा विवाह आणि श्रीनारायणमहाराज यांचा व्रतबंध त्यांनी लगेचच करून घेतला. परमार्थाचा व प्रपंचाचा सर्व भार श्रीलक्ष्मीबाईअक्कांनीच पुढे चालवावा अशी शपथ त्यांचेकडून घेतली. इ.स.१८९१ मध्येच महाराज देह ठेवणार हे सुचविणाऱ्या दोन घटना घडल्या होत्या. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीचिमडमहाराजांना, 'काही झाले तरी हत्तीवर बसू नका' म्हणून सांगितले होते. पण चिमडजवळ रबकवी हे गाव आहे. या गावात श्रावणात यात्रा भरते. या यात्रेत त्यांनी हत्ती आणला होता आणि गावातील मंडळी महाराजांना हत्तीवर बसण्याचा आग्रह करू लागली. नाईलाजास्तव महाराज हत्तीवर बसले. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी आणखी असे सांगून ठेवले होते की, 'रामभाऊंच्या दाजीबा या ज्येष्ठ पुत्राला १० वे वर्ष लागले की श्रीचिमडमहाराज जाणार.' इ.स.१८९१ सालीच श्रीदाजीसाहेबांना १० वे वर्ष लागले होते.

इ.स. १८९१ सालातला कार्तिकातील श्रीसाधुमहाराजांचा रथोत्सव आला. रथोत्सव फार उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा झाला. आरती करणेकरिता महाराज उभे राहिले. आरती केली आणि म्हणाले, 'प्रत्यक्ष वैकुंठासारखे आज श्रीसाधुमहाराजांचे स्थान दिसते. हा तर उत्सव उत्तमच झाला. हाच आमच्या हातून शेवटचा उत्सव. पुढील उत्सवाला आम्ही रहात नाही.'

या उत्सवात श्रीचिमडमहाराजांनी एक दोन कीर्तने केली. एका कीर्तनात ते उद्‌गारले, 'आता अवधी थोडा उरला आहे. यातच काय ते साधून घ्या.' त्यांना आपल्या आयुष्याचा अल्पावधी सुचवायचा होता. पण कीर्तनाला बसलेल्या ज्या एका वृद्ध श्रोत्याकडे पाहून महाराज हे वाक्य बोलले, त्यांचाच मृत्यूकाळ जवळ आला आहे असे इतरांना वाटले. या उत्सवात त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांना खाली नमूद केलेप्रमाणे, प्रमाणयुक्त पद तयार करून या पदावर कीर्तन करणेस सांगितले :-

डोळा भरला जाई रे । रामरूप तू पाही रे । आपणचि नाही तेथे । समाधान ते काय रे ।।ध्रु।। पांचाचा गोंधळ रे । सगुणगुणाचा खेळ रे । तेथे पाहता काहीच नाही । व्यर्थ जाण उपाधी रे ।।१।। अंतःकरण मन बुद्धि रे । चित्त अहंकार संधी रे । त्यापासुनी हे स्थूळ जन्मले । सर्व जाण असार रे।।२।। करुनि तत्त्वझाडा रे । सद्गुरूवचन जोडा रे । दासाचे वाक्य मानुनी । स्वरूपी लीन हो वेडा रे ।।३।।

याप्रमाणे श्रीचिमडमहाराजांनी निर्याण सुचविले व देह ठेवायचा ठरविला. त्यांनी दुखण्याचे मिष घेतले. वैद्याला बोलावले जाई. वैद्याने प्रकृती बघितल्यावर त्यांना त्यात काही दोष दिसत नसे. वैद्य गेल्यावर महाराज आजाराचे काहीतरी लक्षण दाखवित.

मार्गशीर्ष शुद्ध नवमीला श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी मठातील लोकांना महाराजांचा निर्याणकाळ जवळ आला आहे, कोणाला काही विचारणेचे असल्यास विचारून घ्यावे असे सांगितले. नंतर श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी श्रीदाजीसाहेबांना श्रीचिमडच्या महाराजांच्या पायावर घातले. श्रीचिमडच्या महाराजांनी श्रीदाजीसाहेबमहाराजांच्या मस्तकावर हात फिरवला आणि 'याचे सर्व आता बरे होईल' असे म्हणाले. शुक्रवारी आम्हालाही बरे होते असे सांगून भाषण बंद केले. यावेळी श्रीतात्यासाहेबमहाराजांची शेवटची भेट व्हावी अशी श्रीचिमडच्या महाराजांची इच्छा होती. त्यांनी श्रीलक्ष्मीबाईअक्कांकडे खुणेने 'हणमंत कोठे आहे?' असे विचारले. तेव्हा श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी, 'मागे गाडी येत आहे, आता तो येईल' असे सांगितले. पण श्रीतात्यासाहेबांची व श्रीचिमडच्या महाराजांची शेवटची भेट होऊ शकली नाही. आम्हास औषध वगैरे देऊ नका असे श्रीलक्ष्मीबाईअक्कांना त्यांनी सांगितले व मौन धारण केले. अशा या श्रीचिमडमहाराजांनी मार्गशीर्ष शु. ११ शके १८१३ इ.स. १८९१ शुक्रवारी रात्री ९.४५ वा. वयाच्या ५८ व्या वर्षी वैकुंठगमन केले.

***

प.पू. श्रीबाबासाहेब पाटणकर (मुजूमदार)महाराज

जन्म
शके १७५८ इ.स.१८३६

निर्याण
मार्गशीर्ष व.०१ शके १८१७
इ.स.१८९५

श्री. रामचंद्रपंत पाटणकर (मुजूमदार) हे सांगली येथे वास्तव्यास होते. त्यांचा सौ. सीताबाई यांचेशी विवाह झाला. या दांपत्यास सुरवातीला ४ मुली झाल्या. वंशाला एक तरी दिवा असावा असे त्यांना सतत वाटत असे. मुलगा व्हावा म्हणून त्यांनी बरेच नवसही केले. पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यांच्या घराण्याचा कुळस्वामी श्री विष्णु असून, या श्रीविष्णुचे देवालय कृष्णानदीकाठी आहे. या कुलस्वामीस त्यांनी प्रदक्षिणा घालणेस सुरवात केली. या मंदिराजवळच एक पिंपळ वृक्ष आहे. या वृक्षासही सौ. सीताबाई यांनी प्रदक्षिणा घालणेस सुरवात केली. हा क्रम १२ वर्षे सतत चालला होता. सौ. सीताबाई या विष्णुमंदिरात गेल्यावर डोळे मिटून बसल्या असता, त्यांच्या समोर एक यतीपुरुष दिसले आणि ते म्हणाले, मुली, तुझी फारच सेवा झाली आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे आणि म्हणून मीच तुझ्या पोटी जन्मास येईन आणि ५९ वर्षे राहिन. डोळे उघडून पाहतात तो, ते यतीपुरुष कोठेही दिसेनात. त्यांनी देवाला हात जोडले आणि हा दृष्टांत खरा होऊ दे अशी प्रार्थना केली. याप्रमाणे सौ. सीताबाई या गरोदर राहिल्या आणि शके १७५८, इ.स. १८३६ मध्ये मुलगा जन्माला आला. या मुलाचे नांव 'व्यंकटेश' ठेवले. हे व्यंकटेश म्हणजेच आमचे श्रीबाबासाहेब पाटणकर (मुजूमदार).

श्रीबाबासाहेबांना पाचवे वर्ष लागल्यावर त्यांची मुंज झाली. मुंजीनंतर श्रीबाबासाहेब हे नित्यनेमाने स्नान-संध्या व सूर्यनमस्कार घालू लागले. भगवद्गीतेतील १२ वा आणि १५ वा अध्याय त्यांना सहज पाठ झाला. ६व्या वर्षीच बाबासाहेबांना पाठशाळेत घातले. श्रीबाबासाहेबांचे इंग्लीश ४ इयत्ता शिक्षण झाले होते. श्रीबाबासाहेबांना १२ वे वर्ष लागल्यावर घरी, त्यांच्या लग्नाची चर्चा सुरू झाली आणि श्रीबाबासाहेबांचे 'भुवनेश्वरी' या नावाच्या मुलीशी लग्न झाले.

श्रीबाबासाहेबांचे पाठशाळेतील शिक्षण संपल्यावर, वडिलांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी पुणे येथे पाठविले. तेथे त्यांनी वकिलीचा अभ्यास केला. वकिलीची परीक्षा उत्तमप्रकारे पास झाले. येवढ्यात त्यांना आपण मुधोळ संस्थानात न्यायाधीशाचे काम कराल का? अशी विचारणा झाली. तेव्हा 'मी आई-वडिलानां विचारून काय ते सांगतो' असे त्यांनी उत्तर दिले. याप्रमाणे ते सांगलीस आले आणि घडलेली हकिगत सांगितली. आई-वडिलांचा या नोकरीस होकार येताच, ते मुधोळ येथे न्यायाधीशपदी रुजू झाले. मुधोळकर सरकारांनी त्यांना रहाणेसाठी चौसोपा वाडा दिला होता. श्रीबाबासाहेबांनी आपल्या पत्नीला मुधोळला नेले. मुधोळकरांनी त्या दांपत्यास मेण्यातून मुधोळला नेले.

मुधोळहून सांगलीस येताना व सांगलीहून परत मुधोळला जाताना वाटेतच चिमडक्षेत्र लागे. तेथे श्रीबाबासाहेब विश्रांतीसाठी थोडा वेळ थांबत असत. प्रवेशद्वारी असणाऱ्या वटवृक्षास घोडे बांधावयाचे, न्याहारी करायची आणि पुढे जायचे, हा कित्येक दिवस क्रम सुरू होता. साहजिकच, श्रीचिमडमहाराजांच्या नजरेस ही गोष्ट आली आणि तुम्ही आत येणेस हरकत नाही, असे बाहेरच्या बाहेर का जाता? असे ते श्रीबाबासाहेबांना म्हणाले. मग श्रीबाबासाहेब मठात येऊ लागले. चिमडचे महाराज व बाबासाहेब यांना चिलीम ओढायचे व्यसन होते. श्रीचिमडचेमहाराज चिलीम भरून श्रीबाबासाहेबांच्या हाती द्यायचे. त्यांनी चिलीम ओढून झाल्यावर ती चिलीम श्रीचिमडच्या महाराजांनी ओढायची असा क्रम सुरू झाला. हे दृष्य पाहून शिष्यलोक म्हणाले की, 'श्रीबाबासाहेब कितीही मोठे असले तरी तुमच्यापेक्षा कोणी मोठे नाही. तुम्ही चिलीम भरून द्यायची आणि मग श्रीबाबासाहेबांनी ओढायची हे आम्हाला बरोबर वाटत नाही. तुम्ही या श्रीबाबासाहेबांना काहीतरी चमत्कार दाखवा, की ज्यायोगे ते तुमचा आदर करतील.' पुढच्या वेळेस श्रीबाबासाहेब जेव्हा चिमड मठात आले आणि श्रीचिमडमहाराज आणि श्रीबाबासाहेब यांची दृष्टादृष्ट झाली मात्र, श्रीचिमडच्या महाराजांनी श्रीबाबासाहेबांना काय दाखविले आणि श्रीबाबासाहेबांनी काय अनुभवले हे कुणाला कळलेच नाही. श्रीबाबासाहेबांनी श्रीचिमडच्या महाराजांचे पाय धरले आणि ते म्हणाले, 'महाराज मी सर्वस्वी अपराधी आहे. मला आपली योग्यता कळली नाही. मला पदरात घ्या आणि माझेवर पूर्ण अनुग्रह करा.' याप्रमाणे श्रीचिमडमहाराजांनी श्रीबाबासाहेबांना चिमड मठात गणेशचतुर्थी दिवशी अनुग्रह दिला. श्रीबाबासाहेबांमुळेच आमच्या श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना श्रीचिमडच्या महाराजांचा अनुग्रह लाभला.

श्रीबाबासाहेब रोज ज्ञानेश्वरी सांगायचे. कोल्हापूरहून काही साधक ज्ञानेश्वरी ऐकायला सांगलीला यायचे. कोल्हापूरला श्री. विष्णुपंत आपटे नामक शाहू महाराजांचे सिव्हिल सर्जन होते. त्यातील एका साधकाने विचारले, 'काय विष्णुपंत येताय का सांगलीला, ज्ञानेश्वरी ऐकायला?' बराचवेळा ते 'नाही' म्हणायचे. पण एक दिवस 'येतो' म्हणाले. पण माझी एक अट आहे. 'काय अट आहे?' असे साधकाने विचारले. तेव्हा ते म्हणतात, 'कोल्हापूरहून जयसिंगपूर स्टेशनवर आल्यावर टांगेवाल्याने मला आपणहून विचारले पाहिजे की काय रावसाहेब येताय का सांगलीला?' तर येणार! त्याप्रमाणे ते आले असता एक टांगेवाला आला आणि त्याने येणेबाबत विचारले. हे बघून ते प्रथम आले. दुसरे दिवशी ते म्हणाले, 'मी येईन, पण तो टांगेवाला पोलीसी ड्रेसमध्ये पाहिजे.' त्याप्रमाणे दुसरे दिवशी तो टांगेवाला पोलीसी ड्रेसमध्ये आला. तिसऱ्या दिवशी म्हणाले, 'तो टांगेवाला नवरदेवाच्या (मंडोळ्या वगैरे बांधलेल्या) वेषात पाहिजे.' त्याप्रमाणे तो टांगेवाला नवरदेवाच्या वेषात आला. हा जेव्हा प्रकार श्री. बाबासाहेबांनी ऐकला, तेव्हा ते विष्णुपंतांना म्हणतात, 'अहो विष्णुपंत, एखाद्याची परीक्षा बघायची म्हणजे किती बघायची?' हे वाक्य ऐकताच विष्णुपंतांनी बाबासाहेबांचे पाय धरले व कृपा करा म्हणाले. पण त्यांनी कृपा केली नाही. त्यांनी त्यांना चिमडच्या महाराजांकडे नेले व चिमडच्या महाराजांचा त्यांना अनुग्रह प्राप्त झाला.

कालांतराने, श्रीबाबासाहेब हे सांगलीस रहाणेस आले. श्रीबाबासाहेबांना तीन मुली व एक मुलगा

होता. मुलाचे नाव विष्णु ठेवले होते. श्रीचिमडचे महाराज यांनी देहू, आळंदी व परळी येथे तीर्थाटनाला जाणेचा बेत निश्चित केला. महाराजांसोबत श्रीलक्ष्मीबाईअक्का, श्रीबाबासाहेब, श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीगोपाळराव दीक्षित इ. शिष्यमंडळी यात्रेला गेली. सुरवातीस सर्वजण सज्जनगडला गेले. त्यानंतर ते आळंदीस आले. आळंदीला दर्शन झाल्यावर श्रीचिमडमहाराजांना आपली तीर्थयात्रा लवकर आवरून निजधामाला या असा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आदेश झाला. त्याप्रमाणे श्रीचिमडमहाराज हे आळंदीहून थेट सांगलीला श्रीबाबासाहेबांच्या घरी आले. घरी आल्यावर बाबासाहेब चिमडमहाराजांना म्हणाले, 'महाराज आपला फोटो काढायचा आहे.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'अहो, बाबासाहेब, शरीर म्हणजे एक छाया आहे. त्याची पुन्हा छाया कां घेता?' बर, घ्या असे म्हणाले. त्याप्रमाणे कॅमेरा आणला, फोटो काढण्याचे काम विष्णुपंतांनी केले. पण फोटो आला नाही. ४-५ वेळा काचा फुटल्या. ८-१५ दिवस राहिलेनंतर श्रीचिमडचेमहाराज चिमडला रवाना झाले आणि मार्गशीर्ष शु. एकादशी इ.स. १८९१ रोजी श्रीचिमडमहाराजांनी देह ठेवला.

श्रीबाबासाहेबांनी श्रीचिमडच्या महाराजांच्या पादुकांची पूजा केल्याशिवाय कधीही अन्नग्रहण केले नाही. श्रीबाबासाहेबांनी श्रीचिमडमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे कठोर साधना केली. त्यांचेकडे अनुग्रह घेणेस अनेक लोक येत असत. परंतु त्या सर्वांना त्यांनी अनुग्रह दिला नाही. काही मोजक्या लोकांनाच अनुग्रह दिला. त्यात प्रामुख्याने पुण्याचे डॉ. श्री.भाविकर, ग्वाल्हेरचे डॉ. श्री. लेले, पुण्याचे श्री. भिडे वकील, जमखंडीचे श्री.सोहोनी, श्री. बाबासाहेब करंदीकर इत्यादि शिष्य झाले.

श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवल्यानंतर चार वर्षे श्रीबाबासाहेब होते. इ.स. १८९५ मध्ये श्रीबाबासाहेब हे दोन-तीन दिवस तापाने आजारी होते. त्यांचे दृष्टीसमोर तीन दिवस सतत शेष येत होता. शेषदर्शनाला चिमडसंप्रदायात आगळे महत्त्व आहे. हा शेष दृष्टीसमोरून अदृश्य झाला आणि श्रीअक्कलकोटस्वामींनी श्रीबाबासाहेबांना दर्शन देऊन निजधामी येण्याचा आदेश दिला.

आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ।।१।।
आजवर होतो तुमचे गावी । आता कृपा असो द्यावी ।।२।।
आता नाही येणे जाणे । सहज खुंटले बोलणे ।।३।।
रामकृष्ण विठ्ठल बोला । तुका जातो वैकुंठाला ।।४।।

हा श्रीतुकाराममहाराजांचा अभंग मोठ्या आर्त स्वरात उच्चारून, सर्वांना सांगून सवरून मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा, शके १८१७, इ.स. १८९५ रोजी वयाच्या ५९व्या वर्षी श्रीबाबासाहेबांनी देह ठेवला. यानंतर गावभागातील त्यांचे वाड्यात सुंदर समाधी बांधण्यात आली. आजसुद्धा तेथे त्यांची पूजा-अर्चा व पुण्यतिथी साजरी केली जाते.

***

प.पू. श्रीनिरंजनमहाराज मौजे वडगाव

जन्म
पौष शु. प्रतिपदा शके १८२३
शुक्रवार दि.१०.०१.१९०२

निर्याण
मार्गशीर्ष व.७, शके १९१९
रविवार दि.२१.१२.१९९७

सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यात कवलापूर हे गाव आहे. या गावाचे ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर आहे. हे मंदिर प्राचीन आहे. अशा या कवलापूर गावात श्री. बडेसाहेब बहुरूपी (हिरेकुडी) या नावाचे सत्शील गृहस्थ रहात होते. यांच्या पत्नीचे नाव फातिमा होते. श्रीबडेसाहेब हे जातीने मुसलमान असले तरी ते सच्चे शिवभक्त होते. त्यांचा परंपरागत बहुरूपी (सोंगे आणून उपजीविका करणे) हा व्यवसाय होता. या दांपत्याला बरेच वर्षे पुत्रप्राप्ती होत नव्हती. यामुळे दोघे चिंतेत होते. अशातच एक दिवस कवलापुरात पिरान पिरसुबहानी या नावाचे अवलिया संत आले होते. त्यांच्या दर्शनास आपण जावे आणि त्यांना प्रार्थना करुन पुत्र प्राप्तीची मनातील इच्छा प्रगट करावी असा विचार या उभयतांच्या मनात आला. त्याप्रमाणे हे दोघे त्यांच्या दर्शनास गेले. नमस्कार केला आणि पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून त्यांचेकडे कळकळून विनंती केली. यावेळी श्री पिरानपिर म्हणाले, 'तुम्ही काही काळजी करु नका. थोडा काळ जावा लागेल, पण पुत्रप्राप्तीची तुमची इच्छा पुरी होईल आणि तो आपल्या कुळाचा उद्धार करेल' असा आशीर्वाद दिला. आणि या आशीर्वादानुसार पौष शुद्ध प्रतिपदा शके १८२३ दि. १० जानेवारी १९०२ रोजी सकाळी ७.१५ वा. कवलापूर येथे एक पुत्ररत्न अवतीर्ण झाले. या मुलाचे नांव श्रीबंडूसाहेब ठेवणेत आले. हा बंडूसाहेब म्हणजेच आमचे 'श्रीनिरंजनमहाराज' होत.

श्रीनिरंजनमहाराजांचे कवलापूर येथे प्राथमिक शिक्षण सुरू असतानाच त्यांचे वडिल श्री. बडेसाहेब यांना अकाली देवाज्ञा झाली. लहान वयातच पितृछत्र हरवल्याने त्यांच्या आईंनी त्यांचा सांभाळ केला. लहानवयातच पितृछत्र हरपल्याने शिक्षण अर्धवट सोडावे लागले आणि त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली. त्यांनी वडिलांचा जो बहुरूपीचा व्यवसाय होता तो त्यांनी सुरू केला. याबरोबरच श्रीनिरंजनमहाराजांना तालमीचा छंद होता. त्यामुळे त्यांची देहयष्टी अत्यंत सुदृढ होती. ते पूर्ण शाकाहारी होते.

श्रीनिरंजनमहाराज आपल्या बहुरूपी व्यवसायाकरता एका गावात गेले. हे सोंगनाट्य बघण्यासाठी एक लहान शाळकरी मुलगा आलेला होता. त्याच्या मनात विचार होते, त्यामुळे तो चिंतामग्न होता हे श्रीनिरंजनमहाराजांनी ओळखले. ते त्याच्या जवळ गेले आणि त्या मुलाची प्रेमाने चौकशी करुन त्याला धीर द्यायचा प्रयत्न केला. श्रीनिरंजनमहाराजांनी त्या मुलाला विचारले, 'तू शाळेत कां नाही गेलास? शाळेत न जाता तू इथे सोंगनाट्य बघायला आलास काय?' हा प्रश्न ऐकल्यावर तो मुलगा म्हणाला, माझी घरची परिस्थिती अत्यंत बेताची आहे. शाळेतील फी भरण्याइतकेही पैसे माझ्याजवळ नाहीत. हे ऐकून श्रीमहाराजांचे

हृदय द्रवले आणि म्हणाले, तू काळजी करु नकोस. तुझ्या फीची व्यवस्था होईल. याप्रमाणे श्रीमहाराजांनी त्या गावात सोंगनाट्य उत्तमरितीने वठवले आणि भरपूर पैसे गोळा केले. त्या मुलाला बोलावले आणि त्याच्या हातावर शाळेतील फीचे पैसे ठेवले. खरे तर श्रीनिरंजनमहाराज आणि तो मुलगा समवयीन, पण त्यांची कृती सर्व समाजाला काहीतरी ठसवून गेली.

श्रीनिरंजनमहाराज हे सुदृढ शरीराचे आणि लहान वयातच व्यवसाय चांगल्याप्रकारे चालवू लागले हे त्यांच्या नातेवाईकांना बघवले नाही आणि त्यांनी श्रीमहाराजांच्या विरुद्ध कट कारस्थान रचले. त्यातील एकाने श्रीमहाराजांचेवर तीक्ष्ण हत्याराने वार केला. महाराज गंभीर जखमी झाले, पण त्यातून ते बचावले. आपल्या जीवाला धोका आहे हे बघून त्यांनी गाव सोडण्याचा निश्चय केला. बहुरूपी व्यवसाय असला तरी त्यांचे मनात ईश्वरभक्ती रुजू लागली. आत्मज्ञान संपादन करावे असाही विचार त्यांचे मनात घोंगावू लागला. आत्मज्ञानप्राप्तीसाठी सद्गुरूकृपा आवश्यक असलेने सद्गुरुंचा शोध घेऊ लागले. शोध करता करता आडी, ता. चिकोडी येथील अडिमल या डोंगरावर पट्टीवाले नामक एक साधुपुरुष आले आहेत असे कळले. त्यांच्या दर्शनासाठी ते गेले. साधुपुरुष ध्यानावस्थेत होते. त्यांचे समोर महाराजांनी एक अभंग म्हटला. अभंग ऐकून साधुंचे ध्यान उत्थापन झाले. साधु म्हणाले, आत्मज्ञान व्हावे म्हणतोस, पण ओंकाराच्या उत्पत्तीतील गमक तुला माहित आहे कां? हे ऐकून निरंजनमहाराजांनी अकार, उकार मकार मात्रेतला अनुस्वार याचा गर्भितार्थ साधुंपुढे कथन केला. हे ऐकून साधुंनी तुझ्या हातून मोठे कार्य होईल असा आशीर्वाद दिला आणि सांगितले की, 'ज्या पंथामध्ये शांभवी मुद्रा आहे, त्या पंथातील/संप्रदायातील सत्पुरुषाकडून अनुग्रह घे' आणि हा गुरू तुला लवकरच भेटेल असा आशीर्वाद दिला. या आशीर्वादाप्रमाणे शिरगुर ता. रायबाग येथील शिवयोगी प.पू.श्रीकळमेश्वरमहाराज या विभूतींची भेट झाली. हेच आपले सद्गुरू आहेत अशी मनोमन खात्री पटली आणि श्रीनिरंजनमहाराजांनी श्रीकळमेश्वरमहाराजांचे पाय धरले आणि कृपायाचना केली. त्याप्रमाणे प.पू. श्रीकळमेश्वरमहाराजांनी श्रीनिरंजनमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला व अनुग्रह दिला आणि शांभवी मुद्रा दिली. त्यांनी सांगितलेप्रमाणे श्रीनिरंजनमहाराज हे साधना करु लागले. बरेच दिवस घर सोडून झाले होते. त्यांना आपल्या आईची व घराची आठवण झाली. पण गेल्यावर आपल्याला आपली आई काही तरी रागाने बोलेल या चिंतेने ते त्रस्त झाले. ते परत श्रीकळमेश्वरमहाराजांकडे गेले तेव्हा त्यांनी, तू घरी जा, आई आणि नातेवाईकांना भेट असे सांगितले. त्यानुसार ते आपल्या आईचे घरी परत गेले. श्रीनिरंजनमहाराजांना १९ वे वर्ष लागले आणि त्यांचा जन्नतबी या मुलीशी विवाह झाला. यानंतर यथावकाश त्यांना ३ मुले व २ कन्या झाल्या. पण परमार्थाची ओढ मात्र नित्य होती.

श्रीनिरंजनमहाराज हे घेतलेली सोंगे हुबेहूब वठवायचे आणि या सोगातून चांगला सामाजिक/पारमार्थिक संदेश द्यायचे. एक दिवस त्यांचा नांद्रे गावातील चावडीवर सोंगाचा कार्यक्रम होता. आणि यामध्ये त्यांनी

बेरडाचे सोंग घेतलेले होते. अफाट गर्दी जमलेली. हे बघून तहसीलदार आले आणि श्रीनिरंजनमहाराजांवर खवळले आणि नाराजी प्रगट केली. श्रीनिरंजनमहाराजांनी बेरडाचे रौद्ररूप धारण केले. बघणारे सगळे शांत झाले. काही लोक त्यांना हाताला धरून मागे खेचत होते. पण ते आवरेनात. एवढ्यात श्रीमहाराज म्हणाले, हा जो सोंग घेतलेला बेरड आहे, तो वाईट वागणारा/दुसऱ्याची हत्या करणारा नाही, तर कामक्रोधांना जिंकणारा आहे. दुराचारी लोकांना दुष्कृत्यापासून परावृत्त करणारा आणि जिवा-शिवाचे ऐक्य साधणारा आहे हे ऐकून तहसीलदार अवाक झाले. त्यांच्याशी ते आदराने बोलू लागले. श्रीनिरंजनमहाराजांनी श्रीबसवेश्वर, श्रीविश्वामित्र, हनुमान, राम-कृष्ण इ. सोगे हुबेहूब वठवली.

अडिमल या डोंगरावरील श्रीपट्टीवाले महाराज शिष्यांना म्हणाले, मी आता समाधी घेणार आहे. त्या काळी इंग्रजांची राजवट असलेने समाधी घेणेकरता त्यांची परवानगी लागायची. त्याप्रमाणे त्यांच्या शिष्यांनी परवानगी मागितली. पण इंग्रज सरकारने ती नाकारली. हे श्रीपट्टीवालेमहाराजांना कळले. श्रीपट्टीवालेमहाराज म्हणाले, आता इंग्रज सरकारची परवानगी वगैरे काही नको. मी सोमवारी सकाळी ११ वाजता सर्वांसमक्ष समाधी घेणार आहे. हे सगळ्या शिष्यांना कळले. गर्दी झाली. श्रीपट्टीवालेमहाराज म्हणाले, 'नरदेहात एकूण १० द्वारे आहेत. त्यापैकी एकातून माझा प्राण जाणार आहे. तुम्ही लक्ष ठेवा.' हे ऐकून उपस्थित शिष्य म्हणाले, महाराज, आम्ही अज्ञानी माणसे आम्हाला कसे कळणार आपला प्राण गेला की नाही? तेव्हा श्रीनिरंजनमहाराज तेथेच झाडाखाली उभे होते. त्यांचेकडे पाहून श्रीपट्टीवालेमहाराज म्हणाले, तो झाडाखाली जो मुलगा उभा आहे, तो हे अचूक सांगेल. त्याप्रमाणे सगळ्या शिष्यमंडळींनी श्रीनिरंजनमहाराजांना बोलावले. तोपर्यंत श्रीपट्टीवाले महाराज पावणे अकरा वाजता खुर्चीत बसले. त्यांनी नेत्र मिटले आणि बरोबर अकरा वाजता श्रीनिरंजनमहाराजांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला. आणि आश्चर्य श्रीपट्टीवालेमहाराज समाधिस्त झाले. श्रीनिरंजनमहाराज म्हणाले, 'श्रीपट्टेवालेमहाराज स्वरूपी लीन झाले असून कुडीतील पक्षी उडून गेला आहे' असे सूचक विधान बोलून गेले. उपस्थित शिष्यांनी श्रीनिरंजनमहाराजांना प्रश्न केला की या महाराजांचा प्राण कोणत्या द्वारातून गेला? तेव्हा श्रीनिरंजनमहाराज म्हणाले, 'जे सामान्य भोगीजन असतात / जे विषयात गुरफटलेले असतात अशांचा प्राण अधोकेंद्रातून जातो, यालाच अधममृत्यू म्हणतात. जे पक्के संसारी लोक असतात, ज्यांनी अध्यात्माची खूण जाणलेली नाही, अशा लोकांचा प्राण कर्ण अथवा नेत्रातून जातो व ज्यांचे अखंड परमात्म्याशीच अनुसंधान असते, अशांचा प्राण जीवन ऊर्ध्वगामी झालेने सहस्रदलातून/दहाव्या दारातून जातो. यावेळी कानाजवळ एक प्रकारचा स्राव होतो आणि मधासारखा सुवास पसरतो. त्यांची हालचाल बंद होते. कुडी गार असते आणि टाळू फक्त गरम असतो.' अशाप्रकारे त्यांनी सर्व शिष्यांना खुलास केला. यावरून त्यांची परमार्थातील योग्यता कळून येते.

श्रीनिरंजनमहाराजांना त्यांचे काळात जैनमुनी चक्रवर्ती आचार्य श्री १०८ शांतीसागरमहाराज, अथणीचे

शिवयोगी श्री मृगेंद्रस्वामी, वेदांत पारंगत असलेले श्रीरामानंदभारती, घाट राजापुरचे मुस्लिम धर्मातील श्रेष्ठ अधिकारी सत्पुरुष भेटले. श्रीकळमेश्वरमहाराज, श्रीपायसागरमहाराज आणि अनंतकीर्तीमहाराज यांनी श्रीनिरंजनमहाराजांची परमार्थातील योग्यता ओळखली आणि या तिघांनी इ.स.१९५१ साली त्यांचे 'श्रीनिरंजनमहाराज' हे नामकरण केले.

श्रीकळमेश्वरमहाराजांनी दि.१३.०२.१९६० रोजी श्रीनिरंजनमहाराजांना आपले उत्तराधिकारी नेमले आणि लोकांना तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्याची/अनुग्रह देण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे श्रीनिरंजनमहाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सत्संगातून मार्गदर्शन करून अनेक भक्तांचे जीवन उजळून टाकले. अनेकांना मोक्षाचा मार्ग दाखविला, सर्वधर्म समभाव सांगितला.

श्रीनिरंजनमहाराजांची अद्वैयानंद परंपरा, उज्जयनी शाखा, शांभवी दीक्षा, विहंगम राजमार्ग, सहज राजयोग ही मालिका चालविण्याचा आणि ज्ञानदान करण्याचा अधिकार स्वतः श्रीनिरंजनमहाराजांनी दि.९.४.१९९४ रोजी श्री.कृष्णा दशरथ धनवडे यांना दिला आणि दि.२१.१२.१९९७ रोजी त्यांचे श्रीविनयानंदमहाराज असे नामकरण केले. नावाप्रमाणेच त्यांचे ठिकाणी मूलतः विनय होता आणि त्यांच्याशी आमच्या प.पू.श्रीअण्णांचा घनिष्ठ संबंध होता.

श्रीनिरंजनमहाराजांना ९५ वे वर्ष लागले. शरीर थकू लागले आणि अशा अवस्थेत त्यांनी मार्गशीर्ष वद्य ७, शके १९१९ (मॉ शारदादेवी यांची पुण्यतिथी) रविवार दि. २१.१२.१९९७ रोजी संध्याकाळी ६ वा. १० मिनिटांनी ढवळी, ता.मिरज, जि. सांगली येथे महाप्रयाण केले.

श्रीनिरंजनमहाराजांची ढवळी, ता. मिरज येथे समाधी आहे. तसेच मौजे वडगाव, जि. कोल्हापूर येथे आश्रम उभारण्यात आला असून, तेथे कल्याण मंडप, सत्संग हॉल, ध्यान मंदिर, महाराजांच्या पादुका व महाराजांची पंचधातूची मूर्ती प्रतिष्ठित केलेली आहे.

***

श्रीरंगनाथस्वामी निगडीकर

जन्म
मार्गशीर्ष शु.१० शके १५३४
दि.२२.११.१६१२

निर्याण
मार्गशीर्ष व.१० शके १६०६ रविवार
दि.२१.१२.१६८४

श्री. राघोपंत हे नाझरेकर देशपांडे घराण्याचे मूळ पुरूष होते. यांचा काळ साधारणतः पंधराव्या शतकातील होता. यावेळी त्यांचे वास्तव्य बीड जिल्ह्यातील खडकी गावात होते. ते खडकी गावचे म्हणून त्यांचे आडनाव खडके. यांचेकडे गावचे कुळकर्णीपण होते. श्रीराघोपंतांना अश्वविद्या चांगली अवगत होती. म्हणून विजापूरच्या आदिलशहाने त्यांची घोडदळप्रमुख म्हणून नेमणूक केली. घोडदळप्रमुख झाले म्हणून त्यांचे आडनाव घोडके झाले. आदिलशहाने या राघोपंतांना नाझरे गावचे देशपांडे वतन दिले. यामुळे त्यांचे आडनाव देशपांडे झाले.

अशा या नाझरेकर देशपांडेंची चौथी पिढी म्हणजे श्री. रंगोपंत देशपांडे. या श्री.रंगोपंतांना रामजी, बोपाजी, कृष्णाजी आणि श्रीदत्ताजी अशी चार मुले झाली. यातील बोपाजी आणि दत्ताजी हे कर्तृत्ववान होते.

श्रीदत्त परंपरेतील किल्ले कल्याणीचा आनंद संप्रदाय हा फार महत्त्वाचा आहे. इ.स.१६०९ चे सुमारास श्रीसहजानंदस्वामी हे पीठाधीश होते. या श्रीसहजानंदांनी श्रीपूर्णानंदस्वामींना सांप्रदायिक दीक्षा दिली. श्रीसहजानंदास्वामींनी श्रीपूर्णानंदांना काशी-रामेश्वर यात्रेस जाणेची आज्ञा केली. श्रीपूर्णानंदस्वामी हे पंढरपूरला पांडुरंगाचे दर्शनास जात असत. असे पंढरपूरास जाताना नाझऱ्यास गेले. तेथे बोपाजी आणि दत्ताजी या दोघा बंधूंनी या पूर्णानंदांचे उत्तम स्वागत केले आणि बरेच दिवस नाझऱ्यास ठेऊन घेतले. यावेळी श्रीपूर्णानंदस्वामींनी बोपाजी आणि दत्ताजी या दोघा बंधूंना आनंद संप्रदायाची व हठयोगाची दीक्षा दिली.

श्री.बोपाजी देशपांडे हे नाझरे महालाचा कारभार सांभाळीत. त्यांच्या पत्नीचे नांव सौ.बयाबाई होते. त्या कर्तुत्वसंपन्न होत्या. परंतु या दांपत्याला बरेच दिवस मूलबाळ होत नव्हते. सौ.बयाबाई पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून तुळशीपूजन, गोव्रत, गुरुपादुका पूजा इ. उपासना करीत होत्या. एक दिवस सौ. बयाबाईंना एक स्वप्न पडले. स्वप्नात श्रीपूर्णानंदस्वामी त्यांचेसमोर उभे राहिले आणि त्यांनी सौ.बयाबाईंच्या ओट्यात तीन नारळ घातले. गुरूंना विन्मुख परत कसे पाठवायचे? म्हणून सहज हाती आलेला दुसरा नारळ त्यांनी श्रीपूर्णानंदस्वामींना अर्पण केला. श्रीपूर्णानंदस्वामींनी तो नारळ परत बयाबाईच्या ओटीत घातला आणि म्हणाले, 'हे फळ सध्या तुझ्याजवळ राहू दे. ते योग्यवेळी आमचे आमच्याकडे येईल.' एवढे बोलून श्रीपूर्णानंदस्वामी अदृश्य झाले. ही स्वप्नात घडलेली गोष्ट त्यांनी आपले पती श्री.बोपाजी यांना सांगितली. लवकरच दृष्टांताची प्रचिती आली.

सौ. बयाबाईंना यथावकाश तीन पुत्र झाले. यापैकी दुसरा मुलगा मार्गशीर्ष शु. १० शके १५३४, दि.२२.११.१६१२ रोजी जन्माला आला. याचे नाव 'रंगनाथ' असे ठेवणेत आले. हे रंगनाथ म्हणजेच आमचे 'श्रीरंगनाथस्वामी निगडीकर' होत.

श्रीरंगनाथस्वामींच्या शिक्षणासाठी एका शिक्षकाची नेमणूक केली होती. त्यांनी अक्षर ओळख झाल्यावर, गणित, संस्कृत, संस्कृत स्तोत्रे व भगवद्गीतेचे पाठांतर करवून घेतले. या बौद्धिक शिक्षणाबरोबरच श्रीरंगनाथस्वामींना शारीरिक शिक्षण, घोड्यावर बसणे, भालाफेक, नेम मारणे इ. शिक्षण दिले. याबरोबरच त्यांनी धनुर्वेद, अस्त्रविद्या, राजनीती इ. चे अध्ययन केले. मुंजीचे वय झाल्यावर श्रीरंगनाथस्वामींची मुंज करण्यात आली. यथावकाश लग्नाचे वय झाले म्हटल्यावर घरात लग्नाची चर्चा सुरू झाली. त्यांनी आपल्या आईला सांगितले, 'तुम्ही बळजबरीने माझे लग्न करायचे ठरवाल तर मी घरातून निघून जाईन.' श्रीरंगनाथस्वामी विरक्त होते. त्यामुळे इ.स.१६२४ मध्ये ते भल्यापहाटे घरातून बाहेर पडले. फिरत फिरत ते नीरा नदीकाठी श्रीनरसिंहपूरला नृसिंहाचे देवळात पोहोचले. दुपारी ४ घरी भिक्षा मागितली. इकडे श्रीरंगनाथस्वामींच्या घरी शोधाशोध सुरू झाली. दुसरे दिवशी श्रीरंगनाथस्वामींना श्रीनृसिंहाचा दृष्टांत झाला व त्यांनी 'योगसाधनेकरिता बद्रिनाथास जा. तिथे तुला पुढील मार्गदर्शन मिळेल' असे सांगितले.

त्याप्रमाणे श्रीरंगनाथस्वामी तेथून बद्रिनाथला जाण्यास बाहेर पडले. यात्रा करता करता ते काशीला पोहोचले. तेथे काशी विश्वेश्वराचे दर्शन घेऊन, ते पुढे बद्रिनाथला पोहोचले. तेथील बद्रिनाथाच्या देवळात वास्तव्य केले. रात्री बद्रिनाथांना त्यांनी नमन करून मनोमन प्रार्थना केली की, 'आपण माझ्यावर वात्सल्याचा हात फिरवा व मार्गदर्शन करा.' याप्रमाणे श्रीरंगनाथांना पहाटेच्या सुमारास दृष्टांत झाला. बद्रिनाथाने सांगितले, 'येथून जवळच व्यास गुंफा आहे. या गुंफेत व्यासमुनी तसेच अनेक पंथातील साधुसंतांचे वास्तव्य होते. तिथे तू ध्यानधारणा करणेस जा. तुझी मनोकामना पूर्ण होईल.' याप्रमाणे श्रीरंगनाथस्वामींनी या व्यासगुंफेत ध्यान धारणेस प्रारंभ केला. इकडे श्रीरंगनाथस्वामींच्या वडिलांना श्रीपूर्णानंदस्वामींनी दृष्टांतात सांगितले की, 'रंगा सुखरूप आहे. तो महान तपोनिष्ठ, दिव्य देहधारी असलेला योग्यवेळी पहाल, काळजी करू नका.' इकडे श्रीरंगनाथस्वामींनी व्यासगुंफेत खडतर तपश्चर्या केली. गायत्री पुरश्चरणे केली. येथे त्यांनी १२ वर्षे तपश्चर्या केली. एक दिवस साक्षात् नारायणांनी दर्शन देऊन त्यांना सांगितले की, 'तुझी येथील तपश्चर्या पूर्ण झाली. मी संतुष्ट झालो आहे. आपले गावी जा. आई-वडिलांना भेट.' हे ऐकून श्रीरंगनाथस्वामी म्हणाले, 'देवा, ही भूमी सोडून मला तिकडे परत जावेसे वाटत नाही.' हे ऐकून देव नारायण म्हणाले, 'रंगनाथा, तुला उद्याच येथून जावयाचे आहे. वाटेत टेहरी-गढवालचा राजा तुला भेटेल. तो राजा तुला एक घोडा देईल. त्याचा तू स्विकार कर आणि त्या घोड्याचे खूर काळ्या दगडावर जिथे रुततील, तीच तुझी पुण्य कर्मभूमी आहे. राजा जो घोडा देईल तो तुझी आयुष्यभर साथ करील.' आणि इकडे श्रीनारायणाने टेहरी गढवालच्या राजाला स्वप्नदृष्टांत दिला आणि सांगितले की, 'एक मानवी अवतार अंश तुझ्या राज्यात प्रवेश करेल. त्याचा सत्कार कर, त्याला

नीलवर्ण उमदा अश्व दे. उत्तम पोषाख, आयुधे दे आणि त्याच्याकडून उपदेश घे.' याप्रमाणे टेहरीचा राजा बद्रिनाथकडून येणाऱ्या वाटेकडे लक्ष देऊन बसला. तो त्याला एक लंगोटी घातलेला व जटाधारी येत असलेला दिसला. राजाने त्यांना नमस्कार केला व श्रीरंगनाथांना आपल्या राजवाड्यात घेऊन आला. दुसरे दिवशी श्रीरंगनाथांनी या राजाला पंचपंच उषःकाली उपदेश केला. याप्रमाणे मजल दरमजल करीत श्रीरंगनाथस्वामी इ.स.१६३६ मध्ये पंढरपूरला आले.

पंढरपूरला भगवंताच्या मंदिरात कीर्तनाला उभे राहिले. नेहमीप्रमाणे श्रीरंगनाथस्वामींचे वडील श्री.बोपाजीपंत आणि सौ.बयाबाई हे पंढरपूरला वारीला आले होते. तेही या कीर्तनास बसले. या दोघांना नकळत मनात वाटून गेले की, 'हा कीर्तन करणारा आपला रंगा आहे का?' सौ. बयाबाईंना कीर्तन केव्हा संपते असे झाले. श्री.बोपाजीपंत व सौ. बयाबाई या कीर्तनकार श्रीरंगनाथांना नमस्कार करणेकरिता आले, तेव्हा श्रीरंगनाथस्वामी एकदम मागे सरकले आणि क्षणात पुढे येऊन त्यांनी आपल्या मातापित्यांचे पाय धरून नमस्कार केला व कडकडून मिठी मारली आणि सांगितले की, 'आई, आता यापुढे मी तुमच्याजवळ कायमचे नाझरेस राहणार आहे.' याप्रमाणे श्रीरंगनाथस्वामी पंढरपूराहून नाझरेला आले. थोडे दिवसात सौ.बयाबाईंना देवाज्ञा झाली. सौ. बयाबाईंच्या निधनानंतर श्री. बोपाजींच्या जीवनात पोकळी निर्माण झाली. त्यामुळे त्यांना संन्यासदीक्षा घ्यावी असे वाटू लागले. त्याप्रमाणे श्री. बोपाजी, श्रीरंगनाथांना घेऊन श्रीपूर्णानंदस्वामींकडे किल्ले कल्याणीला आले. संन्यासाश्रमाची माहिती सांगून श्रीपूर्णानंदांनी या श्री. बोपाजीपंतांना संन्यासदीक्षा दिली आणि संन्यासाश्रमानंतर बोपाजीचे नाव 'निजानंद' ठेवले. श्रीरंगनाथस्वामींनाही वाटू लागले की आपणही संन्यास घ्यावा. म्हणून त्यांनी श्रीपूर्णानंदस्वामींना संन्यासदीक्षा द्यावी म्हणून विनंती केली. पण श्रीपूर्णानंदस्वामी म्हणाले, तुझे वडिल आता दीक्षा देण्यास योग्य आहेत. त्यांचेकडूनच तुला दीक्षा देववितो. याप्रमाणे एका शुभमुहूर्तावर श्रीनिजानंदांनी (वडिलांनी) श्रीरंगनाथांना संन्यासदीक्षा दिली.

श्रीनिजानंद व श्रीरंगनाथस्वामी हे तीर्थयात्रेला बाहेर पडले. जाता जाता कऱ्हाड येथे मुक्कामास आले. तेथे बरेच दिवस मुक्काम केला व येथेच श्रीनिजानंदांनी कृष्णा-कोयनेच्या संगमावर असलेल्या मार्कंडेय तीर्थाजवळ मार्गशीर्ष व. अमावस्या इ.स. १६४२ रोजी जलसमाधी घेतली.

छत्रपती शिवाजीमहाराज श्रीरंगनाथांची कीर्ती ऐकून होते. पण त्यांची प्रत्यक्ष भेट नव्हती. श्रीरंगनाथस्वामी हे नाझऱ्याला आहेत हे कळताच छत्रपतींनी खासनीसास पाठवून, साताऱ्यास घेऊन येण्यास सांगितले. याप्रमाणे श्रीरंगनाथस्वामींनी आमंत्रणाचा स्विकार केला. पण पालखीत न बसता ते आपल्या घोड्यावरून निघाले. वाटेत औंध व कोरेगावमध्ये असलेल्या निगडीच्या ओढ्यात एका काळ्याकभिन्न दगडावर त्यांच्या मनोहर घोड्याचा खूर रुतला. घोडा पुढे जाईना. स्वामींनी उतरून तो घोड्याचा पाय बाहेर काढला. यावेळी स्वामींना श्रीनारायणाच्या दृष्टांताची आठवण झाली. त्याप्रमाणे स्वामींनी खासनीसांना सांगितले की, 'येथून

पुढे येणे होत नाही. इथेच मी वास्तव्य करणार आणि पुढे लवकरच आम्ही छत्रपतींच्या भेटीला येऊ'. याप्रमाणे यथावकाश निगडीमध्ये श्रीरंगनाथस्वामींनी मठ बांधला व तेथेच वास्तव्य केले. म्हणून ते श्रीरंगनाथस्वामी निगडीकर झाले.

श्रीरंगनाथस्वामी कीर्तनाला उभे राहात ते राजवैभवी पोशाखातच. डोक्याला गर्द गुलाबी मस्त मंदिल, कधी रेशमी, कधी मखमली पायघोळ अंगरखा, कंबरेला ऐटदार जरतारी शेला, किंचित सैलशी सलवार, गळ्यात कंठा, कानात चौकडा, बोटात अंगठ्या, कपाळी केशराचा टिळा असा त्यांचा थाट असे.

समर्थांच्या समर्थ पंचायतनातील एक म्हणजे श्रीरंगनाथस्वामी निगडीकर होत. ते समर्थांना गुरुस्थानी मानीत. श्रीतुकाराममहाराजांबरोबरही यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते. श्रीरंगनाथस्वामींनी विपुल काव्यरचना केली. गुरूगीता टीका, गजेंदमोक्ष, रामजन्म, निजानंद साधने, सुदामा चरित्र, पंचीकरण, मिथ्यामायास्वरूप, एकाखडी, योगवासिष्ठसार टीका, पद्यसंग्रह इ. लेखन केले.

श्रीरंगनाथस्वामींची एकदा पंढरपुरात कीर्तने होती. या कीर्तनाला एक दिवस समर्थ आले होते. श्रीरंगनाथस्वामींना कीर्तनाला यायला थोडा उशीर होणार होता. त्यामुळे त्यांनी आपला पुतण्या खंडोबाला निरोप द्यायला पाठविले. खंडोबाने निरोप सांगताच समर्थ म्हणाले, 'आम्हाला रंगोबा काय आणि खंडोबा काय, तूच कीर्तन कर.' हे ऐकताच खंडोबा श्रीरंगनाथस्वामींकडे पळत घरी आला. श्रीरंगनाथस्वामी म्हणाले, समर्थ म्हणाले आहेत ना, तू कीर्तन कर, आता तूच कीर्तन करायचे. त्यांनी खंडोबाला जीभ बाहेर काढायला सांगितली आणि जीभेवर 'श्री' हे अक्षर लिहिले आणि 'जा, कीर्तन कर असे म्हणाले. याप्रमाणे खंडोबा मंदिरात प्रवेश करणार, तोच समर्थ म्हणाले, 'यावे श्रीधरस्वामी'.

अशा या श्रीरंगनाथस्वामींना ७२ वे वर्ष लागले. वयोमानाने प्रकृती क्षीण झालेली होती. परंतु त्यांचे दैनंदिन कार्यक्रम नेहमीप्रमाणे सुरूच होते आणि मार्गशीर्ष वद्य दशमी शके १६०६, रविवार, दि.२१.१२.१६८४ च्या प्रातःकाळी निजानंद नामाचा जप करीत श्रीरंगनाथस्वामींनी महाप्रयाण केले.

***

प.पू. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर

जन्म
माघ शु.११, शके १७६६
इ.स.१८४५

निर्याण
मार्गशीर्ष व.१० शके १८३५
सोमवार दि.२२.१२.१९१३

श्रीरावजीपंत व सौ. गीताबाई हे दोघे भगवत्भक्त होते. श्रीरावजीपंतांना विठ्ठलभक्तीची ओढ होती आणि सौ. गीताबाई यांना लहानपणापासून रामभक्तीची आवड होती. या दोघांना एका सत्पुरुषाच्या कृपेचा लाभ झाला. त्यांना शके १७६६ म्हणजेच इ.स. १८४५ रोजी पुत्ररत्न झाले. तो दिवस माघ शु. एकादशीचा होता. त्याचे नांव 'गणपती' ठेवले. लहानपणी सर्वजण त्याला 'गणू अथवा गणुबुवा' म्हणत असत. हे 'गणुबुवा' म्हणजेच आमचे श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज होत.

वयाच्या ४थ्या वर्षापासून आजोबांनी गणूला शिकविण्यास सुरवात केली. गणू हा हुशार असलेने गुरुजी जे शिकवीत, ते त्याचे तोंडपाठ होत असे. लहानपणापासून गणूला रामनामाची गोडी होती. ८व्या वर्षी गणूची मुंज झाली. अभ्यासाबरोबर पोहणे, दंड, बैठका, कुस्ती इ. खेळात तो प्रवीण झाला. गणूची रामनामाकडेच ओढ व अंगी विरक्ती असलेने थोड्याच दिवसात त्यांनी शाळेला रामराम ठोकला. गणू नदीकाठी जाऊन तासन्तास रामचिंतन करीत असे. एकदा असेच एक रामदासी गणूला भेटले. गणूनी त्यांना, 'तुम्ही असे गावोगावी का भटकंती करता? असे विचारले.' तेव्हा ते रामदासी म्हणाले, 'मी सद्गुरु शोधार्थ भटकत आहे. गुरुशिवाय ज्ञानप्राप्ती नाही.' हे ऐकल्यावर गणू आपल्या दोन मित्रांसह घरातून बाहेर पडला आणि मजल दरमजल करीत कोल्हापूरला आला. भिक्षा मागून खाऊ लागला. पण भिक्षा मागून खाणे या दोघांना जमेनासे झालेने ते परत गेले. त्यामुळे गणूच्या वडिलांना गणू कुठे आहे हे समजले. वडील कोल्हापूरला जाऊन गणूला गोंदवल्याला परत घेऊन आले.

गणू गोंदवल्याला आला खरा, पण तेथे त्याचे मन रमेना. त्याने नामसाधना चालूच ठेवली. मनात रात्रंदिवस गुरुभेटीचा विचार सुरू होता. गणूचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर 'सरस्वतीबाई' यांचेशी त्यांचा विवाह झाला.

गुरूभेटीची आंतरिक आस लागल्याने गणूने परत घर सोडणेचे ठरविले. सुरवातीला गणू हरीपूर जि. सांगली येथील श्रीराधाबाईअक्का या महान अधिकारसंपन्न साध्वी स्त्रीकडे आला. त्यांनी गणूला मिरजेच्या श्रीअण्णाबुवा या साधुपुरुषांकडे पाठविले. तेथून तो सटाणे येथील श्रीयशवंत महादेव भोसेकर ऊर्फ देवमामलेदार यांचेकडे आला. तेथून तो अक्कलकोटच्या श्रीस्वामीसमर्थांकडे आला. स्वामींनी गणूला अत्यंत प्रेमाने जवळ घेतले, पण मी तुझा अध्यात्मिक गुरू नाही असे स्पष्ट सांगितले. त्यानंतर गणू हुमणाबाद येथील प्रसिद्ध दत्तावतारी संत श्रीमाणिकप्रभू यांचेकडे आला. त्यांनी ''योग्य वेळ आली की तुझे काम होईल'' असा आशीर्वाद दिला. त्यानंतर गणू हा काशीक्षेत्रातील तेलंगस्वामींच्या सांगण्यावरून नैमिषारण्यात गेला. तेथे बराच साधना अभ्यास केला. तेथून तो बंगालमध्ये श्रीरामकृष्ण परमहंसांकडे गेला.

इतकी सर्व मंडळी भेटूनही सद्‌गुरू प्राप्ती झाली नाही म्हणून गणू थोडा नाराज झाला. याचवेळी गणूला समर्थ संप्रदायातील रामकृष्ण या नावाचे एक साधू भेटले. त्यांनी गणूला गुरूंचा ठावठिकाणा सांगितला. ते साधू म्हणाले, 'गणू, तू येहळेगावला तुकारामचैतन्यांकडे जा. तिथे तुझे काम होईल.' हे कळल्यावर गणू येहळे गावाला गेला. तेथे श्रीतुकामाईंची गाठ पडली आणि तेथेच गणू सेवा करून राहू लागला. मठातील वेगवेगळी सर्व कामे करू लागला. श्रीतुकामाईंनी या गणूची अनेक प्रकारांनी परीक्षा बघितली. कधी ते डोहात उडी मारायला सांगत, तर कधी मोठ्या झाडावर चढून सर्व पाने तोडायला सांगत. कधी ते गणूला खरपूस मार देत, पण लगेच प्रेमाने जवळ घेत. या सर्व परीक्षेत गणू उत्तीर्ण झाला. हे पाहून श्रीतुकामाईंनी गणूला अनुग्रहित केले व 'श्रीराम जयराम जयजयराम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र दिला आणि गणूचे नांव 'ब्रह्मचैतन्य' ठेवले. तेव्हापासून सर्व लोक गणूला 'श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर' या नावाने ओळखू लागले.

श्रीतुकामाईंचा अनुग्रह घेतल्यानंतर त्यांच्या आज्ञेने श्रीब्रह्मचैतन्यमहाराज नैमिषारण्यात साधनेसाठी गेले. यानंतर महाराजांनी गंगोत्री, काशी, अयोध्या, इंदूर, उज्जैन इत्यादि ठिकाणी वास्तव्य करून साधन केले.

या ठिकाणाहून महाराज परत गोंदवल्याला आले. आईने आग्रह केल्याने श्रीमहाराजांनी परत गृहस्थाश्रम स्विकारला. आपली पत्नी सौ. सरस्वतीबाई यांना ते माहेरहून परत गोंदवल्याला घेऊन आले. आईच्या आग्रहाखातर श्रीमहाराजांनी गावचे कुळकर्णीपद स्वीकारले. पण ते त्यांनी जास्त दिवस सांभाळले नाही. थोड्याच दिवसात श्रीमहाराजांच्या पत्नी सौ. सास्वतीबाई यांनी देह ठेवला. सौ. सरस्वतीबाईंच्या निधनानंतर महाराजांनी दुसरे लग्न करावे असे गावातील लोक व आई आग्रह करु लागली. केवळ आईच्या आग्रहाखातर श्रीमहाराजांनी 'यमुनाबाई' या नावाच्या जन्मांध मुलीशी लग्न केले. तिचे नांव 'सरस्वतीबाई' असेच ठेवले. या सौ. सरस्वतीबाई शेवटपर्यंत महाराजांच्याजवळ होत्या. महाराजांनी सन १८९० नंतर गोंदवल्यात थोरल्या राममंदिराची स्थापना केली.

श्रीमहाराजांच्या मातोश्री सौ. गीताबाई यांनी महाराजांचेजवळ काशीयात्रा करणेची इच्छा प्रगट केली. त्याप्रमाणे महाराज त्यांना काशीला घेऊन गेले. तेथून ते अयोध्येला गेले व अयोध्येतच महाराजांच्या मातोश्रींनी देह ठेवला.

इ.स.१८९७ मध्ये महाराजांनी नैमिषारण्यात कायमचे जाणेचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी तयारीही सुरू केली. परंतु यादरम्यान गोंदवल्यात दुष्काळ पडला. सर्व भक्तगण महाराजांना न जाण्याबद्दल विनवणी करू लागले. परंतु महाराज आपल्या निर्णयावर ठाम होते आणि एकाएकी थोरल्या मंदिरातील रामरायाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ही घटना अतर्क्य आहे. श्रीरामाची मूर्ती तर पाषाणाची, पण या पाषाणातही देवत्व आहे, याची प्रचिती या अश्रुंमुळे सर्व साधकांना आली. रामरायाचे अश्रु जेव्हा महाराजांनी पाहिले, तेव्हा महाराजांनी आपला नैमिषारण्यात जाण्याचा बेत रद्द केला.

सन १९०५ नंतर परत एकदा महाराज नैमिषारण्यात जाऊन आले. सन १९०९ मध्ये जेकब या नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने श्रीमहाराजांवर विषप्रयोग केला. या घटनेचे श्रीमहाराजांनी अभंगाद्वारे वर्णन केले

आहे. विषप्रयोगानंतर महाराजांना दम्याचा त्रास होऊ लागला. तो इ.स. १९१२ नंतर वाढतच गेला. म्हणून ते निरवानिरवीची भाषा करू लागले. आपल्या मागे गोंदवले येथील सर्व व्यवस्थित चालावे म्हणून त्यांनी व्यवस्थापनपत्र तयार केले आणि यासाठी श्रीब्रह्मानंदमहाराज यांना प्रमुख विश्वस्त म्हणून नेमले.

रविवार दि.२१ डिसेंबर, १९१३ रोजीचा दिवस उजाडला. महाराज सकाळपासून आपल्या जाण्याची सूचना भक्तांना देत होते. रात्री नेहमीप्रमाणे ते भजनाला उभे राहिले. त्यावेळी त्यांचे मुखातून निर्याणाचे अभंग येऊ लागले. पहाटेच्या वेळेला महाराजांनी सर्वांकडे प्रेमाने पहात शेवटचा अभंग म्हटला :-

भजनाचा शेवट आला । एकवेळ राम बोला ।।१।।
आज पुण्य पर्वकाळ । पुन्हा नाही ऐसी वेळ ।।२।।
राम राम वाचे बोला । आत्मसुखामाजी डोला ।।३।।
दीनदास सांगे निका । रामनाम स्वामी शिका ।।४।।

याप्रमाणे मार्गशीर्ष वद्य १० शके १८३५, सोमवार दिनांक २२ डिसेंबर १९१३ रोजी पहाटे श्रीमहाराजांनी श्रीरामाला अखेरचा नमस्कार केला आणि 'माझ्या माणसांना सांभाळ' अशी आर्त विनंती केली आणि शेवटी 'जेथे नाम तेथे माझे प्राण । ही सांभाळावी खूण ।' ही एक ओळ उच्चारून त्यांनी सूर्यादयापूर्वी १० मिनिटे अमृत घटकेवर देह ठेवला.

श्रीदासराममहाराज असताना, श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांच्या हातच्या चिपळ्या आमचे घरी श्रीमहाराजांच्या शिष्या चंपूताई यांनी आणून दिल्या. काही सांगणेचे आधीच श्रीदासराममहाराज यांनी सूचकतेने त्या चिपळ्या महाराजांच्या आहेत हे सांगितले. दरवर्षी श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांच्या पुण्यतिथी दिवशी, आमचे घरी या चिपळ्यांची पूजा केली जाते.

***

श्रीदासराममहाराज कृत श्रीगोंदवलेकरमहाराज यांचा निर्याणाचा अभंग

ब्रह्मचैतन्य हे ब्रह्माचा आकार । चैतन्य साकार गोंदवल्यासी ।।१।।
नामासाठी आले नामीच राहिले । नाम गरजले त्रैलोक्यात ।।२।।
सांगती सकळा करावे भजन । घातले आसन आपण ते ।।३।।
श्रीराम श्रीराम त्रिवार उच्चार । करोनिया स्थिर रामी झाले ।।४।।
शालीवाहन शके अठराशे पस्तीस । वद्य दशमीस मार्गशीर्षी ।।५।।
प्रथम प्रहरी सोमवार दिनी । श्रीराम होऊनी अमर झाले ।।६।।
ब्रह्मचैतन्य ते ब्रह्मरूप ठेले । कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।७।।

श्रीकबीरसाहेब ऊर्फ सय्यदअली सरकवास

निर्याण
मार्गशीर्ष व.१३ शके १८८६
गुरूवार, इ.स. १९६४

श्रीकबीरसाहेब हे सुरवातीस तुपाचा व्यवसाय करीत होते. तुपाचे डबे भरून ते चिम्मडहून सोलापूरला पाठवित असत आणि त्या तुपाच्या पैशांच्या वसुलीसाठी ते सोलापूरला येत असत. असेच एकदा ते सोलापूरला पैसे वसुलीसाठी आले आणि पैसे वसूल करुन सोलापूरहून इंचगिरीला श्रावण सप्ताहासाठी रेल्वेने निघाले. रेल्वे स्टेशनवर ते आले असता, रेल्वे यायला थोडा वेळ आहे म्हणून ते रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर बसून राहिले. पण येणारी व जाणारी कोणतीच रेल्वे त्यावेळी नसलेने स्टेशनमास्तरनी त्यांना स्टेशन बाहेरील धर्मशाळेत जाणेस सांगितले. त्यावेळी कबीरसाहेब त्या स्टेशनमास्तरांना म्हणाले की, 'साहेब, माझ्या जवळ वसुलीचे पैसे आहेत, त्यामुळे जोखीम जास्त आहे, त्यामुळे मी स्टेशनवरच बसून रहातो.' हे वाक्य ऐकल्यावर स्टेशनमास्तरांनी त्यांचेकडे एकदा नीट बघितले व त्यांची साधी राहणी-पोशाख बघून, त्यांच्याकडे कसले पैसे आले? असा संशय त्यांना आला आणि त्या स्टेशनमास्तरांनी या कबीरसाहेबांना पैशांची पेटी उघडून दाखविणेस सांगितले. सुरवातीस स्टेशन मास्तरांनी त्यांना नांव विचारले, तेव्हा कबीरसाहेबांनी 'सय्यद अली सरकवास' असे सांगितले. हे सर्व संभाषण एक ब्राह्मण बाई जवळच उभी राहून ऐकत होती. कबीरसाहेबांनी पेटी उघडल्यावर वरच्या बाजूला दासबोध, त्याचे शेजारी जपमाळ व कापूर इ. वस्तू व त्याचे खाली पैसे ठेवायची पिशवी, काही सोने आणि पाणी प्यायचा लोटा इ. वस्तू होत्या. त्या ब्राह्मण बाईने हे सर्व बघितल्यावर विचार केला की, हे जातीने मुसलमान गृहस्थ आणि यांच्याजवळ ब्राह्मण माणूस ज्या वस्तू बरोबर ठेवतो, त्या वस्तू कशा काय? त्याअर्थी या वस्तू त्यांनी चोरून आणल्या असाव्यात असा संशय त्या बाईला आला आणि ही गोष्ट तिने स्टेशनमास्तरांच्या कानावर घातली. हे तर मोठे संकट आपल्यावर आले असे समजून कबीरसाहेबांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांचे स्मरण केले आणि ते जमलेल्या लोकांना म्हणाले की, ''मी हा दासबोध तुमच्या हातात देतो. यातील दशक ४ समास ८ 'सख्य भक्ती निरूपण' तुम्ही काढा. मी तुम्हाला हा समास, तोंडपाठ म्हणून दाखवतो. म्हणजे तुम्हाला खात्री पटेल की हा दासबोध असलेली पेटी माझी आहे.'' त्याप्रमाणे त्यांनी तो दासबोध समोरच्या माणसाच्या हातात दिला आणि त्यांचे समोर तो समास जसाच्या तसा म्हणून दाखविला. एवढेच नाही तर त्या समासावर थोडावेळ निरुपणही केले. ही त्यांची योग्यता पाहून लोकांना त्यांची चूक कळून आली आणि स्टेशनमास्तर, ती ब्राह्मण बाई आणि जमलेले लोक असे मिळून सर्वांनी त्यांचा सत्कार केला. त्यांना भोजन दिले आणि पुढच्या प्रवासाची व्यवस्था केली.

श्रीकबीरसाहेबांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून अनुग्रह घेतला होता. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा कट्टाचा नेम, पोथीवाचन, भजन हा दिनक्रम सुरू होता. कबीरसाहेब हे जातीने मुसलमान आणि उपासना हिंदू धार्मिक, हे वागणे चिम्मड गावातील लोकांना आवडले नाही. चिम्मड तसेच बनहट्टी, तेरदाळ,

महालिंगपूर, रामपूर आणि रबकवी या पाच गावातील मुसलमान लोकांनी यांच्यावर बहिष्कार टाकला आणि त्यांना वाळीत टाकले.

श्रीकबीरसाहेबांवरील बहिष्कार उठवायचा झाल्यास मुसलमानांचे धर्मगुरू (पीर) यांना बनहट्टीला बोलवायचे व त्यांचेकडून कबीरसाहेबांना मुस्लिम दीक्षा (प्याला पिवे) द्यायची आणि मग त्यांच्यावरील बहिष्कार उठवायचा असा बेत, या पाच गावातील मुसलमान जातीने केला. त्याप्रमाणे दिवस ठरला आणि मुस्लिम जमातीने हैद्राबाद येथील पीरास बनहट्टीला बोलावले. याच सुमारास जमखंडीच्या एका मुनशीलाल नावाच्या एका मुसलमान गृहस्थास भाऊसाहेबमहाराजांनी अनुग्रह दिला होता व त्याला कबीरसाहेबांना चिम्मड येथे जाऊन भेटण्यास सांगितले. कर्मधर्मसंयोगाने या मुनशीलाल यांना हैद्राबादचे पीर बनहट्टीस येणार आहेत असे कळले. आणि त्यानुसार ते पीरांच्या दर्शनासाठी बनहट्टीस आले. या मुनशीलाल यांनाच तेथे जमलेल्या मुसलमान लोकांनी कबीरसाहेबांना बनहट्टीस घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्रीमुनशीलाल हे चिम्मडास गेले आणि कबीरसाहेबांना घेऊन बनहट्टीस आले. मुसलमान लोकांनी कबीरसाहेबांची त्या पीरसाहेबांची भेट घालून दिली. यावेळी श्रीकबीरसाहेब म्हणाले, 'मी एक गुरू केलेला आहे. जातीमधील भेदभाव मी मानत नाही. त्यामुळे मी आता तुम्हाला दुसरा गुरू करून घेणार नाही. मला एक बाप आहे, मी दोन बाप करून घेणार नाही' हे संभाषण ऐकून हैद्राबादचे पीर या कबीरसाहेबांना एकांतात घेऊन गेले आणि त्यांचेबरोबर बराचवेळ बोलणे केले. त्यानंतर कबीरसाहेबांचेबरोबर त्या पीरसाहेबांनी नमाज पढला. श्रीकबीरसाहेबांना नमाज पढता येत होता. नमाज झाल्यावर या दोघांनी एकत्रितपणे भोजन केले. एकांतातून हे दोघेजण केव्हा बाहेर येतात आणि पीरसाहेब काय निकाल (फैसला) देतात, हे ऐकण्यास सगळे मुसलमान उत्सुक झाले होते. थोड्याचवेळात पीरसाहेब बाहेर आले आणि जमलेल्या मुसलमानांना म्हणाले की, '' कबीरसाहेबांशी बोलणे झाल्यावर माझी खात्री झाली आहे की, या ५० कोसाच्या परिसरात या कबीरसाहेबांसारखा परमार्थी अधिकारी पुरूष तुम्हाला सापडणार नाही. त्याला तुम्ही त्रास दिलात तर त्यात तुमचेच नुकसान होईल.'' हे ऐकल्यावर कबीरसाहेबांची कानउघाडणी करुन त्यांना गुरूमंत्र (प्याला पिवे) देण्याऐवजी, त्याच्याबरोबर पीराने नमाज पढून, जेवणही का केले याचा उलगडा तेथील मुसलमानांना झाला आणि तेव्हा लोकांनी कबीरसाहेबांवरील बहिष्कार मागे घेतला.

श्रीकबीरसाहेबांचे यथावकाश लग्न झाले आणि कालांतराने त्यांना पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले. या मुलाचे काय नाव ठेवावे म्हणून कबीरसाहेबांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांना पत्र पाठविले. पण बरेच दिवस झाले तरी महाराजांकडून या संदर्भात पत्र आले नाही. मुसलमान धर्माप्रमाणे ४० व्या दिवशी नामकरण विधी करायचा असतो. त्यामुळे कबीरसाहेबांच्या सासुरवाडीकडील माणसे याबाबत गडबड करु लागली. ४० व्या दिवशी कबीरसाहेब हे चार लोकांसोबत नेमास बसले होते. त्यावेळी नेमात त्यांना ''खुदासाब'' असा शब्द तीन वेळा ऐकू आला. महाराजांचे पत्र अद्याप आलेले नव्हते. त्यामुळे नेमात ऐकू आलेले 'खुदासाब' हे नाव आपल्या मुलाला द्यायचे असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी मुलाचे नांव खुदासाब ठेवले. आश्चर्य असे की

बारशाच्या दुसऱ्या दिवशी श्रीभाऊसाहेबमहाराजांचे पत्र आले आणि त्या पत्रात त्यांनी मुलाचे नांव 'खुदासाब' ठेवावे असे लिहिले होते. हे पत्र आणि पत्रातील नांव बघितल्यावर मात्र कबीरसाहेबांचे सासरे, सासूबाई या सर्वांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून अनुग्रह घेतला.

श्रीकबीरसाहेबांना एकूण पाच मुले व एक मुलगी झाली. पहिल्या मुलाचे नांव खुदासाब दुसरा गंजीसाब, तिसरा राजेसाब, चवथा चंदुलाल, पाचवा महमदअली आणि मुलगी रसुलमा.

श्रीभाऊसाहेबमहाराज यांचेकडून नाम घेणेपूर्वी श्रीकबीरसाहेब, चिम्मड गावातील महाराजांचे अनुग्रहित जे शिंपी होते, त्यांचेबरोबर भजन करीत असत. या भजनाचा त्यांना नाद लागला आणि मनात श्रीमहाराजांचा अनुग्रह घ्यावा असे आले. श्रीमहाराज सावळगीस आले आहेत असे त्यांना कळले. त्याप्रमाणे कबीरसाहेब सावळगीस आले. पण तेथे गेल्या गेल्या त्यांना हागवण लागली. त्यामुळे त्यांना तिथे नाम घेता आले नाही. पुढे महाराज जमखंडीस गेले. तेथे जाऊन नाम घ्यावे असे त्यांनी ठरविले. पण त्यादरम्यान त्यांना ताप चढला. त्यांच्या मनात विचार आला की यावेळीही आपल्याला आता नाम मिळणार नाही. पण कबीरसाहेबांनी निर्धार केला की अशा तापातच जाऊन नाम घ्यायचे, ही संधी चुकवायची नाही. आणि निर्धार केला असेल नसेल तोच त्यांचा ताप उतरला. आपल्या अंगात काही तरी संचारले आहे असे त्यांना वाटले आणि उत्साहाने ते जमखंडीला गेले. बरोबर चिम्मडचे साधक होतेच. या साधकांना बघताच श्रीमहाराज कबीरसाहेबांकडे बघून म्हणाले की, 'तुम्ही, एक चांगला मुलगा आहे, त्या मुलाला नाम घ्यायचे आहे असे म्हणाला होतात, तो हाच का?' त्यावर साधकांनी होकार दिला व 'हाच मुलगा' असे सांगितले. जमखंडी येथे श्रीभाऊसाहेबमहाराजांनी कबीरसाहेबांना नाम दिले. या जमखंडी मुक्कामात एक दिवस महाराज भोजनाला बसले होते. त्यावेळी त्यांच्या पंगतीत श्रीकबीरसाहेबही होते. महाराजांनी ताटात वाढलेले थोडे पदार्थ खाल्ले आणि बाकीचे उरलेले ताट श्रीकबीरसाहेबांच्या ताटात रिकामे केले. त्याच पंगतीत महाराजांचे एकनिष्ठ शिष्य श्रीनंद्याप्पा होते. त्यांनी महाराजांना विचारले, महाराज आम्ही तुमच्या बरोबर गेली तीस वर्षे आहोत, पण आम्हाला तुमच्या ताटातील प्रसाद कधीही मिळाला नाही आणि या मुलाने दोन दिवसांपूर्वी अनुग्रह घेतला तर त्याला हे भाग्य लाभले, हे कसे? तेव्हा महाराज म्हणाले त्याचे नशीब थोर म्हणून त्याला हा प्रसाद प्राप्त झाला.

नाम घेतल्यानंतर श्रीकबीरसाहेबांनी महाराजांना सांगितले की मी अविंध-मुसलमान आहे. आमच्या जातीत मांसाहार करतात. आता मी नाम घेतलेले आहे, तेव्हा मांसाहार करणे आता माझ्यादृष्टीने निषिद्ध आहे कां? हे ऐकून महाराज म्हणाले, तुमच्या जातभाईंचे बरोबर मांसाहार करणेस हरकत नाही, फक्त तू स्वतः हाताने, ते खाण्यासाठी प्राणी कापू नकोस. पण श्रीमहाराजांनी मांसाहार करणेस परवानगी दिली तरी जसजसे कबीरसाहेब नामस्मरण करु लागले, तसतसे त्यांना मांसाहाराची घृणा उत्पन्न झाली आणि त्यांनी पुढे कधीच मांसाहार केला नाही.

श्रीगुरूदेव रानडेसाहेब हे सांगलीला पटवर्धनसरकार यांचेकडे यायचे. असे एकदा आले असताना त्यांनी श्रीकबीरसाहेबांना सप्ताहासाठी बोलावून घेतले. यावेळी श्रीकबीरसाहेबांनी आपलेबरोबर आपले चौथे सुपुत्र

श्री. चंदुलाल यांना नेले होते. श्रीचंदूलाल यांना बरोबर नेणेचा हेतू वेगळा होता. गुरूदेवांनी या आपल्या चंदूलालला नाम द्यावे अशी इच्छा कबीरसाहेबांची होती. त्याप्रमाणे श्रीगुरूदेवांनी चंदूलालला काही पद म्हणता येते कां? असे विचारले. कबीरसाहेबांच्या मनात चंदूलालने श्रीनिंबरगीकरमहाराजांचे 'ॐ नाम काय वदु' हे पद म्हणावे असे होते. त्याप्रमाणे कबीरसाहेबांनी चंदूलालला हे पद म्हणणेस सांगितले. हे पद म्हणणेस सांगण्याचा हेतू हा होता की, आपला मुलगा नाम घ्यायला आला आहे तेव्हा या प्रसंगाला 'ॐ नाम काय वदु' हे पद नामाचे महत्व सांगणारे आहे, ते त्याने म्हणावे. पण चंदूलाल यांचे मनात श्रीगुरूदेवांच्या नावाचे म्हणून कदाचित 'रामजीके नाम जिन्हे लियो बारोबार' हे श्रीसंत कबीरांचे पद म्हणावे असे होते. पण वडिलांनी 'ॐ नाम काय वदु' हे पद म्हणणेस सांगितले, त्यामुळे त्यांचा नाईलाज झाला आणि वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनी 'ॐ नाम काय वदू' हे पद म्हटले. हे पद म्हणून झाल्याबरोबर लगेच गुरूदेवांनी चंदुलालना विचारले की, 'तुझ्या मनात दुसरे एखादे पद म्हणून दाखवायचे होते काय?' आपल्या मनातील गुरूदेवांनी ओळखले याचा आनंद चंदूलालना झाला आणि त्यांनी 'रामजीके नाम जिन्हे लियो बारोबार' हे पद गुरूदेवांना म्हणून दाखविले.

सांगलीस सरकारांच्या माळबंगल्यावर श्रीगुरूदेवांनी अनेकांना नाम दिले. पण चंदुलाल यांना नाम मिळाले नाही. श्रीगुरूदेव श्रीचंदुलालना अथणीला घेऊन गेले आणि श्रीबाबासाहेब संगोराम यांचे घरी श्रीचंदुलालना, श्रीकाकासाहेब तुळपुळे यांचेकडून नाम देवविले.

चिम्मड गावात मुसलमान जातीचा एक वयस्कर पुढारी होता. त्याचे नांव शिराजसाहेब थंडेगिरी. तो श्रीकबीरसाहेबांना नेहमी छळत असे. एकदा गावातील चावडीत तो कबीरसाहेबांना म्हणाला, ''याको नुच्च तिंदु एष्टु स्वक्क बंदादे निनगे'' (का रे कण्या खाऊन किती मस्ती आली आहे तुला) हे ऐकल्यावर त्याला कबीरसाहेब म्हणाले, 'ननगे अंबली कुडशी आई मुत्या ज्वापासना माडार' (मला आई-आजोबांनी अंबील पाजून लहानाचे मोठे केले आहे). कबीरसाहेबांना असे म्हणायचे होते होते की, तू कण्या खाऊन तरी म्हणतोस पण मला कण्यासुद्धा खायला मिळाल्या नाहीत. मी नुसती अंबील (कण्यांपेक्षाही कनिष्ठ आणि पातळ) पिऊन वाढलो आहे. मी शक्तीहीन आहे, तेव्हा माझ्याकडून मस्ती कशी होऊ शकेल?

त्याच दिवशी रात्री त्या मुसलमान पुढाऱ्याला झोपेत झगमगीत प्रकाश दिसला व शब्द ऐकू आले, 'तू सय्यद अलीला (कबीरसाहेब) असा छळशील तर तुझा सत्यानाश होईल.' दुसरे दिवशी तो पुढारी सकाळी लवकर उठला आणि कबीरसाहेबांच्या घरी आला आणि त्याने कबीरसाहेबांचे पाय धरले आणि म्हणाला, तुझ्यामुळे मला आज पीराचे दर्शन झाले. मला क्षमा कर. मी पुन्हा तुला त्रास देणार नाही.

एकदा हिंचगेरीस श्रावण सप्ताहात श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी पोथी वाचत होते व साधक नेमास बसले होते. कोणा साधकास झोप आली असल्यास त्याला उठविण्यासाठी, प्रत्येकास एक सांकेतिक नाम दिलेले असे. त्या नामाचा उच्चार केल्यावर, त्याचे उत्तर त्याने दुसऱ्या एका ठरवून दिलेल्या सांकेतिक

नामाने द्यायचे, म्हणजे तो साधक जागा आहे असे समजायचे. नाहीतर सगळ्या साधकांनी एकदम गजर करायचा म्हणजे तो झोपी गेलेला साधक जागा होत असे.

श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी श्रीकबीरसाहेब हे झोपी गेलेले आहेत असे समजून त्यांच्या सांकेतिक नामाचा गजर केला. पण कबीरसाहेब हे ध्यानमग्न असलेने त्यांनी याला प्रत्युत्तर दिले नाही. सकाळचा नेम संपल्यावर श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीनागाप्पाण्णामहाराजांना आपल्या खोलीत बोलावून घेतले आणि विचारले की, नागाप्पा तुम्ही सांकेतिक नामाने श्रीकबीरसाहेबांना बोलावल्यावर त्यांनी तुम्हाला प्रत्युत्तर दिले का? तेव्हा श्रीनागाप्पाण्णामहाराज म्हणाले, ''श्रीकबीरसाहेब झोपलेले असतील म्हणून त्यांनी उत्तर दिले नाही.'' हे ऐकून भाऊसाहेबमहाराज म्हणाले, 'अहो नागाप्पाण्णा, कबीर ध्यानात होता, त्याने तुम्हाला निःशब्दाने तुमच्या सांकेतिक नामास उत्तरही दिले. ते निःशब्द शब्द मी ऐकले, तुम्ही ते ऐकू शकला नाहीत.'

पूर्वी श्रीकबीरसाहेबांचा तूप विक्रीचा व्यवसाय होता, पण कालांतराने त्यांनी हातमागावरील लुगडी विकण्याचा व्यवसाय सुरू केला. जिथे गावात बाजार असेल, त्या गावात जाऊन त्यांनी अल्प नफ्यात लुगडी विकली आणि त्या पैशांवर उदरनिर्वाह केला. या व्यवसायात त्यांना जास्त फायदा होत नव्हता, 'बेताचाच' फायदा व्हायचा. पण हे चिम्मड गावातील एक व्यापारी श्री. महानिंगाप्पा नाडगौड याला बघवायचे नाही. त्याने जमखंडीगावी जाऊन या श्रीकबीरसाहेबांबाबत तक्रार नोंदविली. व्यवसायात फायदा होत असतानाही हे इन्कमटॅक्स भरत नाहीत, असा तक्रारीतील आशय होता. याप्रमाणे इन्कमटॅक्स विभागाचे अधिकारी चिम्मड गावी आले आणि त्यांनी कबीरसाहेबांचे व्यवसायाचे सारे हिशोब तपासले. व्यवसाय लहान स्वरूपात असलेने त्याला टॅक्स लावण्याइतकी मिळकत आढळून आली नाही. पण या विभागाने त्यांच्यावर इन्कमटॅक्स लावलाच. हा सगळा प्रकार बघून कबीरसाहेबांनी तो व्यापारच बंद केला. हा व्यवसाय जेव्हा कबीरसाहेब करीत होते, तेव्हा त्यांचा रोजचा पाच तासाचा नेम त्यांनी कधीही चुकवला नाही. पण हा व्यवसाय बंद केल्यावर त्यांनी रोज सहा तासाचा नेम सुरू केला.

श्रीकबीरसाहेब दरारोज ४ ते ६ कट्टाचा नेम करायचे. एक दिवस रात्री त्यांचा मुलगा निवर्तला. हे बघून त्यांची पत्नी दुःखाने रडू लागली. पहाटेचे चार वाजले. कबीरांच्या नेमाची वेळ झाली. कबीर नेमाला जाऊ नयेत, म्हणून त्यांची पत्नी त्यांना आडवायला लागली. पण कबीरसाहेबांनी तिला बाजूला केले व ते नित्याच्या नेमास गेले. ६ वाजता नेम संपल्यावर ते मुलाच्या अंत्यविधीला गेले. असा नेम केला तर, परमार्थात काहीतरी प्राप्ती होतेच.

श्रीकबीरसाहेबांना एकानी प्रश्न केला की, 'तुम्ही नेमाला बसले असता दृष्टी कोठे ठेवता?' तेव्हा कबीर म्हणाले, 'प्रचीतिवर'. श्रीभाऊसाहेबमहाराजांची संतसेवा असायची. सगळी साधक मंडळी नेमाला बसायची. अशा एका सभेत महाराजांनी प्रश्न केला की, 'सद्गुरुंनी सांगितल्याप्रमाणे नाम घेतल्यापासून, न चुकता नेम करतो त्यांनी हात वर करावा' तेव्हा फक्त एकट्या श्रीकबीरसाहेबांचा हात वर झाला.

श्रीकबीरसाहेबांनी देह ठेवायचे ठरविले आणि निर्याणाआधी तीन दिवस ते चिम्मड येथील रघुनाथप्रियसाधुमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले. तीन दिवस त्यांनी अन्नग्रहण केले नाही. शेवटपर्यंत त्यांचे दात बळकट होते. एक दिवस त्यांनी दोन ऊस मागून घेतले आणि दातांनी सोलून खाल्ले. देह ठेवायच्या आदल्या दिवशी गंजीसाब या नावाच्या मुलाने त्यांना खाण्याचा आग्रह केला म्हणून काही अन्न त्यांनी खाल्ले व परत आपल्या नेमाच्या खोलीत येऊन बसले.

श्रीकबीरसाहेबांनी चंदुलाल या मुलास सांगितले की 'आपण जाणार'. हे ऐकल्यावर श्री. चंदुलाल हे कबीरांच्या गळ्यात पडून रडू लागले. तेव्हा कबीरसाहेबांनी चंदुलालना दासबोध काढून उघडण्यास सांगितले. दासबोध उघडताच समास ७, दशक ८ श्रवण निरुपणनाम समास निघाला. पुन्हा कबीरसाहेबांनी दासबोध मिटून उघडण्यास सांगितला. तेव्हा परत समास ७ दशक ८ श्रवण निरुपणनाम समासच निघाला. हे बघून श्रीचंदूलालना आश्चर्य वाटले. कबीरांनी चंदूलालना नामस्मरण - नेम चांगला चालू ठेवा म्हणून सांगितले. नंतर कबीरसाहेबांनी चंदूलालना नेमाच्या खोलीत बिछाना घालणेस सांगितले. मार्गशीर्ष महिना, थंडी होती म्हणून त्यांनी स्वेटर घातला होता. झोपणेचे अगोदर ते बहिर्दिशेस जाऊन आले व बिछान्यावर पडले. त्यांचा पहाटे ४ ते ५ नेम, ५ ला काकडआरती आणि काकड आरती झालेवर, परत ६ वाजेपर्यंत नेम असा दिनक्रम होता. दिवस उजाडून सूर्यप्रकाश पडल्याशिवाय ते कोणाशीही बोलत नसत. या नित्यनेमाप्रमाणे त्यांनी सकाळचा नेम केला आणि ६ वाजता ते एका अंगावर झोपले. पण कालांतराने काही हालचाल दिसेना. चंदूलालना संशय आला, म्हणून त्यांनी कबीरसाहेबांच्या मस्तकाला हात लावून बघितला, कारण श्रीकबीरसाहेब नाम हे मस्तकापर्यंत चढवित असत. त्यामुळे मस्तक गरम असे. तसे त्यांचे मस्तक गरम लागले. १० मिनिटांनी त्यांनी मान टाकली. त्यांच्या नाकाला चंदूलालनी सूत लावून बघितले, पण श्वासोच्छ्वास बंद झाला होता. म्हणजेच त्यांचे निर्याण झाले होते. या प्रमाणे श्रीकबीरसाहेबांनी मार्गशीर्ष व. १३ शके १८८६ इ.स. १९६४ गुरुवार चिमड येथे श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या स्मरणात देह ठेवला.

आमचे श्रीदासराममहाराज हे चिमडला गेले होते, तेव्हा त्यांची व कबीरांच्या मुलाची भेट झाली. त्यावेळी त्या मुलाने श्रीदासराममहाराजांना विचारले की महाराज, माझे वडील नेहमी एक समई लावून नेमाला बसायचे, पण देह ठेवायचे दिवशी दोन समया लावणेस त्यांनी का सांगितले? तेव्हा श्रीदासराममहाराज म्हणाले की, 'दोन ज्योतींचे ऐक्य (जीवनज्योत आणि आत्मज्योत) दाखवण्याकरिता दोन समया लावायला सांगितल्या.' हा खुलासा ऐकून त्यांनाही विशेष वाटले.

***

प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर

जन्म
वैशाख शु.९, शके १८०१
इ.स.१८८०

निर्याण
मार्गशीर्ष व.१४ शके १८८६
शुक्रवार दि.०१.०१.१९६५

श्री.वासुदेवराव ताम्हनकर हे पंढरपूरचे रहिवासी होते. ते मुळातच विरक्त स्वभावाचे होते. संसाराकडे पूर्ण दुर्लक्ष करून हरिभजनात रमून जात असत. गीता पारायण केल्याशिवाय अन्नग्रहण करायचे नाही असा त्यांचा नियम होता. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. सावित्रीदेवी होते. श्रीक्षेत्र पंढरपुरातील प्रदक्षिणा वाटेवरील मंगळवेढेकर यांच्या वाड्यात हे दांपत्य रहायचे. अशा या दांपत्याच्या पोटी वैशाख शु. ९ शके १८०१ म्हणजेच इ.स.१८८० साली पुत्र जन्माला आला. भूवैकुंठ पंढरीक्षेत्रात जन्म झाला म्हणून या मुलाचे नांव 'पांडुरंग' ठेवणेत आले. हे 'पांडुरंग' म्हणजेच आमचे प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर.

श्रीपांडुरंगमहाराज हे शिक्षणाकरिता सांगलीजवळील कोल्हापूर जिल्ह्यातील उदगाव या गावी आले. या उदगाव गावी मराठी चार इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. पुढील शिक्षणाकरता ते बेळगावाला गेले. श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर हे ज्या शाळेत शिक्षक होते, त्या शाळेत त्यांनी प्रवेश घेतला. वयाच्या ९ व्या वर्षी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे श्रीपांडुरंगमहाराजांची मुंज झाली. या दरम्यान श्रीपंतमहाराज, श्रीपांडुरंगमहाराजांच्या बिऱ्हाडी आले आणि त्यांनी इ.स.१८८६ मध्ये मार्गशीर्ष मासात गुरुवारी श्रीपांडुरंगमहाराजांना अनुग्रह दिला. नंतर श्रीपांडुरंगमहाराज हे युनिव्हर्सिटी स्कूल फायनल परीक्षा पास झाले. त्यामुळे त्यांना कलेक्टर कचेरीत नोकरी लागली. त्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या खात्यात, वेगवेगळ्या नोकऱ्या केल्या. त्यात प्रामुख्याने मामलेदार कचेरी बेळगाव, खानापूर, बेळगाव पोलीस सुपरिंटेंडेन्ट कचेरी, इन्स्पेक्टर जनरल कचेरी पुणे, रेल्वे पोलीस मुंबई, रेल्वे पोलीस धारवाड. शेवटी त्यांनी पोस्ट खात्यातील नोकरी स्विकारली आणि तिथे ते स्थिरावले. तेथे त्यांनी ३१ वर्षे नोकरी केली. या ३१ वर्षाच्या कालखंडात ते मेसापोटोमिया, बसरा, बगदाद(इराक) इ. परदेशात नोकरीनिमित्त जाऊन आले.

श्रीपांडुरंगमहाराजांना भजनाचा अफाट छंद होता. आमचे श्रीदासराममहाराज केळकर म्हणायचे की भजन बघायचे असेल तर ते श्रीपांडुरंगमहाराजांचेच. सर्वच ठिकाणी सेवा या नात्याने त्यांनी भजनाचे कार्य केले. या भजनकार्याबरोबरच श्रीपांडुरंगमहाराजांनी कित्येक लोकांना दुर्व्यसनापासून मुक्त केले. त्यांनी ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाचा मार्ग सगळ्यांना मोकळा करून दिला. श्रीपांडुरंगमहाराजांची काव्यशक्ती प्रासादिक आणि ओघवती होती. प्रत्येक पदात, दोह्यात प्रेमरस भरून वाहिलेला दिसून येतो. श्रीपांडुरंगमहाराजांनी एकूण आयुष्यात ६००चे वर अभंग, पदे, दोहरे इ. लेखन केले. याबरोबरच त्यांनी साधकांचे सार्थक करण्यासाठीच, ''सार्थक'' हा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला.

श्रीपांडुरंगमहाराजांचा सगळ्या सांप्रदायिक किंवा पंथातील महात्म्यांचा जवळचा संबंध आला. त्यातला त्यात जवळचा संबंध म्हटला तर, आमच्या श्रीचिमड संप्रदायातील थोर संत प.पू.श्रीमामामहाराज केळकर व श्रीदासराममहाराज केळकर यांचेशी आला. श्रीपांडुरंगमहाराजांनी आमच्या ती.मामांच्यावर व ती. दादांच्यावर अलोट प्रेम केले. श्रीपांडुरंगमहाराजांनी आमच्या मामांवर एक सुंदर पद केले आहे. ''**एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।**'' हे ते पद आहे. श्रीपांडुरंगमहाराज सांगायचे की पैठणच्या श्रीएकनाथमहाराजांना पहायचे असेल तर सांगलीला जा आणि बापूरावांना पहा. प.पू.श्रीमामांच्याप्रमाणेच, श्रीपांडुरंगमहाराजांचे आमच्या श्री राम गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज यांचेवर निरतिशय प्रेम होते. ते एका पदात म्हणतात, ''**दत्तगुरूकृपे पांडुरंग मनी अपार कौतुक । राम केळकर ज्ञानमार्गीची विमान वाहतूक।।**'' अशा श्रीपांडुरंगमहाराजांनी आमचे घरी उत्सवात भजन करणेस सुरवात केली. माघ शु. ३ ला प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे आमच्या घरी प्रगट झाले आणि त्यांनी आमचे श्रीमामामहाराजांना अखंड कीर्तनाची आज्ञा दिली. हा दिवस 'पुण्यपर्वकाळ' म्हणून साजरा करावा असे ठरले. त्याप्रमाणे इ.स. १९३९ सालापासून हा उत्सव सुरू झाला. या दिवशी पूर्ण रात्रभर हरिजागर असतो. या दिवशी श्रीपांडुरंगमहाराजांनी रात्री १२.३० ते ३ भजन केले आणि त्यावर्षीपासून आज अखेर त्याच वेळी भजन असते. श्रीपांडुरंगमहाराजांनी गुरुवार दि. २०.०७.१९५९ रोजी गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर, आनंदमठीत सायंकाळी ५ वाजता अवधूत संप्रदाय चालविणेचा अधिकार, श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी यांना दिला.

श्रीपांडुरंगमहाराज मिरज तालुक्यातील बिसूर या गावी भजनाला चालले होते. वाटेत बुधगाव लागले. तेथे अवतारी सिद्धपुरुष श्रीगुंडुबुवा त्यांना भेटले. त्यांचे दर्शन घेतले आणि श्रीपांडुरंगमहाराजांनी त्यांना प्रश्न केला की, 'आपल्या या पंचक्रोशीत परमार्थात पुरा कोण झाला आहे?' यावर श्रीगुंडुबुवा म्हणाले, 'अरे आपला गोंद्या तेवढा पुरा आहे.' गोंद्या म्हणजे आमचे गोविंद अनंत केळकर तथा श्रीमामामहाराज केळकर. हा प्रसंग घडताच श्रीपांडुरंगमहाराजांनी एक अभंग रचला. त्यात ते म्हणतात,

''**पुरा गोंदा म्हणुनी गुंडा सांगे मजला ।।ध्रु।। म्हणुनिया दर्शना आलो । पाहुनी समाधान पावलो । आनंदात रंगुनी गेलो । दिन चांगला ।।१।। गुंडुबुवा विदेही साधु । शक्ती विलक्षण अगाधु । परि हा तो सुखसंवादू । कैचा घडला ।।२।। गुंडुबुवा आणि हा गोंदा । त्यांनी केले परमानंदा । पांडुरंग रामानंदा । ठायी जडला ।।३।।**''

प.पू. श्रीमामामहाराजांनी माघ शु. ९ इ.स. १९६२ रोजी देह ठेवला. यावेळी श्रीपांडुरंगमहाराजांची तब्येत ठीक नव्हती. पाय लटपटत होते. तरीही ते एका भक्ताला बरोबर घेऊन श्रीमामांचे अंत्यदर्शन घ्यायला आले. आल्या आल्या त्यांनी श्रीमामांना ३ प्रदक्षिणा घातल्या आणि आमच्या दादांना उद्देशून म्हणाले, 'काय रामभाऊ पैठणचा एकनाथ आला का नाही कृष्णातीराला?'

प.पू.श्रीमामामहाराजांनी माघ शु. ९ शके १८८३ दि.१२.०२.१९६२ रोजी देह ठेवल्यावर एक वर्षाने, म्हणजे १२.०२.१९६३ रोजी प.पू.श्रीदादांनी श्रीमामामहाराजांच्या सिंहासनाची प्रतिष्ठापना केली. या सिंहासनाचे

दर्शन घ्यावे अशी तीव्र इच्छा प.पू. श्रीपांडुरंगमहाराजांना निर्माण झाली. यावेळी श्रीपांडुरंगमहाराजांची तब्येत बरी नव्हती. त्यांचे पाय लटपटत होते. परंतु याही अवस्थेत ते आमचे श्रीरामनिकेतन येथे सिंहासनाचे दर्शनासाठी आले. सिंहासनावर डोके ठेऊन त्यांनी नमस्कार केला आणि समोर एकदम स्तब्ध उभे राहिले. त्यांना त्यावेळी उभे असताना एक अभंग व आरती स्फुरली. हा अभंग खाली मुद्दाम देत आहे. या अभंगात श्रीपांडुरंगमहाराजांनी श्रीमामांचेकडे स्वतःला निजधामाला नेणेबाबत विनंती केली आहे. या जर्जर देहाचा मला कंटाळा आला आहे. मलाही तुम्ही निजधामाला घेऊन चला व निजधामाला घेऊन जाणेबाबतचा माझा अर्ज तुम्ही पंतांकडे पोहोचवावा आणि पंतांना कळवा असा त्यातील आशय आहे.

श्रीगोविंदजी कृपामूर्ति । भाग्ये लाभली संगती । आता परिसावी विनंती । अखेरची ।।ध्रु।। सांगलीस आलो । संतसंगती सुखावलो । भजनानंदी रंगलो । प्रेमळ भक्तासवे ।।१।। श्रीदत्तकृपे केला । परमार्थ तो पूर्ण झाला । आता आला कंटाळा । या जर्जर देहाचा ।।२।। श्रीपंतराये आश्वासिले । मन भजनानंदी रंगले । तो आता सुखावले । कृपा सद्गुरूंची ।।३।। आता थकले हे शरीर । संपला याचा आधार । काळाचे हे उधार । देऊन टाकू ।।४।। श्रीदत्तगुरूंच्या पायाशी। आपण राहिला विश्वासी । आता तेचि अहर्निशी । मी ही ध्यातसे ।।५।। कधी कृपा करील गुरूराय। कधी बोलवील माय । कधी देईल सुखे आश्रय । ऐसे मज झाले ।।६।। अर्ज माझा पोहोचवा । श्रीपंतरायास कळवा । म्हणा आता बोलवा । पांडुरंगाला ।।७।। रामानंद बालमुकुंद। पंत परात्पर गोविंद । आता एक माझा छंद । उघडा दार मला ।।८।। अवधूत पंथाला । द्या आशीर्वाद या वेळेला । सदा रंग भरला । माजे भजनानंदी।।९।। विकल शरीर शक्तिहीन । घ्या अखेरचे नमन । हे गोविंद गुण निधान । प्रणिपात अखेरचा ।।१०।।

इ.स.१९६५ पासून श्रीपांडुरंगमहाराजांची प्रकृती बिघडत चालली. प.पू.श्रीगोविंदमहाराज दर्शनासाठी आले. आल्या आल्या त्यांनी श्रीपांडुरंगमहाराजांच्या पायावर सुवासिक फुले वाहिली आणि नमस्कार केला. श्रीपांडुरंगमहाराजांना बोलावेसे वाटले, पण बोलता येईना. महाराजांनी श्रीगोविंदमहाराजांच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हणाले, 'गोविंदा, ये रे ये. मी तुझीच वाट पहात होतो. आता हे सगळे तुला सांभाळायचे आहे. मनात दुःखाला थारा देऊ नको. मी कोठेही गेलेलो नाही आणि जाणारही नाही.' श्रीपांडुरंगमहाराज म्हणतात की, 'मी आत्ता जो आहे, तो माझ्याबद्दल ज्यांच्या अंतःकरणात श्रद्धा आहे, निष्ठा आहे त्यांच्याकरिता आहे आणि पुढेही मी ज्यांच्या अंतःकरणात माझ्याबद्दल श्रद्धा आहे, त्यांच्याकरिताच रहाणार आहे. ज्यांच्या अंतःकरणात माझ्याबद्दल निष्ठा नाही, त्यांच्याकरिता मी आत्ताही नाही आणि नंतरही नाही.' दि.१.१.१९६५ रोजीचा शुक्रवार उजाडला. दिवसभर महाराजांची प्रकृती अस्थिर होती आणि महाराजांनी मार्गशीर्ष व. १४ शके १८८६ शुक्रवार दिनांक ०१.०१.१९६५ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी रात्री १२.३०च्या सुमारास देह ठेवला आणि श्रीपांडुरंगमहाराज श्रीपंतमहाराजांच्या रूपात विलीन झाले.

***

भगवान श्रीशिवचिदंबर दीक्षित

जन्म
कार्तिक व.६ शके १६८०
सोमवार इ.स.१७५८

निर्याण
पौष शु.०४ शके १७३७
इ.स.१८१५

कर्नाटकातील जमखंडी तालुक्यातील गोठे या गावी, श्री. मार्तंड दीक्षित या नावाचे तपस्वी व महानुभवी गृहस्थ रहात होते. १६ व्या वर्षी ते घरातून बाहेर पडले आणि काशीला गेले. तेथे श्रीस्वयंप्रकाशस्वामी नावाच्या गुरुंजवळ २० वर्षे राहून विद्याभ्यास केला आणि त्यात ते पारंगत झाले. त्यानंतर ते गुरूंच्या आज्ञेने आपल्या गोठे या गावी परतले. त्यांनी गोठे येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. त्यानंतर त्यांनी सुगोल क्षेत्री जाऊन सोमनाथाचे सहवासात ७ वर्षे गायत्री पुरश्चरण केले. त्यानंतर त्यांनी हिप्परगी येथे जाऊन मार्तंड भैरवाची २ वर्षे आराधना केली. तेथे त्यांना 'आकाश चिदंबर' (तामिळनाडू) क्षेत्री जावे असा दृष्टांत झाला.

त्याप्रमाणे त्यांनी त्या क्षेत्री जाऊन ३ वर्षे घोर तपश्चर्या केली आणि भगवान शंकरांना प्रसन्न करून घेतले. श्रीशंकरांनी, 'मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे आणि मीच तुमच्या पोटी अवतार घेणार आहे आणि जगदोद्धार करणार आहे.' असा वर दिला. त्याप्रमाणे श्रीमार्तंड दीक्षितांच्या पोटी कार्तिक वद्य ६ शके १६८०, सोमवार, या दिवशी पुत्ररत्न झाले. साक्षात् 'चिदंबर नटेश्वर' मानवी देहाने अवतार धारण करून आल्याने, या मुलाचे नाव 'चिदंबर' ठेवणेत आले. हे चिदंबर म्हणजेच आमचे श्रीशिवचिदंबर महास्वामी होत.

वडिल श्री.मार्तंड दीक्षितांनी बाळ चिदंबरांना उपनयन संस्कारावेळीच गायत्री मंत्राबरोबरच श्रीविद्यामहायोग साधना शिकवली. या शिकवणीप्रमाणे श्रीचिदंबरस्वामी अखंड तपस्या करीत राहिले. श्रीशिवचिदंबर स्वामींनी आपल्या एकूण आयुष्यात जडचालन, मृतसंजीवन, अनेक देहधारण, अंतःसाक्षित्व, पंचभूततत्त्व जय अशा अनेक लीला केल्या.

श्रीशिवचिदंबरस्वामींचे दोन विवाह झाले होते. सौ. सरस्वती व सौ. सावित्री अशा दोन पत्नी होत्या. या दोन्ही पत्नींपासून त्यांना ६ पुत्र व १ कन्या झाली.

श्रीशिवचिदंबरस्वामींचे श्रीविद्यामहायोग साधन परंपरेतील दीक्षानाम 'श्रीपूर्णानंदनाथ' असे होते. श्रीशिवचिदंबरस्वामींनी श्रीविद्यामहायोगाचा उपदेश आपले शिष्योत्तम श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ श्रीराजाराममहाराज ठाकूर परदेशी यांना केला. श्रीशिवचिदंबरस्वामींनी त्यांना या उपदेशाबरोबरच चार महावाक्यांचा उपदेश केला. त्यामुळे श्रीराजाराममहाराज हे ब्रह्मनिष्ठ पदाला पोहोचले.

श्रीशिवचिदंबरस्वामींनी भक्ति, ज्ञान, वैराग्ययुक्तविहित कर्माचरण, गुरूसेवा, पितृसेवा, कारुण्यभाव अशा सर्व लोकोत्तर दैवी गुणांनी भूषित असे एक आदर्श जीवन जगून, एक महान पारमार्थिक आदर्श समाजापुढे ठेवला.

श्रीशिवचिदंबरस्वामी हे श्रौत अग्निहोत्री होते. आपल्या अवतारी जीवनाच्या अंतिम टप्प्यात त्यांनी सोमयागाचे अनुष्ठान केले. या यागाचे वेळी अनेक सिद्धमहात्मे उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी देह ठेवायचा बेत निश्चित केला. श्रीशिवचिदंबरस्वामींनी योगशास्त्रोक्त देहविसर्जनाच्या प्रक्रियेचा अवलंब करून, पौष शु. ४ शके १७३७ म्हणजे इ.स. १८१५ रोजी वयाच्या ५७ व्या वर्षी आपल्या स्थूलदेहाची लीला संपविली. त्यांची कर्नाटक राज्यातील, बेळगाव जिल्ह्यातील, मुरगोड येथे समाधी आहे.

***

प.पू.सद्‌गुरू श्रीअंबूरावमहाराज तथा बाबा

जन्म
भाद्रपद व.९ शके १७७८
सोमवार दि.२२.०९.१८५६

निर्याण
पौष शु.०६ शके १८५५
शुक्रवार दि.२२.१२.१९३३

जिगजेवणी ता. इंडी, जि. विजापूर येथे श्री.श्रीनिवासराव कुलकर्णी या नावाचे वतनदार गृहस्थ होते. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. राधाबाई होते. या दांपत्याच्या पोटी भाद्रपद व. ९ शके १७७८, सोमवार दि.२२.०९.१८५६ या दिवशी पुत्ररत्न जन्माला आले. याचे बारशादिवशी 'अंबुराव' हे नाव ठेवणेत आले. हे अंबुराव म्हणजेच आमचे प.पू.श्रीअंबुरावमहाराज ऊर्फ बाबा होत.

श्रीअंबुरावमहाराज इ.स.१८६२ साली निंबरगी येथील शाळेमधे शिक्षणाकरिता दाखल झाले. त्यांची तीक्ष्णबुद्धी, वक्तशीरपणा व गुणग्राहकता यामुळे शाळेतील शिक्षकांचे त्यांचेवर प्रेम बसले. श्रीअंबुरावमहाराजांचे चुलते श्री.बापूराव कुलकर्णी हे श्रीनिंबरगीकरमहाराजांचे शिष्य होते. त्यांचे निंबरगीस वास्तव्य होते. या चुलत्यांमुळे श्रीअंबुरावमहाराजांना श्रीनिंबरगीकर महाराजांचे दर्शन व्हायचे. त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात महाराजांविषयी पूज्यभाव निर्माण झाला. श्रीनिंबरगीकरमहाराज लहान मुले भेटली की त्या मुलांना साखर देत. त्यामुळे लहानमुले त्यांना 'सकरीमुत्या' (साखर देणारा आजोबा) असे म्हणत. यांनाही महाराजांच्या हातची साखर मिळत असे. ज्या दिवशी महाराजांच्या हातची साखर मिळे, त्या दिवशी पंतोजींचे हातचा मार चुकायचा. इ.स. १८६३ साली प्राथमिक शाळेत मराठी भाषा व मोडी लिपीस फार महत्व होते. या भाषा त्यांना अवगत झाल्या, पण बोलीभाषा कानडी असलेने या भाषेचीच त्यांचेवर छाप पडली. इ.स.१८६६ साली निंबरगी येथील शाळेतील शेवटची परीक्षा देऊन श्रीअंबुरावमहाराज जिगजेवणीला परत आले.

इ.स.१८७१ साली त्यांच्या आई-वडिलांचे देहावसान झाले. मातृ-पितृ छत्र हरपले. त्यावेळी त्यांचे वडीलबंधू श्रीगोपाळराव यांनी त्यांचे कुटुंबाची जबाबदारीही स्विकारली. इ.स.१८७६-७७ साली उत्तर कर्नाटकात भीषण दुष्काळ पडला. खायला अन्न मिळेना. घरातील मंडळींसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला. यावेळी श्रीगोपाळराव, धाकटी बहीण जिऊबाई हे दोघे जिगजेवणीला राहिले आणि श्रीअंबुरावमहाराज व त्यांचा धाकटा भाऊ चि. कृष्णा या दोघांनी गाव सोडून बेळगाव जिल्ह्यातील संकेश्वर येथील श्रीशंकराचार्यांच्या मठात जाऊन राहण्याचा निर्णय घेतला. यावेळी श्रीअंबुरावमहाराजांचे वय अवघे २० वर्षांचे होते. ऐन चैत्रातील रखरखीत उन्हात हे दोघे बंधू चालत संकेश्वरला निघाले. जिगजेवणी ते संकेश्वर अंदाजे अंतर १५० मैलांचे आहे. वाटेत मिळेल ते खात, मजल दरमजल करत ते दोघे श्रीशंकराचार्यांच्या मठात दाखल झाले. येथे आल्यावर त्यांची श्रीशंकराचार्यांशी गाठ पडली. श्रीअंबुरावमहाराजांनी घडलेला सविस्तर वृत्तांत सांगितला, मठात पडेल ते काम करण्याची तयारी दर्शविली. यास श्रीशंकराचार्यांनी अनुमती दिली व दोघे तेथे राहू लागले.

श्रीशंकराचार्यांचे सोवळ्याचे पाणी भरावे लागे. हे काम श्रीअंबुरावमहाराजांनी केले. इकडे जिगजिवणी येथील दुष्काळ हटला. चांगले दिवस आले म्हटल्यावर इ.स.१८७८ साली ते दोघेही पायी जिगजेवणीस परत आले. परत आल्यावर श्रीअंबुरावमहाराजांना दुष्काळी कामावर असणाऱ्या मजुरांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी मुकादमाची नोकरी लागली. परंतु ही नोकरी जास्त दिवस राहिली नाही. त्यानंतर त्यांनी गावातच तेल व मीठाचा व्यवसाय केला.

इ.स.१८८३ साली श्रीअंबुरावमहाराजांचा अहिल्याबाई नामक कन्येबरोबर विवाह झाला. पुढे ३-४ वर्षांनी त्यांना कन्यारत्न झाले. परंतु काळाची लीला काही औरच असते. त्यांची कन्या व पत्नी अहिल्याबाई या दोघांचे अचानक देहावसान झाले. महाराजांचा संसारच उध्वस्त झाला. मन विषण्ण झाले. म्हणून त्यांच्या बहिणीच्या सांगण्यावरून ते गावातील मंडळींबरोबर गाणगापूरला गेले. तेथे दत्ताची उपासना करू लागले. एक दिवस त्यांना स्वप्न पडले. त्या स्वप्नात एक संन्यासी आले व त्यांनी त्यांच्या हातात जपमाळ दिली आणि 'तुझे येथील काम झाले आहे. सद्‌गुरूंची तुला लवकरच भेट होईल, तू आता परत जा' असा आदेश दिला.

गाणगापूरहून परत आल्यानंतर त्यांच्या बहिणीने श्रीअंबुरावांना हनुमान जयंती असलेने, निंबरगीला जाऊन मारुतीरायांचे दर्शन घेऊन ये असे सांगितले. त्याप्रमाणे ते पायी निघाले. निंबरगी गावात प्रवेश करताच त्यांना भीमरायाचे भव्य देऊळ दिसले. तेथील ओढ्याच्या काठी असणाऱ्या चौथऱ्यावर श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर हे तंबाखू खात बसले होते. यांचे लक्ष श्रीभाऊसाहेबांकडे गेले. श्रीअंबुरावमहाराजांना तंबाखू खायची सवय होती. समव्यसनी भेटल्याने श्रीअंबुरावमहाराजांनी भाऊसाहेबमहाराजांना तंबाखू मागितली. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी एक चिमूटभर तंबाखू त्यांचे हातावर ठेवली आणि श्रीअंबुरावमहाराजांना त्यांचेविषयी प्रेमभाव निर्माण झाला. त्यांनी आपली परिस्थिती त्यांना कथन केली.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी विचारले, 'अंबुराया, नाम घेतोस का? घेत असलास तर आत्ताच देतो.' परंतु श्रीअंबुरावमहाराजांची थोडी द्विधा मनःस्थिती झाली आणि महाराज, मी जेवण करून येतो असे सांगून त्यांनी नाम न घेताच पळ काढला. जेवण करून झाल्यावर श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना पाहिले व जोरात हाक मारली, परंतु ऐकून न ऐकल्यासारखे करून ते पुढे चालू लागले. तेव्हा श्रीभाऊसाहेबमहाराजांनी एका शिष्यास त्यांना धरून आणावयास सांगितले. त्याप्रमाणे श्रीअंबुरावमहाराजांना त्याने धरून आणले आणि चैत्र शु.१५ शके १८१४ दि.१२.०४.१८९२ रोजी दुपारी २ वाजता श्रीभाऊसाहेबमहाराजांनी श्रीभाऊराव सावळसंगांकरवी नाम दिले.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे ते तासनतास नासाग्री दृष्टी ठेऊन साधन करीत. एक दिवस नासाग्री अविचलित दृष्टी ठेवल्याने त्यांना डोळे गेल्यासारखे वाटले. त्यांनी श्रीभाऊसाहेबांना ही घडलेली घटना सांगितली. श्रीअंबुरावमहाराज म्हणाले, 'महाराज, मला नाम देऊन गरीबाचे डोळे मात्र घालवलेत.' त्यांना साधनेत सगळीकडे प्रकाशच प्रकाश दिसू लागला. महाराज म्हणाले, 'अंबुराया, एकदम

असे काही बोलू नकोस. तू ब्रह्मशाळेत ये. तेथे आपण पाहू काय करायचे ते.' त्याप्रमाणे श्रीअंबुरावमहाराज ब्रह्मशाळेत आले. श्रीभाऊसाहेबांनी काही शिष्यांना अनुभवाची पदे म्हणण्यास सांगितले. ही पदे श्रीअंबुरावमहाराज लक्षपूर्वक ऐकत होते. एका पदात, दृष्टीसमोर दिसणाऱ्या तेजाचे वर्णन होते. हे तेज वर्णन आपल्याला दिसणाऱ्या तेजाशी तंतोतंत जुळते आहे असे त्यांना उमगले. त्यांना आपल्याला नेत्रविकार झाला आहे असे वाटत होते. श्रीअंबुरावमहाराज थोडे गोंधळले हे पाहून श्रीभाऊसाहेबमहाराज हसू लागले आणि म्हणाले, 'नाम देऊन जन्मभर साधन केले तरी न येणारे अनुभव, याला मी नाम देऊन तीन महिने झाले असताना येत आहेत.' नंतर श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना सकाळी ६ तास व सायंकाळी ३ तास असे ९तास साधन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी साधन करून परमार्थात सिद्धता संपन्न केली.

यानंतर श्रीअंबुरावमहाराजांचे वास्तव्य इंचगेरीला होते. तेथेच राहून ते नेम करू लागले. तेथे त्यांनी मठ स्थापन केला. त्यानंतर श्रीभाऊसाहेबमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांची तेथेच समाधी बांधली. हे काम स्वतः श्रीअंबुरावांनी लक्ष घालून केले. श्रीगुरूदेव रानडेसाहेब, प.पू.श्रीकाकासाहेब तुळपुळे इत्यादिंना श्रीअंबुरावमहाराजांचा सहवास लाभला. श्रीभाऊसाहेबमहाराजांच्या आज्ञेने इ.स.१९१५ सालापासून श्रीअंबुरावमहाराज नाम देऊ लागले.

इ.स.१९३३ साली आपल्या अवतारकार्याची समाप्ती करावी असे त्यांना वाटले. त्यांना एक दिवस ताप व खूप सर्दी झाल्याने नाकाने नीट श्वासोच्छ्वास करता येईना. त्यामुळे नेमात अडचण येऊ लागली. तेव्हा डॉक्टर आले. डॉक्टरांना ते म्हणाले, 'डॉक्टर, माझा श्वासोच्छ्वास नीट चालेल असे करा. माझा नेम नीट व्हायला पाहिजे. तापाचे मला विशेष काही वाटत नाही.' डॉक्टरांनी उपचार केल्यावर त्यांचा श्वास मोकळा झाला. श्रीअंबुरावमहाराजांना आनंद झाला आणि ते डॉक्टरांना म्हणाले, 'तुम्ही माझ्या नेमाची वाट मोकळी करून दिली. त्यामुळे माझे आलेले विघ्न दूर झाले.'

दिवसेंदिवस त्यांची प्रकृती बिघडत चालली. श्रीकाकासाहेब तुळपुळे त्यांना भेटायला आले. त्यांनी श्रीकाकासाहेबांना 'आम्ही वैकुंठीचेवासी' हा अभंग म्हणायला सांगितला. त्यानंतर शिष्यांनी दासबोधातील सिद्धलक्षण समास वाचायला सुरवात केली. त्यातील '**साधु वस्तु होऊनी ठेला । संशय ब्रह्मांडा बाहेरी गेला । निश्चय चलेना ऐसा झाला । या नाव सिद्ध ।।५-१०-१०।।**' ही ओवी वाचली. एवढ्यात श्रीअंबुरावमहाराज म्हणाले, 'माझ्या इच्छा, वासना सगळ्या जळून खाक झाल्या. आता मी नारायण नारायण म्हणत आकाशामध्ये उडून जातो.'

असे म्हणून पौष शु. ६, शके १८५५ शुक्रवार दि.२२.१२.१९३३ रोजी श्रीअंबुरावमहाराजांनी वयाच्या ७७ व्या वर्षी महाप्रयाण केले.

***

प.पू. भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस

जन्म
कार्तिक शु. ८ शके १७८६
सोमवार दि.०७.११.१८६४

निर्याण
पौष वद्य ६, शके १८४६
रविवार दि.२७.०१.१९२४

श्री. यज्ञेश्वर वडेर नाईक करुरकर या नावाचे मोठे पराक्रमी व मुत्सद्दी गृहस्थ होते. या श्री. यज्ञेश्वरांची घोरपडे सरकारांनी मुधोळ संस्थानचे कारभारी व सेनापती म्हणून सतराव्या शतकात नेमणूक केली. श्री. यज्ञेश्वरांना श्रीसमर्थ रामदासस्वामींचा अनुग्रह लाभला आणि समर्थांनी त्यांना श्रीप्रताप मारुतीची मूर्ती भेट दिली. या वडेर नाईक घराण्यातील श्री. नरसो तिमाजी यांचेकडे फडणीशी होती. पण नंतर यांना फडणीशी ऐवजी मुधोळ संस्थानची कोटणीशी देणेत आली. म्हणून या घराण्याचे कोटणीस हे आडनाव पुढे प्रचलित झाले. पहिल्या चार पिढ्यांचा पेशा हा लष्करी होता. पाचव्या पिढीतील तिमाजी व रामाजी हे दोघे बंधू सैन्यात शिपाई होते, पण हरिभक्त होते. तिमाजींचे पुत्र नरसो तिमाजी यांचेकडे मुधोळ संस्थानचे कोठीचे काम आले. नंतर त्यांचे चिरंजीव श्री. पांडुरंगराव यांचेकडेही सरकारी कोठीचेच काम होते. श्री. पांडुरंगराव यांचे प्रपंचात फारसे लक्ष नसायचे. त्यांचा नामस्मरणावर भर होता. यांचा विवाह तेरदाळ येथील कुळकर्णी घराण्यातील बहिणाबाई नामक कन्येशी झाला. विवाहानंतर रखुमाबाई हे नाव ठेवणेत आले. या दांपत्याच्या पोटी तेरदाळ येथे कार्तिक शु. अष्टमी शके १७८६, सोमवार दि.०७.११.१८६४ रोजी सकाळी ८ घटका दिवसास पुत्ररत्न अवतीर्ण झाले. यावेळी सुतिकागारात प्रकाश दाटून राहिला होता. बाराव्या दिवशी या मुलाचे नांव हणमंत ठेवणेत आले. हा हणमंत म्हणजेच आमचे 'प.पू.भगवान सद्‌गुरू श्रीहणमंतरावजी ऊर्फ श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस' होत. श्रीमहाराजांच्या मातोश्री, सौ. रखुमाबाई यांना बालपणापासून पिशाच्च बाधा होती. पण महाराजांचा जन्म झाला मात्र, त्या क्षणाला मातोश्रींची पिशाच्च बाधा दूर झाली.

लहानपणापासूनच श्रीमहाराजांना देवाची पूजा करणे, पालखी काढणे, भजन करणे, इ. ची आवड होती. जन्मतःच त्यांचे डोळे तेजःपुंज आणि हसरे होते. इ. स. १८७१मध्ये ते मराठी शाळेत जाऊ लागले. इ.स.१८७३ ला त्यांची मुंज झाली. मराठी इयत्ता चार झाल्यावर ते इंग्रजी शाळेत जाऊ लागले. श्रीमहाराजांना पुंडलिक नावाचे सख्खे बंधु होते. इ.स.१८७० साली श्रीमहाराजांचे पिताश्री श्रीपांडुरंगराव यांनी देह ठेवला. लहान वयातच पितृछत्र हरपलेने त्यांचे चुलते श्रीवामनरावजी कोटणीस यांनी त्यांचा अगदी आपल्या मुलासारखा सांभाळ केला. घरची अत्यंत गरिबीची परिस्थिती असलेने इंग्रजी चौथीनंतर महाराज हे मुधोळ सोडून कलादगीस आले. तेथे त्यांनी मुलकी नोकरीची परीक्षा दिली व ते पास झाले. तेथे सुप्रसिद्ध वेदांती पंचदशीकार श्री. बाबा गर्दे हे महाराजांना शिक्षक होते. महाराजांची बुद्धिमत्ता व जबरदस्त पाठांतर पाहून बाबांनी 'तूच आमचा गुरू आहेस' असे गौरवोद्गार काढले. यानंतर ते पुढील शिक्षणासाठी कोल्हापुरास आले. पण तेथेही त्यांची विपन्नावस्था नडली व ते बेळगावला आले.

इ.स.१८८१ च्या वैशाख महिन्यात मध्यरात्रीच्या शुभमुहूर्तावर त्यांचा मंगल विवाह झाला. त्यांच्या

पत्नीचे नांव 'लक्ष्मी' असे ठेवणेत आले. या साक्षात् लक्ष्मीच होत्या. यांच्या डोळ्याच्या बाहुल्या उलट्या होत्या. पुढे तात्यासाहेब मिरजेला आले आणि तेथे त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली व चांगल्या मार्गाने उत्तीर्ण झाले. घरच्या विपन्नावस्थेमुळे पुढील शिक्षण घेणे शक्य नसलेने महाराजांनी मुधोळ येथे कारभारी कचेरीत कारकून म्हणून नोकरी पत्करली. घरात वीस-पंचवीस माणसे, पैसा कमवायचे दुसरे साधन नाही. वयस्कर चुलते, कर्जाचा बोजा आणि सर्व भार यांचेवर आलेला. पण याही अवस्थेत त्यांनी प्रपंच चालविला. त्या काळी मॅट्रिक झाल्यावर डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा देता येत असे. या संदर्भात महाराजांना मुधोळ येथील न्यायाधीश श्रीबाबासाहेब मुजुमदार यांची चांगली साथ लाभली. आपली नोकरी सांभाळून महाराजांनी कायद्याचा अभ्यास सुरू केला. याच सुमारास महाराजांना गोपाळराव दीक्षित नावाचे स्नेही लाभले व यांची चांगलीच गट्टी जमली. महाराजांच्या बिकट परिस्थितीत गोपाळराव दीक्षितांनी धीराच्या चार गोष्टी सांगून त्यांना उत्तेजित केले.

श्रीतात्यासाहेब घरातल्या कळकटीला वैतागले आणि ते एक दिवस श्रीबाबासाहेब मुजुमदारांना म्हणाले, 'बाबासाहेब, एकदा काशीला जावे म्हणतो.' तेंव्हा मुजुमदार म्हणाले, 'कशासाठी?' श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'घरातील कटकटी आहेतच आणि मला रामाचा ध्यास लागला आहे. त्या रामाची जाणीव मला सतत होते, पण तो माझ्या समोर येत नाही, म्हणून त्याला शोधावे म्हणतो.' हे ऐकल्यावर श्रीबाबासाहेब म्हणाले, 'हणमंतराव तुम्ही अगदी माझ्या मनातले बोललात. पण मला वाटते ते तुम्हाला सांगतो. तुम्हाला काय वाटते ते बघा. मला ज्या महात्म्याचा कृपानुग्रह लाभला आहे, त्यांचे नाव श्रीरामचंद्र आहे आणि ते अवतारी पुरूष आहेत. तुम्ही ज्या शोधात आहात तेच समाधान जर तुम्हाला तेथे लाभले तर मग काशीला जाण्याची जरुरी काय?' हे ऐकल्यावर श्रीमहाराजांनी या गोष्टीला होकार दिला. याप्रमाणे इ.स. १८८६ मध्ये मार्गशीर्ष वद्य पंचमी गुरूवारी श्रीमहाराज हे श्री.बाबासाहेब मुजुमदार यांचेकडे मुधोळास गेले होते. तेथे चिमडचे श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर आले होते. त्यांना श्रीतात्यासाहेबांनी पाहिले मात्र, एकमेकांची दृष्टि एकमेकांकडे जाताच, ज्या आत्मारामाची सगुण रूपात गाठ पडावी असे श्रीतात्यासाहेबांना वाटत होते, तेच रूप दृष्टिसमोर येताच श्रीमहाराजांनी रामचंद्रावजींच्या पायाला मिठी मारली. चिमडच्या महाराजांनी तात्यासाहेबांना उठवले व याच दिवशी मस्तकावर हात ठेऊन, अनुग्रह केला. हे बघून काही लोकांनी चिमडच्या महाराजांजवळ विचारणा केली, 'तुम्ही अगदी लगेच कसा काय तात्यासाहेबांना अनुग्रह दिला?' तेव्हा महाराज म्हणाले, 'बाबांनो तो परमार्थाची पूंजी घेऊनच आला होता, मग काय वेळ लागणार?'

एकदा श्रीचिमडच्या महाराजांना श्रीतात्यासाहेबांनी आपल्या घरी भोजनास बोलाविले. याप्रमाणे महाराज भोजनास आले. भोजन वगैरे झाले. श्रीतात्यासाहेबांनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातला आणि त्याच दिवशी झालेला सर्व पगार रु.२२/- त्यांच्या हातावर ठेवला. बावीस रुपये पगार आणि घरात खाणारी पंचवीस माणसे, असे व्यस्त प्रमाण होते. चिमडच्या महाराजांना याची पूर्ण कल्पना होती. हातात बावीस रुपये ठेवलेले बघितल्यावर चिमडचे महाराज म्हणाले, 'हणमंता, सगळा पगार जर तू माझ्या हातावर ठेवलास तर घरची मंडळी पुढे महिनाभर खाणार काय?' हे ऐकून, श्रीतातयासाहेब म्हणाले, 'महाराज, त्याची काळजी

मला कुठंय? आहे ते आपलेच आहे. आपलेच मी खातो आहे.' हे ऐकताच महाराजांनी त्यातील २ रुपये श्रीतात्यासाहेबांच्या हातावर ठेवले आणि एक रुपयाने तुझा प्रपंच व एका रुपयाने तुझा परमार्थ कळसाला जाईल असा पूर्ण आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे श्रीतात्यासाहेबांनी प्रपंच व परमार्थ सव्यसाचीपणाने केला.

श्रीतात्यासाहेबमहाराजांना श्रीचिमडच्या महाराजांशिवाय दुसरा देवच माहित नव्हता. ते चिमड सोडून खरेतर इतरत्र कोठे गेलेच नाहीत. फक्त श्रीचिमडच्या महारजांबरोबर सज्जनगड व आळंदीला गेले. श्रीतात्यासाहेबांनी वकिली केली ती अत्यंत प्रामाणिकपणे सचोटीने आणि सत्याने केली. त्यामुळे त्यांना यात अपयश कधी आले नाही. क्वचित जरी कोठे नियमाला अपवाद म्हणून अपयश आले तर त्याचे अशील त्यांनी केलेल्या कामाबद्दल, 'आपण काम उत्तमच केले, अपयश आले हे आमचे दैव, त्याला आपण काय करणार?' असे म्हणून धन्यवाद देत असत. पक्षकार श्रीतात्यासाहेबांना 'देव वकील' असे संबोधित असत.

श्रीचिमडच्या महाराजांनी मार्गशीर्ष शु.११ शके १८१३ इ.स. १८९१ मध्ये रात्री ९.४५ वाजता देह ठेवला. याचे श्रीतात्यासाहेबांना अतीव दुःख झाले. श्रीचिमडच्या महाराजांनी देह ठेवायच्या काही वेळ अगोदर, 'हणमंता आला आहे का?' असा प्रश्न केला. यावरून श्रीचिमडच्या महाराजांचे श्रीतात्यासाहेबांवर किती प्रेम होते, हे कळून येते. यानंतर काही काळाने श्रीतात्यासाहेबांना नागोदराचे असाध्य दुखणे झाले. यावर सांगलीचे प्रसिद्ध वैद्य श्री. आबासाहेब सांभारे उपचार करत होते. पण शेवटी त्यांनीही हात ठेकले. शेवटी श्रीतात्यासाहेब हे नानबा फडणीसांना घेऊन चिमडला आले व त्यांनी आपला भार श्रीलक्ष्मीबाईअक्कांवर टाकला. अक्का म्हणाल्या, 'तू आता असे कर, काही झाले तरी २१ दिवस मठाबाहेर जाऊ नको. साधुबुवा तुला बरे करतील.' याप्रमाणे श्रीतात्यासाहेबांनी आचरण पाळले असता २१ व्या दिवसानंतर एक सर्प पोटातून बहिर्दिशेस गेलेवेळी बाहेर पडला आणि या दुखण्यातून श्रीतात्यासाहेबमहाराज मुक्त झाले.

इ.स. १८९८ मध्ये नित्य साधने बरोबरच प्रथम काही दिवस नैमित्तिक कीर्तने श्रीतात्यासाहेबांनी सुरू केली व याचे पर्यवसान नित्य कीर्तनात झाले. सुरवातीला श्रीतात्यासाहेब हे तेरदाळ येथे सोमवार, गुरुवार व एकादशी असे प्रसंगोपात कीर्तन करु लागले. त्यानंतर इ.स.१९०० पासून श्रीतात्यासाहेबांनी नित्य कीर्तन सुरू केले. इ.स.१९०६ साली श्रीतात्यासाहेब चिमड येथे श्रीचिमडच्या महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त गेले असता, मार्गशीर्ष शु.१४ या दिवशी श्रीमाईसाहेबमहाराजांनी चिमडच्या महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पादुका श्रीतात्यासाहेबांना दिल्या. याला अनुसरून त्यांचे चुलते श्रीवामनकाका कोटणीस यांनी 'पादुका मिळाल्या सद्‌गुरू लाधला । काय उणे त्याला सांगा आता ।।' या आशयाचे पद्य केले. श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनास भाविकांची अक्षरशः गर्दी व्हायची. अल्पावधीतच त्यांची कीर्तने लोकप्रिय झाली. कीर्तनाला फारच गर्दी होत असलेने श्रीतात्यासाहेबांना त्यांची राहती जागा अपुरी पडू लागली. श्रीगुलाबसिंग भ. सोवनसी यांचा वाडा हरभटरोडला असून, तो त्या काळी भुताचा वाडा म्हणून प्रसिद्ध होता. या वाड्यात दिवसाही कोणी जायचे नाही. हा वाडा श्रीतात्यासाहेबांनी भाड्याने घेतला आणि या वाड्यात कीर्तनाची पहिली झांज वाजली मात्र, तेथील भूतबाधेची पिछेहाट झाली.

श्रीतात्यासाहेब हे दरवर्षी चिमड मठातील उत्सवाला व आराधनांना जात असत. साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा खर्च ते एकटेच करत असत. धान्य वगैरे सगळे सांगलीहून निवडून नेत असत. चिमड मठातील दुमजली धर्मशाळा, स्वयंपाकघर इ. त्यांनी स्वतः उत्तम बांधवून घेतले.

इ.स.१९१२ साली श्रीतात्यासाहेबांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी ज्येष्ठ व.पंचमीस देह ठेवला. त्यानंतर थोड्याच कालावधीत त्यांचे चुलते श्रीवामनरावजी कोटणीस हे वैकुंठवासी झाले. असे हे दुःखाचे डोंगर कोसळले तरी मनाचा समतोल त्यांनी ढळू दिला नाही. श्रीतात्यासाहेबांना त्यांचे चिरंजीव गुरुवर्य श्रीदादामहाराज कोटणीस, श्रीगोविंदराव कोटणीस, श्री. लक्ष्मणराव कोटणीस व श्री. रंगनाथराव कोटणीस यांची कीर्तनात साथ मिळत असे. त्यांचे कीर्तनास साथीसाठी म्हणून पाठीमागे ३८ मंडळी उभी असायची व तब्बल अठरा तबलेवाले आणि आठ पेटीवाले भक्त असायचे. श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन श्रवणास प.पू.श्रीगुरूदेव रानडेसाहेब, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक प.पू. श्री. ल. रा. पांगारकर, प.पू. श्री. काकासाहेब तुळपुळे, प.पू. समर्थभक्त श्रीशंकर श्रीकृष्ण देव, प.पू. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी इ. महनीय व्यक्ती वेळात वेळ काढून येत असत.

इ.स.१९१६ साली श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या मातोश्री सौ.बहिणाबाई कोटणीस यांनी भाद्रपद अमावस्येला देह ठेवला. इ.स.१९१६ साली सांगलीला प्लेगची साथ आली. त्यामुळे श्रीतात्यासाहेब हे मिरज येथे श्री हुंडेकरांच्या वाड्यात रहाणेसाठी गेले. १९१७ साली श्रीरामनवमी तेथेच साजरी झाली या दरम्यान श्रीतात्यासाहेबांना ताप आलेला होता. श्रीरामनवमी दिवशी तर तो फारच वाढला. अशा स्थितीत कीर्तन करणे शक्यच नव्हते. तथापि आत्मबळावर त्यांनी देवासमोर आपल्याला खांबाला बांधून उभे करणेस श्री. नानबा फडणीसांना सांगितले. त्याप्रमाणे श्रीतात्यासाहेबांना उपरण्याने खांबाला बांधले आणि त्यांनी कीर्तन सुरू केले. त्या कीर्तनात थोड्याच वेळात श्रीतात्यासाहेबांना दरदरून घाम आला. मग त्यांनी बांधलेले उपरणे सोडले आणि ते कीर्तन पुढे चांगलेच रंगले.

इ.स.१९२३ पासून पुढे श्रीतात्यासाहेबांची प्रकृती फारच अशक्त होत चालली. आहार कमी होऊ लागला. त्यांचे यकृत नादुरूस्त झाले होते. पुढे त्यांना उदराचे दुखणे झाले. राजवैद्य आबासाहेब सांबारे यांचे उपचार त्यांचेवर सुरू होते. अंगाला सूज आली, पोट फारच वाढले. अन्नही पोटात जाईना. यावेळी त्यांचे मनात चिमडास जाऊन दर्शन घेऊन यावे असा विचार आला आणि ते चिमडला गेले. त्यांचे बरोबर अनेक माणसे चिमडला गेली. त्यांना निरोप देणेकरता सांगलीतील थोर सत्पुरूष श्रीनारायणमहाराज मळणगावकर हे स्वतः आले होते. श्रीतात्यासाहेबमहाराज रेल्वेने निघाले, कुडची स्टेशनवर उतरले आणि खुर्चीवर बसले. इतक्यात एका गृहस्थाने त्यांचे मागून त्यांच्या गळ्यात हार घातला. हे बघून श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'पुंडलिकराव ज्या अर्थी माझ्या गळ्यात हार पडला आहे, त्याअर्थी मी आता पुढे जास्त दिवस रहात नाही.' ही गोष्ट कार्तिकातील होती. ते चिमडला पोहोचले. तेथे त्यांनी श्रीसाधुमहाराज, श्रीचिमडचे महाराज, श्रीलक्ष्मीबाईअक्का, श्रीदाजीसाहेबमहाराज यांच्या समाधींचे दर्शन घेतले. या मुक्कामात श्रीतात्यासाहेबांची

प्रकृती फारच बिघडली. श्रीतात्यासाहेबांचे मनात चिमडात देह ठेवावा असे होते. पण चिमडच्या महाराजांनी 'झाडाखाली झाड वाढत नाही, तू सांगलीस जा' असा दृष्टांत दिला आणि त्याप्रमाणे सगळ्या मंडळींसह ते सांगलीला परतायला निघाले. यावेळी चिमडचे लोकांनी श्रीतात्यासाहेबांना विचारले, 'पुन्हा केव्हा येणार?' हे ऐकताच श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'बाराव्या दिवशी येतो.' आणि आश्चर्य असे की, बाराव्या दिवशीच श्रीतात्यासाहेबांचा आत्मा चिमडास साधुमहाराजांच्या अक्षय सेवेस हजर झाला. सांगलीत आल्यावर त्यांचे नित्य कीर्तन सुरूच होते. देह ठेवणेचे आदले दिवशी श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'आम्ही ब्रह्मपुरी जाणार आहोत. कोण येणार आहे काय? चला येणार असाल तर घेऊन जातो.' पण ब्रह्मपुरी जाण्यास तयार होणार कोण? 'हा बुवा आता दौऱ्यास जाणार आहे, पुन्हा येणार नाही' असे कीर्तनातून श्रीतात्यासाहेब बोलले.

आयुष्यातील शेवटच्या कीर्तनात श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'चिमडच्या महाराजांच्या आज्ञेप्रमाणे, थोरल्या महाराजांच्या कृपेने, श्रीसाधुमहाराजांची ही कीर्तनसेवा आजवर केली. या कीर्तनामध्ये कोणाला लागेल असे बुद्धिपुरस्सर कधी बोलालो नाही, परंतु हे कीर्तन आहे, त्यातून मूळ विषयाला धरून संतवचनांचे आधारे देत बोलावे लागते. आम्ही वकील असलेने आधाराशिवाय बोलणेच नाही. पण न जाणो बोलण्याच्या ओघात जर एखादा शब्द कोणास न कळत लागला असेल तर, सगळ्या श्रोत्यांनी मला सदय अंतःकरणाने क्षमा करावी. कारण आपली भेट आता पुनः होणार नाही. उद्या तर आम्ही महाराजांच्या इच्छेने मूळस्थानी प्रयाण करणार आहोत.' या शेवटच्या कीर्तनाने हजारो लोकांना चटकाच लागला आणि दुसरे दिवशी श्रीतात्यासाहेबांच्या वडिलांची पुण्यतिथी होती. त्यांनी वडिलांचे श्राद्ध केले. श्राद्धाचा थोडा प्रसाद श्रीतात्यासाहेबांनी ग्रहण केला. श्री. नानबांना हाक मारली आणि मी आज जाणार असे तीन वेळा सांगितले. नित्याप्रमाणे सायंकाळी पोथी वाचन झाले. श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव गु.भ.प.श्रीदादामहाराज कोटणीस यांचेकडे त्यांनी एकदा बघितले आणि 'महाराज आले आहेत, आरती करा' असे उद्‌गार काढले. आरती झाली आणि पौष वद्य षष्ठी शके १८४६, रविवार दि.२७ जानेवारी, १९२४ या दिवशी सायंकाळी ४.४५ वाजता, वयाच्या ६०व्या वर्षी ते स्वरूपाकार झाले.

श्रीतात्यासाहेबांनी पूर्वी संध्यामठी कीर्तन केले होते आणि या कीर्तनात त्यांनी 'ही जागा विश्रांतीला फारच चांगली आहे' असे उद्‌गार काढले होते. श्रीतात्यासाहेबांचे निःसीम भक्त श्रीगंगाधरराव दीक्षित यांचे मळीत श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अंत्यविधी झाला व ज्या जागेवर अंत्यविधी झाला त्या जागेवर श्रीगंगाधररावांनी समाधी बांधली. तेथे पुण्यतिथी उत्सवही सुरू केला. तो आजतागायत चढत्या वाढत्या क्रमाने चालू आहे. तसेच श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ सुपुत्र गु.श्रीदादामहाराज कोटणीस यांनी एस.टी. स्टॅण्ड जवळ 'कैवल्यधाम' ही वास्तू बांधली व तेथेही आजतागायत श्रीतात्यासाहेबांचा पुण्यतिथी उत्सव चढत्या वाढत्या क्रमाने सुरू आहे.

***

प.पू. योगीराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज

जन्म
मार्गशीर्ष व. १३ शके १८०८
गुरूवार दि.२३.१२.१८८६

निर्याण
पौष व. ८, शके १८९६
दि.१५.०१.१९७४

कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी तालुक्यात 'कोलव' हे गाव आहे. या गावात श्री. नागेशभटजी गुळवणी हे मोठे भगवद्भक्त रहात होते. गुळवणी घराण्यात परंपरेने वेदाभ्यास चालत आलेला होता. या श्रीनागेशभटजींना बरेच दिवस पुत्र संतान नव्हते. त्यामुळे ते नेहमी खिन्न असत. लवकरच त्यांना प.पू.नारायणस्वामी या सत्पुरुषांचा सहवास लाभला. त्यांच्या कृपाप्रसादाने श्रीनागेशभटजींना एक मुलगा झाला. हा मुलगा प.पू.श्रीनारायणस्वामींच्या आशीर्वादाने झालेला असलेने याचे नांवही 'नारायण' असेच ठेवले. या श्रीनारायणांनी वेदाभ्यास आत्मसात केला आणि त्यांनी वेदमूर्ती नारायणभटजी असे अभिधान प्राप्त करून घेतले. या श्रीनारायण भटजींना एकूण ४ मुले आणि ३ मुली झाल्या. त्यापैकी ज्येष्ठ चिरंजीव श्री. दत्तंभट्ट होत.

श्री. दत्तंभट्ट हे सुद्धा वेदाभ्यासी होते. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. उमाबाई. यांचे काही दिवसात देहावसान झाले, म्हणून श्री. दत्तंभटांनी हिरवडे गावच्या श्री. मारुतीपंत कुलकर्णी यांच्या एकुलत्या एक कन्येशी विवाह केला. श्री. दत्तंभटांनी आपल्या प्रथम पत्नीचे स्मरणार्थ या नूतन पत्नीचे नांवही उमाबाई असेच ठेवले.

विवाहानंतर श्री.दत्तंभट व पत्नी सौ. उमाबाई हे दोघे जवळीलच 'कुडुत्री' या गावी रहावयास गेले. अशा या दांपत्याच्या पोटी कुडुत्री या गावी मार्गशीर्ष व. १३ शके १८०८ म्हणजेच दि. २३ डिसेंबर, १८८६ वार गुरुवार रात्री ८ वाजून १९ मिनिटांनी एक पुत्ररत्न अवतीर्ण झाले. १२ व्या दिवशी या मुलाला पाळण्यात घालण्यात आले आणि याचे 'वामन' असे नामकरण करणेत आले. हा वामन म्हणजेच आमचे 'प.पू. दत्तयोगी श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज' होत.

श्रीमहाराजांचे मराठी चौथी इयत्तेपर्यंतचे म्हणजे प्राथमिक शिक्षण हे तारळे या गावातील शाळेत झाले व पुढील माध्यमिक शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले व राजाराम हायस्कूल येथे दाखल झाले. लहानपणापासूनच हुशार व चौकस बुद्धि असलेने त्यांनी त्या काळातील तीन रुपयांची 'भुदरगड पेटा' ही शिष्यवृत्ती पटकावली व पुढे त्यांनी अनेक शिष्यवृत्या मिळविल्या. वयाच्या ८व्या वर्षी श्रीमहाराजांचा व्रतबंध झाला. त्यांचे वडिलबंधू श्री. शंकरशास्त्री यांनी महाराजांना संध्या, पुरुषसूक्त, सौरसूक्त यांचे शिक्षण दिले. पुढे महाराज पाठशाळेतही शिकले. पाठशाळेतील श्री. आत्मारामशास्त्री पित्रे यांनी समासचक्र, रुपावली, अमरकोश, रघुवंश इ.चा अभ्यास करवून घेतला.

इ.स. १९०६ पासून महाराजांना चित्रकलेची आवड असलेने त्यांनी चित्रकलेचा अभ्यास नेटाने सुरू केला आणि त्याच वर्षी ते चित्रकलेची पहिली परीक्षा पास झाले. पाठोपाठ दुसरी परीक्षाही पास झाले. त्यानंतरचे चित्रकलेचे शिक्षण घेणेसाठी ते मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या संस्थेत दाखल झाले. तेथे त्यांनी ६ महिने चित्रकलेचा अभ्यास केला. पण मुंबईची हवा त्यांना मानवली नाही. म्हणून ते परत कोल्हापूरला आले व अभ्यास सुरू ठेवला. त्यानंतर तेथे ते थर्डग्रेड, टीचर्स ग्रेडची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि चित्रकला शिक्षकाचा व्यवसाय आपल्या भावी चरितार्थासाठी निश्चित केला. याप्रमाणे ते कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूल येथे चित्रकला शिक्षक म्हणून रूजू झाले.

राजाराम हायस्कूलमधे १९१५ सालापर्यंत तात्पुरती नोकरी केली. त्यानंतर त्यांनी कोल्हापुरात छायाचित्रकाराचा (फोटोग्राफी) व्यवसाय सुरू केला. चित्रकलेबरोबरच ते छायाचित्रकलेतही निपुण होते. कोल्हापूरच्या छत्रपती श्री. शाहूमहाराजांनी त्यांच्याकडून एक चित्र काढून घेतले होते. गोजीवन चौंडेमहाराज यांनीही गोमातेची १०० चित्रे महाराजांकडून काढून घेतली. त्यानंतर प.पू.श्रीदीक्षितस्वामींनी एकमुखी दत्ताचे चित्र महाराजांकडून काढून घेतले. तसेच महाराजांनी तद्नंतर षोडश अवतारांचे चित्रही काढले.

फोटोग्राफीचा व्यवसाय हा धावपळीचा होता. सतत कॅमेरा घेऊन वेळोवेळी दूर जावे लागे. त्यामुळे दैनंदिन अध्यात्मिक उपासनेत/साधनेत अडसर येऊ लागला. त्यामुळे त्यांनी फोटोग्राफी हा आर्थिकदृष्ट्या चांगला असलेला व्यवसाय सोडून, परत त्यांनी शिक्षकाच्या नोकरीचा शोध सुरू केला. याप्रमाणे आपले वडीलबंधू श्री. शंकरशास्त्री यांच्या ओळखीने इ.स. १९१७ साली ते बार्शी येथील म्युनिसिपल शाळा क्र.१ येथे दाखल झाले. या दरम्यान बार्शी येथे काशीचे श्रीयोगानंद नावाचे एक महान योगी आले होते. त्यांची बार्शी येथील भगवंत मंदिरात भगवद्गीतेवर प्रवचने होती आणि प्रवचन झाल्यावर ते आसन व प्राणायाम इ. योगाचा वर्ग घेत. श्रीमहाराज त्यांचे प्रवचन ऐकायला व योगाला जाऊ लागले आणि त्यांना योगाची आवडच निर्माण झाली. ती योग विद्या त्यांनी आत्मसात केली. पुढे महाराज शाळेतील विद्यार्थ्यांना योग शिकवू लागले. या शाळेतील राजकारणाने त्यांनी पुढे नोकरी सोडली आणि परत ते आपल्या कुडित्रे या गावी आले. तेथे येऊन आपल्या वडिलोपार्जित इस्टेटीची विल्हेवाट लावली. स्वतःला काही न घेता सर्व इस्टेट आपल्या बंधूंना वाटून ते तीर्थयात्रेला बाहेर पडले. बद्रिनाथपासून ते कन्याकुमारीपर्यंत तीर्थयात्रा केल्या आणि काशी, हरिद्वार, ऋषिकेश, मथुरा, त्रिंबक, वाडी, नाशिक, कुरूगड्डी इ. पवित्र स्थळे पाहून परत आले.

परत आल्यानंतर श्रीमहाराजांनी इ.स. १९२६ मध्ये पुण्याच्या नूतन मराठी शाळेत चित्रकला शिक्षकाची नोकरी पत्करली. तेथे त्यांनी इ.स. १९४२ पर्यंत नोकरी केली आणि ते सेवानिवृत्त झाले.

श्रीमहाराजांचे ज्येष्ठबंधू श्री. शंकरशास्त्री यांना प.पू.श्रीटेंबेस्वामींनी, श्रीगुळवणीमहाराजांना पत्र लिहिणेस सांगितले. त्या पत्रात पुढीलप्रमाणे लिहिणेस सांगितले, 'प्रभू दत्तात्रेयांचा एक सुंदर फोटो काढून त्यांचे गळ्यात श्लोकबद्ध हार घातल्याचे दाखव आणि हारातील प्रत्येक फुलात श्लोकातील एक एक अक्षर

बसवावे व तो फोटो काढून वाडीला यावयाचे.' याप्रमाणे श्रीमहाराजांनी इतर कामे बाजूला ठेऊन पत्रातील सूचनांप्रमाणे तो फोटो तयार केला आणि श्री टेंबेस्वामींना दाखविण्यासाठी घेऊन आले. हे चित्र पाहून श्री टेंबेस्वामींना अत्यानंद झाला आणि त्यांनी श्रीमहाराजांवर कृपेचा वर्षाव केला. ही केलेली सेवा बघून श्रीटेंबेस्वामींनी श्रीमहाराजांना हातात बांधण्यासाठी एक मंत्र तयार करून तो चांदीच्या पेटीत घालून, ती पेटी स्वतः श्रीमहाराजांच्या हातात बांधली. एक संरक्षक कवच हे प.पू.श्रीटेंबेस्वामींनी आपल्या शिष्याच्या हातात बांधले. हा दिवस होता गुरूद्वादशीचा. या दिवशी हा अनमोल ठेवा श्रीमहाराजांना प्राप्त झाला. याची आठवण म्हणून प.पू.श्रीमहाराज हे प्रत्येक गुरूद्वादशीला नृसिंहवाडीस येत असत.

नागपूर जवळ भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या काठी 'पवनी' हे गाव आहे. या गावात प.पू. श्रीटेंबेस्वामींचा चातुर्मास सुरु होता. या क्षेत्री अनंतचुर्दशी या दिवशी प.पू. श्रीटेंबेस्वामींनी श्रीगुळवणीमहाराजांना मंत्रदीक्षा दिली.

प.पू.श्रीमहाराजांच्या स्वप्नात एक दिवस प.पू. श्रीटेंबेस्वामी आले आणि म्हणाले, 'ही विद्या दत्त संप्रदायाची आहे. आम्ही दोघे एकच आहोत. तुझ्या हातून पुढे मोठे कार्य घडायचे आहे. ही विद्या घे.' स्वप्नातून जागे झाल्यावर प.पू.श्रीमहाराजांचे समोर स्वामी चिन्मयानंद होते. त्यांना नमस्कार केला. हे स्वामी चिन्मयानंद म्हणजेच कलकत्याचे श्रीयोगेश चक्रवर्ती. योगसाधनेद्वारा शक्तीपात दीक्षेमुळे स्वामी चिन्मयानंद सरस्वती पुढे कालांतराने प.पू.श्रीलोकनाथतीर्थ स्वामी झाले.

प.पू.श्रीटेंबेस्वामींच्या आज्ञेने श्रीगुळवणीमहाराजांनी, प.पू.श्रीलोकनाथतीर्थ स्वामींकडून शक्तीपात दीक्षा घेतली आणि त्यांचेकडून शक्तीपात व कुंडलिनी जागृतीचा ठेवा प्राप्त करून घेतला. शक्तीपात दीक्षा याचा अर्थ शिष्याच्या ठिकाणी असणारी निद्रिस्त शक्ती जागृत करणे होय. याप्रमाणे शक्तीपात दीक्षा प्राप्त झालेवर श्रीमहाराजांनी अनेक गुरूभक्तांना ही दीक्षा दिली.

प.पू.श्रीगुळवणीमहाराजांनी नृसिंहवाडीतील दत्ताचे मंदिर आणि सभोवताली असणाऱ्या मंदिरांचाही जीर्णोद्धार केला. अनेक मठांचे नूतीनकरण केले. प्रशस्त धर्मशाळा बांधली. तसेच मुख्य म्हणजे प्रदक्षिणा मार्गावर गोलाकार बांधलेला स्लॅब. यामुळे श्रीदत्तात्रेयांचा सभामंडप अत्यंत सुंदर दिसतो. श्रीगुळवणीमहाराजांनी अनेकांचे जीवन उजळून टाकले. जो जो त्यांच्या सानिध्यात आला, त्याचे ऐहिक आणि पारमार्थिक जीवन त्यांनी उजळून टाकले, कल्याणच केले. अनेक पारमार्थिक लोकांना पारमार्थिक मार्गदर्शन केले.

प.पू. श्रीगुळवणीमहाराज हे एक दिवस आमच्या श्रीरामनिकेतन येथे आले होते. त्यांचे बरोबर त्यांचे शिष्य श्री. केशवराव जोशी हेही होते. आमच्या घरातील प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांच्या समाधीला श्रीमहाराजांचे हातून हार घालणेकरिता हार आणला होता. श्रीमहाराज आले. आमचे आजोबा प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर यांनी तो हार श्रीमहाराजांच्या हातात देत असताना श्री. केशवराव जोशी म्हणाले,

महाराजांची तब्येत बरी नाही. तुम्हीच हार घाला, त्यांना कष्ट देऊ नका. हे वाक्य ऐकल्यावर श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, 'अरे केशव, संतांना हार घालण्यात कष्ट कसले? हार इकडे आण.' श्रीमहाराजांनी आमच्या श्रीमामामहाराजांच्या समाधीला हार अर्पण केला आणि समाधीसमोर अर्धा तास ध्यानस्थ बसले. उत्थापन झालेवर म्हणाले, 'अहो रामभाऊ (दासराममहाराज केळकर), या महात्म्याला कुणी ओळखलेच नाही.' संतच संतांना जाणतात हेच शेवटी खरे आहे.

ऑगस्ट, १९७३ मध्ये श्रीगुळवणीमहाराजांनी आपल्या जवळच्या सर्व चांदीची भांडी तसेच रौप्य तुलेतून जमा झालेली सर्व चांदी, नृसिंहवाडी येथील मंडप शिल्पाचे इंजिनिअर श्री. वि.मो. वैद्य यांचेकडे दिली आणि सांगितले की सर्व भांडी आटवून वाडीच्या देवाचे दरवाजे चांदीने मढवा. या महाराजांच्या इच्छेप्रमाणे श्रीदत्तगुरूंचे मंदिराचे दर्शनी दरवाजे चांदीने मढविलेले आहेत.

श्रीमहाराजांचे हजारो शिष्य आहेत. पण यात अधिकारसंपन्न असे प.पू.सद्गुरू श्रीमामासाहेब देशपांडेमहाराज आणि प.पू.सद्गुरू श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे होत. या दोघा महात्मांनी त्यांचा संप्रदाय खऱ्या अर्थाने चालविला.

शेवटी शेवटी श्रीमहाराजांची प्रकृती बिघडू लागली. किरकोळ आजार, ताप वाढू लागला. वेदना होत होत्या, पण ते शांतपणे सहन करत होते. शेवटच्या दिवशी श्रीमहाराज हे विद्या नावाच्या मुलीचा 'उघड नयन देवा' हा अभंग ऐकत असताना, श्रीटेंबेस्वामींचे दर्शन होत आहे असे म्हणाले आणि थोड्या वेळातच पौष व. ८ शके १८९६ दिनांक १५ जानेवारी, १९७४ या दिवशी वयाच्या ८८ व्या वर्षी श्रीटेंबेस्वामींच्या रूपात स्वरूपाकार झाले.

***

श्रीदासराममहाराज कृत श्रीवामनमहाराज गुळवणी यांची आरती

आरती वामनराया । तव लखलखीत काया ।
रामदासा ऐसी तनू । केली सर्वांवरी माया ।।ध्रु।।
स्नानसंध्या नित्य नेम । जप तप अनुष्ठान ।
साधन सर्वकाळ । भाव शुद्ध वर्णी कोण ।।१।।
गोविंद गुरुस्वामी । तुवा मार्ग दाविती ।
टेंबेस्वामी गाठ होता । कुंडलिनी प्रचिती ।।२।।
लोकनाथ तीर्थे तुवा । केला असे शक्तिपात ।
दासरामा प्रेम दिले । भक्तिभावे नमीत ।।३।।

प.पू. कलावती आई

जन्म
भाद्रपद शुद्ध ५ शके १८३०
इ.स. १९०८

निर्याण
माघ शु. १, शके १९०० बुधवार
दि.०८.०२.१९७८

कर्नाटकातील दक्षिण कानडा जिल्ह्यात कल्याणपूर नावाचे गाव आहे. या गावात अतिशय सुसंस्कृत आणि सात्विक असे कल्याणपूरकरांचे घराणे होते. या घराण्यात श्रीमत् परमहंस शिवरामस्वामी या नावाचे थोर संन्यासी सत्पुरुष होऊन गेले. या शिवरामस्वामींना दोन चुलत बंधु होते. एक शामराव आणि दुसरे शांतमूर्ती. शामरावांच्या पत्नीचे नांव होते रुक्माबाई आणि शांतमूर्ती यांच्या पत्नीचे नाव पद्मावती होते. यांचे मूळ गाव दक्षिण कानडा जिल्ह्यातील कल्याणपूर असून, ते नोकरीनिमित्त उत्तर कानडा जिल्ह्यातील कारवार येथे स्थायिक झाले. शामरावांना बाबूराव नावाचे एकुलते एक पुत्ररत्न होते. बाबूराव वयात आल्यावर त्यांचे वडील श्री. शामराव हे निवर्तले. पण त्यांचे काका श्री. शांतमूर्ती यांनी त्यांचेवर पुत्रवत प्रेम केले. श्री. बाबूरावांचे लग्नाचे वय होताच, त्यांचा सौ. सीताबाई नामक कन्येशी विवाह झाला. लग्नाला आठ वर्षे झाली तरी त्यांना संतती नव्हती. यासाठी या जोडप्याने इ.स.१९०७ साली श्रावणमासात केवळ पुत्रप्राप्तीसाठी सहस्रलिंगार्चन केले. त्याची समाप्ती दुर्गाष्टमीच्या दिवशी झाली आणि त्याच रात्री ''मी तुझ्या वंशात जन्म घेणार आहे'' असा देवीने श्रीबाबूरावांना दृष्टांत दिला. या दृष्टांताप्रमाणे काही दिवसातच सौ. सीताबाई या गर्भवती राहिल्या. या काळात त्यांना नामस्मरण करावे, भजन, कीर्तन ऐकत रहावे असे वाटू लागले. लवकरच नऊ महिने पूर्ण झाले आणि भाद्रपद शु. पंचमी (ऋषीपंचमी) शके १८३०, इ.स.१९०८ या दिवशी ब्राह्म मुहूर्तावर एक कन्यारत्न अवतरले. बाराव्या दिवशी या कन्येचे नामकरण करणेत आले. तिचे नांव 'रुक्माबाई' ठेवणेत आले. या रुक्माबाईंची जन्मवेळ कारवार येथील मंजुनाथ भट्ट या प्रसिद्ध ज्योतीषाला सांगितली असता, त्याप्रमाणे त्यांनी आडाखे बांधून सांगितले की, 'पत्रिका एकदम दुर्लभात दुर्लभ आहे. लाखामध्ये एखादी अशी पत्रिका आढळते. ही व्यक्ती बोलेल ते खरे होईल. तिच्या भोवती कायम बायकांचा घोळका असणार' इ. भविष्य त्यांनी वर्तवले. या रुक्माबाई घरातीला लोक लाडाने 'बाळ' म्हणू लागले. या बाळने आपल्या पहिल्या वाढदिवसाला 'हरि' हा शब्द पहिल्यांदा उच्चारला. यावरून या बाळाचे असाधारणपण सर्वांना जाणवू लागले.

वयाच्या ५ व्या वर्षापासून बाळ मराठी, हिंदी, कानडी भाषेतील भजने म्हणत असे. देवपूजेची तर तिला लहानपणापासूनच आवड होती. कृष्णमूर्ती तिला अत्यंत आवडत असे. ती मूर्ती मध्यभागी ठेऊन बाळ

त्या मूर्तीबरोबर खेळत असे. वयाच्या ७ व्या वर्षी बाळला शाळेत घातले गेले. वयाच्या ७ व्या वर्षीच बाळला पूर्णानंदस्वामीमहाराज (यतीराज) भेटले. या यतीराजांनी या बाळाचे अंगी असणारे सात्विक गुण ओळखले आणि त्यांनी आपल्या नित्य पूजेत असणारी गोपाळकृष्णाची मूर्ती बाळला दिली. पूर्णानंदस्वामींकडे एक विनायक नावाचे भटजी रहात होते. त्यांच्या बायकोचे डोके एकदम फिरले. अनेक उपाय केले, पण उपयोग होईना. शेवटी पूर्णानंद स्वामींनी सांगितले, 'येत्या सोमवारी तिच्या डोक्यावर बाळकडून पाच तांबे पाणी घाल.' याप्रमाणे त्या भटजीने केले असता, त्यांच्या बायकोचा त्रास हळू हळू कमी झाला.

वयाच्या १५ व्या वर्षी बाळचा विवाह दक्षिण कर्नाटकातील कडळूर येथील पोलीस इन्स्पेक्टर श्री. एम. राजगोपाल यांचेशी झाला. विवाह झाल्यावर वऱ्हाड सासरी निघालेले बघून बाळचे वडील श्रीबाबूराव म्हणाले, 'बाळ वाटेत सिद्धारूढ स्वामींचा मठ आहे. त्यांच्या दर्शनास जा. मग पुढे जा.' याप्रमाणे बाळने सिद्धारूढ स्वामींचे दर्शन घेतले. सिद्धारूढ स्वामींनी मस्तकावर हात ठेवला आणि 'ॐ नमःशिवाय' म्हणत जा असा आशीर्वाद दिला. पुढे वयाच्या १७ व्या वर्षी बाळला एक मुलगा झाला. त्याचे नांव बाळकृष्ण ठेवणेत आले आणि वयाच्या १९ व्या वर्षी त्या पुन्हा गर्भवती राहिल्या. पण अचानक त्यांचे पती राजगोपाळ यांचे निधन झाले. या घटनेमुळे तिचे मनावर खोल परिणाम झाला. पतीचा आधार गेला. त्यामुळे दोघा मुलांना सांभाळून आपल्याला भगवंताची सेवा करता येणार नाही. तेव्हा जगून उपयोग नाही, या विचाराने घराजवळील विहीरीत आत्महत्या करायला गेली. यावेळी तेथे एक जटाधारी साधू प्रगट झाला आणि म्हणाला, 'माई थांब, आत्महत्या करणेकरिता तू जन्माला आलेली नाहीस. जीव देणाऱ्यांना वाचविण्यासाठी तुझा जन्म आहे. तुझ्या दुःखाचा प्रलय होण्याची वेळ अगदी जवळ आलेली आहे. यापुढे तू कोणतीही काळजी करू नकोस. लवकर हुबळीला जा आणि सिद्धारूढ स्वामींच्या कृपेने तू उद्धरून जाशील.' एवढे बोलून तो साधू अदृश्य झाला. पुढे महिन्याभरात त्यांना दुसरा मुलगा झाला. त्याचे नांव कमलाकर ठेवले. तशातच त्यांचे वडील श्री.बाबूराव यांचे निधन झाले. हे सगळे पाहून बाळने एका वस्त्रानिशी घर सोडले आणि हुबळीला आली. तेथे पोहोचताच सिद्धारूढ स्वामी तिची वाटच बघत होते. स्वामींच्या आज्ञेने तिने मठात सेवा सुरू केली. मुखात कायम 'ॐनमःशिवाय' हा मंत्र होता. मठातील पडेल ते काम करुन, जे खायला मिळेल ते खाऊन, बाळने खडतर तपश्चर्या केली. बाळचा निष्ठाभाव, शुद्धभाव आणि कार्यतत्परता पाहून स्वामींनी इ.स.१९२८ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर तिचेवर अनुग्रह केला आणि बाळचे नांव 'कलावतीदेवी' ठेवले. आणि या कलावती आईंना निरूपण करण्याची आज्ञा केली. यावेळी कलावतीआईंनी 'नामसंकीर्तन साधन पै सोपे' या अभंगावर निरूपण केले. जेव्हा सिद्धारूढ स्वामींची कृपा झाली तेव्हा कलावतीआई या जवळ जवळ ८ तास

एका समाधी अवस्थेत होत्या. सिद्धारूढ स्वामींनी कलावतीआईंना 'मी आता लवकरच महाप्रयाण करणार आहे. त्यानंतर तू ६ महिने एकांतवासात राहून साधनाभ्यास कर आणि पुढे १२ वर्षांपर्यंत हरिनामाच्या प्रसारार्थ गावोगावी जा' अशी आज्ञा केली आणि मी सदासर्वकाळ तुझ्याच पाठीशी आहे असा आशीर्वाद दिला. पुढे लवकरच श्रावण वद्य प्रतिपदेला सिद्धारूढ स्वामींनी महाप्रयाण केले. स्वामींनी सांगितल्याप्रमाणे कलावतीआईंनी एकांतवासात ६ महिने खडतर तपश्चर्या केली. त्या परत हुबळीला मठात आल्या. यानंतर आईंनी अनेक लोककल्याणाची कार्ये केली. नामाची गोडी, धर्माची शिकवण दिली. यानंतर कलावतीआईंनी बेळगाव येथे 'हरिमंदिर'या साधना केंद्राची स्थापना केली. यानंतर आईंनी त्यांनी लिहिलेला 'परमार्थप्रदीपक' हा अभंग संग्रह प्रकाशित केला. त्यानंतर परमार्थ दर्शन, सिद्धारूढ वैभव, बोधामृत, बालोपासना, कथासुमनहार, श्रीकृष्णप्रताप इ. ग्रंथ प्रकाशित केले. शेकडो स्त्रियांना एकत्र करुन त्यांच्यात भजनाची गोडी निर्माण केली. आईंकडे सर्व जातीधर्माचे, पंथाचे लोक येत असत. सगळ्यांना परमार्थ मार्गाला लावणेचे कार्य त्यांनी केले. प्रपंच करुन परमार्थ कसा करायचा हेही कलावतीआईंनी शिकविले. आईंनी पदांना लावलेल्या चाली इतक्या सुंदर आहेत की, म्हणता म्हणता तो जीव त्या नादात गुंग होऊन जातो.

अशा कलावती आईंनी बेळगांव येथे माघ शु. प्रतिपदा शके १९०० म्हणजेच बुधवार दि.०८.०२.१९७८ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी देह ठेवला व त्या सिद्धारूढ स्वामींच्या स्वरूपात विलीन झाल्या.

***

प.पू. श्रीसद्‌गुरू भाऊसाहेबमहाराज उमदीकर

जन्म
चैत्र शु.९(रामनवमी) शके १७६५
इ.स.१८४३

निर्याण
माघ शु.०३ शके १८३६
गुरूवार दि.२९.०१.१९१४

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात उमदी हे गाव आहे. हे गाव महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांच्या सीमेवर आहे. या उमदी गावात देशपांडे घराणे हे परगणे वतनदार म्हणून प्रसिद्ध होते. या घराण्यात श्री. खंडेराव म्हणून उदार, सात्विक गृहस्थ रहात होते. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. भागीरथीबाई. या दांपत्याच्या पोटी चैत्र शु. नवमी (रामनवमी) शके १७६५ इ.स. १८४३ साली पुत्र जन्माला आला. या मुलाचे नांव 'व्यंकटेश' असे ठेवणेत आले. हे व्यंकटेश म्हणजेच आमचे श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर. त्यांना व्यंकोजी व भाऊराव अशी उपनावे होती.

श्रीभाऊसाहेबमहाराजांची मातृभाषा कन्नड, तथापि उमदी हा गाव जत या मराठी संस्थानात असलेने त्यांचे शिक्षण मराठीतूनच झाले. लहानपणापासून महाराज हे कुशाग्र बुद्धिचे होते. शाळेत पाठ शिकायला आठ-आठ दिवस लागत. पण महाराज हा पाठ एका दिवसात शिकत असत. लहानपणापासून ते उमदी येथील श्री मारुती मंदिरात जायचे आणि त्याची उपासना करायचे. महाराजांना थोरले श्री. यशवंतराव तथा दाजी आणि दुसरे मार्तंड ऊर्फ नानासाहेब असे दोन बंधु होते.

या मारुती मंदिरातच प.पू. सद्‌गुरू श्रीरघुनाथप्रिय श्रीसाधुमहाराज यांचे १२ वर्षे वास्तव्य होते. श्रीसाधुमहाराज या श्रीभाऊसाहेबांना रोज मारुतीची उपासना करीत असलेचे बघत. त्यांची सगुणभक्ती पाहून श्रीसाधुमहाराजांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांना नमस्कार केला. हे पाहून महाराजांचे श्रीसाधुमहाराजांकडे सहजच मन ओढले गेले. ''पडि घेऊनि उलथावे'' या वचनाप्रमाणे श्रीसाधुमहाराज श्रीभाऊसाहेबमहाराजांना निंबरगी येथे घेऊन आले. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांना आज्ञा केली की, तुम्ही श्रीभाऊसाहेबमहाराजांना अनुग्रह द्या. याप्रमाणे श्रीसाधुमहाराजांनी इ.स. १८५८ साली श्रीभाऊसाहेबमहाराजांना अनुग्रह दिला. यावेळी महाराजांचे वय अवघे १५ वर्षांचे होते. परंतु श्रीभाऊसाहेबमहाराज हे श्रीनिंबरगीकरमहाराजांनाच आपले गुरू मानत.

आपल्या चौसोपी वाड्यातील एक लहानशा खोलीत महाराजांनी आपला नेम सुरू केला. सद्गुरूंनी सांगितलेल्या उपासनेप्रमाणे त्यांनी त्रिकाळ नामस्मरण सुरू केले. दर गुरुवारी ते निंबरगीस श्रीमहाराजांच्या दर्शनास जात असत. कालांतराने निंबरगी येथील श्री.बाळकृष्ण पंडित यांची कन्या 'काशीबाई' यांचेशी महाराजांचा विवाह झाला. प्रपंचात राहून परमार्थ कसा साधता येतो हे महाराजांनी सर्व जगाला दाखवून दिले.

१८६२-६३ मध्ये श्रीमहाराजांच्या वडिलांचे निर्याण झाले. त्यामुळे घरातील सर्व जबाबदारी श्रीमहाराजांवर पडली. त्यांनी ही जबाबदारी अत्यंत नेटाने सांभाळली. इ.स.१८७३ साली महाराजांना कृष्णराव हा पुत्र झाला. इ.स. १८७५ साली रामचंद्र आणि इ.स. १८७७ साली भीमराव अशी तीन अपत्ये झाली व त्यानंतर इ.स. १८८१ साली गोदूताई ही मुलगी झाली.

श्रीभाऊसाहेबमहाराज हे रात्ररात्र साधना करीत असत. महाराजांनी राहत्या घरात फक्त स्वतःलाच उभे राहता येईल अशी दोन भिंतींमध्ये एक चिंचोळी जागा करवून घेतली होती. या दोन भिंतीमध्ये दोन्ही दंडाच्या उंचीवर दोन वासे टाकून, तेथे ते रात्री २ तास उभ्याने साधन करीत असत. अशी कठोर साधना महाराजांनी केली. एकदा श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना सांगितले, 'भाऊराया, तुझा गुरू चिमडला आहे, तेव्हा तू दरसाल त्याच्या समाधीचे दर्शन घेऊन येत जा.' त्याप्रमाणे श्रीभाऊसाहेबमहाराज दरवर्षी चिमडास जात.

श्रीभाऊसाहेबमहाराजांनी पुष्कळ साधन करून श्रीनिंबरगीकरमहाराजांची पुष्कळ सेवा केली. ही सेवा पाहून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना लोकानुग्रह करून परमार्थ वाढविण्याची आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणे महाराजांनी ४२ वर्षे साधन करून पूर्णता मिळविली आणि लोकोद्धाराचे कार्य सुरू केले. यादरम्यान इ.स. १८८५ साली श्रीनिंबरगीकरमहाराजांनी देह ठेवला.

सुरवातीस त्यांनी काही मोजक्याच व्यक्तींना अनुग्रह दिला. त्यामध्ये प.पू.श्रीशिवलिंगव्वा यांना लहान असताना बोलावून अनुग्रह दिला. त्यांनीही खडतर साधना करून, त्या आत्मानुभवी संत म्हणून प्रसिद्ध झाल्या. यानंतर १८९२ साली चैत्री पौर्णिमेला निंबरगी येथील ओढ्याच्या काठावर असणाऱ्या एका मंदिरात प.पू. श्रीअंबुरावमहाराजांना अनुग्रह दिला. यानंतर इ.स. १९०१ मध्ये प.पू. श्रीगुरूदेव रानडेसाहेब यांना महाराजांनी अनुग्रह दिला. याप्रमाणेच त्यांचे श्रीसिद्धरामेश्वरमहाराज, श्रीगिरीमल्लेश्वरमहाराज, श्रीरामरावमहाराज होर्ती, श्रीव्यंकटरावमहाराज अंजुटगी, श्रीसिद्धाळेंगय्यास्वामी इ. प्रख्यात शिष्य होऊन गेले.

श्रीनिंबरगीकरमहाराजांनी देह ठेवल्यानंतर गावातील ओढ्यानजीक असणाऱ्या जागेत महाराजांची समाधी बांधली. इ.स. १८८५ पासून इ.स. १९०० पर्यंत महाराजांचा पुण्यतिथी उत्सव उत्साहात होत असे. पण इ.स. १९०० साली गुरवांनी ही समाधी बुजवली. याचे श्रीभाऊसाहेबमहाराजांना वाईट वाटले. यावेळी श्रीनिंबगीकरमहाराजांनी दर्शन दिले आणि सांगितले की, ''कष्टी होऊ नकोस, माझे नाव घेऊन, इथली एक चिमुटभर माती घेऊन, मनात येईल तिथे समाधी कर. जयजयकारच होईल.'' या दृष्टांतानंतर श्रीभाऊसाहेबमहाराजांनी इंचगिरीला श्रीनिंबरगीकरमहाराजांची समाधी बांधली आणि इंचगिरी हे श्रीभाऊसाहेबमहाराजांचे मुख्य भक्तिकेंद्र ठरले. इ.स.१९०६ साली आमचे प.पू.श्रीमामामहाराज केळकर हे चिमडला गेले होते. तेथून ते सांगलीस परतत असताना तेरदाळला श्रीभाऊसाहेबमहाराज आलेले आहेत असे

त्यांना कळले. ते तेरदाळला गेले आणि त्यांनी महाराजांचे दर्शन घेतले. तेव्हा महाराजांनी आमच्या श्रीमामांना एक केळे प्रसाद म्हणून दिले आणि 'भक्तिचा थाट होईल' असा आशीर्वाद दिला.

इंचगिरीचा मठ स्थापन झाल्यावर महाराज एक नवस बोलले. ''निंबरगीकरमहाराजांची भक्ती चांगली वाढल्यास (भक्तिची वाढ होऊन भरभराट झाल्यास) मी आपल्या चरणी दंडवत घालत येईन.'' असा पांडुरंगाला त्यांनी नवस केला. त्याप्रमाणे इ.स. १९१० साली पंढरपूरला जाऊन महाराजांनी नवस फेडला. इ.स. १९१३ साली महाराजांची तब्येत बिघडली होती. त्यांनी देह ठेवणेचे ठरविले. परंतु श्रीअंबुरावमहाराजांनी आग्रह केलेने त्यांनी देह ठेवणेचा बेत रद्द केला.

इ.स. १९१४ साली उमदीस काही दिवस राहून महाराज पौष पौर्णिमेस परत इंचगिरीला आले. तेथे आल्यावर महाराजांची तब्येत पुनः बिघडली. तेव्हा एके दिवशी त्यांनी श्रीअंबुरावमहाराजांना बोलावून, '' अंबुराया, मी आता पायात चाळ बांधून वैकुंठास जाणार. आता पुन्हा तू आडवा येऊ नकोस अशी त्यांना निक्षून आज्ञा केली.'' हे ऐकून श्रीअंबुरावमहाराज म्हणाले, ''आपण इतक्या लवकर देह ठेवल्यास मठाची व्यवस्था कोण बघणार? भक्ति कोण वाढवणार? आम्ही काय करावे? त्याकरिता महाराज आपण काही दिवस राहिलेच पाहिजे.'' हे ऐकून श्रीभाऊसाहेबमहाराज म्हणाले, ''अंबुराया मठाची व्यवस्था पाहण्यास तू आहेस ना! तू आणि मी वेगळा नाही. नागाप्पाही (श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी) तुझ्याबरोबर आहे. आम्ही काळजी केली. कायम केली. मात्र भक्ति वाढविण्याचे काम भाविकच करीत आहेत. या करिता तू पुन्हा मला अडथळा आणू नकोस. तू इकडे येऊच नकोस. तुझ्या खोलीत जा. दार झाक. आडसर घाल आणि नामस्मरण कर. पुढे देव जशी बुद्धि देईल, तसे तू कर. एक लक्षात ठेव की, आकाशातून वीज अंगावर कोसळली तरी तुम्ही नाम सोडू नका. स्वस्थ नेम करीत बसा.'' हाच माझा संदेश आहे.

हे ऐकून श्रीअंबुरावमहाराज तेथून निघून आपल्या खोलीकडे गेले आणि साधनेत निमग्न होऊन राहिले. शेवटचे ११ दिवस महाराजांनी बोलणे सोडले. अन्न-पाणीही वर्ज्य केले. फक्त नामस्मरण सुरू होते. महाराजांची जीभ पडली, परंतु प्राणोत्क्रमण होईना हे पाहून श्रीअंबुरावमहाराज त्यांच्याजवळ बसले आणि त्यांनी दासबोधातील नामस्मरण समास वाचला. सर्वांनी भजन व आरती केली आणि ''राजाधिराज सद्‌गुरूनाथ महाराज की जय''अशी गर्जना केली. ही गर्जना ऐकून व कापराची ज्योत शांत झालेचे पाहून महाराजांनी एकदम टाळी वाजविली आणि माघ शु. ३ शके १८३६ गुरुवार दि. २९.०१.१९१४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी, रात्री ८.०० वाजता इंचगिरी येथे देह ठेवला.

***

प.पू.मातोश्री सौ. इंदिराबाई केळकर

निर्याण
माघ शु.०४ शके १८८४
(गणेश जयंती) इ.स.१९६३

बेळगाव जिल्ह्यातील कागवाड या गावात श्री. नागेश सिद्धेश्वर फाटक हे गृहस्थ रहात होते. त्यांचा वकिलीचा व्यवसाय होता. यांचे पोटी एक कन्यारत्न जन्माला आले. बारशा दिवशी या कन्येचे नाव 'रंगू' असे ठेवणेत आले.

या रंगूचे लग्नाचे वय झाले म्हटल्यावर श्री.नागेशपंतांनी वरसंशोधन करण्यास प्रारंभ केला आणि यथावकाश या रंगूचा सांगली येथील श्री. गोविंद अनंत केळकर तथा श्रीमामामहाराज यांचेशी कुरूंदवाड येथे, फाल्गुन पौर्णिमेला थाटाने विवाह झाला. सासरी या रंगूचे नाव 'इंदिरा' असे ठेवणेत आले. ह्या इंदिरा म्हणजेच आमच्या प.पू.श्रीमामामहाराजांच्या अधिकारसंपन्न पत्नी सौ. इंदिराबाई केळकर होत.

सौ. इंदिराबाई या महान पतिव्रता होत्या. त्या उकडीच्या मोदकासारख्या गोऱ्यापान होत्या. साक्षात त्या इंदिरादेवी होत्या. आपल्या पतीने अन्नग्रहण केल्याशिवाय त्या अन्नग्रहण करीत नसत. पतीचे सुख तेच आपले सुख व पतीचे दुःख हेच आपले दुःख असा त्यांचा आचार होता. सौ. इंदिराबाईंना इ.स.१९१२ साली कन्यारत्न झाले. ही कन्या म्हणजे लक्ष्मीचा अवतार होती. या केळकरांचे घरात लक्ष्मीला महत्व नसून, नारायणाला महत्व आहे हे लक्षात घेऊन, ही लक्ष्मीरूपी कन्या अकालीच निजधामाला गेली. याचे सौ. इंदिराबाईंना फार दुःख झाले. त्यानंतर ७ वर्षांपर्यंत सौ.इंदिरामातांना पुत्रप्राप्ती झाली नाही. याची त्यांचे सासरे गु. श्रीअनंतराव केळकर यांना फारच चिंता लागून राहिली. आपल्या मुलाला पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून काही व्रतवैकल्ये करावी का? असा विचार त्यांच्या मनात आला. यासाठी ते त्यांचे गुरू श्री. लक्ष्मण दीक्षित यांचे पौत्र श्री.शंकरभटजी नातू यांना विचारणेसाठी गेले. त्यांनी 'उपमन्युकृत शिवस्तवाचा' पाठ एक वर्ष करा म्हणजे तुमच्या मनाप्रमाणे तुम्हाला इप्सित साध्य होईल असे सांगितले. त्याप्रमाणे श्रीअनंतरावांनी माघ शु. ८ शके १८४१ इ.स. १९१९ पासून व्रतास प्रारंभ केला आणि त्याच वर्षी ते श्रीमामा आणि सौ. इंदिरामाता यांना बरोबर घेऊन रामेश्वरला जाऊन आले आणि आश्चर्य असे की सौ. इंदिरामाता या गर्भवती राहिल्या.

दरम्यानच्या काळात सौ. इंदिराबाईंचे मामा श्री.महादेवराव रानडे हे कुरुंदवाड गावी रहात होते. ते औरवाडच्या श्रीवजीरबाबांचे भक्त होते. त्यांनी श्रीवजीरबाबांना सांगितले की, 'माझ्या भाचीला अद्याप पुत्रप्राप्ती नाही.' हे ऐकून श्रीवजीरबाबा म्हणाले, 'महादेवा, तुझ्या भाचीची मुलगी ही लक्ष्मी होती. आपल्या आईच्या पोटी पुढे एक विष्णुभक्त जन्माला येणार म्हणून ती निघून गेली, शोक करू नको. असा तुझ्या भाचीला

माझा निरोप सांग. आता मी तुला एक खारीक देतो. ती तुझ्या भाचीला खावयास दे. तिच्या प्रभावामुळे तुझ्या भाचीला विष्णुभक्त असा पुत्र होईल.' ती खारीक घेऊन श्री.महादेवराव घरी आले आणि ती खारीक त्यांनी सौ. इंदिरामातेना खावयास दिली.

सौ. इंदिरामाता या गर्भवती असतानाच त्यांनी श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचेकडून अनुग्रह घेतला. अनुग्रहानंतर सौ. इंदिरामातेंनी नित्य साधन करण्यास प्रारंभ केला.

सौ. इंदिरामातेंना ७ वा महिना लागताच त्या प्रसुतीसाठी कुरुंदवाड गावी आपल्या श्री. महादेवमामांच्या घरी गेल्या आणि ७ व्या महिन्यातच श्रावण व.६ शके १८४२ गुरुवार दि.०६.०८.१९२० रोजी रात्री २ वा. १० मिनिटांनी सौ. इंदिरामाता प्रसूत झाल्या. त्यांना पुत्ररत्न झाले. हे पुत्ररत्न म्हणजेच 'राम गोविंद केळकर' तथा आमचे 'श्रीदासराममहाराज केळकर' होत.

इ.स.१९२३ साली श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना आपल्या घरी भोजनाचे आमंत्रण दिले. सौ.इंदिरामातांनी घरी पंचपक्वान्नांचा बेत केला होता. इतर पदार्थांबरोबर वाटीत कवडीचे दही वाढले होते. श्रीतात्यासाहेबमहाराज भोजन झाल्यावर घरी गेले आणि त्यांनी घरच्या मंडळींसमोर इंदिरामातेंनी वाढलेल्या दह्याची प्रशंसा केली. ते घरात म्हणाले की, 'आपल्या घरी इतके दूध-दुभते आहे, तरी आपल्या घरी असे दही होत नाही. दही कसे लावले आहे? हे तुम्ही इंदिराबाईंना विचारून या.' याप्रमाणे घरची मंडळी सौ. इंदिरामातेंना विचारायला आली. सौ.इंदिरामाता म्हणतात की, 'मी नेहमीसारखेच विरजण लावून दही केले होते. पण आम्ही या दह्यात आमचे प्रेम मिसळले होते, म्हणून ते दही महाराजांना जास्त आवडले.'

सौ. इंदिरामाता या रोज श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या कीर्तनाला जायच्या. आमच्या मामांनी त्यांना रोज बारा अभंग म्हणणेस सांगितले होते. याप्रमाणे सौ.इंदिरामाता या बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणायच्या. या बारा अभंगांच्या पठणामुळे त्यांना, 'श्रीतुकाराममहाराज सदेह वैकुंठास विमानात बसून चालले आहेत, जिजाबाई व श्रीरामेश्वरभट्ट ओणवे होऊन आश्चर्याने वर पहात आहेत व तुळशीच्या मंजिऱ्यांचा सुगंध सगळीकडे दरवळला आहे' असा दृष्टांत झाला आणि आश्चर्य म्हणजे श्रीरामनिकेतनमध्ये हा सुगंध साधनाचेवेळी बसलेल्या साधकांनाही आला होता.

एक दिवस इंदिरामाता आपल्या पतींना (मामांना) म्हणाल्या, 'अहो, मी साधनेला बसते ते बरोबर आहे का नाही ते बघा.' श्रीमामा हे पूर्ण अधिकारी असूनसुद्धा श्रीमामा त्यांना म्हणाले, तुला अनुग्रह कुणाचा आहे, त्यांना तू जाऊन विचार. त्याप्रमाणे एक दिवस सौ. इंदिरामाता या श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या घरी गेल्या. त्या महाराजांना म्हणाल्या की, 'महाराज, मी साधनेला बसते ते बरोबर आहे का नाही ते सांगा.' महाराज म्हणाले, 'बसून दाखवा.' त्याप्रमाणे सौ.इंदिरामातांनी त्यांना साधनेला बसून दाखविले. हे बघून

महाराज म्हणतात, 'आजपर्यंत मला कुणी हाच महत्वाचा प्रश्न विचारला नाही. तुम्ही करताय ते अगदी बरोबर आहे' आणि त्याच दिवशीच्या कीर्तनात महाराजांनी 'हुरूप आला सूर लागला । ऐटीत बसलो भजनाला ।।' या अभंगावर विवरण केले. साधनेला हुरूप असेल तर सूर लागतो, मग ऐटीत साधन (भजन) होते.

सौ. इंदिरामाता एकदा श्रीदादांना सहज म्हणाल्या, रामजी, तू कीर्तन, निरुपणात साधनाबद्दल खूप चांगले सांगतोस. पण तुला स्वतःला तरी जमेल कां नऊ नऊ तास साधन करायला? हे ऐकून दादांनी काहीच उत्तर दिले नाही. दुसरे दिवशी श्रीदादा हे घरच्या माडीवरील खोलीत मांडी घालून साधनेस बसले. दुपारी जेवणाला सुद्धा खाली आले नाहीत. हळूहळू संध्याकाळ झाली. मग मात्र सौ. इंदिरामातांना चैन पडेना. जीव खालीवर होऊ लागला. त्या वरती माडीवर गेल्या आणि म्हणाल्या, 'रामजी, तुझ्या साधनाबद्दल माझी आता खात्री झाली आहे. आता तू उठ बाबा आणि जेवायला चल' याप्रमाणे श्रीदादांनी ध्यान उत्थापन केले आणि खाली आले. सौ. इंदिरामातोश्रींनी श्रीमामांचेबरोबर रामेश्वर, चिमड, निंबरगी इ. यात्रा केल्या.

सौ. इंदिरामाता आणि आमचे मामा हे रात्री जेवण झाल्यावर मंदिरात येऊन बसत आणि ते श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या गोष्टी बोलायचे. त्यांना किती वेळ झाला हे कळायचेच नाही. सौ. इंदिरामाता यांना आपल्याला अहेवपणी मरण यावे अशी इच्छा होती. याबाबत त्या श्रीमामांना म्हणायच्या, मी वटसावित्रीचे त्रिरात्री व्रत केले आहे व नेहमीप्रमाणे दरवर्षी मी ते व्रत निष्ठेने करत आले आहे. त्यामुळे मीच आधी जाणार. त्यावर श्रीमामा म्हणायचे की, वटसावित्रीने पूर्वी एकदा तुझ्या व्रताचे फळ तुला दिले आहे त्यामुळे काही झाले तरी मीच आधी जाणार. त्यावर त्या म्हणायच्या, मला मरणाची भीती वाटते. मग मामा म्हणायचे, त्याची तू काळजी करू नको. तुला फक्त थोडी कळ सोसावी लागेल' आणि ही श्रीमामांची भविष्यवाणी खरी ठरली. इ.स.१९६२ रोजी श्रीमामांनी देह ठेवला. श्रीमामांच्या निर्याणानंतर मात्र इंदिरामातेंनी चांगलीच हाय खाल्ली. मुळातच जेवण कमी होते. ते आणखी कमी केले आणि 'मी एक वर्षाच्या आत जाणार' अशी त्यांनी प्रतिज्ञा केली.

श्रीमामांच्या निर्याणानंतर श्रीदादांनी मामांचे सिंहासन बसविले. ते बघण्याकरिता श्रीदादा, इंदिरामातेंना मंदिरात घेऊन आले. या सिंहासनावर श्रीमामांच्या नावे मजकूर कोरला आहे. हा मजकूर काय लिहिला आहे, तो तू वाच, असे श्रीदादा इंदिरामातेंना म्हणाले. इंदिरामाता मजकूर वाचू लागल्या. जेव्हा मजकुरात आपल्या पतीचे नाव आले, तेव्हा त्या नाव न वाचता पुढचे वाचू लागल्या. हे बघून श्रीदादा म्हणाले, आई तू मधले वाचले नाहीस. तेव्हा इंदिरामाता म्हणाल्या, 'ते नाव मला दिसत नाही' एवढ्या इंदिरामाता या पतिव्रता होत्या.

शेवटी शेवटी इंदिरामातेंची प्रकृती जास्तच खालावली. 'आता मला जगण्याची इच्छाच नाही.' असे त्या वरचेवर म्हणत. परंतु रोज बारा अभंग म्हणण्याचा नेम त्यांनी शेवटपर्यंत सोडला नाही. शेवटी बारा अभंग म्हणताना इंदिरामातांना धाप लागली. हे बघून श्रीदादा म्हणाले, आई आता राहू देत बारा अभंग, पुष्कळ वेळा म्हणून झाले. हे ऐकून इंदिरामाता म्हणाल्या, 'मग तू म्हण बारा अभंग, मग मी थांबते.' यावेळी त्यांच्याजवळ सौ. इंदिराबाई करंदीकर होत्या. शेवटी त्यांनी बारा अभंग म्हणताच, माघ शु. ४ (गणेश जयंती) शके १८८४ इ.स. १९६३ रोजी दुपारी ३.५० च्या सुमारास सौ. इंदिरामातेंनी देह ठेवला. सौ.इंदिरामातेंची अंत्ययात्रा ही बारा अभंग म्हणतच निघाली. त्यादिवशीही श्रीदादांनी आईच्या निर्याणाचे दुःख बाजूला सारून नित्याचे कीर्तन केले.

***

श्रीदासराममहाराज कृत इंदिराबाई केळकर (श्रीदासरामांची माता)यांची आरती

हनुमत् सद्गुरूंची कृपा तुवा झाली ।
साधनी या रत होऊनी अखंडची ठेली ।
आहार थोडा असुनी पतिसेवा केली ।
गोविंद पती लाभे भली भाग्यशाली ।।१।।
जय देवी जय देवी इंदिरा माते ।
ओवाळू आरती तुजला गुणवंते ।।ध्रु।।
बारा अभंग तेरा वेळा तू म्हणसी ।
विठ्ठलदर्शन तुजला धन्य धन्य होसी ।
अभिष्ट साधुनी मनीचे गुरुपदी या वससी ।
दासराम हा वंदीत तव पदकमलासी ।।२।।

प.पू.सद्‌गुरू श्रीगोविंद अनंत ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर

जन्म
फाल्गुन श. १० शके १८१०
इ.स.१८८८

निर्याण
माघ शु.९ शके १८८४
दि.१२.०२.१९६२

रत्नागिरी जिल्ह्यातील या तालुक्यात नेवरे/वाडा ढोमकळे हे गाव आहे. हे केळकर घराण्याचे मूळ गाव होते. येथूनच काही ना काही कारणांनी केळकर कुटुंबातील लोक बाहेर पडले आणि इतरत्र गावोगावी वसतीस गेले. केळकर कुळाचे गोत्र शांडिल्य, वेद ऋग्वेद, शाखा शाकल, सूत्र अश्वलायन असे आहे. सोमेश्वर आणि बंदीजाई (बांदेश्वरी) या मुख्य देवता या कुळाच्या आहे. पण केळकर कुटुंबाची जसजशी ग्रामांतरे आणि स्थलांतरे होत गेली, तसतशी त्या गावच्या स्थानाच्या देवता या केळकर घराण्याच्या कुलदेवता बनत गेल्या. स्थानांतर करता करता केळकर कुळातील एक कुटुंब, कोकणातीलच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, मालवण तालुक्यातील आचरे या गावी वास्तव्यास आले. येथे आल्यावर या कुटुंबात रामेश्वर, रवळनाथ, पावणाई, ब्राह्मणदेव, गांगो, नवलाई आणि सातेरी व बांदेश्वरी यांचा कुलदेवतामध्ये समावेश झाला. आचरे येथील केळकरांपैकी गंगाधर नावाचे गृहस्थ सांगली गावी रहाण्यास आले. केशव हे या केळकर घराण्याचे मूळ पुरूष असून, श्री. गंगाधर हे पाचव्या पिढीतील गृहस्थ आहेत. श्री. गंगाधर गोविंद केळकर हे धार्मिक स्वभावाचे होते. दररोज स्नानसंध्या, गायत्रीमंत्र जप, इतर जपजाप्य ते करीत असत. यांच्या पत्नीचे नांव सौ. पार्वती होते. सांगलीस वसतीस आल्यावर गंधाधररावांनी कवड्यांचा व्यापार सुरू केला आणि या व्यापारात त्यांचा चांगला जम बसला. या गंगाधर आणि पार्वती दांपत्याच्या पोटी इ.स. १८६० साली पुत्र झाला. त्याचे नांव 'अनंत' ठेवणेत आले. या अनंताला घरातले लोक प्रेमाने नाना म्हणायचे. या नानांचे शिक्षण मराठी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत झाले होते. शिक्षणानंतर ते सांगली संस्थानातील एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या कार्यालयात नोकरीस लागले आणि लौकरच ते हेडक्लार्क झाले. श्रीनानांनी सांगली येथील प्रसिद्ध वे.शा.संपन्न असणाऱ्या श्रीलक्ष्मण दीक्षित यांचेकडून पार्थिव पूजा घेतली. ते रोज 'ॐ नमःशिवाय' या मंत्राचा १२,००० जप करीत असत. श्रीनानांनी प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेकडून उपदेशानुग्रह घेतला. श्रीनानांचा विवाह हा हरिपूर येथील श्री. परशुरामपंत फडके यांच्या 'यमू' नामक कन्येशी झाला. हिचे राधा असे नाव ठेवणेत आले. या दांपत्याचे पोटी सुरवातीला गंगू नामक कन्या झाली आणि त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे फाल्गुन शु. दशमी शके १८१० म्हणजे इ.स.१८८८ साली बेळगाव जवळील कळखांबे या गावी गायीच्या गोठ्यामध्ये पुत्र अवतीर्ण झाले. बारशादिवशी या मुलाचे नांव 'गोविंद' असे ठेवणेत आले. हा गोविंद म्हणजेच आमचे '**प.पू.सद्‌गुरू श्रीगोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर**' होत. मामामहाराजांची बहिण गंगू यांची मुले त्यांना मामा म्हणू लागले. हेच नाव पुढे रूढ झाले.

श्रीमामा हे ३-४ वर्षांचे असतानाच त्यांची आई सौ.राधाबाई यांचे निर्याण झाले. म्हणून श्रीमामांच्या वडिलांनी तासगांव येथील आगरकर यांच्या घरातील लक्ष्मी नामक कन्येशी विवाह केला. श्रीमामांनी वयाच्या ७ व्या वर्षी शाळेत प्रवेश केला. वयाच्या ८व्या वर्षी उपनयन संस्कार झाला आणि त्याप्रमाणे ते नित्य संध्या,

देवाची पूजा अर्चा करू लागले. याबरोबरच त्यांनी दासबोध, रामायण, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांचे पठण सुरू केले. शालेय शिक्षण सुरू असतानाच त्यांनी मारुतीची उपासना सुरू केली. पुढे त्यांनी विटेवर ११ मारुती कोरले. मारुतीची उपासना या दृष्टीने त्यांनी तालीम करुन शरीर कमवायला सुरवात केली. रोज ते १२०० सूर्यनमस्कार घालायचे. पुढे श्रीमामा हे इंग्रजी सातव्या (म्हणजे मॅट्रिक) इयत्तेपर्यंत पोहोचले. याचवेळी त्यांनी ड्रॉईंगच्या परीक्षा दिल्या आणि ते थर्ड इयर ट्रेन्ड झाले होते.

एक दिवस श्रीमामांना कळले की, श्रीगोंदवलेकरमहाराज हे मिरजेहून आपल्या गावी रेल्वेने जाणार आहेत. याप्रमाणे श्रीमामा हे वाटेत लागणाऱ्या बुधगाव स्टेशनवर गेले. स्टेशनवर महाराजांच्या दर्शनासाठी बरेच लोक जमले होते. गर्दीतून वाट काढत आमचे मामा महाराजांजवळ पोहोचले आणि आमच्या मामांनी गोंदवलेकरमहाराजांच्या कमरेला घट्ट मिठी मारली. आपली आई आपल्याला भेटली असे त्यावेळी मामांना वाटून गेले. मामांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेऊन दर्शन घेतले. महाराजांनी मामांच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हटले, 'बाळ, देवाचे नाव घ्यावे, अंगारा लावावा, तीर्थ घ्यावे' आणि महाराज एकदम म्हणाले, 'हा मुलगा पुढे महासाधु होणार आहे' हे श्रीगोंवलेकरमहाराजांचे शब्द भविष्यात खरे ठरले.

यानंतर सांगली गावात प्लेगची साथ आली, म्हणून आमचे मामा हे आपले वडिलांसमवेत मिरजेला रहायला गेले. पण तिथेही प्लेगने मामांना गाठले. त्यांच्या काखेत प्लेगच्या दोन-तीन गाठी उठल्या. पण यावेळी मामांची सावत्र आई माई या मामांच्या मादतीला धावून आल्या. या माईंनी देवांना पाण्यात ठेवले आणि म्हणाल्या, 'देवा माझा एकुलता एक पुत्र बापू (मामा), या प्लेगमधून वाचू दे. मी माझे आयुष्य त्याला देणेस तयार आहे.' आश्चर्य असे की माईंचे गाऱ्हाणे देवाने ऐकले आणि आमचे मामा प्लेगमधून बाहेर आले. यावेळी आणखी एक घटना घडली. श्रीमामा हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे उपासक होते. त्यांचेवर मामांची आत्यंतिक निष्ठा होती. श्रीमामांनी घरच्या लोकांना सांगितले की, माझ्या उशाशी ज्ञानेश्वरमहाराजांचा फोटो ठेवा. बाकी काही करु नका. आश्चर्य असे , प्लेगच्या दुखण्यात मरणोन्मुख अवस्थेत असताना मामांना असे दृश्य दिसले की, मामांचा जीव धरती सोडून वर वर चालला आहे. समोरून एक तेजस्वी यतीपुरुष आले आणि म्हणाले, 'अरे बाळ, तू इकडे कसा येत आहेस? तुझे इकडे काम नाही. तुझे पृथ्वीतलावरचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे तू आलास तसा परत जा.' आश्चर्य असे की, श्रीमामांच्या देहात चेतना निर्माण झाली.

श्रीमामांना सांगलीच्या मुन्सफ कोर्टात नोकरी मिळाली. त्याप्रमाणे ती इमाने इतबारे बजावू लागले. लग्नाचे वय झाले म्हटल्यावर श्री.अंताजीपंत मामांच्या 'लग्न करुन घे', म्हणून मागे लागले. मामांच्या मनाची धारणा होती की लग्न केले तर आपले हातून परमार्थ घडणार नाही. त्यामुळे मामा लग्नाला कायम नकार देत होते. पण अंताजीपंत जेव्हा सारखे मागे लागले, तेव्हा त्यांनी एक अट घातली. ते आपल्या वडिलांना म्हणाले, 'नाना, मी आळंदीला जातो. ज्ञानेश्वरमहाराजांना या लग्नाबाबत विचारतो आणि ते लग्न कर म्हणाले, तर मी लग्न करतो.' हा पर्याय मामांनी काढला. याप्रमाणे श्रीमामा हे आळंदीला गेले आणि तेथील पिंपळाच्या पारावर ज्ञानेश्वरी पारायणाला बसले आणि साक्षात् ज्ञानेश्वरमहाराज नाथपंथी वेषात प्रगट झाले आणि विचारले, 'बाळ तू का आला आहेस?' तेव्हा मामांनी त्यांना सांगितले की, 'मी लग्न करू की नको हे

विचारण्यासाठी तुमच्याकडे आलो आहे.' हे ऐकून ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, 'बाळ, आई-वडील म्हणत आहेत त्याप्रमाणे तू लग्न करुन घे. तुला योग्य गुरूची गाठ पडेल आणि तुझा प्रपंचात परमार्थ कळसाला जाईल.' असा आशीर्वाद दिला. तो दिवस होता शालीवाहन शके १८२६, पौष शु.६, बुधवार. त्या दिवशी आणखी एक विशेष घटना घडली. ती म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीमामांना ज्ञानेश्वरी पोथी, पादुका व शंकराची पिंड अशा प्रासादिक वस्तु दिल्या. ही प्रासादिक ज्ञानेश्वरी जुन्या पद्धतीची सुट्या पानांची असून, बोरूने सुवाच्य अक्षरात लिहिलेली आहे. या ज्ञानेश्वरीच्या पहिल्या पानावर या घटनेसंबंधी स्वतः श्रीमामांनी नोंद करून ठेवली आहे. (यामध्ये मिळालेली पिंड, पादुका कशा आहेत ते लक्षात येण्यासाठी श्रीमामांनी हाताने चित्रेही काढली आहेत. पिंड व पादुका देवात पूजेमध्ये असून, ज्ञानेश्वरीची पोथी श्रीरामनिकेतन येथे जतन करून ठेवली आहे.) तो मजकूर असा :-

श्री शालीवाहन, शके क्रोधी १८२६ पौष शु.६, बुधवारी प्रदोषकाली श्रीज्ञानेश्वर येऊन सर्व दोषातून मुक्त करून घबाड मुहूर्ती प्रदोषकाली 'विठ्ठली, विठ्ठलाचा राम राम राम' हा मंत्र दिला व माळीका श्री आदिशिवानाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गैणीनाथ, निवृत्तीनाथ, ज्ञाननाथ होय. पायातील खडावा व पिंडीही पूजेस दिली. रोज ११०० जप करणेस सांगितले आहे. तो करीत जाईन.

।। गोविंद ।।

याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आशीर्वाद घेऊन मामा सांगलीस आले. पुढे त्यांचा इंदिरा नामक कन्येशी विवाह झाला. श्रीमामांनी सिटी हायस्कूल येथे नोकरी पत्करली. तेथे ते ड्रॉईंग या विषयाबरोबरच मराठी, सायन्स आणि नीतीशास्त्र शिकवू लागले. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे सांगलीत नित्य कीर्तन करायचे आणि त्यांच्या कीर्तनास साथीला आमच्या श्रीमामांचे वडील श्रीनाना जायचे. त्यांचेबरोबर श्रीमामाही कीर्तनाला जावू लागले. श्रीनानांना श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह होता. आपणही त्यांचा अनुग्रह घ्यावा असे मामांना वाटले. त्याप्रमाणे श्रीमामा श्रीतात्यासाहेबमहाराजांना विचारायला गेले. तेव्हा श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणाले, 'बापूराव तुम्ही माझ्याकडे अनुग्रहाकरता आलात खरे, पण तुमचे पूर्वनियोजित सद्गुरू चिमडला आहेत. त्यांचेकडे जावा आणि त्यांच्याकडून अनुग्रह घ्या. साधनेत काही शंका, अडचणी आल्या तर त्याचे निवारण मी करेन.' या आज्ञेप्रमाणे श्रीमामा हे चिमडला गेले. श्रीनारायणमहाराज तेथे होते. त्यांनी मामांना विचारले, 'बापूराव, कां आला आहात?' तेव्हा श्रीमामा म्हणाले, 'मी का आलो आहे हे तुम्हाला सगळे माहित आहे.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'अनुग्रह घेणेकरता आला आहात ना?' मामा 'हो' म्हणाले आणि त्याच दिवशी श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह श्रीमामांना प्राप्त झाला. तो दिवस होता माघ वद्य द्वितीया इ.स. १९०८. श्रीनारायणमहाराजांनी सांगितलेप्रमाणे श्रीमामा हे साधन करु लागले.

इ.स.१९१३ साली श्रीमामांना एक कन्या झाली. पण ती फार काळ राहिली नाही. लवकरच निवर्तली. याचे सौ. इंदिरामातांना फार दुःख झाले. सौ. इंदिरामातेंचे मामा श्री.महादेव रानडे हे औरवाडच्या वजीरबाबांचे भक्त होते. त्यांनी ही घडलेली घटना श्रीवजीरबाबांच्या कानावर घातली. तेव्हा वजीरबाबांनी एक खारीक महादेवरावांना दिली आणि ती खारीक प्रसाद म्हणून सौ. इंदिरामातेना ग्रहण करणेस सांगितले व म्हणाले,

'तिच्या पोटी महान विष्णुभक्त जन्माला येणार आहे. काळजी करु नकोस.' याप्रमाणे सौ. इंदिरामातेने खारीक ग्रहण केली. याच दरम्यान सौ. इंदिरामातेंना इ.स. १९२० च्या वैशाख महिन्यात श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा अनुग्रह प्राप्त झाला. सौ. इंदिरामाता परत गर्भवती राहिल्या आणि त्या ६ व्या महिन्यात कुरूंदवाड येथे आपले माहेरी बाळंतपणासाठी गेल्या. ७ व्या महिन्यात त्या प्रसूत झाल्या. श्रावण वद्य षष्टी शके १८४२ गुरूवार दि.०६.०८.१९२० रोजी त्यांना पुत्ररत्न झाले/ विष्णुभक्त अवतीर्ण झाला. हे पुत्ररत्न म्हणजे '**श्रीदासराममहाराज केळकर**' होत.

इ.स.१९२४ साली प.पू.सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांनी महाप्रयाण केले. श्रीमामा हे माघ महिन्यातील वद्य पक्षात दासबोधाचे पारायण करीत असत. **माघ वद्य प्रतिपदा इ.स.१९२४** साली श्रीमामांनी नित्य कीर्तन करणेस प्रारंभ केला. या दिवशीचे कीर्तनास फक्त एक श्रोता होता आणि तो म्हणजे श्री. गोपाळराव रानडे. श्री. गोपाळराव हे श्रीमामांचे विद्यार्थी होते आणि या दिवशी श्रीमामांनी '**रामकथा रस पी प्राण्या**' या श्रीमध्वमुनीश्वरांचे अभंगावर कीर्तन केले आणि यातच सगळा कीर्तनाचा लेखाजोखा मांडला. दोन दिवसांनी म्हणजे माघ व. ३ इ.स. १९२४ हा दिवस उजाडला. श्रीमामा दासबोध पारायणाला बसले आणि बरोबर रात्री १२ वाजता साक्षात् श्रीतात्यासाहेबमहाराज प्रगट झाले. श्रीमामांनी त्यांना बसायला शालजोडी दिली आणि त्यावर श्रीमहाराज बसले आणि म्हणाले, 'बापूराव तुमचे वाचन असेच पुढे सुरू राहू दे, मी बसून ऐकतो.' याप्रमाणे श्रीमामांनी त्यांचे समोर ७-८-९ असे तीन दशक वाचले. वाचन पूर्ण झालेवर श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चरणावर लोळण घेतली. हे बघून श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणाले, 'बापूराव, काय इच्छा आहे?' तेव्हा श्रीमामा म्हणाले, 'महाराज, मी माघ वद्य प्रतिपदेपासून कीर्तन करणेस प्रारंभ केला आहे. आपल्या नित्यकीर्तनाप्रमाणे माझेही हातून नित्यकीर्तन घडावे, एवढीच इच्छा आहे.' हे ऐकून श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणाले, 'बापूराव तुमचे हे कीर्तन माझेप्रमाणे अखंडत्वाने चालेल.' हा आशीर्वाद दिला आणि महाराज अदृश्य झाले.

याप्रमाणे आमचे श्रीमामांनी अत्यंत निष्ठेने आणि श्रीतात्यासाहेबमहाराजांची आज्ञा म्हणून अखंड ३८ वर्षे कीर्तन केले. कीर्तन हा श्रीमामांचा प्राण होता. श्रीमामांचे अंगी मूलतःच नम्रता होती. नम्रतेचे मूर्तीमंत प्रतिक म्हणजे आमचे श्रीमामा होते. अंगी नम्रता असणे हे पूर्णस्थितीला पोहोचण्याचे कारण आहे. याप्रमाणे श्रीमामा हे परमार्थात पूर्णस्थितीला पोहोचले होते. साधनेबरोबरच कीर्तन आणि कीर्तनाबरोबर साधन हे दोन्हीही त्यांनी साधले. म्हणून ते पूर्णस्थितीला पोहोचले आणि याचा निर्वाळा बुधगावच्या श्रीगुंडुबुवांनी दिला.

कालांतराने श्रीमामांना मधुमेहाचा विकार झाला. त्यामुळे प्रकृती थोडी क्षीण होऊ लागली. हा काळ साधारणतः १९६० चा होता. श्रीमामांना पाठीच्या मणक्यातील क्षय झाला. त्यातच मामांना मुत्रपिंडात कॅन्सरची लक्षणे दिसू लागली. लोक मामांना विचारायचे की, मामा तुमची तब्येत कशी आहे? तेव्हा मामा म्हणायचे, 'जोपर्यंत माझे कीर्तन सुरू आहे, तो पर्यंत चांगली आहे.' श्रीमामांच्या अशा विकल परिस्थितीत इ.स. १९६२ हे वर्ष आले. दरवर्षी पौषामध्ये श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथी पर्वकाळात कीर्तन असायचे. तसा

तो उत्सव आला. पण तेथे जाऊन कीर्तन करणे मामांना अशक्य होते. पण श्री.गंगाधरकाकांच्या असणाऱ्या अतीप्रेमामुळे गंगाधरकाका घरी आले आणि म्हणाले, 'बापूराव तुम्ही समाधीत आले पाहिजे. तुम्हाला अगदी फुलासारखे उचलून नेतो.' तो षष्ठीचा दिवस होता. श्री.गंगाधरकाका, श्री.सोनोपंत लागू, श्री.शंकरराव ताम्हनकर इ. मंडळी घरी आली आणि त्यांनी मामांना एका खुर्चीवर बसवले आणि खुर्चीसह हनुमान समाधी मंदिरात गेले. तेथे गेल्यावर मामांनी कीर्तन सुरू केले आणि तिथेच मामांना एक अभंग स्फुरला :-

अहो हनुमंत षष्ठी । करती स्वानंदाची पुष्टी ।।१।।
षडैश्वर्य देऊन । करिती भक्तांचे रक्षण ।।२।।
गोविंदासी नेमी । आणती गंगाधर स्वामी ।।३।।

या अभंगावर श्रीमामांनी कीर्तन केले. यावेळी मामांचा चेहरा श्रीतात्यासाहेबमहाराजांसारखा काही जणांना दिसला. पौषानंतर माघ महिना उजाडला. एकवर्षापासून श्रीमामा दररोज कीर्तनाची टिपणे काढत होते. शनिवार माघ शु., सप्तमी आणि रविवार माघ शु. अष्टमी या दोन दिवसांची टिपणे लिहून झाली. सोमवार, माघ शु. नवमीला कीर्तनासाठी पुढील अभंग सांगितला :-

मूळ स्वभाव गुरूनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।
अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ।।२।।
गोविंद म्हणे स्वस्वभाव । जीवा सोडी रे अभाव ।।३।।

पण या अभंगाची टिपणे श्रीमामांनी सांगितली नाहीत. तेव्हा तिथे कु. शरयू उपळावीकर होत्या. त्या टिपणे लिहायच्या. त्यांनी मामांना विचारले, 'मामा, या अभंगावरील टिपणे सांगा की?' तेव्हा मामा म्हणाले, 'या अभंगाचे रामजी विवरण सांगेल.' माघ शु. अष्टमीला मामांना गादीवर बसून कीर्तन करता येईना. तेव्हा त्यांनी गादीवर झोपल्या स्थितीत कीर्तन केले. माघ शु. नवमीचा दिवस उजाडला. सकाळी ६ वाजता नाड्या सुटल्या होत्या. डॉक्टर तब्येत बघायला आले. तेव्हा त्यांनी सांगितले की, बापूराव जास्तीत जास्त दु. २ वाजेपर्यंत राहतील. पण सायंकाळचे पाच वाजले मात्र, कीर्तनाची वेळ झाली म्हटल्यावर मामांनी मान वर केली आणि सगळ्यांना **श्रीराम जयराम जयजयराम** म्हणणेस सांगितले. श्रीमामा इतक्या मोठ्यांदा म्हणाले की, अंगणातील विहीरीपर्यंत बसलेल्या भक्तांना तो आवाज ऐकू आला आणि **'श्रीराम जयराम जयजयराम'** हा कीर्तनातील शेवटचा संदेश दिला. रात्री श्रीदादा हे श्रीमामांचेजवळ बसूनच होते. श्रीदादांनी श्रीमामांचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले आणि रात्री ११.५० वाजले मात्र, श्रीमामांनी माघ शु.नवमी, शके १८८४, सोमवार दि.१२.०२.१९६२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी महाप्रयाण केले आणि ते श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या स्वरूपात विलीन झाले.

***

प.पू.सद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर





प.पू.सद्गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर आणि प.पू.मातोश्री सौ. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे पोटी ज्येष्ठ शु. १० शके १८०७ म्हणजेच इ.स. १८८५ साली पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बारशा दिवशी या मुलाचे नांव 'नारायण' ठेवणेत आले. हे नारायण म्हणजेच आमचे 'प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर' होत.

श्रीनारायणमहाराज हे ज्यावेळी माईसाहेबांच्या उदरात होते, त्यावेळी त्यांच्या मातोश्री श्रीमाईसाहेबांना श्रीनिंबरगीकरमहाराजांचे साक्षात दर्शन झाले होते. तसेच इ.स.१८८५ सालीच श्रीनिंबरगीकरमहाराजांनी देह ठेवल्यामुळे त्यांचेच 'नारायण' हे नाव, यांना ठेवणेत आले.

वयाच्या ६ व्या वर्षी म्हणजेच इ.स.१८९१ साली वैशाख शु.५ या दिवशी श्रीनारायणमहाराजांचा व्रतबंध झाला. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे वकिली करणेकरिता बेळगाव येथे राहिले होते. त्यांनी इ.स. १८९३ साली श्रीनारायणमहाराजांना विद्याभ्यासासाठी बेळगावला आपले जवळ ठेऊन घेतले. याठिकाणी राहून श्रीनारायणमहाराजांनी ४ वर्षे विद्याभ्यास केला. इ.स.१८९७ च्या ऑगस्ट महिन्याच्या प्रारंभी श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी एका इसमाला बेळगावला पाठविले व श्रीनारायणमहाराज यांना चिमडला घेऊन येण्यास सांगितले. श्रीनारायणमहाराजांना चिमडला का घेऊन येण्यास सांगितले हे पुढील घटनेवरून लक्षात येते. आश्विन शु. ३ इ.स. १८९७ रोजी चिमड येथे श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी देह ठेवला.

श्रीलक्ष्मीबाईअक्कांनी अधिक शिक्षणाकरता व मुख्यतः उपदेशानुग्रहाकरता श्रीनारायणमहाराजांना बत्तीस शिराळा येथे चिमडमहाराजांचे पुतणे श्रीबळवंतराव यरगट्टीकर यांचेकडे पाठविले. या श्रीबळवंतराव यरगट्टीकर यांनी श्रीनारायणमहाराजांना उपदेशानुग्रह दिला. श्रीबळवंतराव हे श्रीनारायणमहाराजांकडून सातत्याने साधनाचा अभ्यास करून घेत. त्यांना चिमडास जाण्यास परवानगीही ते देत नसत. काही काळानंतर श्रीनारायणमहाराज हे चिमडास आले. येथे आल्यावर ते चिमडमठाच्या जवळच एक टेकडी आहे. तेथे अलमप्रभूचे देवस्थान आहे, तेथे जाऊन ते साधन करीत.

श्रीनारायणमहाराजांचे लग्नाचे वय झाल्यावर त्यांचा विवाह करण्यात आला. त्यांचे दोन विवाह झाले. पहिल्या पत्नीपासून एक मुलगी झाली. तिचे नाव अंबूताई असे होते. ती श्रीतात्यासाहेबमहाराजांचे भाचे श्री. बापूराव शामजी कुलकर्णी यांना विवाहात दिली होती. श्रीनारायणमहाराजांची पहिली पत्नी अकाली निवर्तली. तेव्हा महाराजांनी दुसरा विवाह केला. त्याकाळी तेरदाळ गावी श्री.रामाप्पा बेळगळी या

नावाचे वकील रहात होते. त्यांना गंगाबाई नावाची कन्या होती. यांचेशी श्रीनारायणमहाराजांचा दुसरा विवाह झाला. या पत्नीपासून त्यांना प्रथम कमल नावाची मुलगी व श्रीरामचंद्र ऊर्फ बाबूराव अशी अपत्ये झाली. त्यानंतर महाराजांना श्रीविश्वनाथराव ऊर्फ पंडितराव, श्रीबळवंतराव, श्रीनीलकंठराव, श्रीगंगाधरराव आणि श्रीसदाशिवराव असे पुत्र झाले.

श्रीदाजीसाहेबमहाराज यांनी इ.स.१९०० मध्ये देह ठेवला. त्यानंतर श्रीनारायणमहाराज हे चिमड मठाचे मठपती झाले. मठपती झाल्यानंतर त्यांचेकडे अनेक स्त्रिया व पुरुष अनुग्रहाकरिता येऊ लागले. तेव्हा पुरुषांना ते स्वतः अनुग्रह देत व स्त्रियांना श्रीमाईसाहेबमहाराजांकडून अनुग्रह घेणेस सांगत. श्रीनारायणमहाराज अनेकदा म्हणत की, 'मला चिमडसंप्रदाय संख्येने वाढवायचा नाही. संख्या महत्वाची नसून, अभ्यासू साधक संप्रदायात तयार होणे हे महत्त्वाचे आहे. या चिमड मठाचे ऐहिक वैभवसुद्धा मला हवे तेवढे वाढविता येईल, पण मला तसे मुळीच करायचे नाही. कारण ऐहिक वैभवाकडे, डामडौलाकडे लक्ष लागले की परमार्थ हा गौण होऊ लागतो.' पूर्वकालीन संतांनी केलेल्या चमत्काराबद्दल श्रीनारायणमहाराज म्हणाले की, 'चमत्काराने परमार्थात फारसे काही साध्य होत नाही.' ते नेहमी म्हणत, 'परमार्थात काहीही न करता जर कोणास काही मिळत असेल, तर खुशाल मिळू दे. पण साधन करून करून माझ्या पायाला मात्र घट्टे पडले आहेत, तेव्हा मला थोडी प्राप्ती झाली.' श्रीनारायणमहाराज हे शिष्य, सज्जन लोकांकडून कधीही सेवा करून घेत नसत. ते साधा नमस्कारही करून घेत नसत. श्रीनारायणमहाराज म्हणायचे, 'खरे बोलायचे तर हे महाराजपण मला मनापासून नको होते, पण आमचे वडीलबंधू श्रीदाजीसाहेब यांनी लवकर देह ठेवलेने ही जबाबदारी माझे शिरावर आली आहे.'

मुंबईचा एक गृहस्थ चिमडला आला, तेव्हा श्रीनारायणमहाराज हे शेतातून नुकतेच आले होते. डोक्यावर कडब्याचा भारा आणि खांद्याला भोपळे अडकवले होते. या गृहस्थाने श्रीनारायणमहाराजांनाच विचारले, महाराज कुठे आहेत? कारण एकंदरित महाराजांचा वेष पाहता, त्याला हे महाराज असतील असे जरासुद्धा वाटले नाही. श्रीनारायणमहाराजांनी सांगितले, 'आत आहेत.' हे ऐकून तो गृहस्थ मठात आला. समोर श्रीचिमडच्यामहाराजांचा फोटो, पादुका, डाव्या बाजूस श्रीसाधुमहाराजांच्या पादुका व फोटो दिसला आणि तेथून तो परत महाराजांच्या जवळ आला आणि म्हणाला, 'आत महाराज दिसत नाहीत.' तेव्हा श्रीनारायणमहाराज म्हणाले, 'आत आहेत, तेच महाराज आहेत आणि मी त्यांचा सेवक आहे.'

गुरुद्वादशी ते पांडव पंचमी असा चिमडमठात उत्सव असतो. या उत्सवात रात्री कीर्तन करण्याचा मान श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना होता. त्यांनी देह ठेवल्यावर श्रीनारायणमहाराज हे कीर्तन करु लागले. ते बरेचवेळा 'करी सार्थक या जीवाचे' या अभंगावर कीर्तन करीत. या उत्सवाला निंबरगीचे श्रीनागप्पाण्णामहाराज नीलवाणी हे येत असत. ते जोपर्यंत मठात असत, तोपर्यंत ते कुणालाही नमस्कार करून देत नसत आणि जो कोणी अनुग्रह मागायला आला तर त्या व्यक्तीस ते श्रीनागप्पाण्णामहाराजांकडे अनुग्रहाकरिता पाठवित.

इ.स.१९२२ साली श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे निंबरगी यात्रेला गेले होते व इकडून म्हणजेच चिमडहून श्रीनारायणमहाराज हेही निंबरगी यात्रेला गेले होते. यावेळी श्रीनारायणमहाराज हे घोड्यावर स्वार होऊन निंबरगीला गेले होते.

श्रीनारायणमहाराजांनी आपल्या कर्तृत्वाने अनेक ज्येष्ठ शिष्य, साधक निर्माण केले. यात प्रामुख्याने श्रीव्यंकटेश रामचंद्र मोहोळकर, श्रीवासुदेव परशराम आठल्ये, श्रीबाबा कानिटकर, श्रीतात्यासाहेब देशमुख, श्रीबार्शीकर, श्रीकुरूळकर, श्रीभाऊराव देशपांडे, श्रीचरणकर, श्रीबापूसाहेब साठे, श्रीमल्हारपंत कुलकर्णी, श्रीगोविंदपंत घोसरवाडकर, प.पू.श्रीमामामहाराज केळकर इ. ज्येष्ठ साधक शिष्य होते. यातील श्रीबापूसाहेब साठे हे एकदा पंढरपुरचे ज्योतिषी श्री.गणपतराव कौलगी यांना भेटले होते. त्यावेळी हे कौलगी श्रीनारायणमहाराजांविषयी म्हणाले, 'अहो बापूसाहेब, तुमचे गुरू साक्षात शंकर आहेत असे समजा.' श्रीनारायणमहाराजांचे पाच शिष्य परमार्थात उच्च पदावर पोहोचले. त्यांना स्वरूप साक्षात्कारही झाला. हे पाहून महाराजांनी स्वतः त्यांना पाटावर बसवून त्यांची पूजा केली होती. हे केवढे विशेष आहे!

इ.स.१९३९ साली श्रीदासराममहाराज हे चिमडला रथोत्सवास गेले होते. त्यांचे कीर्तन ठेवण्यास श्रीमाईसाहेबांनी श्रीनारायणमहाराजांना सांगितले. त्याप्रमाणे दिवाळी पाडव्या दिवशी श्रीदासराममहाराजांचे कीर्तन झाले. हे कीर्तन ऐकायला स्वतः श्रीनारायणमहाराज, श्रीनागप्पाण्णामहाराज, श्रीगोपाळकाका कोटणीस इ. होते. या सर्वांना कीर्तन फारच आवडले.

इ.स.१९४३ साली श्रीनारायणमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीरामचंद्र ऊर्फ बाबूराव कालवश झाले आणि थोडे दिवसावर उत्सव आला होता. काही जणांच्या मनात आले की आता यावर्षी उत्सव होतो का नाही? श्रीनारायणमहाराजांनी विचार केला की, मी मुलगा गेला म्हणून कोणत्या गोष्टी वर्ज्य केल्या आहेत? दोन वेळ जेवण आहे, दोन वेळ चहा सुरूच आहे. झोप ताणून घेत आहे व इतर व्यवहारही चालले आहेत. मग अपल्या उत्सवानेच तेवढे काय घोडे मारले आहे? अशा विचाराने त्यांनी उत्सव केला. इ.स.१९४५ साली श्रीनारायणमहाराजांचा षष्ठ्यब्दी समारंभ साजरा केला गेला. या निमित्ताने श्रीमामामहाराज चिमडला गेले होते. श्रीनारायणमहाराजांनी कौतुकाने एका संध्याकाळी मठात श्रीमामामहाराजांचे कीर्तन आयोजित केले. हे कीर्तन ऐकायला स्वतः श्रीनारायणमहाराज उपस्थित होते.

श्रीमल्हारपंत कुलकर्णी हे श्रीनारायणमहाराजांच्या कीर्तनात टिपणे घेत असत. त्यांची विषयवारीने विभागणी करून आणि संगती लावून श्री. व्यंकटेश रा. मोहोळकर यांनी इ.स.१९६० रोजी एक पुस्तक तयार केले. या पुस्तकाला 'नारायणीय शिष्य प्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या' असे नाव दिले. याचे हस्तलिखित श्रीनारायणमहाराजांनी वाचले होते.

इ.स. १९६२ साली आमच्या प.पू.श्रीमामासाहेब केळकर यांनी देह ठेवला. आमचे श्रीमामा हे श्रीनारायणमहाराजांचे शिष्य होते. श्रीमामांनी देह ठेवल्याचे कळल्यावर श्रीनारायणमहाराज एकच वाक्य बोलले. 'आपल्या संप्रदायातील श्रेष्ठ गुरूभक्त गेले.' श्रीनारायणमहाराजांनी हे उद्‌गार काढावेत याला फार महत्व आहे.

इ.स.१९५३ पासून ते १९६६ पर्यंत श्रीनारायणमहाराजांना शारीरिक व्याधी आणि व्यथा जडल्या होत्या. इ.स.१९६५ साली त्यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्याचा वाचेवर परिणाम झाला होता. श्रीनारायणमहाराजांच्या निर्याणापूर्वी २-३ महिने अगोदर श्रीदासराममहाराज हे श्रीनारायणमहाराजांच्या दर्शनास गेले होते. महाराज बिछान्यावर पहुडले होते. तेथूनच त्यांनी श्रीदासदाममहाराजांना विचारले, 'रामभाऊ, रोज कीर्तन चालू आहे का?' महाराजांचेजवळ महाराजांचे मेहुणे श्री. बेळगली बसले होते. ते म्हणाले, 'यांचे वडिल बापूराव केळकर गेल्याचे दुसरे दिवसापासूनच अखंड कीर्तन सुरू आहे.' हे ऐकून श्रीनारायणमहाराजांचे डोळे पाण्याने भरले आणि अश्रुधारा सुरू झाल्या. महाराज म्हणाले, 'रामभाऊ असेच कीर्तन चालू ठेवा.' महाराजांनी एक नारळ मागवून तो श्रीदासराममहाराजांच्या ओट्यात घातला आणि श्रीदासराममहाराजांच्या पाठीवर हात फिरवून आशीर्वाद दिला.

इ.स.१९६६ च्या माघ महिन्यात श्रीनारायणमहाराजांना फारच अशक्तपणा जाणवू लागला. ते पलंगावर पडून होते. संध्याकाळची वेळ झाली. संध्याकाळच्या भजनास प्रारंभ झाला आणि पलंगावर निजल्या स्थितीत त्यांनी श्रीसाधुमहाराजांच्या मंदिराच्या कळसाला वंदन केले आणि ॐकाराचा उच्चार करत माघ शु.१० शके १८८८, सोमवार दि. ३१.०१.१९६६ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी महाप्रयाण केले.

***

श्रीदासराममहाराजकृत श्रीनारायणमहाराज यांचा निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके अठराशे सत्याऐंशी । विश्वावसु संवत्सर उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध दशमी आणि सोमवार । रात्रौ प्रथम प्रहरी दुसरे तासी ।।२।।
नारायणरावांनी केले हो निर्याण । साधनी निमग्न ऐक्य झाले ।।३।।
साधुदेवालय कळस वंदून । सोडियेले प्राण निजसत्ते ।।४।।
परब्रह्मरूपी मिळोनिया गेले । कीर्तीरूपे उरले दासापाशी ।।५।।

प.पू.श्रीहरिबुवामहाराज, फलटण

जन्म
आश्विन शु.१२ शके १७९७
इ.स. १८७५

निर्याण
माघ शु.११ शके १८२०
इ.स. १८९८

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात फलटण नावाचा तालुका आहे. या फलटण नगरीत निंबाळकर नामक प्रसिद्ध राजघराणे आहे. या नगरीत महानुभाव पंथाची अंदाजे ६७ मंदिरे असून, या फलटणला **'महानुभाव पंथाची काशी'** असे संबोधिले जाते. तसेच याठिकाणी प्राचीन श्रीराम मंदिर आहे. तसेच मारुती मंदिरही आहे. अशा या मारुती मंदिरात श्रीहरिबुवा हे आश्विन शु. १२ शके १७९७ म्हणजे इ.स. १८७५ रोजी प्रगट झाले. यावेळी त्यांचे वय अंदाजे ४० वर्षे होते. श्रीहरिबुवा मंदिरात प्रगट झालेची बातमी हळू हळू गावात लगेच पसरली. त्यांच्या दर्शनाकरिता गर्दी उसळली. सकाळी प्रगट झालेले हरिबुवा संध्याकाळपर्यंत एका सिद्धासनातच बसलेले होते. फलटण संस्थानचे अधिपती श्री. मुधोजीराजे नाईक-निंबाळकर हे त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणे मारुतीच्या दर्शनास आले. तेथे आल्यावर श्रीहरिबुवा त्यांचे नजरेस पडले. त्यांना बघितल्यावर राजेंनी त्यांचे विनम्रपूर्वक दर्शन घेतले आणि राजवाड्यावर येणेची विनंती केली. विनंतीला मान देऊन श्रीहरिबुवा हे राजवाड्यावर वसतीला गेले. श्रीहरिबुवा हे वैराग्यसंपन्न आणि विदेही असलेने त्यांना राजवाड्यावर रहाणे थोडे कठीण झाले. सरकार हरिबुवांना उंची वस्त्रे नेसवीत, पण ते वस्त्र दुसऱ्या क्षणाला ते काढून टाकत व दिगंबर अवस्थेत रहाणेच पसंत करीत. कौतुकाने दिलेले चांदीचे भांडेही ते दूर भिरकावून देत. श्रीहरिबुवा हे साक्षात् विदेही संत होते. त्यांचे वागणे इतरांना विचित्र वाटे. एखाद्याच्या घरात शिरून ते तेथील कपडे फेकून देत असत, तर मध्यरात्री रस्त्यात उभे राहून भजन करीत. कधी कधी शिव्या देत असत, तर कधी कधी तापलेल्या वाळूवर आडवे पडून विठ्ठलाच्या भजनात तल्लीन होऊन जात. हे भजन द्रविड, तेलंगी किंवा कानडी अशा वेगवेगळ्या भाषेत असायचे. कधी कधी श्रीहरिबुवा हे मंदिरात कीर्तन ऐकायला येत, तर कधी ते कीर्तनातच झोपी जात. कधी कधी ते अत्यंत शांत असायचे, तर कधी कधी त्यांचा उग्र अवतार असायचा. त्यामुळे हरिबुवांना बघितल्यावर गावातील मुले घाबरून जायची. मुलेच काय तर मोठी मोठी माणसेसुद्धा, हरिबाबा दिसले की घराची दारे भराभरा लावून घेत. हरिबुवा एखाद्याच्या घरी गेले की, तो गृहस्थ श्रद्धावान असेल तर त्याच्या घरी जेवतो म्हणायचे. त्याप्रमाणे जेवणाचे ताट वाढून आणले असता हरिबुवा सगळे पदार्थ एकत्र करून खात असत. हे बघून त्या गृहस्थाला आश्चर्य वाटायचे.

हरिबुवा म्हणायचे, 'बाबांनो, आपले चित्त शुद्ध ठेवा आणि कोणतेही कर्म करा, यश नक्की येईल.' पण एखादा दांभिकपणे भक्ती करत असेल, तर त्याला ते परखडपणे बोलत असत. हरिबुवांनी अनेकांना उपदेश केला. सन्मार्गाला लावले. अनेकांचा उद्धार केला. अनेकांना दुर्धर संकटातून बाहेर काढले. मेलेल्या माणसाला जीवंत केले. श्रीहरिबुवांच्या नुसत्या स्पर्शाने रोग अथवा विषबाधा नाहिशी होत असे. पण एकदा खुद्द श्रीहरिबुवांच्याच पोटात दुखू लागले. भक्तांनी औषध आणले व ते घेण्याचा आग्रह करु लागले. हे बघून श्रीहरिबुवा म्हणाले, 'अरे, औषधाने रोगाचा नाश होईल. पण कर्माच्या नाशाचे काय?'

अशा श्रीहरिबुवांचा मुक्काम कायम फलटण शेजारील मलटण येथेच असायचा. हळूहळू देह क्षीण होऊ लागला. त्यामुळे त्यांची भ्रमंती थांबली. कधी त्यांना फिरायला जावे वाटले तर ते एखाद्या भक्ताच्या खांद्यावर बसून जात. श्रीहरिबाबांनी माघातील रथसप्तमीला उत्सव साजरा करायला सुरवात केली. भक्तांना मंडप उभारायला सांगितला. रथसप्तमीच्या दिवशी सकाळी सूर्याचे पूजन करणेत आले. गल्ली गल्लीतून भाविकांच्या दिंड्या श्रीहरिबुवांच्या दर्शनाला येऊ लागल्या. दिवसभर भक्तांचे कार्यक्रम झाले. अष्टमी दिवशी महाप्रसाद झाला. नवमीला कीर्तन व दशमीला दहीहंडीचा कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता झाली.

एकादशीला श्रीहरिबुवांच्या खोलीमध्ये बुवांचा एक भक्त त्यांचे पाय चेपत बसला होता आणि इतर भक्त श्रीहरिभाऊंच्या सभोवताली बसले होते. अचानक श्रीहरिबुवांचे पाय गार लागू लागले. प्रत्येकाने हात लावून बघितला. तीच अनुभूती आली. हे बघितल्यावर त्यातील एका भक्ताने वैद्यांना बोलावून आणले. वैद्यांनी तपासणी केली असता, वैद्यांनी खिन्न आवाजात श्रीहरिबुवांनी महानिर्याण केले आहे असे सांगितले. हे ऐकताच उपस्थित शिष्यांच्यात एकच हलकल्लोळ झाला. सगळे दुःखसागरात लोटून गेले. श्रीहरिबुवांनी देह ठेवला ही बातमी सगळ्या गावात वाऱ्यासारखी पसरली. सगळे भक्तगण जमू लागले. फलटणचे सरकार श्री. मालोजीराजे निंबाळकर हे दर्शनाला आले. सगळ्या भक्तांनी श्रीहरिबुवांना गरम पाण्याने स्नान घातले. श्री.गोविंदराव कानडे नामक गृहस्थांनी पंचामृताचा अभिषेक घातला. हरिबुवांच्या डोक्यावर टोपी आणि अंगात कफनी घालणेत आली. कपाळी केशरी टिळा लावणेत आला. गळ्यात फुलमाळा घालणेत आल्या. बुवांची पूजा आणि आरती करुन वाद्यांच्या गजरात श्रीहरिबुवांची मिरवणूक काढणेत आली. पुंडलिकाच्या आणि त्रिजटेश्वराच्या मंदिराच्या मध्यावर उत्तम आसन तयार केले आणि त्यावर श्रीहरिबुवांना बसवणेत आले. समाधी तयार करणेत आली. सर्व विधी पूर्ण झालेवर समाधी बंद करणेत आली. उपस्थित भक्तमंडळींनी '**सद्‌गुरू श्रीहरिबुवामहाराज की जय**' असा जयजयकार केला.

अशा या विदेही श्रीहरिबुवामहाराजांनी माघ शु. एकादशी शके १८२० इ.स.१८९८ या दिवशी महाप्रयाण केले. या श्रीहरिबुवांची नित्य आठवण भजनाच्या रुपाने आमच्या कीर्तनात शेवटी रोज होत असते.

***

स्वानंदसुखनिवासी वै. श्रीविष्णुबुवा जोगमहाराज

जन्म
भाद्रपद व.१ शके १७८९,
शनिवार दि. १४.०९.१८६७

निर्याण
माघ वद्य १ शके १८४२
गुरूवार दि.०५.०२.१९२०

रत्नागिरी जिल्ह्यात जयगड तालुक्यात नांदिवडे या नावाचे गाव आहे. जयगड हे बंदर असून, तेथून २ मैलांवर नांदिवडे हे छोटे गाव आहे. या गावात पुष्कळ काळापासून जोग घराणे रहात होते. पेशवाईमध्ये कोकणातील अनेक घराणी घाटावरती आली आणि पराक्रम गाजवू लागली. यातीलच एक जोग घराणे. यातील श्री. रुद्राजी अनंत जोग हे नांदिवडे गाव सोडून सांगली जिल्ह्यातील विटे येथे स्थिर झाले. त्यांच्या पुत्रांपैकी श्री.महादेव रुद्राजी यांची संतती सांगली-मिरज येथील सरदार पटवर्धनांच्या आश्रयास गेली. श्री.रुद्राजी जोग यांचे चौथे पुत्र श्री. गोपाळ हे पुणे येथे स्थायिक झाले. श्री. गोपाळ जोग यांचे पणतू श्री. नरसोपंत हे मोठे सत्वशील आणि सदाचारी गृहस्थ होते. त्यांनी काही दिवस सावंतवाडीच्या राजेसाहेबांचे शिक्षक म्हणून काम केले. त्यांचा सरस्वती नामक कन्येशी विवाह झाला. या सरस्वतीबाईंचे घराणे हे मल्लविद्येसाठी प्रसिद्ध होते.

अशा या नरसोपंत आणि सरस्वतीबाई या दांपत्यास पांच मुले झाली. भगवंत, गणपती, पांडुरंग, विष्णु आणि यमुना. यातील चारही मुले ही कर्तृत्ववान होती. यातील श्री.विष्णु यांचा जन्म भाद्रपद व.१ शके १७८९, शनिवार दि. १४.०९.१८६७ रोजी सायंकाळी पाच ते साडेपाचच्या सुमारास झाला. हा विष्णु म्हणजेच आमचे 'स्वानंदसुखनिवासी श्रीविष्णुबुवा जोगमहाराज'.

श्री. विष्णुबुवांचे शिक्षण जेमतेम चौथी इयत्तेपर्यंत झाले. बुवांच्या बाळपणी हल्लीसारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नव्हती. दगडी पाट्या व पेन्सिलीही नव्हत्या. पाट्यांच्या जागी त्याकाळी लाकडी फळकुटे असत. त्यावर विटकरीचा चुरा करून तो त्यावर पसरायचा आणि त्यावर काडीने अक्षरे काढायची. म्हणून या प्रकाराला पूर्वी धूळपाटी म्हणायचे. या धूळपाटीवर जेवढे शिक्षण झाले तेवढेच शिक्षण झाले. श्रीविष्णुबुवांची पिंपरी येथे शेती होती. तेथे ते जात असत. मुख्य म्हणजे श्रीविष्णुबुवांना व्यायामाची आवड होती. त्यामुळे ते दररोज तालीम करणे, दूध-तूप खाणे, पोहायला जाणे, कुस्त्या पहाणे, सकाळी देवदर्शन करणे असा त्यांचा दिनक्रम होता. महत्वाची गोष्ट म्हणजे श्रीविष्णुबुवांनी कधीही चहा-कॉफीला स्पर्श केला नाही. ते रोज अर्धा शेर निरसे दूध प्यायचे. त्यानंतर साधना करायची आणि ज्ञानेश्वरी किंवा एकनाथी भागवताचे वाचन करायचे. सकाळ-संध्याकाळ संध्या करायची, भस्मलेपन करायचे असाही त्यांचा दिनक्रम होता. श्रीविष्णुबुवांचे ज्येष्ठ बंधू श्रीपांडोबामहाराज हेसुद्धा प्रख्यात पैलवान होते. यांचेकडूनच श्रीविष्णबुवांनी तालमीचे धडे घेतले. श्रीपांडोबामहाराज हे पुणे येथील नगरकर तालमीचे वस्ताद होते. या श्रीपांडोबामहाराजांनी लवकर देह ठेवला. त्यामुळे त्या नगरकर तालमीचे वस्तादपण श्रीविष्णुबुवांकडे आले. ते सगळ्यांना कुस्ती शिकवू लागले. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी मांसाहार करावा लागतो यावर श्रीविष्णुबुवांचा अजिबात विश्वास नव्हता. श्रीविष्णुबुवांनी कधीही मांसाहारास स्पर्श केला नाही. शरीर बलदंड होण्यासाठी नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळले पाहिजे. ते नसेल तर

आणि पौष्टिक खुराक चालू असला तर त्याचा काही एक उपयोग होणार नाही. 'मोरीला बोळा आणि दिल्ली दरवाजा उघडा' तसे ते होईल असे त्यांचे ठाम मत होते. देशी खेळांवर म्हणजे जोर, उडी, मल्लखांब इ.वर त्यांचे विशेष प्रेम होते कां? तर ते म्हणत की या खेळामुळे शरीराचा कस उत्तम लागतो. एखाद्याला हातात टेनीसची रॅकेट घेऊन चाललेले पाहिले की श्रीविष्णुबुवा थट्टेने म्हणत, 'हे चालले हाती झारा घेऊन बुंदी पाडायला.'

श्रीविष्णुबुवांना या तालमीबरोबरच त्यांना पुढे परमार्थाचा छंद लागला. श्रीतुकाराममहाराजांच्या गाथ्याचा त्यांनी गाढा अभ्यास केला. पण याची कुणाला कल्पना दिली नाही. श्रीविष्णुबुवा म्हणायचे, 'मला कळू लागल्यापासून मी वृत्ती कधी कामाच्या आधीन केलीच नाही.' त्यामुळे त्यांना उपजतच वैराग्य निर्माण झाले होते. श्रीविष्णुबुवा एकदा रामकुंडावर स्नानासाठी गोदावरीमध्ये उभे राहिले. हे बघून तीरावरील भटजी संकल्प सांगू लागला. 'पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः' हे ऐकल्यावर श्रीविष्णुबुवा त्याच्यावर एकदम खेकसले आणि म्हणाले, 'मी पापीही नाही आणि पापकर्माही नाही, दुसरे काय म्हणायचे असेल तर म्हणा. एवढा हा संकल्प उच्चाराल तर खबरदार!'.

श्रीविष्णुबुवा म्हणत 'गतजन्मी मी कोण होतो माहित आहे? मी माऊलीच्या पालखीचा भोई होतो. जन्मभर त्यांचीच पालखी वाहिली, त्यामुळे या जन्मी साधन असे फार करावे लागले नाही. 'साधकाची दशा उदास असावी' या अभंगात श्रीतुकाराममहाराजांनी साधकाची लक्षणे सांगितली आहेत. ती सर्व लक्षणे श्रीविष्णुबुवांच्या अंगी जन्मतःच होती. ते देहावर असायचे नाहीत. उपाधीशून्य होते. जेवायला बसले तर किती जेवलो आणि काय जेवलो याचे त्यांना भान नसे. एकदा ते जेवत असताना त्यांना एकाने विचारले, बुवा भाकरी वाढू का? ते म्हणाले, 'हवी असेल तर वाढ. अगोदर किती वाढली होती?' 'कुणाला ठावकी' हे उत्तर ऐकून वाढणाऱ्याने कानाला खडा लावला. अर्थ हा की, ते जेवतानाही वृत्तीवर नसत. परस्त्रीशी तर ते कधी बोललेच नाहीत. स्त्री-नातलगांशी जितक्यास तितके बोलायचे. याबाबत एकाने 'असे का' म्हणून विचारले तेव्हा ते म्हणाले, अरे कबीराचा दोहा माहित नाही काय? '**तित्तीर पत्थर चूमते है । उस्को न छोडे काम । घी शक्कर खावत जो । उसकी जाने राम।।**' हा दोहा म्हणून दाखवला. या दोह्याचा अर्थ असा आहे की, 'दगड माती खाणारे तित्तीर पक्षी जर आपल्या काम क्षुधेला दूर ठेऊ शकत नाहीत, तर मग तूपसाखर खाणाऱ्या माणसांची काय कथा!'

श्रीविष्णुबुवा हे कुस्तीच्या निमित्ताने आळंदीला जाऊ लागले. आणि जाता जाता त्यांना आळंदीत येण्याचा छंदच लागला. श्रीविष्णुबुवांनी माऊलींच्या समाधीवर माळ ठेवली आणि ती गळ्यात घातली, आपल्या हाताने. त्यामुळे माऊलींखेरीज त्यांनी कुठलाही गुरू केला नाही. श्रीविष्णुबुवांनी आळंदीला अजानवृक्षाखाली ज्ञानेश्वरीची पारायणे केली. यानंतर त्यांनी भंडारा डोंगरावर तुकारामगाथ्याची पारायणे केली. अशारितीने बुवांचा काळ व्यतीत होऊ लागला आणि साधना प्रगतीपथावर दिसू लागली. बुवांची साधना ही सहज साधना होती. त्यांना देवपूजेचा पसारा मांडून बसलेले अथवा माळ घेऊन जप करत बसलेले कुणी

पाहिले नाही. त्यांची सहजवृत्ती होती. ते जप करीत पण विष्णुसहस्रनामाचा करीत. राहुरीला एक योगी रहात असत. त्यांचेकडे जाऊन बुवांनी योगमार्ग शिकला. पण ही योगमार्गाची साधना करत असता, कुंभकाचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला. तेव्हा त्यांनी योगसाधना फारशी केली नाही.

आळंदी येथे श्रीविष्णुबुवा अजानवृक्षाखाली बसले असता माऊली प्रगट झाले आणि माऊलींनी मस्तकावर हात ठेवला आणि सांगितले, 'तू कीर्तन-प्रवचने करत जा.' त्याप्रमाणे ते कीर्तन-प्रवचन करु लागले. श्रीविष्णुबुवांनी वैदिक धर्माची प्रतिष्ठापना व्हावी याच एका हेतूने जन्मभर प्रयत्न केले. श्रीबुवांचे असे मत होते की, 'जो ज्ञानाचे प्रतिपादन आणि समर्थन करतो तो धर्म.' विद् म्हणजे जाणणे. परमात्म्याचे निखळ ज्ञान जाणणे हा वैदिक धर्म बुवांना अपेक्षित होता. अशा श्रीविष्णुबुवांनी भागवत संप्रदायाचा प्रसार जन्मभर केला. श्रीबुवांना इच्छा असती तर बुवांना स्वतःचा स्वतंत्र फड उभारता आला असता. फड निर्माण करणे, मठ बांधणे त्यांना सहज शक्य होते. पण त्यांनी ते कटाक्षाने टाळले. '**न मांडी स्वतंत्र फड**' हे नाथांचे वचन त्यांच्यामधे मुरले होते. त्यामुळे मठाची निर्मिती करुन फड उभारून स्वतःचा बडिवार माजवण्याऐवजी, त्यांनी **'वारकरी शिक्षण संस्था'** निर्माण केली. त्यांनी ही शाळा सुरू करतानाही 'मा फलेषु कदाचन ।' हे भगवंताचे वचन डोळ्यापुढे ठेवले. अत्यंत निस्पृहपणे ही शाळा चालविली.

श्रीविष्णुबुवा हे प्रामुख्याने ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत नाहीतर वारकरी निरूपण करीत. व्याख्यान त्यांनी फक्त एकदाच दिले ते म्हणजे हुबळीला श्रीसिद्धारुढस्वामींच्या मठात जगद्गुरू शंकराचार्य यांच्या जयंतीच्या निमित्ताने दिले. यात प्रामुख्याने गीताभाष्य आणि ज्ञानेश्वरी यांचा समन्वय साधणारा विषय प्रतिपादित केला. श्रीविष्णुबुवा हे वारकरी पद्धतीचे कीर्तन करायचे. एखादा अभंग सेवेकरता घ्यायचे पण त्या अभंगाचे अंतरस्वरूप मात्र वेगळ्या पद्धतीने सांगायचे. त्यांचे वैशिष्ट्य सांगायचे झाल्यास कीर्तनामध्ये वक्ता आणि श्रोता यांच्या स्मरणशक्तीवर भर देण्याऐवजी, बुद्धिवर लक्ष केंद्रीत केलेले असायचे. त्यामुळे मुख्यतः श्रोत्यांच्या विचारशक्तीस चालना मिळे. श्रीविष्णुबुवा हे कीर्तनात सुरवातीला अभंगाचा भावार्थ सांगत आणि मग पूर्वपक्ष करुन अभंगातील मर्म श्रोत्यांना समजावून सांगत. कित्येकदा ते सुरवातीला त्या अभंगाची भूमिका स्पष्ट करून सांगत असत. कारण अभंगाचे मोल कळायला ते आवश्यक असे. तसेच ते अभंगाची सगळी कडवी साखळीप्रमाणे एकात एक कशी गुंफली आहेत, हे मोठ्या कौशल्याने सांगत. त्यांच्या कीर्तनाचे आणखी एक वैशिष्ट्य होते की, अभंगातील प्रमेयांशी सुसंबद्ध तोच वेदांताचा भाग विवेचन करायचे आणि सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे निरपेक्षता. कोणाजवळ ते काहीही मागत नसत. त्यामुळे कीर्तनात कोणाचीही भीडभाड ठेऊन ते बोलायचे नाहीत. पाखंडी ज्ञानी, पाखंडी भक्त, ढोंगी, पैसे घेऊन कीर्तन करणारे यांचेवर ते टीकेची झोड उठवीत. अध्यात्माच्या जोडीला वक्त्याला जे शारीरिक व्यक्तीमत्त्व लागते, ते श्रीविष्णुबुवांजवळ पुरेपूर होते. त्यांची उंची पुरती सहाफूट. कुठेही गेले तरी ते सगळ्याहून उंच दिसायचे. गोरे भव्य पीळदार शरीर, व्यायाम करुन कमावलेले, रुबाबदार सुंदर मुद्रा, सदा प्रसन्न स्मितहास्य, शरीरास शोभणारा पहिलवानी थाटाचा शुभ्र मलमलीचा सदरा, डोक्यावर स्वच्छ रेशमी कोशा, अंगावर नागपुरी रुईकाठी उपरणे, जुन्या पद्धतीप्रमाणे काळा दोरा लावलेले खिशातील घड्याळ, असे हे विष्णुबुवा कीर्तनाला उभे राहिले की,

'**दर्शनाचिये प्रशस्ति पुण्यपुरुषः**' या ज्ञानेश्वरमहाराजांच्या वर्णनाचा प्रत्यय येऊन श्रोते खऱ्या अर्थाने सुखावून जात. विष्णुबुवा कीर्तनाला उभे राहिले की त्यांच्या मागे शे-दीडशे टाळकरी उभे असायचे. पखवाज वाजवायला त्यांचेच अधिकारी शिष्य ह.भ.प. श्रीबंकटस्वामी, लक्ष्मणबुवा असायचे. चार ते पाच हजार श्रोते कीर्तनाला असायचे. खेडेगावातून मुलाबाळांसह खेडूत गाड्या भरभरून यायचे. कीर्तन चार-चार, पाच-पाच तास चालायचे, पण सगळा श्रोता तटस्थ असायचा. किती वेळ गेला हे श्रोत्यांना कळायचेच नाही. श्रीविष्णुबुवा हे निजानंदात रंगल्यामुळे श्रोते कीर्तनानंदात रंगून गेलेले असायचे.

श्रीविष्णुबुवा म्हणायचे की कीर्तन श्रवणास स्वतः देव उभा राहतो. त्यामुळे ते कीर्तनामधून कुणालाही उठू देत नसत. ते म्हणत की कीर्तनातून उठून गेलात तर पुण्यसंचयासाठी आलेले तुम्ही, पाप घेऊन जाल. ते म्हणायचे की सरकारी अधिकारी उपस्थित असलेली सभा सोडून कोणी गेले तर जसा त्या अधिकाऱ्याचा अपमान होतो, त्याप्रमाणे कीर्तन मध्येच सोडून जाणे हा देवाचा अपमान आहे. अशी त्यांची शिस्त होती आणि ते कठोरपणे पाळवून घेत.

श्रीविष्णुबुवा हे पुरते मराठी चार इयत्ताही न शिकलेले. त्यांना स्वतःची सही करायला दोन मिनिटे लागत. संस्कृतचा गंध नाही, मार्गदर्शन करायलाही कुणी नाही. अशा परिस्थितीत बुवांनी तुकाराममहाराजांच्या गाथेचे वर्गीकरण केले. म्हणजे विषयानुरूप अभंग संपादित केले. अशी वर्गीकरण केलेली गाथा १९०१ साली श्री. व्यंकटराव आवटे यांचे करवी प्रसिद्ध झाली आणि पारमार्थिकांना 'सोपी पायवाट' केली. हे काम करत असताना बुवांना या अभंगांचा सखोल अभ्यास करावा लागला. श्रीतुकाराममहाराजांचे अभंग दिसायला सोपे, पण अर्थ लावायला ते तितकेच कठीण आहेत. त्यामुळे बुवांची कुशाग्रबुद्धी, शब्दमोल जाणण्यासाठी आवश्यक कल्पकता, सांगितलेल्या विषयावरील प्रभुत्व, अध्यात्मिक विषयांचा सखोल अभ्यास, अपरोक्षानुभूती इ. गुण हा गाथा बघितला म्हणजे कळून येतात. यानंतर श्रीविष्णुबुवांनी सार्थ अनुभवामृत किंवा अमृतानुभव, निळोबांचा व ज्ञानेश्वरमहाराजांचा वर्गीकृत गाथा, सार्थ हरिपाठ व चांगदेव पासष्ठी, एकनाथी भागवत आदि ग्रंथ, वेदांतविचार, महिपतीकृत सार्थ ज्ञानेश्वरीतील वेचे इ. ग्रंथ प्रकाशित केले.

श्रीविष्णुबुवांच्या आयुष्यातील मोलाचे काम म्हणजे 'वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना'. आळंदीत शेकडो साधक येऊन रहात. मिळेल ती माधुकरी भक्षण करुन ते साधक अत्यंत निष्ठेने अजानवृक्षाखाली ज्ञानेश्वरची पारायण करीत. मात्र योग्य मार्गदर्शन नसलेने त्यांची तपश्चर्या व्यर्थ जात असे. वै. मारुतीबुवा गुरव हे श्रीविष्णुबुवांचे आळंदी येथील शिष्य. साधकांची ही अवस्था पाहून त्यांचे मन विषण्ण होत असे. वै. मारुतीबुवा ठोंबरे, वै.बंकटस्वामी, वै.लक्ष्मणबुवा इ. शिष्यांमध्ये याविषयी चर्चा होत असे. वै.मारुतीबुवा गुरव हे आळंदीमधे ज्ञानेश्वरी सांगत. ऐकायलाही अनेक साधक येत. पण केवळ एवढ्याने ते भागणारे नव्हते. या सर्व साधकांनी एकत्र रहावे, ज्ञानेश्वरीचा अभ्यास करावा, त्याचबरोबर मृदंगवादन, भजन, कीर्तन, प्रवचन, इतर ग्रंथांचा अभ्यास करावा, याचीही फार गरज होती. याकरता एखादी शाळा सुरू करावी अशी चर्चा सुरू झाली. पण ही शाळा केव्हा सुरू होईल, जर विष्णुबुवांनी पुढाकार घेतला तर. पण शाळा सुरु करायची म्हटले

तर पैसा पाहिजे. तो गोळा केला पाहिजे आणि याचा तर विष्णुबुवांना तिटकारा होता. मग ही शाळा सुरू करणेबाबत विष्णुबुवांना पटवणार कोण? असा प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितीत पूज्य श्रीनारायणस्वामी आणि पंडित पांडुरंग शर्मा यांनी श्रीविष्णुबुवांना पटवले आणि त्याप्रमाणे चैत्र शु. १ शके १८३९ दि.२४.०३.१९१७ रोजी आळंदी येथे 'वारकरी शिक्षण संस्था' स्थापन झाली. अध्यक्षस्थानी अर्थातच श्रीविष्णुबुवा होते. या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे वारकरी संतांचे वाङ्मयात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, तुकाराम गाथा इ. ग्रंथ आहेत, त्यातील तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून वारकरी पंथास व त्याद्वारे महाराष्ट्र धर्मास चालना देणारे प्रचारक निर्माण करणे हा होय. शाळेच्या पहिल्या दिवशी ज्ञानेश्वरीचा वर्ग घेण्यासाठी श्रीविष्णुबुवांनी गु.भ.प. श्रीमामासाहेब दांडेकर यांना आळंदीस पाठवले. त्यावेळी फक्त सहा विद्यार्थी होते. आता या शाळेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. या वारकरी शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून ह.भ.प. श्रीबंकटस्वामी, पं. पांडुरंग शर्मा, ह.भ.प. लक्ष्मणबुवा इगतपुरीकर, ह.भ.प.श्री. माधवराव देशमुख, ह.भ.प. श्रीमारुतीबुवा गुरव व ह.भ.प. श्रीमामासाहेब दांडेकर हे प्रामुख्याने होते आणि हेच त्यांचे पुढे प्रख्यात शिष्य झाले. याव्यतिरिक्त आणखी बरेच प्रख्यात शिष्य झाले, पण विस्तारभयास्तव त्यांची नांवे इथे दिलेली नाहीत.

लोकमान्य टिळक आणि श्रीविष्णुबुवा यांचा जवळचा स्नेह होता. श्रीविष्णुबुवा यांची वृत्ती पारमार्थिक असली तरी त्यांच्या अंतःकरणात जाज्वल्य देशभक्ती होती. लोकमान्यांनी दारुबंदी, परदेशी मालाचा बहिष्कार, स्वदेशी जागरण, गोरक्षण इ. जी जी आंदोलने केली, त्यामध्ये श्रीविष्णुबुवांनी सक्रीय भाग घेऊन करता येईल ते सर्व केले. इ.स. १९०६ साली पंढरपुरामध्ये स्वदेशी प्रदर्शन भरले. यावेळी श्रीविष्णुबुवा जोगमहाराज हे अध्यक्ष होते आणि लोकमान्य टिळक हे प्रमुख वक्ते होते. लोकमान्य टिळकांनी 'युद्धश्च' या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर श्रीविष्णुबुवा बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, बळवंतरावांनी 'युद्धश्च' या विषयावर व्याख्यान दिले आहे. आता मी याचे मागील म्हणजे 'मामनुस्मर' या विषयावर बोलणार आहे आणि त्या प्रमाणे ते बोलले. यानंतर हे दोघे विठ्ठलमंदिरात दर्शनाकरता गेले. श्रीविष्णुबुवा भगवंतासमोर उभे राहून कान धरून नाचायला लागले. पण लोकमान्य टिळक कान धरुन नाचेनात. हे बघितल्यावर श्रीविष्णुबुवा म्हणाले, बळवंतराव, आत्ता तुम्ही तर भगवंतासमोर कान धरुन नाचलात तर, भगवान इंग्रजांचे कान धरल्याशिवाय राहणार नाहित. हे वाक्य ऐकल्यावर लोकमान्यही कान धरुन नाचू लागले. लोकमान्य १९१४ साली आपली सहा वर्षे मुदतीची दीर्घ शिक्षा संपवून मंडालेहून घरी परतले, त्यावेळी मध्यरात्रीच्या सुमारास ज्या थोड्या लोकांना गायकवाड वाड्यात मुद्दाम निमंत्रण देऊन बोलाविले होते, त्यात श्रीविष्णुबुवा होते. चिरोल या नावाचा लोकमान्यांचे संदर्भात एक खटला सुरू होता. त्या खटल्यासाठी स्वतः लोकमान्यांनी परदेशात जावे असे ठरले. या प्रसंगाला अनुलक्षून श्रीविष्णुबुवांनी एक अभंग रचला आणि तो गुरुवर्य श्रीमामासाहेब दांडेकर यांना कागदावर लिहायला सांगितला. त्याप्रमाणे तो त्यांनी लिहिला आणि तो अभंग एका ताटात ठेऊन, हार आणि बुक्का घेऊन श्रीविष्णुबुवा स्वतः गायकवाड वाड्यात गेले. सदरचा अभंग मुद्दाम कळणेसाठी खाली दिला आहे :-

पुण्य उभे राहो आता । संतांचे या कारणे ।।१।।
लाग विलायतेच्या वाटे । तुम्हा भेटे स्वराज्य ।।२।।
संकल्प हे यावे फळ । कळवळा बहुतांचा ।।३।।
म्हणे ज्ञानदेव किंकर । तुमचा होय जयजयकार ।।४।।

श्रीविष्णुबुवांनी लोकमान्यांच्या भाळी बुक्का लावला व गळ्यात हार घालून तो अभंग लोकमान्यांच्या स्वाधीन केला. पुढे लोकमान्यांची जी प्रचंड मिरवणूक निघाली, त्यामध्ये लोकमान्यांच्या शेजारी रथामध्ये श्रीविष्णुबुवाच बसले होते. एक दिवस विष्णुबुवा मामासाहेब दांडेकरांना म्हणाले, 'सोन्या, तुम्ही माझ्याकडून होते नव्हते ते सगळे घेतले, पण माझे ब्रह्मचर्याचे व्रत कोण घेणार?' तेव्हा मामासाहेब एकाही क्षणाचा विलंब न लावता म्हणाले, 'बुवाजी, तुमचे ब्रह्मचर्याचे व्रत मी घेतो' आणि त्याप्रमाणे श्रीमामासाहेब दांडेकर हे शेवटपर्यंत ब्रह्मचर्यव्रताने राहिले..

श्रीविष्णुबुवा हे आजारी पडले आहेत हे कोणालाच कळत नसे. कारण वेदना प्रगट करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. श्रीविष्णुबुवांना लहानपणी देवीचा आजार झाला होता. त्यानंतर भगेंद्राचे दुखणे झाले होते. त्यानंतर मधुमेह झाला होता. एकदा ते ओंकारेश्वराला गेले असता, उजव्या पायाच्या पोटरीस खिळा लागल्याचे निमित्त झाले. पाय सुजायला तेवढेच कारण पुरले. त्यामुळे त्यांना भरपूर ताप आला. तरीसुद्धा बुवा डॉक्टरांकडे गेले नाहीत. औषध घ्या म्हटले की ते म्हणत, 'सध्या ग्रहमान अनुकूल नाही. त्यामुळे त्रास होत आहे. ते बदलताच बरे वाटेल.' शेवटी विष्णुबुवांना कफक्षयाचे दुखणे झाले. एवढे धिप्पाड शरीर, विष्णुबुवा एखाद्या नरव्याघ्रासारखे दिसायचे. पण मधुमेह आणि कफक्षय या दोन दुखण्यांनी त्यांचे प्रचंड शरीर पोखरले गेले.

इ.स.१९१७ च्या माघ महिन्यात महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांनी देह ठेवला. त्यांचेशी बुवांचा फार जवळचा संबंध होता. पण त्यांच्या अंत्ययात्रेला बुवा जावू शकले नाहीत. पण गु.मामासाहेब दांडेकर त्या अंत्ययात्रेला गेले होते. त्यांचेबरोबर श्रीभाऊसाहेब गोखले होते. एकदम ते मामासाहेबांना म्हणाले, 'सोनोपंत, बुवांचे निधन जर पुण्यात झाले तर केवढी मोठी अंत्ययात्रा निघेल नाही?' हे ऐकून मामासाहेब एकदम चमकलेच. घरी आल्यावर त्यांनी श्री.गोखले काय म्हणाले हे घाबरत घाबरत बुवांना सांगितले. तत्क्षणी उसळून बुवा म्हणाले, 'गोखल्याला काय माहित? आम्ही आळंदीशिवाय दुसरीकडे मरणारच नाही.' श्रीमामासाहेब हे श्रीविष्णुबुवांजवळ १०-१२ वर्षे होते. एक दिवस बुवा मामासाहेबांना म्हणाले, 'सोन्या, आज तू ज्ञानेश्वरी सांग. मी ऐकतो.' हे ऐकून मामासाहेबांनी नवल वाटून विचारले, 'बुवा, आज काय विशेष आहे?' तेव्हा बुवा म्हणाले, 'आज माझी जन्मतिथी.' त्यानंतर बुवा मामासाहेबांना एकदा म्हणाले, 'सोन्या, आमचे आयुष्य शेवटाला आले आहे.' हे ऐकून श्रीमामासाहेब म्हणाले, 'बुवा, उगीचच तुम्ही हे म्हणता की आमचे दिवस संपत आले.' हे ऐकल्यावर बुवा म्हणाले, 'सोन्या, तुला सांगतो - ज्ञानेश्वरमहाराजांनी मला जी मुदत दिली आहे, ती संपत आली आहे. राहुरीजवळ एका योग्यापाशी योगाभ्यास करताना माझ्या छातीवर परिणाम झाला. एक ठोका कमी पडू लागला. आपण आता लवकरच मरणार असे वाटू लागले. म्हणून मी आळंदीस माऊलींसमोर

धरणे धरून बसलो. तेव्हा माऊलींनी मला दर्शन दिले आणि सांगितले की, 'तू कथा कीर्तन कर' हे सांगितल्याची मुदत संपत आली आहे.' दिवसेंदिवस त्यांची तब्येत खालावत चालली. माघ शु. पौर्णिमा, इ.स.१९२० या दिवशी बुवा श्रीमामासाहेबांना म्हणाले, 'सोन्या, उद्या उजाडायला पुण्यात रहायचे नाही. आळंदीला जायचे आहे.' याप्रमाणे श्रीबुवांनी आळंदीला देह ठेवायचे पक्के केले होते. त्याकाळी आळंदीला जाण्यासाठी मोटारी उपलब्ध नव्हत्या. तेव्हा श्रीमामासाहेबांनी दोन घोड्यांची चांगली मजबूत बग्गी ठरवली आणि त्याला सांगितले, 'तू ठीक पहाटे ४ वाजता ये.' त्याप्रमाणे तो हजर झाला. गाडी सुरू झाली. बुवांना अपार वेदना होत होत्या. रस्ता अतिशय वाईट. दमले म्हणजे बुवा आपले डोके मामासाहेबांच्या गुडघ्यावर टेकवीत. आळंदीजवळ इंद्रायणीचा पूल हा फरसबंदी होता. त्यावरून गाडी जाऊ लागली तेव्हा बुवांना खडखडाट ऐकू आला. त्यांना आळंदी जवळ आल्याचे जाणवले. त्यांनी श्रीमामासाहेबांना विचारले, 'सोन्या, आळंदी आली का रे?' ते 'हो' म्हणताच, बुवा म्हणाले, 'चला आता मरायला हरकत नाही.' पुढे ते वारकरी शिक्षण संस्थेच्या धर्मशाळेत येऊन तेथे निजले. विष्णुबुवा आलेत म्हटल्यावर बरीच शिष्य-साधक मंडळी तेथे जमू लागली. हे बघून त्यांनी मामासाहेबांना सांगितले, 'सोन्या, मला गडबड नको आहे. त्यांना जायला सांग.' त्याप्रमाणे सगळी मंडळी गेली. श्रीमामासाहेबांनी इंद्रायणीचे तीर्थ आणले. कुणीतरी ज्ञानेश्वरमाऊलींचेही तीर्थ आणले. तोवर सकाळचे ८.३० ते ९ वाजले असावेत. श्रीविष्णुबुवांनी मामासाहेबांना खोलीत बोलावले आणि 'मला उठवून बसव' असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी उठवून बसवले. उत्तरेकडे तोंड करून माडी घालून बसले आणि म्हणाले, 'सोन्या, जातो.' असे म्हणून श्रीविष्णुबुवा जोगमहाराजांनी आळंदी येथे माघ वद्य प्रतिपदा (गुरूप्रतिपदा) शके १८४२ गुरुवार दि. ०५.०२.१९२० रोजी सकाळी ९ वाजता श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे स्मरणात वयाच्या ५३ व्या वर्षी देह ठेवला व ते स्वानंदसुखनिवासी झाले.

***

श्रीदासराममहाराजकृत विष्णुबुवा जोगमहाराज यांची आरती

आरती जय विष्णु । ज्ञानाग्रणी ज्ञानभाना ।
ज्ञानेची वैराग्य ज्या । थोर कृपानिधाना ।।१।।
पंढरीचा वारकरी । झळकला पुण्यनगरी ।
स्वानंद सुखवासी । स्वानंदाची लहरी ।।२।।
अनंत जन्मोनी जो । ज्ञानराजा वाही डोई ।
पालखीचे सोहोळ्यात । देहभान हरुनी जाई ।।३।।
ज्ञानेश्वरी वदनी ज्या । हृदयी ज्ञानेश्वर डोले ।
अनुग्रह ज्ञानाईचा । **गोविंदसुत** पायी लोळे ।।४।।

प.पू.श्रीप्रभाकरस्वामीमहाराज, सोलापूर

निर्याण
माघ व.०१ शके १८७९
शुक्रवार दि.१५.०२.१९५७

कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यात बंकापूर या नावाचे एक गाव आहे. या गावात टेंबे या नावाचे एक घराणे होते. या घराण्याचे खास वैशिष्ट्य असे की, प्रत्येक पिढीतील दांपत्यास दोन पुत्र होत. यातील एक संसारी आणि एक यती होत असे. असे हे ७ पिढ्या चालले होते.

अशा या घराण्यात श्रीविठ्ठलपंत टेंबे हे सद्गृहस्थ होते. हे संसारी होते आणि त्यांचे बंधू यती होते. श्रीविठ्ठलपंत यांचा स्वभाव अत्यंत कडक व करारी होता. ते न्यायनिष्ठूर होते. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. तुळसाबाई. याही घरकामात कुशल होत्या. अशा या दांपत्यास बरीच वर्षे मुलबाळ नव्हते. त्यामुळे ते दांपत्य बऱ्याचदा चिंतेत असायचे. श्रीविठ्ठलपंत हे सूर्योपासना करीत. ती त्यांनी अधिक वाढविली. तसेच ते लक्ष्मीस्त्रोत्राचा नित्य पाठ करीत. असे विठ्ठलपंतांनी २५ वर्षे तपाचरण केले आणि एक दिवस साक्षात् श्रीसूर्यनारायण त्यांचेपुढे प्रगट झाले आणि त्यांना वर दिला, ''अरे तुला दोन पुत्र होतील. त्यातील एक प्रापंचिक राजयोगी तर दुसरा यती बनून कुळाचा व जगाचा उद्धार करील.'' या वराप्रमाणे श्री. विठ्ठलपंतांना यथावकाश एक पुत्र प्राप्त झाला. त्याचे नाव त्यांनी दिवाकर ठेवले आणि काही कालावधीने दुसरे पुत्ररत्न झाले. त्याचे नांव त्यांनी 'प्रभाकर' असे ठेवले. हे प्रभाकर म्हणजेच आमचे 'श्रीप्रभाकरस्वामीमहाराज' होत.

श्रीप्रभाकरमहाराजांची मातृभाषा कानडी होती. त्यांना लहानपणी शाळेत घालणेत आले. परंतु शालेय शिक्षणाकडे महाराजांचे फारसे लक्ष नव्हते. श्रीप्रभाकरमहाराज हे लहानपणापासूनच पूजा-अर्चा करणे, स्तोत्रे म्हणणे इ.तच रमत असत. गायत्रीमंत्रावर त्यांचा अधिक भर होता. शाळेला जातानासुद्धा ते रस्त्याने गायत्रीमंत्र म्हणत जात. मुंजीचे वय झाल्यावर त्यांची मुंज करणेत आली.

याच सुमारास महाराज शाळेत असतानाच एक विभूती त्यांचेसमोर प्रगट झाली आणि तिने महाराजांना पुढीलप्रमाणे हवेतच मंत्र लिहून दाखविले आणि सांगितले की, 'ॐ श्रीमन्महारामाय' हा मंत्र म्हणशील तर, श्रीरामाचे माणसासारखे प्रत्यक्ष दर्शन होईल, 'ॐ श्रीमन्महानारायणाय' हा मंत्र म्हणशील तर, जगाची कर्मे करण्याकरिता याचा उपयोग होईल आणि 'ॐ ॐ ॐ श्रीमहालक्ष्म्यै नमः' हा मंत्र म्हणशील तर, अन्न, वस्त्र, निवारा व खर्चाची सोय होईल. वरीलप्रमाणे मंत्र मिळाल्यावर महाराजांनी त्या मंत्राचा जप सुरू केला व साधना सुरू केली. श्रीप्रभाकरमहाराजांचे व्यवहारात आणि अभ्यासातही लक्ष नसलेने एक दिवस त्यांचे थोरले

बंधू श्री.दिवाकर त्यांना काही कडक शब्दात बोलले. हे ऐकून श्रीप्रभाकरमहाराज त्या दिवसापासून घराबाहेर पडले, ते परत घरी गेले नाहीत.

श्रीप्रभाकरमहाराज घरातून बाहेर पडल्यावर ते विजापूर येथे आले. तेथील श्री. कुलोपाध्याय म्हणून सत्पुरुषांच्या घरी आले. त्यांना घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा त्यांनी सांगितले की, 'तू ब्रह्मचारी असलेने मारुतीची उपासना करीत जा.' त्यावेळी महाराजांचे वय अंदाजे १०-१२वर्षांचे होते. विजापुरात लंगरबावडी म्हणून भाग आहे. तेथील पाण्यात उभे राहून त्यांनी श्रीमारुतीरायांचे अनुष्ठान करणेस सुरवात केली. सकाळी अनुष्ठान करायचे, दुपारी माधुकरी मागून नैवेद्य दाखवून अन्नग्रहण करायचे. असा त्यांचा दिनक्रम सुरू होता.

अशी त्यांची कठोर साधना (अनुष्ठान) पाहून महाराज पाण्यात उभे असतानाच त्यांच्या समारे प्रत्यक्ष मारुतीराय प्रगट झाले. त्यांनी पुढीलप्रमाणे उपदेश केला :- ''अरे, प्रभू भेटण्याचा हा मार्ग नव्हे. जोरापूर पेठेत श्रीगुरु बसय्यास्वामी आहेत. त्यांचेबरोबर श्रीदत्तमहाराज हे नेहमी हजर असतात. त्यांची सेवा कर. जातीगोतीचा अभिमान धरू नकोस.'' हा दृष्टांत झाल्यावर श्रीप्रभाकरमहाराज तात्काळ विजापूर येथील जोरापूर पेठेत गेले. तेथे श्रीबसय्यास्वामी बसलेले होते. त्यांना महाराजांनी साष्टांग नमस्कार घातला व त्यांचे सेवेत राहिले. एक दिवस श्रीबसय्यास्वामींनी त्यांना बोलावून अनुग्रह दिला आणि 'या अल्लाह वो काफी या अल्लाह वो शाफी या अल्लाह वो माफी' या मंत्राची एक माळ करायची आणि ही माळ झाल्यावर 'या खातून' असे म्हणायचे असे सांगितले. श्रीप्रभाकरमहाराज हे जातीने ब्राह्मण, श्रीबसय्यास्वामी लिंगायत आणि मंत्र मुसलमानी, हे सगळेच अतर्क्य होते. परंतु गुरूआज्ञेनुसार श्रीप्रभाकरमहाराजांनी २८ वर्षे ही उपासना चालविली.

कालांतराने श्रीप्रभाकरमहाराज जे जपास बसले असताना, त्यांच्यासमोर श्रीदत्तमहाराज प्रगट झाले आणि म्हणाले की, जगदोद्धार करीत जा. असे म्हणून श्रीदत्तप्रभूंनी एक दंडकाष्ठ महाराजांपुढे ठेवला आणि म्हणाले, 'कोई दिल दुखायेगा और त्रास देईगा, उसका फडशा उडा देगा' असे म्हणून श्रीदत्तमहाराज अंतर्धान पावले. ही घडलेली घटना त्यांनी श्रीबसय्यास्वामींना सांगितली. तेव्हा श्रीबसय्यास्वामी म्हणाले, 'तेरा काम फत्ताह होगा बेटा' तुझी सेवा पूर्ण झाली आहे. तू आता कुठेही जाऊ शकतोस.

याप्रमाणे श्रीप्रभाकरमहाराज हे गदगच्या जंगलात गेले आणि तेथे त्यांनी कठोर साधना केली. येथे त्यांना श्रीरामप्रभूंचे दर्शन झाले. महाराजांना निर्गुणस्वरुपाचा साक्षात्कार व्हावा असा ध्यास लागला. तेव्हा त्यांना आदेश (आकाशवाणी) झाला की,'अरे तुला आत्मज्ञान हवे आहे तर तू हिंचगिरीला श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकरांकडे जा.' त्याप्रमाणे ते हिंचगिरीला गेले आणि त्यांच्याकडूनही श्रीप्रभाकरमहाराजांनी अनुग्रह घेतला आणि नामसाधना केली. तेथे असताना त्यांना आद्य रघुनाथाचार्य म्हणून सिद्धपुरूष आहेत आणि ते श्रीभाऊसाहेबमहाराजांचे मेहुणे आहेत असे कळले. हे कळल्या कळल्या ते निंबाळला आले. श्रीरघुनाथाचार्यांची भेट झाल्यावर दर्शन घेतले व तेथेच थोडे दिवस राहिले. श्रीरघुनाथाचार्य हे रात्री साधनेला बसायचे. ते

साधनेला बसल्यावर आसनासहित वर जाऊन आढ्याला टेकायचे आणि परत खाली यायचे. असा त्यांचा रात्रभर साधनाभ्यास चालायचा. हे श्रीप्रभाकरमहाराजांनी पाहिले आणि त्यांचेबद्दल निष्ठा अधिक घट्ट झाली. श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांची झालेली सेवा बघून त्यांना, 'तू उत्तरेकडे जा' असा आदेश दिला. त्याप्रमाणे त्यांनी हिंचगेरी सोडली आणि ते उत्तरेकडे निघाले.

भ्रमण करीत करीत ते सांगली जिल्ह्यातील चिंचणी येथील श्रीतिकोटेकरस्वामीमहाराजांकडे आले. श्रीप्रभाकरमहाराजांनी श्रीतिकोटेकरमहाराजांचा अनुग्रह घेतला आणि आत्मज्ञानाचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर श्रीप्रभाकरमहाराज मोंगलाईत आले. तेथे श्रीतुकोबामाईमहाराजांची भेट झाली. त्यांचेबरोबर महाराजांनी बराच काळ घालवला. त्यांच्यावरही प्रभाकरमहाराजांची भक्ती आणि श्रद्धा होती. याप्रमाणेच श्रीप्रभाकरमहाराजांची नगर जिल्ह्यातील कर्जत गावातील श्रीगोधडस्वामीमहाराजांवर निष्ठा होती. ते प्रत्येक वर्षी चैत्र व श्रावण महिन्यात या महाराजांचे स्थानी जाऊन, त्यांची सेवा करीत असत.

याप्रमाणे ते वाई, पुणे, हुमणाबाद, गाणगापूर करून सोलापुरात आले. सोलापुरात आल्यावर ते रामफुलारी या गृहस्थाकडे जवळ जवळ १५ वर्षे राहिले. याठिकाणी राहून महाराजांनी बऱ्याच लीला केल्या. श्रीप्रभाकरमहाराज हे अनुग्रह देऊ लागले. त्यांचे अनेक शिष्य झाले. अनेक भक्तजनांना भवरोगातून मुक्त केले. अनेक शिष्यांना दत्तप्रभू, रामप्रभू यांची सेवा करणेस सांगितले.

साधारणपणे ९०-९५ वय झाल्यावर महाराजांचे शरीर गलितगात्र झाले होते. अशक्तपणा आला होता. महाराजांनी शेवटी 'ॐश्रीमन्महारामाय' या मंत्राचा जप सरू केला. हा मंत्र त्यांना लहानपणीच मिळाला होता. जप सुरू असताना त्यांची वाचा बंद पडली. वाचा बंद पडली आहे म्हटल्यावर त्यांनी भ्रुमध्याकडे दृष्टी स्थिर केली आणि श्वासावर नाम घ्यायला सुरवात केली. शेवटी माघ वद्य प्रतिपदा शके १८७९, शुक्रवार दि.१५.०२.१९५७ रोजी रात्री १०.४५ वाजता श्रीप्रभाकरमहाराजांनी देह ठेवला.

***

महायोगी श्रीचांगदेवमहाराज

निर्याण
माघ व.०३ शके १२९८
इ.स.१३७६

श्री. मुधोपंत या नावाचे गृहस्थ नारायणडोही या गावात रहात होते. त्यांना सुंदर व मोहक असा मुलगा झाला. त्याचे नांव 'चांगा' असे ठेवण्यात आले. हेच पुढे 'चांगदेव' म्हणून प्रसिद्धीस आले.

श्रीमहिपतीकृत भक्तलीलामृतात असा उल्लेख आहे की, चांगदेव हे देवलोकी इंद्रसभेतल्या मरूद्गणांपैकी एक मरुद्गण होते. इंद्रसभेत बसले असताना त्यांचे हातून असभ्य वर्तन घडले. त्यामुळे इंद्रांनी त्यांना शाप दिला की, ''तुला मृत्यूलोकी जन्म घेऊन १४०० वर्षे रहावे लागेल व पुढे ज्ञानदेवांचा अवतार होऊन, त्यांचे कृपेने तू मुक्त होशील.''

त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे चांगदेवांची ५ व्या वर्षी मुंज झाली. चांगदेव हे जन्मतःच हुशार असलेने संध्या, रामरक्षा, स्तोत्रे, पुरुषसुक्त, रुद्र इ. त्यांचे तोंडपाठ झाले. प्रौढ वयात त्यांनी चारी वेदसंहिता, व्याकरण, न्याय, ज्योतिष, भागवत व इतर पुराणे इ. सर्वात निपुणता मिळविली. शास्त्राने ज्या १४ विद्या ६४ कला सांगितल्या आहेत, या सर्व विद्या व कला त्यांनी थोड्या अवधीतच आत्मसात केल्या. पण एवढ्यावर त्यांचे समाधान होईना. म्हणून योगविद्या शिकणेसाठी त्यांनी श्रीक्षेत्र काशी गाठले.

काशी येथे गेल्यावर त्यांना कळले की, या क्षेत्रात एक मोठे लांबचलांब विवर असून या विवरात एक योगी समाधिस्थ असतात. त्यांनी लगेच त्या विवराचा शोध घेतला. पण त्यांना त्या विवरासमोर मोठमोठे नाग, साप व वाघ बसलेले दिसले. पण श्रीचांगदेवांना मंत्र-तंत्र विद्या माहित असलेने या मंत्रांच्या बळावर त्यांनी साप, नाग व वाघ यांचे मुखबंधन व दृष्टिबंधन केले आणि त्या भयाण विवरात प्रवेश केला. आत गेल्यावर श्रीचांगदेवांना एक समाधिस्थ योगी दिसले. ते योगीपुरुष समाधी अवस्थेतून बाहेर आले व त्यांनी या श्रीचांगदेवांची विचारपूस केली व त्यांची योग्यता जाणून त्यांनी षट्चक्राचे भेदन करून कुंडलिनी जागृत केली. या अवस्थेत श्रीचांगदेव बरेच दिवस होते. त्यामुळे त्यांना अष्टधासिद्धी प्राप्त झाल्या. त्या योग्यांनी श्रीचांगदेवांना योग संप्रदाय चालविणेची आज्ञा केली आणि या विवरस्थानातून बाहेर पाठविले.

बाहेर येताच त्यांनी काशी गाठले व काही दिवस तेथे वास्तव्य केले. तेथून ते खानदेशातील तापी व पयोष्णी नद्यांच्या संगमावरील शिवमंदिरात आले व तेथे त्यांनी कायमचे वास्तव्य केले. थोड्याच दिवसात त्यांची सगळीकडे प्रसिद्धी झाली. समाधी लावून ती तीन दिवसांनी उतरल्यावर, तेथील लोक त्यांच्या समोर

प्रेते आणून ठेवीत. श्रीचांगदेव आपल्या योगसामर्थ्याने सहजच ती प्रेते उठवीत असत. हस्तस्पर्शाने रोग बरा करणे, आकाशमार्गाने ये-जा करणे, वाघावर बसून, हातात सापाचा चाबूक घेऊन संचार करणे इत्यादि दैवी चमत्कार ते करू लागले.

पैठणला श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी रेड्यामुखी वेद बोलविला ही बातमी श्रीचांगदेवमहाराजांच्या कानावर आली. त्यांना असे वाटले की आपण १४०० वर्षे जगून काही उपयोग झाला नाही. त्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची भेट घेण्याचे ठरविले. पण शिष्य म्हणाले, 'महाराज, आपण १४०० वर्षांचे आणि ते फक्त १४ वर्षांचे, आपण त्यांना भेटायला जावे म्हणजे थोडा कमीपणा आहे. आपण त्यांना पत्र पाठवावे.' ते त्यांना पटले व त्यांनी कागद, दौत आणि टाक घेतला व पत्र लिहायला बसले. पण त्यांचे पत्राच्या मायन्यातच अडले. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना नमस्कार लिहावे म्हटले, तर ते वयाने फारच लहान आहेत आणि अनेक आशीर्वाद लिहावे तर, अधिकाराने ते फारच मोठे आहेत. अशी अवस्था झाल्यामुळे मायनाच नाही तर पत्र काय लिहिणार? शेवटी त्यांनी पाकीटात कोरा कागद घातला आणि शिष्याकडून तो श्रीज्ञानेश्वरांना पोहोचता केला. यावेळी श्रीज्ञानेश्वरमहाराज हे आपल्या तीन भावंडांसमवेत एका भिंतीवर कोवळे ऊन खात बसले होते. त्या शिष्याला बघितल्यावर श्रीमुक्ताबाईंनी भिंतीवरून खाली उडी मारली आणि तो लखोटा घेतला आणि फोडला. आत त्यांना कोरा कागद दिसला. हे बघून श्रीमुक्ताबाईंनी शेरा मारला, १४०० वर्षे जगून कोरा तो कोराच राहिला आहे. हा शेरा ऐकून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, मुक्ताबाई, आपण असे बोलू नये. ते आपले आजोबा आहेत आणि एक लक्षात ठेव, कोऱ्या कागदावरच अक्षरे उमटतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी तो कोरा कागद घेतला आणि त्यावर श्रीचांगदेवमहाराजांना बोध करणाऱ्या ६५ ओव्या लिहिल्या. त्यालाच 'चांगदेव पासष्ठी' हे नाव आहे.

या ओव्या घेऊन तो शिष्य परत श्रीचांगदेवमहाराजांकडे आला. त्यांनी ओव्या बघितल्या. पहिल्या ओवीतच प्रवेश होईना. म्हणून शेवटी त्यांनी आपण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शनाला जाणेचे निश्चित केले. १४०० शिष्यांच्या लवाजम्यासह श्रीचांगदेवमहाराज श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे भेटीला आले. तोवर मुक्ताबाई या भिंतीवर कोवळे ऊन खात बसल्या होत्या. श्रीचांगदेवमहाराज आलेत म्हटल्यावर श्रीनिवृत्तीनाथमहाराज, श्रीसोपानदेव व श्रीज्ञानेश्वरमहाराज हे त्यांना सामोरे गेले. पण मुक्ताबाई सामोरे गेल्या नाहीत. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'मुक्ताबाई मी तुला कोठून आणू ढाण्या वाघ आणि सापाचा चाबूक?' तेव्हा मुक्ताई श्रीज्ञानेश्वरमहाराजांना म्हणतात, 'दादा, मी ज्या भिंतीवर बसले आहे ती भिंत चालव.' मुक्ताबाईंकरिता श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भिंत चालविली. हे सगळे दृष्य बघितल्यावर श्रीचांगदेवमहाराज आश्चर्यचकित झाले आणि नंतर ते श्रीमुक्ताबाईंना शरण गेले पुढे त्यांच्याकडूनच श्रीचांगदेवांना अनुग्रह प्राप्त झाला.

श्रीचांगदेवमहाराज तापी-पयोष्णी नद्यांच्या संगमावर असताना चातुर्मास सुरु झाला. चातुर्मासात ते मौनव्रत धारण करून चार महिने डोळे मिटून रहात असत. सकाळी स्नानसंध्या वगैरे झाल्यावर ते पार्थिव लिंगाची पूजा करीत. शिष्याने माती मळून द्यायची व त्याने लिंग तयार करायचे. पण एक दिवस शिष्याने माती मळण्याचा कंटाळा केला आणि त्याने वाळूतच वाटी पालथी घालून त्यावर माती लिंपून लिंग तयार केले. नित्याप्रमाणे श्रीचांगदेवमहाराजांनी या लिंगास आवाहनपूर्वक मंत्राक्षता वाहिल्या व ते हातावर घेऊ लागले. पण ते जागचे हालेना. त्यांनी डोळे उघडून पाहिले, तेव्हा ते वाटीवर स्थापलेले लिंग त्यांच्या योगबळामुळे स्वयंभू लिंग तयार झालेले दिसले. म्हणून श्रीचांगदेवांनी या लिंगावर मंदिर बांधून त्याचे नांव वाटेश्वर - वटेश्वर ठेवले. त्यामुळे श्रीचांगदेवमहाराजांना 'चांगा वटेश्वर' हे नाव पडले. श्रीचांगदेवमहाराजांनी अनेक अभंग लिहिले. तसेच 'तत्त्वसार' या नावाचा १०३६ ओव्यांचा ग्रंथ लिहिला. त्यापैकी ४०५ ओव्याच सध्या उपलब्ध आहेत.

अशा या श्रीचांगदेवमहाराजांनी आपल्या जीवनातील बराचसा काळ पुणतांबा या गावी व्यतीत केला आणि माघ वद्य ३ शके १२९८ म्हणजेच इ.स.१३७६ रोजी पुणतांबा येथे संजीवन समाधी घेतली.

***

समर्थ रामदासस्वामी

जन्म
चैत्र शु.९ शके १५३० (रामनवमी)
दि.२४.०३.१६०८

निर्याण
माघ व.०९ शके १६०३
दि.१३.०१.१६८१

श्री. सूर्याजीपंत ठोसर हे जांब या गावी रहात होते. ते ऋग्वेदी ब्राह्मण होते. ते महान सूर्योपासक होते. त्यांच्या पत्नीचे नांव राणूबाई. यांचे पोटी चैत्र शु. ९ शके १५३० (रामनवमी) दि.२४.०३.१६०८ रोजी रामजन्माच्या शुभमुहूर्तावर मुलगा जन्माला आला. त्याचे नांव 'नारायण' असे ठेवणेत आले. हे नारायण म्हणजेच आमचे 'श्रीसमर्थ रामदासस्वामी' होत.

श्रीसमर्थ सात वर्षाचे असतानाच त्यांचे वडिल श्री. सूर्याजीपंतांचे देहावसान झाले. श्रीरामदासस्वामी हे लहानपणापासूनच विरक्त होते, साहसी होते. समर्थांना १२वे वर्ष लागताच आई म्हणाली, 'नारायणा, बोहल्यावर तरी चढ रे.' आईची आज्ञा मोडायला नको म्हणून समर्थ हे बोहल्यावर चढले मात्र. गुरूजी शुभमंगल सावधान म्हणू लागले. तेव्हा समर्थ म्हणतात, 'मी सावध आहेच, तुम्ही मला सावधान करण्याची गरज नाही.' 'द्विज सावधान ऐसे सर्वत्र विवाह मंगले म्हणती । ते एक रामदासे आयकिले त्या सदा असो प्रणती ।।.' समर्थ बोहल्यावरुन अंगावरील वस्त्रानिशी पळून गेले. तेथून ते पायी चालत पंचवटीला आले. तेथे त्यांनी रामाचे दर्शन घेतले आणि टाकळीस येऊन १२ वर्षे तपश्चर्या केली. तेथून ते नाशिकला आले. आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून त्यांनी आपले 'रामदास' हे नाव धारण केले. या टाकळी गावातील नंदिनी नदीत उभे राहून त्यांनी १३ कोटी रामनामाचे पुरश्चरण केले. समर्थांनी टाकळी येथे मारुतीची मूर्ती स्थापन केली. मारुती हा शक्ती आणि बुद्धिचे दैवत आहे असा समर्थांचा ठाम विश्वास होता. येथे २४ वर्षे तपश्चर्या केल्यानंतर समर्थ हे भारतभ्रमणाकरता बाहेर पडले. काश्मिरमधे गेले असता श्रीनगर येथे शिखांचे सहावे गुरू श्रीहरगोविंदसिंह यांची भेट झाली. या श्रीहरगोविंदसिंहांच्या कमरेला २ तलवारी असायच्या आणि बरोबर १००० सैनिक असायचे. हे बघून समर्थांना आश्चर्य वाटले. समर्थांनी याबाबत श्रीहरगोविंदसिंहांना विचारले की, 'आपण धर्मगुरू आहात, मग आपण दोन तलवारी जवळ कां बाळगता?' तेव्हा गुरू श्रीहरगोविंदसिंह म्हणाले, 'एक तलवार धर्मरक्षणासाठी आणि दुसरी तलवार शीलरक्षणासाठी' यानंतर समर्थ श्रीहरगोविंदसिंहांबरोबर सुवर्ण मंदिरात आले. तेथे त्यांनी २ महिने मुक्काम केला. तेव्हापासून समर्थ हे आपलेजवळ शस्त्र बाळगू लागले. कुबडीमधे छोटी तलवार ठेवत असत.

असे भारतभ्रमण करीत, समर्थ ३६ व्या वर्षी महाराष्ट्रात परत आले. महाराष्ट्रात ते पैठणला आले. पैठणला ते श्रीएकनाथमहाराजांच्या वाड्यात उतरले. त्यावेळी श्रीनाथमहाराज व गिरीजामाऊली यांनी देह ठेवला होता. श्रीएकनाथमहाराजांच्या पत्नी गिरीजामाऊली या समर्थांच्या मावशी होत्या. पण त्यावेळी त्यांनी आपली कुणालाच ओळख दिली नाही.

समर्थांनी शिवथरघळीत 'दासबोध' लिहिला. तो दासबोध शिष्यांनी समजून घेऊन, मग पाठांतर करावे असे समर्थांचे मत होते. शिष्यांना ते दासबोध पाठ करायला लावत. यासाठी ते शिष्यांची परीक्षा घेत. त्या काळात ग्रंथ छापले जात नसल्याने ते हाताने लिहून त्याची नक्कल केली जायची. त्या ग्रंथाला बाईंडिंग नसायचे. त्यामुळे सर्व कागद सुटे असल्याने, पानांवर पृष्ठांक नसायचे. अशावेळी समर्थ, शिष्यांकडून त्यांनी लिहिलेली दासबोधाची पोथी मागवून घेत आणि पत्याप्रमाणे पिसून, पोथीतील सर्व पाने विस्कळीत करीत. मग शिष्याला ते सगळा दासबोध व्यवस्थित लावून ठेवायला सांगत. ज्या शिष्याला दासबोध कंठस्थ असायचा, तोच दासबोध व्यवस्थित लावायचा आणि अशा शिष्यालाच समर्थ 'मठपती' म्हणून नियुक्त करीत असत. ज्यांना दासबोध लावायला आला नाही अशा शिष्यांना समर्थ म्हणत, 'याने दासबोध वाचला नाही, नुसता गंधफुले वाहून पूजला.'

सज्जनगडावरील मठाची इमारत जीर्ण झाली होती. म्हणून त्याची दुरुस्ती करणेचे ठरविले. त्यामुळे समर्थ हे अंगलाई देवळात व शेजारच्या तटातील ओवऱ्यात रहाण्यास आले. इ.स. १६०३ च्या रामनवमीनंतर चाफळहून समर्थ परत येईपर्यंत इमारत तयार झाली. समर्थ आल्यावर वैशाखापासून समर्थ त्या इमारतीत राहू लागले. गृहप्रवेश करतेवेळी समर्थ म्हणाले, 'आता येथे अल्पकाळ रहाणे आहे. यानंतर समर्थांनी खोलीच्याबाहेर येणे व कोणाशीही बोलणे कमी केले. श्रीउद्धवस्वामी आणि श्रीआक्काबाई या दोघांशिवाय ते खोलीत कोणासही येऊ देत नसत.' पितळेच्या खुरांचा पलंग होता. त्यावर ते नित्य बसून असत. अन्न कमी केले होते. ४-५ महिने ते नुसते दुधावर होते. श्रीउद्धवस्वामी एक दिवस समर्थांना म्हणाले की, 'आपले व्याधी निरसनार्थ अनुष्ठान बसवितो व उत्तम वैद्य आणवितो.' त्यावर हसून समर्थ म्हणाले, 'आत्तापर्यंत देहाची ममता टाकण्याचा उपदेश केला, याचे हे सार्थक की काय? प्रारब्धाने देहाचे जे व्हायचे ते होत राहिल.' यानंतर आक्का म्हणाल्या, 'आपली इच्छा नसेल तर राहू दे औषधोपचार. पण आता थंडीचे दिवस आले आहेत. येथे डोंगरावर फार थंडी असते. त्यामुळे आपण चार दिवस चाफळला किंवा अन्य ठिकाणी जाऊ.' तेव्हा समर्थ म्हणाले, 'आक्का, आम्ही चाफळला जाण्याने श्रीरघुवीराच्या उपासनेकडे लोकांचे दुर्लक्ष होऊ लागेल. यासाठी कोठेही आता जाणे नको.'

अशास्थितीत पौषमासात डोमगावहून श्रीकल्याणस्वामी आले. त्यांनी लिहिलेली दासबोधाची प्रत समर्थांनी तपासून दिली. समर्थांचे मुखातून एक श्लोकार्ध निघाला :-

'रविकुलटिळकाचा काळ संनिध आला । तदुपरी भजनाने पाहिजे सांग केला ।'

हे समर्थांचे मनोगत जाणून, '**अनुदिनी नवमी ही मानसी आठवावी । बहुत लगबगीने कार्यसिद्धी करावी ।।**' हे दोन चरण श्रीउद्धवस्वामींनी म्हणून, समर्थांचा श्लोक पूर्ण झाला. हे पाहून समर्थ फार संतुष्ट झाले आणि म्हणाले, 'उद्धवा, शाब्बास, भले शाब्बास.' नंतर श्रीरामापुढे अखंड नामघोष सुरू केला. माघ कृ.८

दिवस उजाडला. श्रीआक्काबाई आणि श्रीउद्धवस्वामी यांचेखेरीज बाकीचे सगळे शिष्य दाराशीच बसून राहिले होते.

दुसरे दिवशी समर्थांनी रघुपतीकडे दृष्टि लावून ध्यान धरले. हे पाहून श्रीआक्का व सर्व शिष्यमंडळी घाबरली. हे पाहून समर्थ म्हणाले, 'इतके दिवस सेवेत राहून वेदांत श्रवण केल्याचे व अध्यात्माचे फळ हेच काय?' हे ऐकून श्रीआक्का म्हणाल्या, 'आपली प्रत्यक्ष सेवा व सगुण दर्शन अंतरेल याचे वाईट वाटते.' त्यावेळी आक्कांच्या समाधानाकरिता समर्थांच्या मुखातून पुढील अभंग प्रगट झाला :-

'माझी काया गेली खरे । परी मी आहे जगदाकारे ।
ऐका स्वहित उत्तरे । सांगेन ती ।।१।।
नका करू खटपट । पहा माझा ग्रंथ नीट ।
तेणे सायुज्याची वाट । ठाई पडे ।।२।।
रहा देहाच्या विसरे । वर्तो नका वाईट बरे ।
तेणे मुक्तीची द्वारे । चोजविती ।।३।।
रामी रामदास म्हणे । सदा स्वरुपी अनुसंधान ।
करा श्रीरामाचे ध्यान । निरंतर ।।४।।

या अभंगाचा आशय श्रीभीमस्वामींनी दोन ओव्यात सांगितला, तो असा :-

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
परी मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।१।।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।
असता न करावा खेद । भक्त जनी ।।२।।

समर्थांनी पद्मासन घातले व ते उत्तराभिमुख बसले. तीन वेळा 'जय जय रघुवीर समर्थ' हा घोष केला आणि समर्थांनी माघ व. नवमी शके १६०३, दिनांक १३.०१.१६८१ रोजी देह ठेवला आणि ते रामरुपाकार झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीउद्धवस्वामींनी अंत्यसंस्कार केले. या दिवसालाच '**दासनवमी**' असेही म्हणतात.

***

प.पू.सद्‌गुरू श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर

जन्म
शके १७६१ इ.स.१८३९

निर्याण
माघ व.११ शके १८६४
बुधवार दि.११.०२.१९४२

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामध्ये खानापूर बलवडी या नावाचे लहान खेडे होते. या खेड्यात श्री.बचारामपंत आणि सौ. येसूबाई या नावाचे जोडपे रहात होते. दोघेही सात्विक व सत्शील होते. या दांपत्याला शके १७६१, इ.स.१८३९ साली एक कन्यारत्न झाले. ही कन्या म्हणजेच आमच्या सद्‌गुरू 'श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर' होत.

श्रीमाईसाहेबांचा वयाच्या ८ व्या वर्षी म्हणजेच इ.स.१८४७ साली चिमडच्या श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज यांचेशी विवाह झाला. श्रीचिमडचेमहाराज विटे या गावी नोकरी निमित्त रहात होते. येथे श्रीमाईसाहेबांनी एका मुलीस जन्म दिला. तिचे नाव 'देवका' असे ठेवणेत आले. त्यानंतर इ.स. १८७८ मध्ये श्रीमाईसाहेबांना एक मुलगा झाला. त्यावेळी त्यांचे घरी श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज रहायला होते. या जन्माला आलेल्या मुलाचे नालच्छेदन व्यवस्थित न झाल्याने हा मुलगा दगावला. हे पाहून तेथील लोक म्हणाले, 'या साधुमहाराजांना घरी ठेऊन घेतल्याने हा मुलगा दगावला आहे.' हे ऐकून श्रीमाईसाहेबांना फार वाईट वाटले. हे बघून श्रीसाधुमहाराज माईसाहेबांना म्हणाले, 'माई, तुम्ही काळजी करू नका, तुम्हाला यापुढे आणखी चांगली मुले-मुली होतील.' या आशीर्वादानुसार श्रीमाईसाहेबांना चांगली मुले झाली.

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांनी या श्रीमाईसाहेबांना अनुग्रह दिला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे श्रीमाईसाहेबांनी शेवटपर्यंत साधन केले. श्रीसाधुमहाराजांनी श्रीमाईसाहेबांना नित्य उपासनेसाठी चांदीच्या पादुका दिल्या. त्या पादुका मस्तकी धारण करून त्यांनी त्याचा स्विकार केला. एकदा श्रीमाईसाहेबांनी विचारले, 'साधुबुवा तुम्ही मला कुठे जागा द्याल?' त्यावेळी साधुमहाराज म्हणाले, 'माई, काही काळजी करु नका. मी तुम्हाला माझ्या पायापाशी जागा देतो.'

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांच्या आज्ञेने श्रीचिमडचेमहाराज व सौ. माईसाहेब या चिमड या गावी रहायला आल्या. यथावकाश मठात माणसांचे जाणे-येणे सुरू झाले. त्यामुळे श्रीमाईसाहेबांचा त्यांचे आगत स्वागत करण्यातच बराच वेळ जाऊ लागला. त्यामुळे त्यांना साधनात विघ्न येऊ लागले. याविषयी त्यांनी श्रीचिमडच्या महाराजांशी सल्लामसलत केली. तेव्हा श्रीचिमडचेमहाराज म्हणाले, 'तुम्ही मठात येणाऱ्यांचे हसतमुखाने आगत-स्वागत करा. हीच तुमची साधना आहे.' त्याप्रमाणे त्या शेवटपर्यंत करत राहिल्या.

श्रीसाधुमहाराजांच्या आशीर्वादाने श्रीमाईसाहेबांचे पोटी इ.स.१८८० साली श्रीदाजीसाहेब, इ.स.१८८५ साली श्रीनारायणमहाराज व इ.स. १८८९ साली श्रीउद्धवरावजीमहाराज असे महान पुत्र अवतीर्ण झाले.

एकदा चिमडमधील काही स्त्रिया काशीयात्रेला जाणार होत्या. त्यांनी श्रीमाईसाहेबांना येणेबद्दल विचारले. तेव्हा त्यांनी मी पतीराजांना विचारून सांगते असे सांगितले. याप्रमाणे 'मी या बायकांबरोबर काशी यात्रेला जाऊ काय?' असा प्रश्न श्रीचिमडमहाराजांना विचारला. तेव्हा श्रीचिमडचेमहाराज म्हणाले, 'अहो तुम्हाला इथेच काशीविश्वेश्वराचे दर्शन घडविले तर' हे ऐकून माईसाहेबांनी होकारार्थी उत्तर दिले. श्रीचिमडचे महाराज एका औदुंबर वृक्षाजवळ गेले आणि त्यांनी त्या वृक्षाची एक फांदी हातात धरली आणि आश्चर्य असे की त्या फांदीतून पाणी (गंगा) वाहू लागले. हे बघून श्रीमाईसाहेबांनी काशीला जाणेचा बेत रद्द केला.

इ.स.१८९१ साली श्रीचिमडमहाराजांनी देह ठेवला. हा त्यांच्यावर मोठा आघात होता. त्यानंतर इ.स.१८९७ साली श्रीलक्ष्मीअक्का, इ.स. १९०० साली श्रीदाजीसाहेबमहाराज व इ.स. १९३२ साली श्रीउद्धवरावमहाराज यांचे झालेले देहावसान त्यांनी स्वतःच्या डोळ्याने पाहिले, पण त्या स्थितप्रज्ञ राहिल्या.

श्रीतात्यासाहेबमहाराजांनी इ.स. १९०० पासून नित्यकीर्तनाला प्रारंभ केला. त्यावेळी ते उपास्य दैवत म्हणून समोर 'दासबोध' ठेवत असत. श्रीमाईसाहेब या एकदा सांगलीस आल्या असताना त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांना विचारले, 'हणमंतराव, कीर्तनासाठी समोर उपास्य दैवत म्हणून काय ठेवता?' तेव्हा समोर समर्थांची तसबीर आणि दासबोध ठेऊन कीर्तन करतो असे त्यांनी सांगितले. तेव्हा श्रीमाईसाहेबमहाराज म्हणाल्या, 'हणमंतराव, तुम्हाला चिमडच्या महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली एखादी वस्तू दिली तर चालेल का?' हे ऐकून श्रीतात्यासाहेब म्हणाले, 'ती वस्तू मी अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचेन.' याप्रमाणे श्रीमाईसाहेबांनी मार्गशीर्ष शु. १४ इ.स. १९०६ साली श्रीचिमडच्या महाराजांच्या पादुका श्रीतात्यासाहेबांना दिल्या. त्या पादुका डोक्यावर घेऊन ते अक्षरशः नाचले.

इ.स. १९०० साली श्रीदाजीसाहेबांनी देह ठेवल्यानंतर श्रीनारायणमहाराज मठाधिपती झाले. यावेळी श्रीमाईसाहेब या येणाऱ्या साधकांना अनुग्रह द्यायच्या. श्रीनारायणमहाराज हे स्त्रियांना अनुग्रह घेण्यासाठी श्रीमाईसाहेबांकडे पाठवित.

अशा या श्रीमाईसाहेबमहाराज या इ.स. १९३८ साली सांगलीत आल्या होत्या. तेव्हा त्या श्रीमामामहाराज यांचे कीर्तन ऐकण्यासाठी 'श्रीरामनिकेतन' येथे बरेच दिवस येत होत्या. श्रीमामांचे कीर्तन व साधनाभ्यास बघून त्यांनी श्रीमामामहाराजांना अनुग्रह करणेची आज्ञा केली. इ.स. १९३९ साली पांडवपंचमीच्या उत्सवात श्रीमाईसाहेबांनी आमच्या श्रीदासराममहाराजांचे कीर्तन चिमड मठात ठेवले. हे कीर्तन इतके उत्कृष्ट झाले की, श्रीमाईसाहेबमहाराज, श्रीनारायणमहाराज हे बेहद्द खूष झाले.

श्रीमाईसाहेबमहाराज या शतायुषी होत्या. श्रीमाईसाहेबांना आत्तापर्यंत दीर्घ आयुष्यात सर्दी, पडसे याखेरीज अन्य गंभीर आजार झालेला नव्हता. शेवटी शेवटी त्यांची हातापायातील शक्ती कमी होत चाललेली होती. शेवटी त्या अंथरूणावर खिळून होत्या. यावेळी त्यांचे चिरंजीव श्रीनारायणमहाराज हे तासा तासाला त्यांचेकडे जाऊन त्यांची प्रकृती पाहून येत असत. तेथील उपस्थित शिष्य मंडळींना याचे आश्चर्य वाटे. त्यांच्या

मनात येऊन जाई की, महाराज, तासातासाला जाऊन काय पहातात? याबाबत शिष्यांनी त्यांना विचारले, तेव्हा श्रीनारायणमहाराज म्हणाले, हा पुत्रधर्म आहे. तो पाळलाच पाहिजे. हा धर्म पाळायचा म्हणजे काय? असे उपस्थित शिष्यांनी विचारले तेव्हा महाराज म्हणाले, परलोकाचे प्रस्थान ठेवलेल्या जीवांना अखेर जागृती राहिल असे करणे म्हणजे त्यांची परमसेवा होय. वडिलांच्या म्हणजे श्रीचिमडच्या महाराजांच्या एका वाक्यावर आईने या मठात कितीतरी कष्ट सोसले आहेत. सारखे लोक यायचे, पण कधी कंटाळा केला नाही. सर्वांनाच लळा लावला. 'हाच तुमचा अभ्यास, तो नीट करा म्हणजे सर्व श्रेय तुम्हाला मिळेल' असे आश्वासन श्रीचिमडच्या महाराजांनी, तिने अभ्यास मागितला तेव्हा ते दिले होते. ते पुरे करणे माझे कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य पुरे करण्याची वेळ जवळ आली आहे. श्रीनारायणमहाराज मधून मधून आत जाऊन पहायचे की आई जागृतीत आहे की शून्यावस्थेत आहे. केव्हा केव्हा आई हसत होती याचा अर्थ ते जागृतीचे चिन्ह होते. मरणकाळी सुषुम्नेचा जोरदार उठाव होतो व जीव शून्यावस्थेत जातो. तेथे त्यास जागृत करता आले म्हणजे काम झाले. अशी खटपट शेवटच्या काळात श्रीनारायणमहाराजांनी केली.

अशा या श्रीमाईसाहेबमहाराजांनी माघ व. ११ शके १८६४, बुधवार दि.११.०२.१९४२ रोजी सायंकाळी ५ वाजता, वयाच्या १०३ व्या वर्षी आपले सद्‌गुरू श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, आपले पती श्रीचिमडचेमहाराज यांना वंदन करून महाप्रयाण केले. त्यावेळी श्रीसाधुमहाराजांच्या समाधीमंदिरातील श्रीसाधुमहाराजांच्या पादुका उचकटून पडल्या. खऱ्या अर्थाने श्रीसाधुमहाराजांनी श्रीमाईसाहेबांना आपल्या पायापाशी जागा देऊन आपले शब्द खरे केले.

श्रीमाईसाहेबांनी ज्या दिवशी देह ठेवला, त्या दिवशी श्रीदासराममहाराजांचा सौ.सीतावहिनींशी नरसोबावाडी येथे विवाह झाला. विवाहानंतर सायंकाळी ५ चे दरम्यान या दांपत्याची टांग्यातून वरात निघणार होती. श्रीदासराममहाराज टांग्यामध्ये चढत असतानाच, कोणतेही भौतिक कारण नसताना त्यांच्या गळ्यातील हार आपोआप तुटून पडला. हे बघून तात्काळ श्रीदासराममहाराज म्हणाले, 'आत्ता चिमडला श्रीमाईसाहेबांचे निर्वाण झाले.' सांगलीस परत आल्यावर त्यांना अधिकृत वार्ता कळली. श्रीमाईसाहेब ऊर्फ सौ.सीताबाई यांनी देह ठेवला आणि त्याच माईसाहेब आमच्या श्रीदासराममहाराजांच्या पत्नी सौ. सीताबाईंच्या रूपाने आमच्या घरात आल्या.

***

श्रीनरहरीमहाराज वासुदेवराव दिवाण अर्थात
श्रीदत्तमहाराज, अष्टे (श्रीदत्तं भडजी)

जन्म
आश्विन शु.०१ शके १८१६
दि.०१.१०.१८९४

निर्याण
फाल्गुन शु.०६ शके १८४७
दि.१८.०२.१९२५

करवीर प्रांतात वारणानदीच्या काठी वठार म्हणून एक गाव आहे. या गावास बुवाचे वठार असे म्हणतात. याचे कारण या गावात पुष्कळ हरदास मंडळी रहात असत. या गावात श्रीएकनाथमहाराज यांचे नातू श्रीउद्धवस्वामीमहाराज यांची समाधी व मठ आहे.

अशा या गावात श्री. वासुदेवराव दिवाण हे सत्शील गृहस्थ रहात होते. तसेच या गावात श्रीएकनाथमहाराजांचे वंशातील श्रीउद्धवस्वामी महाराजांचे वंशज श्री. राजारामपंत इनामदार रहात होते. यांना मुक्ताबाई नावाची कन्या होती. या मुक्ताबाईचा श्री. वासुदेवराव दिवाण यांचेबरोबर विवाह झाला. यथावकाश या दांपत्याला अनुक्रमे सखाराम व वामन असे दोन पुत्र झाले आणि त्यानंतर काही कालावधीने यांचे पोटी आश्विन शु.१ शके १८१६ दि.०१.१०.१८९४ रोजी एक पुत्ररत्न जन्माला आले. या मुलाचे नांव 'नरहरी' ठेवणेत आले आणि हेच नरहरी पुढे 'श्रीदत्तमहाराज' या नावे प्रसिद्धीला आले.

श्रीदत्तमहाराज हे शिराळा येथे शालेय शिक्षण घेत होते. पण तेथे ते हूडपणा करीत असत. त्यामुळे त्यांचे कसेबसे मराठी ५ वी इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. श्रीदत्तमहाराज हे शिकत नसल्याने घरातील मंडळी यावरून त्यांना सतत बोलत असत. यामुळे ते उद्विग्न होऊन वयाच्या १३ व्या वर्षी म्हणजेच इ.स. १९०७ साली, नोकरीच्या निमित्ताने सांगलीस जातो म्हणून घराबाहेर पडले. त्यांनी चालत चालत सांगली गाठली. पण सांगलीत आल्यावर नोकरी कोठे मिळेना. त्यांनी नोकरी करावी अशी ईश्वरी इच्छाच नसावी असे वाटते. या दरम्यान त्यांना कळले की श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज म्हणून कोणी सत्पुरुष आलेले असून, ते थोर अवतारी पुरूष आहेत. लगेच त्यांनी नृसिंहवाडी गाठली व श्रीटेंबेस्वामींचे दर्शन घेतले.

त्यानंतर श्रीदत्तमहाराज हे वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजेच इ.स.१९०८ साली श्रीक्षेत्र गाणगापूरला गेले. तेथे गेल्यावर त्यांना प्रत्यक्ष श्रीदत्तगुरूंनी दर्शन दिले आणि त्यांना ईश्वरानुग्रह दिला. त्यानंतर श्रीदत्तमहाराज हे गाणगापूरहून परत आपल्या वठार या गावी आले. साधारणपणे ते येथे २ वर्षे राहिले. श्रीदत्तमहाराजांच्या मनात आले की आपण पंढरपूरला जावे आणि याप्रमाणे ते एकाएकी निघाले. वाटेत जाताना शुकाचार्यांचा डोंगर लागतो. त्या डोंगरावर साधनेकरता आवश्यक असणारा एकांत व रम्य वातावरण पाहून, त्यांनी त्या डोंगरावर ६ महिने राहून अनुष्ठान केले व नंतर ते पंढरपूरला मार्गस्थ झाले.

पंढरपूरला आल्यावर त्यांची, थोर विभूती प.पू.श्रीहरिहरमहाराज यांची गाठ पडली. श्रीहरिहरमहाराज हे ब्रह्मचारीव्रत आचरण करणारे महान साधू होते. त्यांना पाहून श्रीदत्तमहाराज त्यांचेकडे आकृष्ट झाले व

त्यांचेबरोबर राहू लागले. श्रीहरिहर महाराजांनी श्रीदत्तमहाराजांना वयाच्या १६ व्या वर्षी म्हणजे इ.स.१९१० साली मंत्रोपदेश देऊन, शक्तीपात दीक्षा दिली.

यानंतर श्रीहरिहरमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांची परमार्थातील सात्विक/वाचिक/मानसिक तपाचरण मनोभूमिका तयार झाली आहे हे पाहून, त्यांना योगसाधनेसाठी प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराजांकडे पाठविले. श्रीटेंबेस्वामींनी श्रीदत्तमहाराजांना हटयोग दीक्षा दिली. त्यानंतर श्रीदत्तमहाराजांनी आपले वैराग्य व साधन घट्ट व्हावे म्हणून **श्रीकृष्णा प्रदक्षिणा** केली. याबरोबरच त्यांनी भारतभ्रमण केले. शेवटी ते तंजावरपर्यंत गेले. तंजावर येथे ते ३ वर्षे मुक्कामास होते. तेथून ते इ.स. १९२३ साली थेट आपल्या वठार या जन्मगावी आले. तेथून थोडेच दिवसात ते अष्टे मुक्कामी आले आणि तेच त्यांचे कायमचे वास्तव्यस्थान झाले.

श्रीदत्तमहाराजांचा उपनिषदे तसेच तत्सम ग्रंथांचा अभ्यास होता. श्रीदत्तमहाराजांनी आयुष्यभर श्रीटेंबेस्वामी लिखित '**श्रीदत्तमहात्म्य**' या एकाच ग्रंथावर प्रवचन केले.

अशा या श्रीदत्तमहाराजांनी आपण समाधी घ्यावयाची असे ठरविले. फाल्गुन शु.६ शके १८४७, गुरुवार दि.१८.०२.१९२५ रोजी त्यांनी सायंकाळी, त्यांच्याजवळ असलेल्या श्रीदत्तमूर्तीची आरती केली व मंत्रपुष्प म्हटले. यानंतर लगेच त्यांनी आसनावर बसून, पुन्हा संध्या करण्याची इच्छा प्रगट करून, चटकन ते समाधीच्या आसनांपैकी एक आसन घालून बसले. श्रीदत्तमहाराजांनी आचमन करून प्राणायाम केला व लगेच समाधी लावली. उपस्थित मंडळींना ही नित्यसमाधी आहे का महासमाधी आहे हे कळेना.

श्रीदत्तमहाराजांनी प्राणायाम केल्यावर म्हणजेच रात्रौ ८.३० वा. त्यांचे सर्व शरीर ताठ होते. ते ३ तासपर्यंत त्या अवस्थेत होते. ३ तासानंतर त्यांची मान थोडी कलली. मस्तकातून फट् असा आवाज होऊन ब्रह्मरंधाचा भेद झाला आणि मस्तकाला खळगा पाडून बारीक छिद्र पडले आणि दत्तमहाराजांनी रात्री ११.३० च्या सुमारास महाप्रयाण (समाधी घेतली) केले. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३१ वर्षे होते.

समाधीला सरकारी परवानगी मिळण्यास १७ तास लागले. तोपर्यंत महाराजांचे सर्वांग मऊ होते. त्यांना स्नान घालणेत आले आणि त्यानंतर त्यांना कफनी, रुद्राक्षमाळा आणि हार घालणेत आला. त्यांना घातलेल्या स्नानाचे जल, तीर्थ म्हणून प्राशन करण्यास प्रत्येकजण धडपडत होते. पाण्याचे पाट वाहू लागले. शेवटी तेथील माती, चिखल लोकांनी आपल्या अंगास लावून घेतला. समाधीच्या जागेमध्ये त्यांचा कमंडलू व श्रीदत्तमहात्म्य ही पोथी ठेवण्यात आली. सर्वांनी जड अंतःकरणाने समाधीचे द्वार बंद केले. समाधीचा कार्यक्रम पूर्ण होण्यास दुसरे दिवशीचे रात्रीचे ११ वाजले. तोपर्यंत अष्टे गावातील चूल बंद होती.

अशा या श्रीदत्तमहाराजांनी फाल्गुन शु. ६ शके १८४७ दि.१८.०२.१९२५ रोजी, वयाच्या ३१व्या वर्षी देह ठेवला.

***

प. पू. श्रीमामासाहेब देशपांडेमहाराज

जन्म
आषाढ शु.०२ शके १८३६
दि.२५.०६.१९१४

निर्याण
फाल्गुन शु.०९ शके १९१२
दि.२१.०३.१९९०

छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या नंतरच्या काळात मल्हारबा देशपांडे नामक निष्ठावान सरदार होऊन गेले. त्यांच्या वंशातील श्री. राघो निळो देशपांडे यांची वंशपरंपरा भोर जवळील नसरापूर येथे स्थायिक झाली. या श्री. राघो देशपांडे यांचे सुपुत्र श्री दत्तोपंत देशपांडे यांचेकडे नसरापूरचे कुलकर्णीपण होते. देशपांडे हे नसरापूरचे वतनदार होते. मुबलक शेती त्यांचेकडे होती. श्री. दत्तोपंत हे अतीव शांत स्वभावाचे आणि भाविक होते. त्यांना प.पू.सद्गुरू श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी महाराजांचा अनुग्रह होता. ते शाडूच्या मूर्ती अप्रतिम बनवत असत. ते स्वतः वैद्यकीय आणि ज्योतिषशास्त्रात निष्णात होते. या पू. श्रीदत्तोपंतांचा विवाह वयाच्या अठराव्या वर्षी अक्कलकोट संस्थानातील वाकनीस श्री. नारायण भट्ट सोनटक्के यांची द्वितीय कन्या कु. बाई यांच्याशी झाला. कु. बाई यांना श्री स्वामी समर्थ महाराजांनी स्वतःच्या मांडीवर घेऊन 'ही आमचीच पोर आहे' असे उद्गार काढून आशीर्वाद दिला होता. कु. बाई यांना त्यांच्या वडिलांकडून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आज्ञेने परंपरेचा शक्तीपात अनुग्रह लाभलेला होता. कु. बाई यांचा नवव्या वर्षी विवाह होऊन, त्यांचे सासरचे, सौ. पार्वती असे नाव ठेवणेत आले.

श्रीदत्तोपंत आणि सौ. पार्वतीदेवी यांना पहिली मुलगी झाली व ती लगेच निवर्तली. त्यानंतर गोविंद आणि रघुनाथ ही दोन मुले झाली. त्यानंतर झालेली अपत्ये पण लवकरच निवर्तली, पण एक कन्या होती. तिचे नाव अनुसूया होते. अपत्ये होऊन ती लवकरच निवर्तत असलेने दोघेही अत्यंत दुःखी झाले. शेवटी १९१२ साली त्यांनी नरसोबावाडी येथे पौर्णिमेला जाऊन देवासमोर गाऱ्हाणे घातले. तेव्हा साक्षात् दत्तात्रेयांनी श्रीटेंब्येस्वामींच्या भेटीस जावे असा आदेश दिला. त्यावेळी टेंब्येस्वामी वाडीतच होते. त्यांचे दर्शनास जाताच स्वामी स्वतःहून म्हणाले, 'काही काळजी करू नका, आपल्याला पुत्रप्राप्ती होईल आणि तो दीर्घायुषी होईल.' या आशीर्वादाप्रमाणे सौ. पार्वतीदेवी गर्भवती राहिल्या आणि त्यांना असह्य प्रसूतीवेदना होऊ लागल्या. त्यावेळी सौ. पार्वतीदेवींनी श्रीटेंब्येस्वामींचा धावा केला. तोच श्रीटेंब्येस्वामी त्यांचेसमोर प्रगट झाले आणि म्हणाले, 'बाळ काळजी करू नकोस, गुरूवारी सकाळी आमच्याच पूर्णांशानी पुत्र जन्माला येईल. त्याचे नांव श्रीपाद ठेवा' असे म्हणून श्रीटेंब्येस्वामी अंतर्धान पावले. या आशीर्वादाप्रमाणे सौ.पार्वतीदेवी यांचे पोटी आषाढ शु. द्वितीया शके १८३६ दि. २५ जून १९१४ साली पुत्ररत्न अवतीर्ण झाले. बाराव्या दिवशी श्रीटेंब्येस्वामींनी सांगितलेप्रमाणे त्यांचे 'श्रीपाद' हे नाव ठेवणेत आले. हा श्रीपाद म्हणजेच आमचे '**प.पू.सद्गुरू श्री श्रीपाद दत्तात्रेय तथा श्रीमामासाहेब देशपांडेमहाराज**' होत.

प.पू.श्रीमामा ३ वर्षांचे असताना पुन्हा त्यांनी बिऱ्हाड पुण्याहून नसरापूरला हालवले. प.पू.श्रीमामांचे शालेय शिक्षण तेथेच झाले. घरातील संस्कार करणेचे अवघड काम त्यांच्या मातोश्री सौ. पार्वतीदेवी यांनी यथासांग पार पाडले. प.पू.श्रीमामा हे तल्लख बुद्धिचे, चौकस आणि हुशार होते. वयाच्या आठव्या वर्षी प.पू.श्रीमामांची मुंज झाली. मुंज झाल्यावर त्यांचे पितृदेव पू. श्रीदत्तुअण्णांनी त्यांना चतुष्पादा गायत्रीचा अनुग्रह केला आणि लगेचच त्यांना हिमालय यात्रेला घेऊन गेले. पुढे वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत नर्मदा परिक्रमा केली. कालांतराने पू.श्री दत्तुअण्णांनी ६ मे १९२८ रोजी देह ठेवला. पू. श्री.दत्तूअण्णांनी प.पू.श्रीमाामांचे पुण्याच्या भारत इंग्लिश स्कूलमधे नाव घातले होते. पण शिक्षण सुरू झाले नाही तोच पू.श्रीदत्तुअण्णा गेले. त्यामुळे प.पू.श्रीमामांच्यावर शिक्षण अर्धवट सोडून लहान वयातच कुटुंब पोषणाची जबाबदारी आली. वर्तमानपत्र वाटणे, साबण, तेल इ. विकणे असे व्यवसाय ते करु लागले. पुढे एका छापखान्यात नोकरी केली. त्याच सुमारास स्वातंत्र्य चळवळ सुरू होती. प.पू.मामा या स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. असहकार, चलेजाव, स्वदेशी, सविनय कायदेभंग इ. चळवळीत प.पू.मामांनी भाग घेतला. प.पू.श्रीमामा हे अतिशय उत्तम नट आणि दिग्दर्शक हेते. छोट्यामोठ्या नोकऱ्या करत शेवटी प.पू.श्रीमामा खडकीच्या ॲम्युनेशन फॅक्टरीत कामाला लागले. त्यावेळी त्यांना मातोश्रींनी ज्ञानेश्वरीची गोडी लावली होती. त्याप्रमाणे प.पू.श्रीमामा हे ज्ञानेश्वरीचा अभ्यास करु लागले. मातोश्रींनी त्यांना विद्या शिकविल्या. पारमार्थिक गोडी निर्माण झाली आणि त्यांची पारमार्थिक तयारी पाहून मातोश्रींनी त्यांना मार्गशीर्ष शु. सप्तमी दि.२६.११.१९४१ रोजी पहाटे दिव्य शक्तीपात अनुग्रह केला व त्याचवेळी परंपरेचे उत्तराधिकार दिले. अनुग्रहानंतर मातोश्रींनी प.पू.श्रीमामांना सांगितले की, 'श्रीपाद, तू जरी आता शक्तीसंपन्न झाला असलास तरीही, परंपरा चालवण्यासाठी मंत्र हवा. हा मंत्र मी देऊ शकत नाही. बरोबर बारा वर्षांनी तुला थोर सत्पुरुषांकडून तो मंत्र तुला प्राप्त होईल.' ज्या दिवशी मातोश्रींनी मामांना अनुग्रह केला, त्याच रात्री म्हणजेच दि.२६.११.१९४१ रोजी मातोश्रींनी देह ठेवला. आपल्या आईने देह ठेवला याचे पू.मामांना अतीशय दुःख झाले आणि पुढे येणाऱ्या संकटांना त्यांनी धीरोदात्तपणे तोंड दिले.

प.पू.श्रीमामांचा मातोश्री असतानाच बबी बोपर्डीकर नामक कन्येशी विवाह झाला होता. विवाहानंतर त्यांचे 'इंदिरा' असे नाव ठेवले होते. पण पहिल्या बाळंतपणात नवजात बालकासह ती निवर्तली. हे बघून प.पू.श्रीमामांच्या मनात संन्यास घ्यावा अशी इच्छा निर्माण झाली. तेव्हा त्यांच्या मातोश्रींनी त्यांची समजून घातली. मातुश्रींच्या देहावसानानंतर लगेचच प.पू.श्रीमामांचा दुसरा विवाह झाला, पण तोही अल्पकाळच टिकला. ही पत्नी देखील बाळंतपणातच अपत्यासह निवर्तली. परत तृतीय विवाह झाला, पण वयाच्या ३४ व्यावर्षी याही पत्नीचे देहवसान झाले. खऱ्या अर्थाने प.पू.श्रीमामांचा लौकीक व्यवहार संपला आणि श्रीस्वामी समर्थमहाराज यांचे आज्ञेने १५ जून १९४८ रोजी प.पू.श्रीमामांनी गृहत्याग केला. १९३७ सालापासून त्यांनी

पंढरीची वारी सुरू केली. अशी वारी त्यांनी १२ वर्षे केली. त्यानंतर ह.भ.प. श्रीकेशवराव देशमुख महाराजांच्या दिंडीतून वारी करणेस सुरु केले, ती वारी १९८० पर्यंत सुरू होती.

यानंतर प.पू.श्रीमामा हे राजकोट येथे रहाणेस गेले. तेथे सौराष्ट्र परिवहन खात्यात नोकरी धरली. तेथे कैवल्यधाम योगाश्रमाच्या शाखेतील स्वामी दिगंबरजी यांचेबरोबर स्नेहसंबंध जुळले. त्यांचेबरोबर श्रीमामांनी हिमालय यात्रा केली. प.पू.श्रीमामांनी आपले आयुष्यात सहा वेळा हिमालय, दोन वेळा अमरनाथ, एकवीस वेळा गिरनार, पाच वेळा रामेश्वर इ. यात्रा केल्या. तीर्थयात्रेबरोबरच प.पू.श्रीमामांची खडतर तपसाधनाही सुरूच होती.

इ.स.१९५४ साली पंढरपूरची वारी झालेनंतर ह.भ.प. श्रीयशवंतराव वैद्य मास्तरनी त्यांना सोलापूरला येणेबाबत विनंती केली. श्री.यशवंतराव हे ज्ञानेश्वरीचे अभ्यासक होते. त्यांचेशी प.पू.श्रीमामांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. त्यामुळे प.पू.श्रीमामा हे सोलापूरला वैद्य मास्तरांच्या घरी गेले. दुपारचे भोजन झाल्यावर सोलापूर पाहणेचे उद्देशाने सहज फिरायला गेले. जाऊन परत आले, तर घराबाहेर चपलांचा ढीग दिसला. हे पाहून प.पू.श्रीमामा माडी चढून वर गेले. तेथे तिसऱ्या मजल्यावर एक तेजस्वी सत्पुरुष व्याघ्राजिनावर बसलेले दिसले. त्यांना पाहताच प.पू.मामा एकदम बोलून गेले की, 'यांच्या पत्रिकेत पंचमात बुध चंद्र युती असणारच.' ज्योतीष शास्त्रानुसार ते सहज बोलून गेले. हे वाक्य त्या सत्पुरुषांच्या कानी पडले आणि त्यांनी प.पू.श्रीमामांना जवळ बोलावले. आपले जवळ बसवून घेतले आणि म्हणाले, 'आपल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि आपल्या मातोश्रींची पूर्णकृपा आहे.' हे ऐकल्यावर प.पू.मामांचे डोळे मिटले गेले आणि प.पू.श्रीमामा समाधी अवस्थेत गेले. समाधीतून उठल्यानंतर त्यांनी त्या सत्पुरुषाच्या चरणावर मस्तक ठेवले. ते सत्पुरुष म्हणजेच प.पू.सद्गुरू योगीराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज होत. त्यांना पाहिल्यावर प.पू.श्रीमामांना अंतरीची खूण पटली. श्रीगुळवणीमहाराजांनी गुरूपौर्णिमेच्या मुहूर्तावर श्रीमामांना सांप्रदायिक महामंत्र दिला आणि परंपरेचे उत्तराधिकारी पद प्रदान केले. यानंतर प.पू.श्रीमामांनी साधन अधिक तीव्रतेने सुरू केले. कुरवपूरला अनुष्ठान केले. १९६१पर्यंत प.पू.श्रीमामा हे कोणालाही दीक्षा देत नसत. पण त्यानंतर ते दीक्षा देऊ लागले. पण प्रत्येक दीक्षेच्यावेळी ते साधकाना सांगत की, 'आम्ही दीक्षेसाठी निमित्तमात्र आहोत. दीक्षा ही श्रीगुळवणीमहाराजांचीच आहे.' यातच प.पू.श्रीमामांचे श्रेष्ठ गुरूपण दिसून येते. श्रीमामांनी सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडीजवळ जागा विकत घेऊन तेथे एक वास्तु निर्माण केली. या वास्तुचे 'माऊली आश्रम' असे नामकरण केले. प.पू.मामांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात संतवाङ्मय, तत्त्वज्ञान आणि ज्ञानेश्वरीचा प्रचार व प्रसार केला. अनेक ग्रंथ प्रकाशित केले. त्यासाठी त्यांनी 'श्रीवामनराव प्रकाशन' ची स्थापना केली. प.पू.श्रीमामा हे भगवान श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे उपासक व अभ्यासक होते. माऊलींच्या वाङ्मयाचा अखंड अभ्यास त्यांनी केला.

इ.स.१९८८-८९ साली प.पू.श्रीमामांचे अमृतमहोत्सवी वर्ष फार मोठ्या प्रमाणावर साजरे झाले. अनेक मोठ्या गावात सत्कार समारंभ झाले. प.पू.श्रीमामांनी आपल्या परंपरेचे अधिकार प.पू.सौ.शकुंतलाबाई आगटे आणि प.पू.श्रीशिरीषदादा कवडे यांना प्रदान केले. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच सध्या संप्रदायाचा कार्यभार सुरू आहे. अमृतमहोत्सवानंतर प.पू.मामांनी निजधामाला जाणेचा विचार सुरू केला. त्याच सुमारास त्यांना श्री स्वामी समर्थांचे दर्शन झाले आणि 'आयुष्य वाढवून देऊ का?' असे त्यांनी विचारले. तेव्हा प.पू.श्रीमामा म्हणाले, 'स्वामी, आता काया शिणली आहे. आता आयुष्य वाढून मला नको.' त्यानंतर प.पू.श्रीमामांनी आपल्या निर्वाणाचे संकेत काही भक्तांना सांगून ठेवले. प.पू.श्रीमामांनी शेवटच्या काळात पाटण तालुक्यातील कोयनानगर जवळील 'दत्तधाम' येथे श्री नृसिंहसरस्वतीस्वामी महाराजांच्या मूर्तीची स्थापना केली. या समारंभानंतर मात्र प.पू.श्रीमामा हे निरवानिरवीची भाषा करु लागले आणि फाल्गुन शु. नवमी शके १९१२ मंगळवार दि.२१.०३.१९९० रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी योगमार्गाने महाप्रयाण केले.

***

प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर कृत श्रीमामासाहेब देशपांडेमहाराज यांची आरती

आरती श्रीपादा । जय जया प्रसिद्धा ।
दत्तप्रभू जन्म घेती । नवल हे बहु सिद्धा ।।ध्रु।।
पार्वती मातेने । तुवा अनुग्रह केला ।
शक्तीपात दीक्षा जैसी । तुवा नेम चालविला ।।१।।
पाटील आदि करुनी । तुजलागी भेटले ।
साधन पाहुनी । प्रेमे कौतुक केले ।।२।।
वामनराये तुवा । श्रीमंतची केले ।
म्हणोनी दासरामे । पदकमल वंदिले ।।३।।

प.पू. मातोश्री सौ.सीतावहिनी केळकर

निर्याण
फाल्गुन शु. दशमी, गुरुपुष्यामृत
शके १९०४ दि.२४.०३ १९८३

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात इचलकरंजी हे गाव आहे. या गावात श्री.दत्तोपंत गोवंडे या नावाचे गृहस्थ रहात होते. ते गाढे विद्वान आणि पेशाने शिक्षक होते. पण सव्यसाची शिक्षक म्हणून त्यांचा जास्त परिचय होता. हे मराठी शाळामास्तर होते. यांच्या पत्नीचे नांव सौ. गिरीजाबाई. या दांपत्याला ४ मुले व ३ मुली अशी सात अपत्ये होती. यापैकी या दांपत्याच्या पोटी शेवटी एक कन्यारत्न झाले. बाराव्या दिवशी या कन्येचे नांव 'मालती' असे ठेवणेत आले. ही मालती हे सर्व भावंडातील शेंडेफळ होते. श्री. दत्तोपंतांना मिळणारा पगार कमी आणि खाणारी तोंडे जास्त, त्यामुळे हाता तोंडाची गाठ कशीबशी घातली जात होती. त्यामुळे घरातील सर्व कामे करण्याची सवयच लहानपणापासून या मालतीला होती. मालतीच्या लहान वयातच तिचे पितृछत्र हरपले. त्यामुळे सौ. गिरीजाबाईंनीच सगळ्यांचा आई आणि वडिल या दोन्ही भूमिका बजावून सांभाळ केला. घरचा कर्ता पुरुष निवर्तल्याने घरची परिस्थिती बिकट बनली. त्यामुळे मालतीला फारसे शिक्षण घेता आले नाही. तरीही मालती फायनल परीक्षा उत्तीर्ण झाली. वयाची १३ वर्षे उलटून गेल्यानंतर त्यावेळच्या पद्धतीनुसार या मालतीसाठी वरसंशोधन सुरू झाले. विवाहाचे बाबतीत मिरजेच्या मराठे मिल्स चे संस्थापक श्री.बळवंतरावजी मराठे यांनी पुढाकार घेतला आणि वर निश्चित केला. सांगलीचे संतश्रेष्ठ शांतीब्रह्म श्रीमामामहाराज केळकर यांचे सुपुत्र श्रीदासराम यांचेशी विवाह निश्चित केला. माघ व.११ शके १८६४ इ.स. १९४२ या दिवशी नृसिंहवाडी येथे विवाह पार पडला. चि.सौ.कां.मालती ही आता सौ.सीता या सासरच्या नावाने ओळखली जाऊ लागली. ही सीता म्हणजेच आमच्या 'सौ. सीतावहिनी केळकर' होत. विवाह पार पडल्यानंतर नृसिंहवाडी येथे वरात निघाली. यावेळी सौ. सीतावहिनींचे पती श्रीदासराम म्हणजे संतशिरोमणी श्रीदासराममहाराज केळकर हे टांग्यात बसत असताना, महाराजांच्या गळ्यातील हार तुटून पडला. क्षणभर महाराज स्तब्ध झाले आणि आपल्या वडिलांना म्हणजे श्रीमामामहाराजांना म्हणाले, 'मामा, चिमडला माईसाहेबमहाराज यरगट्टीकरांनी आत्ता देह ठेवला आहे.' आणि ते खरे होते, हे सांगलीस परत आल्यावर कळले. माईसाहेबमहाराजांचे नांव सीता होते आणि या मातोश्रींचे नांवही सीता ठेवलेले होते. यादृष्टीने माईसाहेबमहाराजच या सीतामातोश्रींच्या रुपाने केळकर घराण्यात आल्या असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सौ.सीता या जेव्हा गृहिणी म्हणून केळकरांच्या घरात आल्या तेव्हा घरी मामामहाराज हे श्वशूर, सौ. इंदिराबाई या सासूबाई आणि श्रीदासराममहाराजांचे मामेबंधु श्री. भरत ही मंडळी घरात होती. श्री. भरत फाटक हे सौ.सीताबाईंना वहिनी म्हणू लागले आणि त्यामुळे सीतावहिनी हेच नांव पुढे रूढ झाले. सीतावहिनी या नावानेच त्या ओळखल्या जाऊ लागल्या.

आपल्या सासूबाई सौ. इंदिराबाई यांची प्रकृती थोडी बेताचीच असल्याने घरातील बरीचशी कामे सौ.सीतावहिनींच करीत असत. स्वतःचे वय लहान असूनही वेळच्यावेळी कामे करण्याची सवय त्यांनी स्वतःला लावून घेतली आणि सर्व कामे समर्थपणे पार पाडण्यास सुरवात केली. सौ. सीतावहिनी पहाटे ४ ला उठायच्या. अंगण झाडायचे. समोरच्यादारी श्री.पवार कुटुंब रहायचे. त्यांचेकडे जनावरे होती. त्यांचेकडे जाऊन शेण आणायचे आणि सगळ्या अंगणभर शेणकाला पसरायच्या. विहिरीचे पाणी स्वतः ओढून घरातील पाणी भरत. धुणे आणि भांडी इ. सर्व कामे त्या स्वतः करायच्या. अनेक वेळा त्या धुणे घेऊन कृष्णानदीच्या विष्णुघाटावर जायच्या. स्वयंपाकाची जबाबदारीही सीतावहिनींच्या खांद्यावर आली. घरात देऊळ असलेने लोकांचे जाणे-येणे भरपूर होते. अशांकडेही त्या विशेष लक्ष देत असत.

श्रीमामामहाराजांचे सकाळ संध्याकाळचे नित्यनेमाचे कार्यक्रम असत. त्या कार्यक्रमासही आवश्यक ती पूर्वतयारी करणे, आरती, प्रसाद वेळच्यावेळी ठेवणे या गोष्टीही सीतावहिनी चोख पार पाडीत. प.पू. श्रीमामामहाराज व प.पू.श्रीदासराममहाराज यांच्या नित्याच्या कीर्तनात मध्यंतरी बुक्का लावून झाल्यावर, स्त्रीश्रोत्यांना प्रसाद वाटला जाई. हेही काम सौ. वहिनी मोठ्या उत्साहाने करीत. काही विशेष प्रसंगी अंगावर भरजरी साडी, दागिने आणि गोऱ्या मुखावर शोभिवंत नथ असणारी ती मूर्ती पाहिल्यावर, साक्षात् लक्ष्मीच जणू श्रीदासराममहाराजांच्या घरी वावरत आहे असा भास होई. सौ. वहिनींच्या रुपाने एका सतीचाच घरात प्रवेश झाला होता. सौ. सीतावहिनींचा विवाह झाल्यावर त्याच वर्षीच्या मे महिन्यात आमचे मामा या दांपत्याला घेऊन रामेश्वर दर्शन करुन आले. यथावकाश म्हणजे लग्नानंतर दोन वर्षांनी म्हणजेच दि.२३.१०.१९४४ रोजी सौ. सीतावहिनींचे पोटी पुत्र अवतीर्ण झाला. या पुत्राचे नांव 'चंद्रशेखर' असे ठेवण्यात आले. हा चंद्रशेखर म्हणजेच माझे पितृदेव प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर. यानंतर यथावकाश श्री. सूर्यकांत, श्री. अनल, श्री. अनिलप्रभू असे तीन पुत्र झाले.

घरातील सर्व कामे स्वतः करत असलेने सौ.सीतावहिनींना माहेरी जाणेस सवड मिळत नसे. सासरची सगळीच माणसे ही सत्पुरुष आणि प्रेमळ असलेने माहेरचा जिव्हाळा सासरीच मिळाला. त्यामुळे माहेरची आठवण त्यांना कधी झालीच नाही. सौ. सीतावहिनींच्या वडिल भगिनी सौ.अंबुताई भावे या काही कारणाने प्रथम काही दिवस त्यांचेच घरात व कालांतराने शेजारीच बिऱ्हाडाने कायम सानिध्यात राहू लागल्या. या दोन बहिणींचे एकमेकावर जीवापाड प्रेम होते. कुठे जायचे झाले तरी या दोन बहिणी कायम बरोबर असत. शिवाय त्यांचे थोरले बंधू श्री. रामभाऊ गोवंडे आणि श्री. हरिभाऊ गोवंडे महिन्यातून एकदा तरी बहिणीला भेटायला येत असत.

सौ. सीतावहिनींचा वेळच्यावेळी काम हा स्थायीभाव होता. त्यामुळे दैनंदिन कामे वेळच्यावेळी होत असत. प.पू.श्रीदादा हे ट्रेझरीमध्ये नोकरीस होते. त्या दरम्यान संस्थान विलीन झाले आणि प.पू.श्रीदादांची तासगावला बदली झाली. पण काही कारणाने ही नोकरी त्यांनी सोडली. त्यामुळे घरातल्या येणाऱ्या घरभाड्यावर प्रपंच सुरू झाला. आपल्या पतीने नोकरी सोडली, आता आपले कसे व्हायचे! हा विचार सौ.सीतावहिनींच्या मनात देखील आला नाही. त्याच उत्साहाने त्या पुढे कर्म करत राहिल्या.

सौ. सीतावहिनींकडे दुर्दम्य उत्साह होता. एकदा वाड्यातील मास्तरीणबाईंनी (श्रीमती इंदिराबाई कुलकर्णी) वहिनींना विचारले, 'काय हो वहिनी, तुम्हाला इतका उत्साह कसा असतो?' हे ऐकल्यावर वहिनी थोड्याशा हसल्या आणि म्हणाल्या, 'अहो मास्तरीणबाई, आमचे घरी आमच्या मामंजींना (मामामहाराज) भेटण्यासाठी सांगलीचे राजेसाहेब आले होते. त्यावेळी आमच्या पद्धतीने मी केलेला राजेशाही थाट बघून मामंजी (मामामहाराज) फारच खूष झाले आणि त्यांनी माझ्या पाठीवर हात फिरवून शाबासकी दिली, त्यामुळे माझा उत्साह संपत नाही.'

सौ.सीतावहिनींना आपल्या मामंजींबद्दल जेवढा आदर होता, तितकाच सासूबाई (इंदिराबाई केळकर) यांच्याबद्दल होता. वाड्यामध्ये श्री.गजाननराव कुलकर्णी या नावाचे मास्तर होते. त्यांच्या पत्नी इंदिराबाई. या इंदिराबाईंना सौ. सीतावहिनी ''मास्तरीणबाई'' म्हणून हाक मारीत. एकदा सौ. इंदिराबाई सौ. वहिनींना म्हणाल्या, 'वहिनी, तुम्ही मला मास्तरीणबाई म्हणून नका, मी तुम्हाला बहिणीसारखी आहे. त्यामुळे मला तुम्ही इंदिराबाईच म्हणा' हे ऐकून यत्किंचित हसून सौ. वहिनी म्हणाल्या, 'असे जरी असले तरी मी तुम्हाला मास्तरीणबाईच म्हणणार. काय होतंय तसं म्हटलं म्हणून?' तरीपण वहिनी तुम्ही मला मास्तरीणबाई म्हणू नका. मला कसे तरी वाटते, असे मास्तरीणबाई म्हणाल्या. त्यावर सौ. सीतावहिनी म्हणाल्या, 'मास्तरीणबाई, तुम्ही रागावू नका. काय आहे, तर तुमचे नांव आणि माझ्या सासूबाईंचे नाव एकच आहे. सुनेने सासूबाईंचे नांव घेऊ नये अशी आपली भारतीय परंपरा सांगते. त्याचा अनादर होईल असे मला काही करायचे नाही. म्हणून मी तुम्हाला मास्तरीणबाई म्हणते.' हे ऐकल्यावर मात्र मास्तरीणबाई स्तब्ध झाल्या. ही गोष्ट तशी फार साधी आहे. पण फार फार मोठा अर्थ सांगून जाणारी आहे.

आपले मामंजी श्रीमामामहाराज यांना रक्तदाबाचा विकार जडला. तसेच मधुमेहही जोडीला आला. त्यामुळे मामांचे कडक पथ्य सुरू झाले. या पथ्याची जबाबदारी सौ. वहिनींनी आपल्याकडे घेतली. त्यांचे पथ्यपाणी त्या व्यवस्थित सांभाळत. १९६० नंतर मात्र मामांची तब्येत थोडी खालावत गेली. मामांनी आपला आहार कमी केला. पण सौ. वहिनी या काळजी घेत असत. श्री. न.दा. दिवेकरसर आपल्या ''गोविंदचरितमानस'' या ग्रंथात म्हणतात, ''**सीता रामाची प्रिय पत्नी । करी मामांची सेवा आवर्जुनी । प्रेमभाव मनी ठेऊनी । जपे मामांना ।।**'' पुढे श्री. न. दा. दिवेकरसर म्हणतात, ''**मामा अति नेमस्त । मोजकेच घास खात । तव सुन म्हणे मनात । शक्ती टिकेल कैसी ।। अन्नमय हे शरीर। अन्नाशिवाय कसा आधार । आणि मामा अंथरुणावर । आणि काय उपाय? ।। मग ती काय करी। एक एक घस मोठा करी । आता शक्ती टिकेल बरी । म्हणे मनाशी आपुल्या । तिचा सद्भाव ओळखून। मामा होती प्रसन्न वदन । म्हणती सून युक्तीवान । असे मोठी ।।**''

आपल्या सासऱ्यांची पित्यासमान सेवा करणे ही गोष्ट फार कठीण आहे. पण सौ.सीतावहिनींनी ती सेवा करुन, सेवाभाव आचरून दाखविला.

इ.स.१९६२ साली श्रीमामामहाराज केळकर यांनी देह ठेवला आणि मागोमाग म्हणजे पुढील वर्षीच सौ.इंदिरामातांनी देह ठेवला. घरातील वडिल माणसांचे छत्र हारपले. यामुळे घरातील सर्व जबाबदारी

सौ.सीतावहिनींवर आली. प.पू.श्रीदासराममहाराज हे आत्मानंदी निमग्न असल्याने, त्यांचे व्यवहारात लक्ष नव्हते. पण व्यवहार सगळा सौ. सीतावहिनींच बघायच्या. त्यामुळे त्या आपल्या पतीला परमार्थाला पूरक झाल्या. सौ. सीतावहिनीचे बाबतीत प.पू.श्रीदासराममहाराज म्हणत, 'मला आई वडिल नाहीत असे तिने मला कधी भासू दिले नाही.' यातच वहिनींचे महात्म्य कळून येते.

पुढे यथावकाश सौ.वहिनींच्या चिरंजीवांचे अनुक्रमे श्री.चंद्रशेखर १९७० मध्ये, श्री. सूर्यकांत इ.स.१९७३ मध्ये व श्री. अनल १९७६ मध्ये विवाह थाटामाटाने पार पडले. त्याही वेळी वहिनींचा उत्साह कायम होता. कालांतराने वहिनींच्या भोवती नातवंडांचा गराडा पडला. या नातवंडांचे करण्यातच वहिनींचा वेळ सगळा खर्ची पडू लागला. त्यामुळे व्यवहार त्यांनी सुनांकडे सोपवला. लहान मुलांची हयगय झालेली सौ. वहिनींना खपत नसे. सर्व नातवंडांना समभाव. मग तो थोरल्या मुलाचा मुलगा असू दे, नाही तर घरात येणाऱ्या जाणाऱ्यांचा मुलगा असू दे! इतकेच नव्हे तर सौ. वहिनींनी आपला भाचा श्री. धनंजय भावे यांचा मुलगा चि. मोहनलाल याला तर लहानपणी आपल्या घरातच ठेऊन घेतले होते.

यातच १९७२ साली सौ. सीतावहिनींनी श्रीदादांकडून अनुग्रह घेतला. आणि त्याप्रमाणे त्या पहाटे साधना करु लागल्या. सौ.सीतावहिनींनी 'श्रीराम सेवा महिला भजनी मंडळाची' स्थापना केली. त्यामध्ये प्रामुख्याने सौ.सीतावहिनी, सौ. अंबुताई भावे, सौ. कमलाताई पाटणकर, सौ. लीलाताई पेठे, सौ. सुशिला घारपुरे, सौ. सुशिलाकाकू पटवर्धन, सौ. खाडिलकर अशा महिला होत्या. त्या भजनी मंडळाने महिलांच्या संगीत भजनी स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळविली.

१९८० साली श्रीदासराममहाराजांची साठीशांत झाली. या कार्यक्रमा दिवशी सौ. सीतावहिनींना धाप लागली. पण कार्यक्रमात व्यत्यय येईल म्हणून याची जाणीव कुणालाही करुन दिली नाही. इ.स.१९८२ सालच्या जून महिन्यात सौ. सीतावहिनींना हृदयविकाराचा झटका आला. त्यातून त्या निभावून गेल्या. पण यामुळे त्यांना कमालीचा अशक्तपणा आला आणि डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती सांगितली. पण विश्रांती घेणे हे सौ. सीतावहिनींना माहितच नव्हते.

सौ. सीतावहिनी कायम आपल्या पतीराजांना म्हणजे श्रीदासराममहाराजांना म्हणू लागल्या की, मला लोळत घोळत इतरांची सेवा घेत मरण नको आहे. मरण यायचे झाले तर झटपट यावे. पण त्यांच्या मनात एक इच्छा होती की माझ्या डोळ्यासमोर माझ्या अनिलप्रभूचे लग्न व दीपक व सुनील या नातवंडांची मुंज व्हावी. पण या दोन्ही इच्छा तशाच मनात विरून गेल्या.

सोमवार दि.२१.०३.१९८३ रोजीचा दिवस उजाडला. या दिवशी सौ. सीतावहिनीना फारच अस्वस्थ वाटू लागले. त्याप्रमाणे त्यांचेवर उपचार करणेत आले व तो दिवस मागे पडला. मंगळवारीही त्यांची प्रकृती अस्वस्थच होती. मामामहाराज केळकर यांच्या जयंती महोत्सवानिमित्त सौ. वहिनींनी नैवेद्याच्या चकल्या करवून घेतल्या. बुधवार दि.२३.०३.१९८३ रोजी संध्याकाळी नित्य कीर्तनानंतर श्री. श्रीकांत देशपांडे यांचे

प्रवचन ऐकले व त्यांचे तोंडभरून कौतुक केले. त्या रात्री मात्र सौ. वहिनींना त्रास जाणवू लागला. गुरूवार दि.२४.०३.८३ चा दिवस उजाडला. फाल्गुन शु.दशमी. हा मामामहाराजांच्या जयंतीचा दिवस. या दिवशी वाड्यातीलच श्री. दिलीप कुलकर्णी हा प्रथमच कीर्तन करणार होता. त्याचे कीर्तन ऐकण्यास वहिनी बाहेर येऊन बसल्या आणि कीर्तन झाल्यावर त्याचे तोंडभरून कौतुक केले. सकाळी ११ चे सुमारास सौ.सीतावहिनींचे तृतीय चिरंजीव श्री.अनल यांचे पत्र पंढरपूरहून आले होते. ते सौ.वहिनींनीच घेतले आणि वाचले. त्यात श्री. अनल यांच्या मुलीची तब्येत बरी नव्हती, असा काहीसा मजकूर होता. नातवंडांचा वहिनींना लळा असलेने त्या म्हणाल्या, 'माझी तब्येत बरी असती तर मी पंढरपूरला गेले असते. तरीपण श्रीमामांच्या जयंती उत्सवानंतर मी पंढरपूरला नक्कीच जाईन.'

आणि अचानक दुपारी १२.३० वाजता सौ.वहिनींना अस्वस्थ वाटू लागले. डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या त्यांना दिल्या. पण गुण येईना. अस्वस्थपणा वाढू लागला. श्वास घेण्यास अडचण येऊन धाप लागली. तेंव्हा त्यांनी आपला भाचा श्री.प्रकाश भावे यांना हाक मारणेस सांगितले. श्री. प्रकाश भावे डॉक्टरांना बोलवायला गेले. सौ.वहिनी म्हणू लागल्या, 'मला आता सोसवत नाही रे. नकोशा झाल्या आहेत या यातना.' यानंतर त्यांनी प.पू.श्रीदादांना अंगारा लावणेस सांगितले. त्याप्रमाणे प.पू.श्रीदादांनी अंगारा लावला. अंगारा लावल्यावर सौ. वहिनींनी प.पू.श्रीदादांना नमस्कार करायला उठू लागल्या, पण प.पू.श्रीदादांनी सौ.वहिनींना उठू दिले नाही. तिथूनच त्यांनी श्रीदादांना नमस्कार केला. इकडे श्रीचंद्रशेखरअण्णा व श्रीअनिलप्रभू हे नोकरीस गेले होते. त्यांना घरी येण्यास निरोप दिला. एवढ्यात डॉक्टर आले आणि त्यांनी वहिनींना हॉस्पिटलमध्ये दाखल केले पाहिजे असे सांगितले. इतक्यात त्यांच्या भगिनी सौ.अंबुताई भावे तेथे आल्या. सौ. अंबुताईच्या गळ्यात पडून सौ.वहिनी म्हणाल्या, 'अंबूताई, मी कुणाचे वाईट केले नाही, मग मला देव का गं त्रास देतोय. आता मला हे सहन होत नाही.' डॉक्टरांनी इंजक्शन दिले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. सौ. वहिनींची नाडी हाताला लागेनाशी झाली. त्यावेळी श्रीदादांनी पळीभर तीर्थ सौ. वहिनींच्या मुखात घातले. ते पोटात गेले, पण त्याचाही उपयोग झाला नाही. आणि फाल्गुन शुद्ध दशमी शके १९०४, गुरुपुष्यामृतयोग, गुरूवार दि.२४.०३.१९८३ रोजी बरोबर १२.५० वाजता सौ. सीतावहिनींची प्राणज्योती परमात्मज्योतीत मिळून गेली आणि त्या स्वरुपाकार झाल्या. सौ. वहिनींची आत्मज्योत बाहेर पडत असताना जसे विजेचे स्पार्किंग व्हावे तसे प्रकाशाच्या ठिणग्या बाहेर पडताना काही माणसांना दिसल्या. तर सौ. वहिनींच्या शरीरातून विजेचे लोळ बाहेर पडत होते असे दृष्य श्रीदादांना दिसले.

सौ. वहिनींचा देह राममंदिरात ठेवणेत आला. सर्वत्र आक्रोश आणि हुंदके यांचे साम्राज्य पसरले होते. सौ.वहिनी गेल्या ही वार्ता वाऱ्यासारखी सांगली गावात पसरली. सौ. वहिनींच्या कपाळावर लाल भडक कुंकवाचा मळवट भरला आणि कुणी त्यांच्या मुखात तुळशीपत्र घातले. प्रत्येकजण येणारा सौ. वहिनींच्या पायावर मस्तक ठेवत होता. श्रीदादा, श्रीअण्णा व श्रीअनिलप्रभू यांना तर दुःख सहन होत नव्हते. सारखे वहिनी वहिनी म्हणून ते पोटतिडकीने टाहो फोडत होते. श्री. श्रीपतराव घोंगडे यांनी सौ. वहिनींच्या तळपायाला केशर लावून, त्यांच्या मुद्रा एका कागदावर घेतल्या. सौ. वहिनींचे देहावर हार घालण्याकरता

अहमहमिका लागली होती. अक्षरशः हारांचा ढीग लागला होता. एवढ्यात सौ.वहिनींचे दोन चिरंजीव श्री.सूर्यकांत व श्री. अनल हे आपल्या मुलांसह आले. त्यांना तर शोक अक्षरशः आवरत नव्हता.

संध्याकाळी ५ वाजता अंत्ययात्रेची तयारी सुरू झाली. सौ. वहिनींचा देह अंगणात आणून त्या देहाला सुवासिनींचे हस्ते स्नान घालणेत आले. नंतर हिरवी साडी, चोळी नेसवून खण नारळाने ओटी भरणेत आली. सोबत पानसुपारी ठेवणेत आली आणि अंत्ययात्रेला सुरवात झाली. प्रत्येकजण खांदा देणेकरता पुढे सरसावत होते. अक्षरशः ५००० लोक अंत्ययात्रेस जमलेले होते. अंत्ययात्रा समाधी मंदिरासमोर येताच, श्री.गंगाधरसिंग दीक्षित यांनी आरती केली व पालखीला एक प्रदक्षिणा घातली. पुढे जाऊन सौ. सीतावहिनींवर श्रीचंद्रशेखरअण्णा यांनी अंत्यसंस्कार केले. तिसरे दिवशी रक्षा विसर्जनावेळी एक चमत्कार दिसून आला. त्या चितेत चिताभस्माबरोबरच विड्याची हिरवी एक-दोन पाने, एक दोन फुले, सुपारी आणि सौ. वहिनींच्या नेसत्या पातळाच्या निऱ्या जशाच्या तशा होत्या. एका पतिव्रतेच्या - एका महासाध्वीच्या सौभाग्य अलंकाराला स्पर्श करणेचे धाडस प्रत्यक्ष अग्निनारायणालाही झाले नाही. अशा महान पतिव्रता/महान साध्वी सीतामातोश्री होत्या. '**स्वधर्म जावूनि जीवन जगणे । अशी माऊली पुन्हा न होणे ।**' हेच खरे आहे. आणि या अर्थानी त्यांनी भगवद्गीतेतील निष्काम कर्मयोग आचरला.

''गृहिणी भली वंद्य जी सत्कुळी या । मनी सज्जनी रामभक्ती कराया ।
सदा कर्मयोगा जिने पाळीयेले । सीता माऊलीला नमिले नमिले ।।''

***

प्रा.डॉ.के.वा.आपटे कृत सौ.सीतावहिनींचा निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके एकोणीसशे चारात । दुंदुभि संवत्सरात उत्तरायण ।।१।।
फाल्गुन शुद्ध दशमी आणि गुरूवार । दिवसा तृतीय प्रहर पहिले तासी ।।२।।
सीतावहिनींनी केलेसे निर्याण । मनात स्मरण रामनाम ।।३।।
गोविंदजयंती गुरूपुष्यामृत । योग हा विख्यात साधियेला ।।४।।
सच्चिदानंदरूपी मिळोनिया गेल्या । कीर्तीरूपे उरल्या दासापाशी ।।५।।

प. पू. श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी

जन्म
आषाढ शु.०१ शके १८४३
दि.०६.०७.१९२१

निर्याण
फाल्गुन व.०९ शके १९२५
दि.२५.०३.२००३

श्री. बाळकृष्ण कुलकर्णी हे मूळचे आंधळी (पलूस) या गावातील रहिवासी होते. श्री. बाळकृष्ण कुलकर्णी यांना ब्रह्मनाळ येथील शाळेमधे शिक्षकाची नोकरी लागली. त्यामुळे ते ब्रह्मनाळ या गावातच स्थायिक झाले. त्यांच्या पत्नीचे नांव सरस्वती होते. अशा या दांपत्याच्या पोटी आषाढ शु. १ शके १८४३, दि. ०६.०७.१९२१ रोजी ब्रह्मनाळ येथे पुत्र जन्माला आला. बारशा दिवशी या मुलाचे नाव 'गोविंद' असे ठेवणेत आले. हे गोविंद म्हणजेच आमचे 'प.पू.श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी' होत.

श्रीगोविंदमहाराजांना एकूण तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. कालांतराने ही सर्व मंडळी सांगली येथे स्थायीक झाली. आर्थिक बळ कोणतेही नसल्याने त्यांची परिस्थिती हलाखीची होती. साधारणतः ही सर्व मंडळी १९२७-२८ चे दरम्यान सांगलीत आली. श्रीगोविंदमहाराजांचे वडील बंधू श्री गोपाळमहाराज (आबा) व हे स्वतः असे दोघे मिळून सांगलीत सगळीकडे फिरून जळणाकरिता काटक्या व चिपाडे गोळा करीत आणि माधुकरी मागून उदरनिर्वाह करीत. श्रीगोविंदमहाराजांचे ११ वी पर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर ते पुढे शिकले नाहीत.

श्रीगोविंदमहाराजांनी आपल्या श्रीगोपाळमहाराज या बंधूंसह पटेल चौकात ''कुलकर्णी बंधू टी क्लब'' या नावे व्यवसाय सुरू केला. अल्पावधीतच हा व्यवसाय चांगला चालू लागला. श्रीगोविंदमहाराजांचा स्वभाव अतिशय करारी आणि तापट होता. त्यांचेसमोर घरातील कोणीही बोलण्यास धजावत नसत. श्रीगोविंदमहाराजांचे लग्नाचे वय झाल्यावर घरातील मंडळी त्यांना लग्नाबाबत विचारू लागली. पण महाराज या विषयावर काहीच बोलत नसत. नंतर एकदा महाराजांच्या बहिणीने लग्नाचा विषय काढला आणि लग्न करून घेण्याचा आग्रह धरला. तेव्हा गोविंदमहाराज म्हणाले,''माझा विवाह करण्याचा तुम्ही प्रयत्न करू नका. मी विवाह करणार नाही आणि तुम्ही सारखा आग्रह केला तर मी रामदास्वामींसारखे मांडवातून पळून जाईन.'' हे वाक्य ऐकल्यावर सगळ्यांनी महाराजांच्या लग्नाचा नाद सोडला आणि महाराज आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी व्रताने राहिले.

श्रीगोविंदमहाराजांच्या हॉटेल जवळच एक श्री. बाबूराव साळुंखे या नावाचे गृहस्थ रहायचे. त्यांचेकडे श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यायचे. असेच एकदा श्रीगोविंदमहाराज व श्रीगोपाळमहाराज यांची आणि श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची या श्री.बाबूराव साळुंखे यांचे घरी पहिली भेट झाली आणि या दिवसापासून श्रीगोविंदमहाराज हे श्रीपांडुरंगमहाराजांकडे आकृष्ट झाले. श्रीगोविंदमहाराज यांना मार्गशीर्ष व.१४ इ.स.१९५७ साली श्री.बाबूराव साळुंखे यांचे घरी श्रीपांडुरंगमहाराज यांचा अनुग्रह प्राप्त झाला आणि याबरोबरच श्रीगोपाळमहाराज कुलकर्णी यांनाही श्रीपांडुरंगमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. पुढे थोड्या काळातच म्हणजे

गुरूवार दि.२०.०७.१९५९ रोजी गुरूपौर्णिमेच्या मुहूर्तावर आनंदमठीत सायंकाळी ५ वाजता श्रीपांडुरंगमहाराजांनी श्रीगोविंदमहाराजांना अवधूत संप्रदायाचा अधिकार दिला.

एकदा श्रीगोविंदमहाराज हे श्रीपांडुरंगमहाराजांसमवेत आपल्या सोलापूर येथील बहिणीकडे गेले होते. रात्री जेवण झाल्यावर सर्वजण झोपी गेले. काही वेळाने श्रीगोविंदमहाराज यांना जाग आली. त्यांना सारखा 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र ऐकू येत होता. त्यांनी सगळीकडे पाहिले, पण काही कळेना. शेवटी ते श्रीपांडुरंगमहाराज यांच्या जवळ गेले आणि त्यांच्या जवळ कान केला तेव्हा त्यांना श्रीपांडुरंगमहाराजांच्या श्वासातून 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र ऐकू येत असलेचे कळले. हा सर्व प्रसंग पाहून आपले सद्गुरू हे, पंतमहाराजांचा साक्षात अवतारच आहेत, याची श्रीगोविंदमहाराजांना मनोमन खात्री झाली.

श्रीगोविंदमहाराज हे रोज नित्यनेमाने श्रीपांडुरंगमहाराजांच्या दर्शनास जात असत. काही काळानंतर श्रीपांडुरंगमहाराजांनी मार्गशीर्ष वद्य अमावस्या इ.स. १९६६ साली देह ठेवला. श्रीपांडुरंगमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांची समाधी बांधावी अशी सर्व भक्तमंडळींची इच्छा होती. त्याप्रमाणे गणपती संस्थानकडून जागा खरेदी केली. पण या जागेबाबत बराच वाद निर्माण झाला. कोर्टकचेरी झाली. पण महाराजांच्या बाजूनेच निकाल झाला. या जागेसाठी श्रीगोविंदमहाराज व श्रीगोपाळमहाराज यांनी अतिशय कष्ट घेतले. त्यानंतर श्रीपांडुरंगमहाराजांचे समाधी मंदिर बांधणेत आले. मंदिर बांधकामासाठी श्रीगोविंदमहाराजांनी सायकलीवरून फिरून आर्थिक मदत गोळा केली. सध्याचे नदीकाठी असणारे पंतमंदिर हे श्रीगोविंदमहाराजांच्या त्यागाचे प्रतिक आहे. श्रीगोविंदमहाराज हे शिष्यांसमवेत अवधूत फेरी काढत असत. निरनिराळ्या भक्तांच्या घरी ते या निमित्ताने जात असत.

अशा श्रीगोविंदमहाराजांची इ.स. २००१ पासून सारखी प्रकृती बिघडू लागली. प्रत्येक महिन्याला महाराजांना डॉक्टरांना दाखवावयास न्यावे लागे. यावेळी त्यांचे निष्ठावान शिष्य श्री. शंकरराव सूर्यवंशी हे त्यांची चारचाकी गाडी घेऊन येत व त्यांना दवाखान्यात नेत असत. श्री.शंकरराव म्हणायचे की, ही माझी गाडी महाराजांच्यासाठीच घेतली आहे. यावरून त्यांची श्रीगोविंदपंतांप्रती असणारी निष्ठा कळून येते.

इ.स.२००३ साल उजाडले. यामधेही प्रत्येक महिन्याला महाराजांना दवाखान्यात घेऊन जावे लागे. त्यांचे अखेरचे दिवस जवळ येत चालले होते. त्यांची झोप कमी होत चालली होती, म्हणजेच ते उन्मनी अवस्थेत गेले होते. आहारही कमी केला होता आणि दि.२५.०३.२००३ रोजीचा दिवस उजाडला. दिवसभर त्यांनी काहीही ग्रहण केलेले नव्हते. रात्री त्यांनी थोडे सरबत ग्रहण केले. फाल्गुन वद्य नवमी शके १९२५, मंगळवार दि. २५.०३.२००३ रोजी रात्री ११ वाजून २० मिनिटांनी वयाच्या ८२ व्या वर्षी श्रीगोविंदमहाराजांनी महाप्रयाण केले.

***

प.पू.श्रीरामानंदमहाराज बीडकर

जन्म
माघ शु.८, शके १७६०
दि.२२.०१.१८३८

निर्याण
फाल्गुन व.१० शके १८३४
दि.०१.०४.१९१३

श्री.बळवंतराव बीडकर हे सरदार घराण्यातील होते. ते शरीराने धिप्पाड व उंच होते. ते पेशवे सरकारांच्या पदरी कामास होते. पुणे जिल्ह्यातील सोनोरी व चोराची आळंदी यांच्या दरम्यान नांदुरकीचा किल्ला आहे. या किल्याच्या देखरेखीचे काम श्री. बळवंतरावांकडे होते. श्री. बळवंतरावांवर पेशवे सरकारांची पूर्ण कृपा होती कारण ते साहसी व धाडसी होते. म्हणून पेशव्यांनी यांना आपले अंगरक्षक म्हणून नेमले होते. श्री.बळवंतरावांचा सुरवातीस विवाह झाला होता. पण ती स्त्री अर्धनार निघाल्याने त्यांनी तिला फारसे जवळ केले नाही. यानंतर श्री.बळवंतरावांनी बार्शी तालुक्यातील वरड वाघुळी या गावचे श्री.व्यंकटराव कुलकर्णी यांची मुलगी गंगूबाई हिचेबरोबर दुसरा विवाह केला. गंगूबाई या रुपाने फारच सुंदर होत्या. या दांपत्याचे पोटी माघ शु. अष्टमी शके १७६० दि.२२.०१.१८३८ रोजी पुत्ररत्न जन्माला आले. याचे बारशा दिवशी 'रामचंद्र' असे नाव ठेवणेत आले. हे रामचंद्र म्हणजेच आमचे 'श्रीरामानंदमहाराज बीडकर' होत.

श्रीरामानंदमहाराज हे तेजस्वी व मोहक होते. त्यांची छाप दुसऱ्यावर सहज पडत असे. वयाच्या ७ व्या वर्षी महाराजांचे वडिल निवर्तले. वडिल असेपर्यंत ते शाळेत गेले नाहीत. त्यांच्या वडिलांनी त्यांना मुळाक्षरे, त्रैराशिकापर्यंत गणित व तोंडी हिशोब चांगले शिकविले होते. पेशवाईनंतर इतर सरदारांप्रमाणे एलफिस्टनसाहेब, महाराजांच्या वडिलांना दरमहा २०० रुपये पेन्शन देत असतानाही, म्लेंच्छांचे अन्न खाणे ठीक नाही म्हणून त्यांनी पेन्शन स्विकारली नाही. श्रीमहाराजांचा थोरला भाऊ हा अचानक घर सोडून गेला.

वयाच्या ८ व्या वर्षी महाराजांचा व्रतबंध झाला. यानंतर महाराज हे दररोज तुळशीबाग, बेलबाग इ. ठिकाणी जाऊन देवदर्शन घेऊ लागले. महाराजांनी आपण आषाढीची वारी करायची असा निश्चय केला व आपल्या मित्रांना घेऊन महाराज आळंदीला गेले आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पालखीबरोबर निघाले. पालखी जसजशी पुढे जाईल तसतसे त्यांचे मित्र परतीला लागले, पण महाराज 'आपण वारी पूर्ण करायची' या निश्चयाने पुढे चालत राहिले. सासवडला पालखी आल्यावर ते वारकरी जेथे उतरतात तेथे उतरले. परंतु त्या रात्री महाराजांचे पाय सुजले. एका वृद्ध वारकरी स्त्रीने महाराजांच्या पायाला खोबरेलतेल लावून गरम पाण्याने पाय शेकले. यामुळे महाराजांचे पायाची सूज कमी झाली आणि दुसरे दिवशी ते वारीबरोबर चालू लागले. पंढरपूरात पोहोचले. वारकऱ्यांची इतकी गर्दी की, महाराजांची आणि या बाईची चुकामुक झाली. महाराजांना प्रश्न पडला की, आता मला पांडुरंगाचे दर्शन कसे होणार? इतक्यात एक अंगात बंडी घातलेला व डोक्याला पंचा गुंडाळलेला काळा सावळा असा एक गृहस्थ आला आणि त्याने महाराजांना विचारले, 'का रे पोरा का रडतोस?' तेव्हा महाराज म्हणाले, 'मला विठ्ठलाचे दर्शन पाहिजे.' त्या गृहस्थाने महाराजांच्या हाताला धरले आणि मंदिरात जाऊन विठोबाचे दर्शन घडविले व विठोबाच्या गळ्यातील माळ काढून महाराजांच्या गळ्यात

घातली. नंतर महाराजांची एक वारकऱ्याशी गाठ पडली. त्याने आपले घरी महाराजांना ८ दिवस ठेऊन घेतले व पुण्याला जाणेचा खर्च देऊन त्यांना पुण्याला पाठविले.

प्रथम महाराजांनी कोर्टात उमेदवारी केली. ती थोडे दिवसच केली. त्यानंतर त्यांनी सराफी व्यवसाय करण्यास प्रारंभ केला. सुरवातीला त्यांचा धंद्यात चांगला जम बसला. पण त्यांना व्यवसायाला भांडवल कमी पडू लागले, म्हणून त्यांनी सराफी धंदा सोडून दिला आणि ते एका सुगंधी सामानाच्या दुकानात नोकरीस लागले. या काळात त्यांनी या दुकानासंबंधी चांगली माहिती अवगत करून घेतली व त्यानंतर त्यांनी ही नोकरी सोडून, स्वतःचा सुगंधी सामानाचा व्यवसाय सुरू केला. या धंद्यात त्यांचा चांगला जम बसला आणि परत या व्यवसायासोबत सराफी व्यवसायही सुरू केला. महाराजांना आडगिऱ्हाईकी वस्तू घेऊन विकण्याचा नाद होता. महाराज एकदा शहरातून फिरत असता, पेशवाईतील एका जुन्या वाड्यात तांबे पितळेच्या भांड्यांचा लिलाव चालला होता. भांडी फारच जुनी व नक्षीची होती, म्हणून किंमतही जास्त होती. महाराजांनी यातील ३० भांड्यांचा सेट दिडशे रुपयांना खरेदी केला. घरी आल्यावर ती भांडी माडीवर चढवीत असताना, त्यातील एक समई खाली दगडावर पडली. ती मोडण्याऐवजी वाकली. तेव्हा महाराजांना संशय आला व त्यांनी तिला कस लावला, तेव्हा ती सोन्याची निघाली. इतकेच नव्हे तर नीट तपासून पाहता तिच्यामधील दांड्यात हिरे, माणके इ. बहुमोल रत्ने निघाली. या समईने महाराजांना लक्षावधी रुपये मिळवून दिले.

श्रीरामानंदमहाराज हे मारुतीचे उपासक होते. रोज ११ वेळा हनुमानकवच वाचायचे. त्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. वयाच्या २१ व्या वर्षी महाराजांचा विवाह देवीचे केडगाव जि. अहमदनगर येथील श्री. रामजी अप्पाजी पाटील यांची कन्या 'रंगूबाई' यांचेशी झाला. श्रीरामानंदमहाराज हे सुगंधी सामानाचे व्यवसायानिमित्त बडोदे आणि ग्वाल्हेर येथे गेल्यावर, आपल्या अद्‌भुत सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी त्या सरकारांचे मन जिंकले. सरकारांनी त्यांना मोठ्या प्रमाणात बक्षिसी दिली.

श्रीरामानंदमहाराजांना 'अक्कलकोटस्वामींच्या दर्शनास जावे' असा दृष्टांत झाला. त्याप्रमाणे त्यांना स्वामी केव्हा भेटतील अशी तळमळ निर्माण झाली. त्याप्रमाणे ते अक्कलकोटला गेले. यावेळी स्वामी अक्कलकोटमधील राजवाड्यात गेले होते. ते एकदा राजवाड्यात गेले की, १५-२० दिवस बाहेर येत नसत. महाराजांनी स्वामींचे दर्शन झाल्याशिवाय अन्नग्रहण करायचे नाही असा निश्चय केला होता. दोन दिवसानंतर स्वामींनी राजवाड्यात दंगा केला व 'हमारेकू बंदीखानेमे डालते है, लोगोंकू तकलीफ होती है, दर्शन बी नही मिलते ।' असे म्हणून भिंतीवरून उड्या मारुन स्वामी वाड्याबाहेर आले. बाहेर आल्यावर श्रीरामानंदमहाराजांनी त्यांना नमस्कार केला व पूजा केली. 'अब यहाँसे चले जाव. तुम्हारा काम हो गया है ।' असा महाराजांचा हुकूम होताच ते पुण्याला परतले. स्वामींचे दर्शनानंतर त्यांच्या वृत्तीत आमूलाग्र बदल झाला आणि 'श्रीसद्‌गुरूराय माऊली' या भजनाचा त्यांना छंद लागला. याप्रमाणे श्रीरामानंदमहाराज हे दोन वेळा माघ शुद्ध पौर्णिमेस स्वामींच्या दर्शनास गेले. यावेळी एक दिवस स्वामी समर्थांनी या महाराजांच्या श्रीमुखात लगावली. तेव्हा महाराजांना गुंगी येऊन ते खाली पडले. दुसरे दिवशी पहाटे ते शुद्धीवर आले. त्यावेळी त्यांना अवर्णनीय आनंद

झाला होता. ते एका वेगळ्या अवस्थेतून बाहेर आले होते. लगेच ते स्वामींच्या दर्शनास गेले. तेव्हा स्वामींनी त्यांना एक सहस्र भोजन घालणेची आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणे श्रीरामानंदमहाराजांनी अक्कलकोट येथील वाण्याकडून उधारीवर माल घेऊन सहस्रभोजन घातले. सहस्रभोजन झाल्यावर स्वामी समर्थ म्हणाले, 'भोजन तर तू दिलेस, पण दक्षिणा दिली नाहीस.' त्यांचेकडे दक्षिणा देणेसाठी द्रव्य नव्हते हे स्वामींना माहित होते, म्हणून स्वामींनी या महाराजांकडून, 'तू जो जडीबुटीचा अथवा किमयेचा उद्योग करतोस तो आजपासून बंद कर व यापुढे करु नको' अशी गुरूदक्षिणा मागितली. यानंतर स्वामी समर्थांनी महाराजांना नर्मदा परिक्रमा करणेचा आदेश दिला. या नर्मदा परिक्रमेत महाराजांनी अनेक लीला, चमत्कार केले व साधनसिद्धताही करून घेतली. यानंतर महाराजांनी काशी, प्रयाग व गया ही त्रिस्थळी यात्रा पूर्ण केली.

महाराजांची आर्थिक परिस्थिती खालावली गेली. महाराजांच्या मागील सर्व उपाध्या सुटल्यामुळे ते एकांतवासात आनंदात काळ घालवू लागले. पण हे त्यांच्या पत्नीला आवडले नाही. याचा महाराजांना त्रास होऊ लागला. तेव्हा त्यांनी आपल्या मालकीचे घर विकून सगळा पैसा पत्नीचे हातात देऊन टाकला. परत महाराजांनी काही काळ सुगंधी मालाचा व्यवसाय सुरू केला. ठाणे, मुंबई या सारख्या भागात त्यांच्या मालाला चांगली मागणी होती. इ.स.१८९६ च्या दिवाळीपर्यंत हा व्यापार केला. त्याकाळी त्यांनी पुण्याहून माल मागवला, पण तो वेळेवर आला नाही. तेव्हा पुण्यास जाण्याचा व माल विकण्याचा त्यांनी निश्चय केला. तेव्हा असा चमत्कार घडला की पेटीतल्या रिकाम्या बाटल्या दुसरे दिवशी सगळ्या भरलेल्या दिसल्या. तो सर्व माल विकला, तर पुन्हा दुसरे दिवशी बाटल्या भरलेल्या असायच्या हे बघितल्यावर 'जो बाटल्या भरतो तो बसल्या ठिकाणी आपली उपेक्षा करील काय' असा विचार महाराजांचे मनात आला आणि त्यांनी तो धंदा बंद केला. इ.स.१९११ साली त्यांच्या पत्नीचे देहावसान झाले. पत्नीच्या निधनानंतर 'आमचाही आता नेम नाही' असे महाराज सारखे म्हणू लागले.

मार्च १९१३ पासून महाराजांच्या तब्येतीच्या तक्रारी जास्त जाणवू लागल्या. त्यांना मूळव्याधीचा भयानक त्रास होता. केव्हा केव्हा त्यांचे अंग बाहेर येत असे. यामुळे ते हैराण झाले होते. शिष्यमंडळी त्यांची सारखी विचारपूस करत होती. तेव्हा महाराज म्हणाले, 'मला माझे देह प्रारब्ध पाहू दे.' काहीवेळा महाराज मी आता जाणार म्हणायचे, तर एकदम मी काही आजच मरत नाही, असे म्हणायचे. परंतु दिवसेंदिवस त्यांची तब्येत जास्तच बिघडू लागली. वृद्धापकाळामुळे शक्ती क्षीण होत चालली होती. शेवटी महाराजांनी आपली दृष्टी भ्रूमध्याकडे ठेवून स्थिर केली व त्या अनुसंधानात स्वामी समर्थांचे स्मरण करीत फाल्गुन व. १० शके १८३४ मंगळवार दि. ०१.०४.१९१३ रोजी दुपारी पावणे बारा वाजता वयाच्या ७५ व्या वर्षी महाराज स्वस्वरूपी लीन होऊन स्वरूपाकार झाले.

***

गु.भ.प. शिवभक्त श्रीअनंत दत्तात्रय कुलकर्णी तथा श्रीतात्या कुंभोजकर

जन्म
आश्विन शु.२ शके १८२४
दि.०३.११.१९०२

निर्याण
फाल्गुन अमावस्या, शके १९०८
दि.०९.०४.१९८६

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात कुंभोज हे गाव आहे. या गावामध्ये श्री. दत्तात्रय कुलकर्णी या नावाचे सदाचारसंपन्न व सत्शील गृहस्थ रहात होते. त्यांना अध्यात्माची आवड होती. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यांना चिमडचे सद्गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह होता. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे ते नित्य साधन करायचे. सकाळची पूजाअर्चा करून ते सकाळी ६ वाजता साधनास बसत, ते दुपारी २ वाजेपर्यंत उठत नसत. नंतर सायंकाळी संध्या झाल्यावर रात्री ११ वाजेपर्यंत त्यांचे साधन चालत असे. पुन्हा रात्रीचे साधन वेगळेच. रात्री ते भोजन करत नसत. श्रीदत्तोपंत हे घोसरवाड येथील संस्थानात कारकून होते. लग्नाचे वय झाल्यावर त्यांचे लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. पार्वती ठेवले.

श्रीदत्तोपंत कुलकर्णी यांचे आजोबा हे चालत बनशंकरीचे दर्शनासाठी बदामी येथे जात असत. पण काही कालांतराने त्यांना पायी दर्शनाला जाणे होईना. तेव्हा त्यांनी बनशंकरी देवीला सांगितले की, 'हे देवी, आता मला तुझ्या दर्शनाला येता येत नाही, मला माफ कर.' तेव्हा देवीने दृष्टांत दिला की, 'तू आता इकडे येऊ नकोस. मी तुझ्या पाठीमागून येईन, पण तू मागे वळून मला बघायचे नाहीस. जेथे तू बघशील तेथे मी गुप्त होईन.' याप्रमाणे ते बनशंकरी-बदामीहून निघाले आणि चालत चालत ते अगदी कुंभोज गावातील आपल्या घराजवळ आले. इथपर्यंत त्यांनी मागे बघितले नव्हते. पण आता मात्र धीर न राहून त्यांनी मागे पाहिले असता, देवी गुप्त झाली. मात्र यांची सेवा बघून ती देवी त्यांच्या स्वप्नात आली आणि तिने सांगितले की, 'जिथे तू मागे वळून पाहिलेस, तेथेच मी आहे. मला वर काढ.' याप्रमाणे त्यांनी त्या जागी शोध घेतला असता देवीची मूर्ती दिसून आली. नंतर श्रीदत्तोपंतांनी आपल्या कुंभोज येथील घराजवळ बनशंकरी देवीची स्थापना केली व देऊळ बांधले. येथे नवरात्रात मोठा उत्सव असतो.

एकदा दुष्काळात कुंभोज गावी पाऊस पडला नाही. तेव्हा गावातील लोक श्रीदत्तोपंतांकडे आले आणि म्हणाले, आता तुम्ही भगवंताची प्रार्थना करा. त्याप्रमाणे श्रीदत्तोपंत विठोबाचे देवळात गेले आणि त्यांनी प्रतिज्ञा केली, 'देवा, जर पाऊस पडला नाही तर, मी तुझ्यापुढे डोके आपटून प्राण देईन.' हे प्रतिज्ञावचन पूर्ण होताच अचानक आकाशात पावसाचे मेघ दाटून आले आणि जोराचा पाऊस पडू लागला. या गोष्टीची साक्ष म्हणून गावातील लोकांनी मेघराजाचे मंदिर उभारले.

श्रीदत्तोपंत हे साधननिष्ठ होते. रात्र रात्र साधना करायचे. ते सांगत असत, 'नीलं धवलं श्यामं

येथपर्यंतचा अनुभव मला माझ्या गुरूंनी म्हणजे श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांनी दिला आहे.' हे ऐकून एक दिवस श्रीरामभाऊमहाराज यांनी त्यांना दृष्टांत देऊन सांगितले, 'दत्तोपंत आता श्यामच्या पुढे काही दिसते कां? सर्व काही श्यामच आहे.'

श्रीदत्तोपंत कुलकर्णी व घोसरवाड गावचे प.पू.श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचा फार स्नेह होता. श्री गोविंदपंतांच्या अंगात श्रीहालसिद्धनाथांचा संचार होत असे. संचारातील आज्ञेप्रमाणे ते श्रीदत्तोपंतांना घेऊन चिमड येथे गेले आणि श्रीगोविंदपंतांनी श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह घेतला होता.

अशा श्रीदत्तोपंत आणि सौ. पार्वती यांना चार अपत्ये झाली. १. महादेव २. अनंत ऊर्फ तात्या ३. नारायण व ४. चंद्राक्का. कालांतराने श्रीदत्तोपंतांनी कुंभोज गाव सोडून ते सांगलीस वास्तव्यास आले. तेथे असताना आश्विन वद्य एकादशीस सकाळी साधनेला बसण्यापूर्वी ते पत्नीस म्हणाले, 'अगं आज एकादशी आहे, मी स्नानाला नदीवर जाणार आहे.' या वाक्याचा गूढार्थ पत्नीला कळला नाही. त्या म्हणाल्या, 'ठीक आहे, या तुम्ही जाऊन.' त्यानंतर दत्तोपंत धोतराची खोळ पांघरून साधनास बसले. बराचवेळ झाला, त्यांची काहीच हालचाल दिसेना. म्हणून पत्नीने धोतराची खोळ बाजूला करून पाहिले, तो श्रीदत्तोपंतांनी साधनेतच आपला देह ठेवलेला होता.

अशा या श्रीदत्तोपंतांच्या पोटी आश्विन शु.२ शके १८२४ दि.०३.११.१९०२ रोजी कुंभोज येथे पुत्ररत्न जन्माला आले. बारशादिवशी या मुलाचे नांव 'अनंत' ठेवणेत आले. हा अनंत म्हणजेच आमचे श्रीअनंत दत्तात्रय ऊर्फ तात्या कुंभोजकर (कुलकर्णी) होत.

श्रीतात्यांचे शिक्षण मराठी सातवीपर्यंत झाले. त्यानंतर पुणे येथे शिक्षकी पेशास आवश्यक असणारे शिक्षण घेऊन, पुढे त्यांनी एस.टी.सी. व हिंदीची परीक्षाही दिली. तात्या नोकरीच्या शोधात होते, पण नोकरी मिळत नव्हती. ते निराश झाले व श्रीहालसिद्धनाथांच्या चरणी गाऱ्हाणे घालावे असा विचार करून ते श्रीगोविंदपंत यांचेकडे आले. श्रीगोविंदपंतांनी संचार अवस्थेत भंडारा दिला व तो भंडारा सांगलीचे पटवर्धन सरकार यांचे गाडीसमोर श्रीहालसिद्धनाथ अप्पांचे नांव घेऊन टाक व त्यांना साष्टांग नमस्कार कर असे सांगितले. त्याप्रमाणे सांगलीस येऊन तात्यांनी पटवर्धन सरकारांच्या गाडीसमोर श्रीहालसिद्धनाथांचे स्मरण करून भंडारा टाकला व आडवे पडले. हे पाहताच सरकारांनी तात्यांना ताबडतोब नोकरीत रुजू करुन घ्यावे असा आदेश काढला. ७वी पर्यंत शिक्षण झाले असलेने त्यांना शिक्षक पेशाची नोकरी मिळाली.

विवाहाचे वय झालेवर त्यांचा काशीबाई विष्णु टाकळीकर नामक कन्येशी विवाह झाला. विवाहानंतर या कन्येचे सौ. लक्ष्मीबाई असे नांव ठेवणेत आले. या दाम्पत्याच्या पोटी सुरवातीस शकुंतला नामक कन्या झाली, त्यानंतर रामचंद्र नावाचा पुत्र झाला. या रामचंद्रांना बापूराव या टोपणनावाने लोक ओळखत असत.

या बापूरावांना वयाच्या २०-२२ वर्षांपासून श्रीरेवणनाथांचा संचार होत असे. ते आप्पाची वाडी आणि घोसरवाड येथे तलवारी आणि गुंडाने खेळत असत. श्रीतात्यांचे तिसरे अपत्य, श्री.मधुकर म्हणजे आमचे प्रा. म. अ. कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद होत. हे एम.ए. पर्यंत शिकले. त्यांना वक्तृत्वकला चांगली अवगत होती व आहे. त्यांनी कोल्हापूर येथील महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी केली. श्रीतात्यांचे चौथे अपत्य म्हणजे श्रीभगवान ऊर्फ प्रभाकर व पाचवे अपत्य म्हणजे श्री. शशिकांत.

श्रीतात्यांचा मुळातच शिक्षकी बाणा. ते शाळेमध्ये गणित आणि भूमिती हे विषय अतिशय उत्कृष्ट शिकवीत असत. सुरवातीला त्यांनी शिरगुप्पी ता.चिकोडी, जि. बेळगांव येथील शाळेत नोकरी केली. ही शाळा चौथीपर्यंतच होती व सांगली संस्थानच्या अखत्यारीतील होती. सरकारांना सांगून तात्यांनी ती शाळा ७वी पर्यंत वाढविली. शाळेत तात्या जीव ओतून शिकवीत असत. त्यांच्या हाताखाली शिकलेल्यांपैकी श्री. जिनाप्पा आकिवाटे हे ख्यातनाम पैलवान म्हणून नांवारुपास आले. तसेच श्री. लगमाण्णा आकिवाटे हे प्रसिद्ध हिंदी शिक्षक म्हणून मान्यता पावले. विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तम यश मिळविलेच पाहिजे असे त्यांचे ध्येय होते. श्री. तात्या त्यासाठी ७वी च्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना रात्री पुन्हा आपल्या घरी शिकवणीसाठी बोलावून घेत. पण शिकवणीची फी घेत नसत. वारंवार शिकविलेल्या प्रकरणांची उजळणी करून घेत असत. शिरगुप्पीनंतर तात्या हे सांगली येथे आले. सांगलीतही उत्तम शिक्षक म्हणून तात्यांनी मोठी प्रतिष्ठा प्राप्त केलेली होती. गणपतीपेठेतील अनेक व्यापारी आपल्या मुलांना शिकविण्यासाठी श्रीतात्यांचेकडे आग्रह धरीत असत. त्याप्रमाणे तात्या व्यापाऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या मुलांना शिकवीत असत. पुढे तात्यांनी नांद्रे येथे काही काळ नोकरी केली व परत ते सांगलीस आले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर शारीरिक प्रकृती धडधाकट केली पाहिजे असाही त्यांचा आग्रह असावयाचा. म्हणून श्रीतात्या हेडमास्तर असताना त्यांनी सर्व वर्गांचा पहिला तास हा व्यायामाचा ठेवला होता. ते विद्यार्थ्यांकडून औंधकर प्रणित साष्टांग नमस्कार घालून घेत. त्या काळात उगार येथे झालेल्या नमस्कार स्पर्धेत तात्यांच्या शाळेचा प्रथम क्रमांक आला होता. व्यायामाबरोबर ते वक्तृत्त्व कलेलाही प्राधान्य देत. आठवड्याच्या वेळापत्रकातील एक तास कुमारसभा, बालसभा यासाठी देत असत. विशेष करून मुलींनी/स्त्रियांनी/विधवांनी देखील शिकले पाहिजे हे ते वारंवार पटवून देत. नव्या मुली ज्या वर्गात येत तो वर्ग तात्या स्वतःकडे घेऊन, उत्तम शिकवून, चांगले गुण मिळविणारा वर्ग असा लौकिक प्राप्त करून देत. प्रस्तुत चरित्र लेखकाला (दीपक चंद्रशेखर केळकर) घरी येऊन गणित आणि भूमिती शिकवत. श्रीतात्या आलेले बघून तो चरित्रलेखक पळून जात असे. पण तात्या घरातल्या माणसांना सांगून त्याला धरून आणायला लावत व चिकाटीने सोप्या पद्धतीने गणित व भूमिती शिकवित. शिकविण्यापूर्वी उभे आणि आडवे पाढे म्हणायला लावीत. त्यांनी माझ्याकडून अभ्यास करून घेतला म्हणून पुढे माझे गणित चांगले झाले, असे श्रीतात्यांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत.

श्रीतात्या हे शिवभक्त होते. ६० वर्षे त्यांनी सोमवारचे व्रत केले. श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांची तात्यांवर विशेष कृपा होती. श्रीअप्पाची वाडी आणि घोसरवाड येथे होणाऱ्या यात्रेस ते जात असत. एके वर्षी अप्पाची वाडी येथील यात्रेत श्रीगोविंदपंतांना संचार झाला आणि त्यांनी सर्व भक्तांना 'येणारा काळ संघर्षाचा व त्रासाचा येणार आहे' अशी सूचना करून प्रत्येकाने आपली साधना व उपासना वाढविलीच पाहिजे अशीही सूचना केली. एकदा संचारात श्रीगोविंदपंतांनी भक्तांच्या संरक्षणासाठी श्रीतात्यांना छडी दिली. ही छडी म्हणजे वेताची दोन-अडीच फूटी घोटी काठी आहे, त्यास चांदीची मूठ व वेढण केले आहे. आजही तात्यंचे चिरंजीव श्री.शशिकांत यांचेकडे ती ठेवलेली आहे. श्रीदासराममहाराज म्हणत, 'ही काठी म्हणजे श्रीहालसिद्धनाथांनी सर्वांचे संरक्षणासाठी दिलेला सोटा आहे.'

सांगली येथेच श्रीतात्या हे तालुका मास्तर म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर ते प.पू.श्रीमामामहाराज यांचे घरी कीर्तनास येऊ लागले. पुढे ते श्रीदासराममहाराज यांच्या कीर्तनासही येत असत. कीर्तनात ते रंगून जात. श्रीतात्या हे शिवभक्त असल्याने कायमच सोमवार करीत असत. तसेच या दिवशी शिवलीलामृत वाचत असत. वाचन पूर्ण झालेनंतर शंकराला बेल वहात असत. बेल आणणेकरिता ते रविवारी सांगलीवाडी येथे जात. तेथे एका विद्यार्थ्याच्या घरी बेलाचे झाड होते. तेथून बेल आणून स्वच्छ धुवून निवडत असत व ११ पाने त्यांना प्रिय अशा घरी नेऊन देत. त्यांचे प्रिय घर म्हणजेच आमचे श्रीरामनिकेतन. दर सोमवारी ते आमचे घरी यायचे. श्रीदासराममहाराजांचे हातात बेल देऊन त्यांचे हातून परत आपल्या हातात घ्यायचा व तो शंकराला वहायचा असा त्यांचा नित्यनेम होता. पण बेल वाहिल्याशिवाय ते सोमवारच्या फराळास बसत नसत. एका सोमवारी श्रीदासराममहाराज एका कार्यक्रमासाठी बाहेरगावी गेले होते. घरी यायला किती वाजतील याचा नेम नव्हता. श्री तात्या आले, त्यांना समजले की श्रीदासराममहाराज बाहेर गेले आहेत. मग श्रीतात्या परत दोन तासांनी आले. तरीही श्रीदादा घरी आले नव्हते. तात्या परत घरी गेले व परत आले. असे दोनदा झाले. शेवटी श्रीदादा दुपारी चार वाजता घरी आले. त्यानंतर श्रीतात्यांनी श्रीदादांच्या हातून बेल घेऊन शंकरास वाहिला आणि मगच त्यादिवशीचा फराळ केला. या त्यांच्या निष्ठेस तोडच नाही, यालाच म्हणतात नेम- निष्ठा. श्रीरामनिकेतन बरोबरच ते केशवनाथाच्या दर्शनास जात असत व बेल वहात असत. दिवस-रात्र ते शंकराच्या अनुसंधानातच असत.

तात्यांना काही मंत्रही अवगत होते. पूर्वी लहान मुलांना 'पैण' नांवाचे दुखणे व्हायचे. पैण म्हणजे डोक्यात पुरळ उठणे, खाज सुटणे. यावर तात्यांचा रामबाण उपाय असा होता :- ते त्या मुलांच्या पालकांना पिंपळाची तीन पाने असलेली कोवळी फांदी आणणेस सांगत. कुलदैव विचारित. त्यानंतर त्या तीनही पानांवर काहीतरी मंत्राक्षरे लिहित व ती फांदी त्या मुलाच्या घरी चुलीवर/गॅसवर काही अंतरावर बांधून ठेवण्यास सांगत. आठ दिवसांनी हाच उपाय परत करीत असत. असे ३-४ आठवडे केल्यानंतर त्या मुलाचे दुखणे पूर्ण बरे होई. उपायासाठी सोमवार किंवा गुरूवार आणि वेळ सकाळी ८ वाजता ठरलेली असे. एकदा खुद्द राजवैद्य

श्री. सांभारे यांच्या मुलास हे दुखणे झाले. त्यांनी स्वतः इलाज करून काही उपयोग होईना. हे तात्यांना कळले. त्यांनी सांभारे वैद्यांच्या मुलावरही हा उपाय केला आणि त्यास बरे केले. म्हणून पुढे शेवटपर्यंत सांभारे वैद्य कुंभोजकर घराण्यातील कोणाही व्यक्तीकडून औषधाचे पैसे घेत नसत.

लोकमान्य टिळकांचा तात्यांचेवर व इतर शिक्षकांवर फार प्रभाव होता. त्यामुळे स्वदेशीचा वापर करायचा व आपण काही तरी सोडायचे असे सर्वांनी ठरविले होते. त्यावेळी तात्यांना सर्वांनी विचारले, 'तुम्ही काय सोडणार?' त्यावर तात्या म्हणाले, 'मी चहा-कॉफी सोडतो'. तेव्हापासून तात्यांनी चहा-कॉफी सोडली ती कायमचीच. एकदा तात्या त्यांच्या सूनेस म्हणाले की, 'मी सांगतो, ते तू ऐकशील कां?' त्यावर त्या म्हणाल्या, 'तात्या, तुम्ही म्हणाल ते मी ऐकीन.' मग तात्यांनी त्यांचेकडून वचन घेतले. तात्या म्हणाले, 'मी ६० वर्षे सोमवारचे व्रत केले आहे. आता हे व्रत व सोमवारचा उपवास तू घे.' त्याप्रमाणे त्यावेळेपासून सूनेने (श्री.म.अ.कुलकर्णी यांच्या पत्नी) हे व्रत आजपर्यंत जपले आहे.

शेवटी शेवटी श्रीतात्यांचे तब्येत थोडी खालावत गेली. राहत्या घरी ते जिन्यावरून पाय घसरून पडले. त्यांच्या डोक्याला थोडा मारही लागला. अंगात ताप आला होता. तात्यांची सगळी मुले त्यांना बघण्याकरिता आली होती. तेव्हा ते प्रत्येकाला म्हणाले, 'इथे माझ्या उशाला शंकर येऊन बसले आहेत, त्यांना आधी नमस्कार करा, मग मला करा.' त्यांना आपण जाणार याची जाणीव झालेली होती. तात्यांनी श्री. बंडू शिंदगी कुठे आहेत असा प्रश्न केला, सोमवार केव्हा आहे ते बघा आणि त्याला शंकराला बेल घालायला सांगा असे तात्यांनी सांगितले. तात्यांना सांगली येथील डॉ. बी. एस. कुलकर्णी यांचे दवाखान्यात दाखल केले. ४-५ दिवस उपचार सुरू होते. श्रीदासराममहाराज तात्यांना दवाखान्यात भेटायला गेले होते. तेव्हा तात्यांना पाहून ते म्हणाले, 'अमावस्या उलटणार नाही' आणि आश्चर्य तात्यांनी फाल्गुन अमावस्या, शके १९०८, शुक्रवार दि.०९.०४.१९८६ रोजी सकाळी ६ वाजता श्रीहालसिद्धनाथ व श्रीशंकरांच्या स्मरणात देह ठेवला आणि ते शिवस्वरूप झाले. त्यांचे कलेवर त्यांच्या मुलाच्या (भगवानबापू) राहत्या घरी आणणेत आले. श्रीतात्यांनी देह ठेवलेची बातमी श्रीदासराममहाराजांना कळली. श्रीदासरामहाराज आपल्या चिरंजीवांना म्हणजेच श्रीअण्णामहाराजांना म्हणाले, 'चंदा, शर्ट आणि टोपी दे व माझ्याबरोबर चल.' याप्रमाणे हे दोघेही तात्यांच्या घरी आले. श्रीदासराममहाराजांनी भंडारा मागून तात्यांच्या कपाळी लावला आणि आरती करणेस सांगितले. त्यांच्या सर्व पुत्रांनी तात्यांची आरती केली.

असे आमच्या श्रीतात्या कुंभोजकर यांचे चरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे.

***

धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजीमहाराज

जन्म
ज्येष्ठ शुद्ध १२ शके १५७९
दि.१४.०५.१६५७

निर्याण
फाल्गुन अमावस्या, शके १६११
दि.११.०३.१६८९

छत्रपती श्रीशिवाजीमहाराज व सौ. सईबाई यांचे पोटी ज्येष्ठ शु.१२, शके १५७९ दि.१४ मे, १६५७ रोजी सकाळी १० वाजणेचे सुमारास पुरंदर येथे पुत्र जन्माला आला. बारशा दिवशी या मुलाचे नांव 'शंभूराजे' अर्थात 'संभाजी' असे ठेवणेत आले. हा संभाजी म्हणजेच आमचे 'धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजीमहाराज' होत.

छत्रपती श्रीशिवाजीमहाराजांच्या मातोश्री जिजाऊसाहेब यांना, नातू झालेला बघून फार आनंद झाला. सौ.सईबाईसाहेब या प्रकृतीने फारच नाजूक होत्या. संभाजीमहाराज मात्र लहानपणापासूनच दणदणीत प्रकृतीचे होते. त्यामुळे त्यांचे आईकडून पोट भरेना. बाळासाठी दाई ठेवणे गरजेचे होते. दूधआई मिळणेसाठी शोधाशोध सुरू झाली. नसरापूर जवळील कापूरवहाळ गावच्या गाडे पाटलाची पत्नी धाराई ही यावेळी नुकतीच प्रसूत झाली होती. जिजाऊमातांनी धाराईला बोलावणे पाठविले. त्याप्रमाणे धाराई आपल्या बाळासह पुरंदरला आली. धाराईच शंभूराजांची दूधआई झाली. धाराईचे हे प्रेम पाहून महाराजांनी २६ होनांचे वार्षिक मानधन धाराईला दिले. शंभूराजांच्या मातोश्री सौ. सईबाई या भाद्रपद व. चतुर्दशी दि.०५.०९.१६५९ या दिवशी अचानक निवर्तल्या. यावेळी शंभूराजे फक्त दोन वर्षांचे होते. ही घटना घडल्यानंतर श्रीशिवाजीमहाराज हे शंभूराजे व जिजाऊमाता यांना घेऊन राजगडावर आले. गडावर ते दररोज जोर, बैठका, सूर्यनमस्कार इ. व्यायाम करू लागले. याप्रमाणेच त्यांना भालाफेक, दांडपट्टा, घोडदौड इ. चे प्रशिक्षणही देणेस सुरवात केली. तसेच याबरोबरीने श्री. उमाजी पंडित व केशवभट्ट हे संस्कृत भाषा, साहित्य, राजनीती, रामायण, महाभारत याचेही शिक्षण देत होते.

पुरंदरवरील तहानुसार शिवाजीमहाराजांनी शंभूराजांसह बादशहा औरंगजेब यांच्या भेटीसाठी आग्र्यास जाणेचे ठरविले. मातोश्री जिजाऊसाहेबांच्या पाया पडून शिवाजीमहाराज व शंभूराजे हे फाल्गुन शु.९ शके १५८७ दि.०५.०३.१६६६ रोजी स्वराज्याचा कार्यभार जिजाऊसाहेबांकडे सोपवून ७०० घोडेस्वार व ४००० पायदळासह ते आग्र्याकडे निघाले. आग्र्याला जायला सुमारे दोन महिने कालावधी लागला. दरबारात औरंगजेबाची भेट घ्यायचा दिवस ठरला. त्याप्रमाणे दरबारात गेले. पण इतर सरदारांना जशी बैठक व्यवस्था केली होती, त्याप्रमाणे शिवाजीमहाराजांकरिता बैठक व्यवस्था केली नव्हती. तसेच इतर सरदारांना औरंगजेब द्रव्य व वस्त्रे देत होता. पण शिवाजीमहाराजांना त्याने काही दिले नाही. हा सर्व प्रकार बघून शिवाजीमहाराजांना अत्यंत राग आला व तेथून ते तडक बाहेर निघाले. हे बघून औरंगजेब घाबरला. त्याने रामसिंगला बोलावून घेतले आणि शिवाजीची समजूत काढ असे सांगितले. पण तो जवळ येताच शिवाजीमहाराज म्हणाले, 'तू मला

ओळखतोस, तुझा बाप मला ओळखतो, तुझ्या बादशहालासुद्धा मी कोण आहे हे माहित आहे. मला रांगेत उभे करावे असा मी माणूस आहे कां? असा प्रश्न शिवाजीमहाराजांनी केला.' हा सर्व प्रकार बघून बादशहाने शिवाजीमहाराजांची समजूत काढणेसाठी आकीलखान, मुखलिसखान या हस्तकांना मानाची वस्त्रे देऊन महाराजांजवळ पाठविले. हे बघून महाराज म्हणाले, 'चाहे मेरा सिर काटकर ले जाओ । मै बादशहाजीकी हुजरी नही करता ।।' हे शंभूराजे बघत होते आणि तेव्हा शुभूराजांना शिवाजीमहाराजांचा स्वाभिमान आणि निर्भयतेचा प्रत्यय आला. परत परत जेव्हा बादशहाचे बोलावणे येऊ लागले, तेव्हा महाराजांनी शंभूराजांना पाठविले. पण ते परत दरबारात गेले नाहीत. बादशहाने शंभूराजांचा सन्मान केला. रत्नजडित कट्यार व मोत्याचा कंठा त्यांना भेट म्हणून दिला. मानाची वस्त्रे दिली. शेवटी बादशहाने महाराजांना नजरकैदेत ठेवले. १००० सैनिकांसह फौलादखान त्यांच्यावर नजर ठेऊन होता.

शिवाजीमहाराजांनी बरोबर आणलेला लवाजमा व सेना परत राजगडाकडे पाठविली. जवळ मोजकेच मावळे ठेवले. येथून सुटण्याचा मार्ग महाराज पहात होते. इतक्यात महाराजांना एक युक्ती सुचली. श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव उत्तरेत मोठ्याप्रमाणात साजरा केला जातो. त्यानिमित्त महाराजांकडून बादशहाच्या परवानगीने रोज मिठाईचे पेटारे फकीर, बैरागी यांना वाटण्यासाठी बाहेर पडू लागले. इतक्यात शुक्रवार आला. बादशहा व इतर अधिकारी नमाज पढण्यासाठी गेले आणि ही वेळ साधून शंभुराजांसह शिवाजीमहाराज हे पेटाऱ्यात बसून बाहेर पडले. तेथून ते मथुरेला आले. मोरोपंत पिंगळेंची बहिण मथुरेस काशीपंतांना दिली होती. तेथे सर्व मंडळी आली. शंभूराजांना त्यांच्याकडे ठेऊन, बैरागी वेषात शिवाजीमहाराज इतर मावळ्यांसह राजगडावर सुखरूप पोहोचले. काशीपंतांनी शंभूराजांकडून संस्कृत स्तोत्रे तसेच संस्कृत व्याकरण घोकून घेतले. त्यामुळे शंभूराजांना संस्कृतभाषेच्या अभ्यासची गोडी लागली. त्यामुळे ते पुढे संस्कृत भाषेत काव्यरचना करु लागले. शंभूराजे त्याठिकाणी ८ महिने होते.

त्या काळातील पद्धतीनुसार लग्नाचे वय झाले व शंभुराजांच्या विवाहाची बोलणी सुरू झाली. दाभोळच्या पिलाजीराव शिर्के यांची कन्या जिऊबाई यांचेशी श्रीशंभुराजेंचा विवाह झाला. यांचे नांव येसूबाई ठेवणेत आले. या अतिशय समंजस, धोरणी आणि कर्तबगार होत्या. राज्यकारभारातही श्रीशंभुराजे चांगले तयार व्हावेत या हेतूने सदरेवर बसवून कार्यालयीन कामकाजाचाही अनुभव यावा म्हणून शिवाजीमहाराजांनी त्यांना २६.०१.१६७१ पासून कामगिरी सोपविली. यावेळी ते अवघ्या चौदा वर्षांचे होते.

यानंतर श्रीशिवाजीमहाराजांचा ज्येष्ठ शु.१२ शके १५९६ दि.०६.०६.१६७४ रोजी काशीचे विद्वान श्री. गागा भट्ट यांच्या अधिपत्याखाली व सूचनेनुसार राज्याभिषेक झाला. शिवाजीमहाराज हे स्वतंत्र सार्वभौम छत्रपती झाले. रायगडावर हा अपूर्व सोहळा झाला. चौघडा आणि वेदमंत्रांच्या निनादात हा सोहळा पार पडला.

राज्यारोहणानंतर शिवाजीमहाराज स्वतः प्रचंड फौजा घेऊन रायगडावरून निघाले. त्याचवेळी महाराजांनी शंभूराजांना पन्हाळगडावर राहून बादशाही फौजांवर लक्ष ठेवणे आणि युक्ती-प्रयुक्तीने महाराज परत येईपर्यंत थोपवून धरणे ही कामगिरी सोपविली. शंभूराजांनी यावेळी आपले शिक्के व मुद्रा वापरण्यास आरंभ केला होता. एकप्रकारे रायगडच पन्हाळ्यावर आला होता. या काळात मिळालेल्या सवडीचा उत्तम उपयोग करुन 'बुधभूषण' हे संस्कृत काव्य व नायिका भेद, नखशिख आणि सातसतक हे हिंदी काव्यसंग्रह लिहिले. शंभूराजांचा संस्कृत भाषेचा चांगला व्यासंग होता. कवि कलश हा एक उत्तम योद्धा, मुत्सद्दी व संस्कृत विद्वान, हजरजबाबी कवी होता. तो शंभूराजेंच्या अत्यंत विश्वासातील होता व तो कायम त्यांचे जवळ असे.

दि.३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजीमहाराजांनी देह ठेवला. यावेळी संभाजीमहाराज रायगडावर नव्हते. ते पन्हाळगडावर होते. पण त्यांना दुसरे दिवशी महाराजांनी देह ठेवला हे कळविले. हंबीरराव मोहिते हे संभाजीराजेंना रायगडावर आणणेसाठी पन्हाळगडावर गेले. त्याप्रमाणे संभाजीमहाराजांना मोठ्या लवाजम्यासह रायगडावर आणले आणि त्या दिवसापासून संभाजीमहाराजांनी राज्यकारभार पहाणेस प्रारंभ केला. नवीन अष्टप्रधान मंडळ तयार केले. यानंतर माघ शु. सप्तमी शके १६०२ दि.१६ जानेवारी, १६८१ रोजी संभाजीराजेंचा राज्याभिषेक सोहळा पार पडला. यानंतर श्रीशंभुराजेंनी अनेक लढाया करून विजय संपादन केले.

समर्थ रामदासस्वामींना छत्रपती शिवाजीमहाराजांनी देह ठेवला हे पाहून अतीव दुःख झाले. समर्थांनी शंभूराजांना अतिशय उत्कृष्ट असे मार्गदर्शनपर खालील पत्र पाठविले :-

अखंड सावधान असावे । दुश्चित्त कदापि नसावे । तजवीज करीत बैसावे । एकांतस्थळी ।।१।। काही उग्रस्थिती सोडावी । काही सौम्यता धरावी । चिंता परावी लागावी । अंतर्यामी ।।२।। मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती घ्यावे । सुखी करुनी सोडावे । कामाकडे ।।३।। पाटांतील तुंब निघेना । तरी मग प्रवाह चालेना । तैसे जनांच्या मना । कळले पाहिजे ।।४।। जनाचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला । जन ठायी ठायी तुंबला । म्हणजे खोटे ।।५।। श्रेष्ठी जे जे मेळवीले । त्यासाठी भांडत बैसले। मग जाणावे फावले । गनिमासी ।।६।। ऐसे सहसा करु नये । दोघे भांडता तिसऱ्यासी जय । धीर धरुनि महत्कार्य। समजूनि करावे ।।७।। आधीच पडली धास्ती । म्हणजे कारभार होय नास्ती । या कारणे समस्ती बुद्धि शोधावी ।।८।। राजी राखता जग । मग कार्याभागाची लगबग । ऐसा जाणोनी सांग । समाधान राखावे ।।९।। सकळ लोक एक करावे । गनिमा निपटून काढावे । येणे करिता कीर्ति धावे । दिगंतरी।।१०।। आधी गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळ धाके । ऐसे न करिता धक्के । राज्यासी होती ।।११।। समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा । आला तरी कळो न द्यावा । जनामध्ये ।।१२।। राज्यामध्ये सकळ लोक । सलगी देऊनि करावे सेवक । लोकांचे मनामध्ये धाक । उपजोचि नये ।।१३।। बहुत लोक मेळवावे। एक विचारे भरावे । कष्ट करोनि घसरावे । म्लेंच्छांवरी ।।१४।। आहे तितुके जतन करावे । पुढे अधिक मेळवावे । महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।।१५।। लोकी हिंमत धरावी । शर्थीची तरवार करावी। चढती वाढती पदवी । पावाल तेणे ।।१६।। शिवरायाचे आठवावे रुप । शिवरायाचा आठवावा प्रताप । शिवरायाचा आठवावा साक्षेप। या भूमंडळी।।१७।। शिवरायाचे

कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे। शिवरायाचे सलगी देणे । कैसे असे ।।१८।। सकळ सुखाचा त्याग । करोनि साधिजे तो योग । राज्यसाधनाची लगबग । कैसी केली ।।१९।। त्याहून करावे विशेष । तरीच म्हणवावे पुरूष । याउपरी आता विशेष । काय लिहावे ।।२०।। शिवरायासी आठवावे । जीवित तृणवत् मानावे । इहलोकी परलोकी उरावे । कीर्तीरूपे ।।२१।। निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।२२।।

शंभूराजांनी औरंगजेबाविरुद्ध युद्ध केले. तसेच पोर्तुगीजांविरुद्धही ते लढले आणि विजय मिळवून आणला. शंभूराजांना स्वकीयांच्या कारस्थानाचा फारच सामना करावा लागला. पण त्यातही ते विजयी झाले. अनेक संकटांना तोंड देऊन त्यांनी स्वराज्याचे संरक्षण आणि संवर्धन केले. यावेळी संभाजीमहाराज म्हणतात,

''अतिप्रबल घेरे रहै आठो जाम मोहि । दिनबंधु अब क्यों न लागत पुकारी हो ।।१।।
सबही संकट नेवाई एक कोर ताके । तब जानि हों जू जब मो तन निहारिहो ।।२।।
ज्यों भाँति हरिन कसिप को विदार्‌यौ उर । तौन भाँति कब मेरे दुष को विदारिहो ।।३।।
संभ कहे सुनि दीन दयाल सो । मेरी हँसी भए तेरी हँसी है ।।४।।''

''अनेक संकटे रात्रंदिवस मला वेढून राहिली आहेत. मग हे दिनबंधू, तुला कां बरे मी हाक मारणार नाही? जेव्हा तू या भक्ताच्या शरीराकडे पाहशील, तेव्हाच तुला त्याचे साहाय्यक व्हावेसे वाटेल. तू जसे हिरण्यकश्यपूचे पोट फाडलेस, तसेच माझ्या दुःखाचेही विदारण कर. शंभुराजे म्हणतो, हे दीनदयाळा, माझ्या फजितीत तुझीच फजिती आहे, काय करतोस बघ!''

महाराणी येसूबाईंचे थोरले बंधू गणोजीराजे शिर्के हे केवळ वतनासाठी फितूर झाले. त्यांनी पन्हाळगडावर असलेल्या कवि कलशावर आक्रमण केले. पण गणोजी शिर्के हे महाराजांचे मेव्हणे म्हणून त्यांच्याशी युद्ध न करता, कवि कलश विशाळगडावर पळून गेला. हे शंभूराजेंना कळाले. शंभुराजे संतापले. ते गणोजीवर आक्रमण करणेकरिता पन्हाळ्यावर आले. तोवर गणोजी संगमेश्वर भागात पळून गेले होते. त्याचा पूर्णपणे बिमोड करुन ते परत विशाळगडावर आले. तेथून ते कवि कलशासह संगमेश्वरला आले. तेथून ते रायगडावर परत जाणार होते. एवढ्यात शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान सैन्यासह कोल्हापुरात आला आणि तेथून त्याने संगमेश्वर गाठायचे ठरविले. याप्रमाणे तो ३००० स्वारांसह संगमेश्वरात आलेचे कळले. इतक्या लवकर तो कसा काय आला असे शंभूराजांना वाटले. पण या गणोजी शिर्केने त्यांना रानातील पायवाट दाखविली होती. शंभूराजांनी एवढ्या सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे जाणून, सर्वांनी एकदम शत्रूवर तुटून पडून त्यांची फळी फोडून बाहेर पडावे असे सांगितले. याप्रमाणे ते बाहेर पडले. तासभर घनघोर युद्ध झाले. अनेक मावळे सटकले, पण कवि कलशाच्या हाताला बाण लागून तो घोड्यावरून खाली कोसळला व पकडला गेला. शंभूराजे परत वाड्यात येऊन लपून बसले. पण तेथे ते पकडले गेले. मुकर्रबखान व ईरूलास खान यांनी संभाजीराजांच्या अंगावरील कपडे फाडले व त्यांच्या देहाला कोळश्याची पूड फासण्यात आली. त्यांच्या

अंगावर विदुषकी अंगरखा आणि डोक्यावर इराणी पद्धतीची विदुषकी टोपी घालणेत आली. दोन्ही कोपरे , दोन्ही खांदे, दोन्ही गुडघे आणि कंबर यांना साखळदंडांनी बांधणेत आले. उंटावरती उलटे बसवून संगमेश्वर ते औरंगजेबाच्या पुढे त्याच्या छावणीत म्हणजे श्रीगोंदा तालुक्यातील बहादूरगड इथपर्यंत म्हणजे ३०० कि.मी. त्यांची धिंड काढणेत आली. उंटावरून उलटे बसवल्यामुळे देहाला सतत आचके आणि हेलकावे बसत होते. धिंड सुरू झाल्यापासून रस्त्याने लोक व मोगल सैनिक दगड मारत होते. कोण शंभूराजांना अपशब्द ऐकवित होते.

करता करता संभाजीराजांना बादशहापुढे उभे करण्यात आले. अल्लाच्या कृपेने आपल्याला हा विजय प्राप्त झाला आहे या भावनेने तो सिंहासनावरून खाली उतरला आणि जमिनीवर डोके टेकून अल्लाचे आभार मानू लागला. हे पहाताच शंभूराजे आणि कवि कलश यांनी एकमेकांकडे पाहिले, पण त्यांचे मनोधैर्य खचले नाही, कयम होते. शीघ्रकवी कलश याने या प्रसंगी एक काव्य रचले आणि ते त्याने आपल्या धन्याच्या - शंभूराजांच्या चरणी अर्पण केले :-

यावन रावन की सभा संभू बंध्यो बजरंग ।
लहू लसत सिंदूरसम खूब खेल्यो रनरंग ।
जो रवि छवि लछत ही खद्योत होत बदरंग ।
त्यो तुव तेज निहारी के तखत तज्यो अवरंग ।।

(रावणाच्या सभेत ज्याप्रमाणे हनुमंताला आणले होते, त्याप्रमाणे संभाजीराजास औरंगजेबासमोर उपस्थित करणेत आले आहे. हनुमंताच्या अंगाला जसा शेंदूर शोभून दिसतो, तसे घनघोर युद्धामध्ये रक्त अंग माखल्याने, हे राजन ते तुला शोभून दिसत आहे. ज्याप्रमाणे सूर्याला पाहताच काजव्याचा प्रकाश नाहिसा होतो, त्याप्रमाणे तुझे तेज पाहून औरंगजेबाने आपल्या सिंहासनाचा त्याग केला आहे.)

औरंगजेबाने श्रीशंभूराजांना प्रश्न केला ''बोल मौत या इस्लाम?'' हा प्रश्न ऐकून शंभूराजे संतापलेल्या नजरेने पाहत होते. परत औरंगजेबाने प्रश्न केला, तेव्हा मात्र धर्मांतराचा प्रस्ताव ठामपणे नाकारून ते औरंजगेबाला शिव्या देऊ लागले. हे बघून औरंगजेब म्हणाला, 'देखो ये काफर का बच्चा संभा मेरी तरफ कितनी कडी नजरसे देख रहा है । इसे सख्त सजा दी जाय ।।' समोर मृत्यू स्पष्टपणे दिसत असूनही शंभूराजे डगमगले नाहीत आणि धर्मांतराचा प्रस्ताव नाकारला. औरंगजेबाच्या आदेशानुसार प्रत्येक दिवशी संभाजीमहाराजांवर एक एक अत्यंत क्रूर असे अत्याचार करणेस सुरवात केली. पहिल्या दिवशी त्यांच्या हाताची नखे मुळासकट उपसण्यात आली आणि मग पायांची नखे उपसली व त्यानंतर हाताच्या बोटांची पेरे एक एक करत तोडण्यात आली, तसेच पायाची बोटेही तोडण्यात आली. हे होऊनसुद्धा संभाजीराजे डगमगले नाहीत. यानंतर क्रूरता वाढत गेली. त्यांचे ओठ व कान कापले. नाकाचा शेंडा तोडणेत आला. त्यानंतर जीभ मुळासकट उपटणेत आली. इतके जरी झाले तरी ते आपल्या जळजळीत नजरेने औरंगजेबाकडे पहात होते.

हे बघून औरंगजेब म्हणाला, 'अरे देख क्या रहे हो, इसको अल्ला की नजर दे दी जाय ।' मग त्यांचे डोळे फोडण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे लोखंडाच्या अणकुचीदार सळ्या तापवून लालबुंद करण्यात आल्या आणि त्या दोनी सळ्या एकाचवेळी शंभूराजांच्या डोळ्यात आरपार खुपसण्यात आल्या. हाच प्रकार कवि कलश याचे बाबतीत करणेत आला.

पुढे अंगावर उकळते पाणी टाकून बटाट्याची साल सोलावी, तशी अंगावरची कातडी सोलायला सुरवात केली. त्यावर मिठाचे पाणी फेकण्यात आले. शरीराचा अक्षरशः दाह दाह झाला. रक्ताने लालबुंद झालेले गलितगात्र शरीर आणि अंगाला असंख्य मुंग्या डसल्या होत्या, तरी शंभूराजांनी माघार घेतली नाही. शंभूराजे झुकले नाहीत. वाकले नाहीत, थकलेही नाहीत.

हे पाहून औरंगजेबाने शंभूराजांना ठार मारण्याचा निश्चय केला. शंभुराजे आणि कवि कलश यांचे याप्रकारे २२ दिवस हाल करणेत आले. अखेर या दोघांना वढु बुद्रुक येथील रानात आणणेत आले. रात्री मिट्ट काळोख होता. मशालींच्या उजेडात शंभुराजे व कविकलश या दोघांना आणले. कवि कलशाचा शिरच्छेद करणेत आला आणि शंभूराजांना निवडुंगाच्या रानात जमिनीवर पालथे झोपवून, लाकडाच्या ओंडक्यावर त्यांच्या टाचा ठेऊन, त्यांचे टाचेपासून डोक्यापर्यंत कु-हाडीने तुकडे तुकडे केले. त्यांचे मस्तक पोखरले आणि एका भाल्यावर रोवले गेले आणि त्याची धिंड काढणेत आली. तो दिवस होता फाल्गुन अमावस्या, शके १६११, दि. ११ मार्च, १६८९. यावेळी त्यांचे वय अवघे ३२ वर्षांचे होते.

अशा धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराजांनी हिंदू धर्माकरता खऱ्या अर्थाने बलिदान दिले. 'व्यर्थ न हो बलिदान' हेच खरे आहे.

।। धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजीमहाराज की जय ।।

***

आश्विन शुद्ध ११ - पाशांकुशा एकादशी

आश्विन मासातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला **पाशांकुशा एकादशी** म्हणतात.

पाशांकुश - पाश म्हणजे भवबंधनाच्या पाशावर जेव्हा अंकुश ठेवला जातो म्हणजे प्रतिरोध केला जातो, त्याला पाशांकुश म्हणतात.

विशेष अर्थ :- विशेष अर्थ सांगायचा झाल्यास जी एकादशी देवी आपल्या आश्रित परमार्थी भक्तांच्या भवबंधनाचा प्रतिरोध करुन त्यांना परम लक्ष्यापर्यंत पोहोचवून देते ती श्रीपाशांकुशा एकादशी देवी होय.

पापरूपी हत्तीवर पुण्यरूपी अंकुशाने नियंत्रण ठेवण्यासाठी या एकादशीला पाशांकुशा एकादशी म्हटले जाते. एखाद्या माणसाकडून अनावधानाने जरी पाप घडले तरी पाशांकुशा एकादशीचे व्रत करावे. असे केल्याने पापांचा नाश होऊन सद्‌गुणांचा समावेश व्रत कर्त्या व्यक्तीस होतो असे श्रीकृष्णाने युधिष्ठिराला सांगितले.

पाशांकुशा व्रताचरणात मौन बाळगून आराधा करावी असे सांगितले जाते. विजयादशमीनंतर याच एकादशी दिनी श्रीराम आणि भरत यांची भेट झाली होती.

मृदुमान्य नावाच्या राक्षसाला भगवान शंकरांनी प्रसन्न होऊन तू कोणाकडूनही मरणार नाहीस, पण एका स्त्रीच्या हातून मरशील असा वर दिला होता. या वरामुळे उन्मत्त झालेल्या या राक्षसाने देवांवर स्वारी केली. यावेळी सर्व देव मदतीसाठी शंकराकडे धावले. मात्र शंकरांनाही काही करता येत नव्हते. यावेळी देव शंकरासह एका गुहेत जाऊन लपून बसले. यावेळी शंकरांच्या श्वासातून एक देवता निर्माण झाली. त्या देवतेने मृदुमान्य राक्षसाला ठार करून सर्व देवांची मुक्तता केली. त्या दिवशी भरपूर पाऊस पडत होता. त्यामुळे अनायासे सर्व देवांना स्नान घडले. तसेच सर्वजण गुहेत लपून बसल्यामुळे त्यांना उपवासही घडला होता. त्या दिवसापासून एकादशीचे व्रत म्हणून उपवास करण्याचा प्रघात पडला. या देवीचे नांव होते एकादशी.

***

आश्विन वद्य ११ - रमा एकादशी

आश्विन महिन्यातील वद्य पक्षात येणारी एकादशी ही **रमा एकादशी** म्हणून ओळखली जाते. ही एकादशी चातुर्मासाची सांगता होण्यापूर्वीची शेवटची एकादशी असलेने रमा एकादशी महत्वाची मानली गेली आहे.

रमा एकादशीला श्रीविष्णुंचा आठवा अवतार मानल्या गेलेल्या श्रीकृष्णाचे पूजन केले जाते. या एकादशीला श्रीकृष्णांची विधिवत् पूजा केल्यास सुख आणि सौभाग्य प्राप्त होते.

मुचुकंद नावाचा एक महाप्रतापी राजा होता. मुचुकंदाच्या कन्येचे नाव चंद्रभागा होते. तिचा विवाह चंद्रसेन नामक राजाचा पुत्र शोभन याच्याशी झाला. शोभन हा शारीरिकदृष्ट्या दुर्बळ होता. त्याला भूक सहन होत नसे. एकदा ते दोघेजण मुचुकंद राजाच्या राज्यात फेरफटका मारायला गेले. तो दिवस रमा एकादशीचा होता. एकादशी व्रत करणेबाबत चंद्रभागेने शोभनला सांगितले. तेव्हा तो आपल्याला उपवासाची सवय नाही असे म्हणाला. तेव्हा उपवास केला नाही तर समाजात आपल्याला समाजात कलंक लागेल असे ती म्हणाली. शेवटी नाईलाजाने त्याने उपवास करणेचे ठरविले. दुर्दैवाने द्वादशीच्या दिवशी पहाटे शोभनचा देहांत झाला. नंतर त्याचेवर अंत्यसंस्कार झाले. त्यानंतर काही दिवसांनी तीर्थयात्रेला बाहेर पडलेले राजपंडित सोमनाथ शर्मा अनेक नगरे व तीर्थक्षेत्रे हिंडून परतत होते, त्यावेळी वामदेव मुनींच्या आश्रमाजवळ मंदराचल पर्वतावर त्यांनी शोभनला राज्य करताना पाहिले. तेव्हा सोमनाथ शर्मा चंद्रभागेला घेऊन त्याच्याकडे आले. तेव्हा शोभन म्हणाला की, रमा एकादशीच्या पवित्र प्रभावाने मला जीवनदान मिळालेले आहे. शेवटी शोभन विष्णुलोकी गेला.

***

कार्तिक शुद्ध ११ -प्रबोधिनी एकादशी

कार्तिक मासातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला **प्रबोधिनी एकादशी** म्हणतात.

विशेष अर्थ :- जी एकादशीदेवी आपल्या शरणागत भक्तांच्या मनातील मोह दूर करते आणि त्यांना विशुद्ध ज्ञान (प्रबोध) प्रदान करुन मोक्ष प्राप्तिस सहाय्यक होते ती आहे प्रबोधिनी एकादशी

या एकादशीला हरिबोधिनी, उत्थान, कौशिकी, कार्तिकी एकादशी असेही संबोधिले जाते.

कार्तिक शुद्ध एकादशी ही मोठी एकादशी म्हणून ओळखली जाते. दक्षिणायन हीदेवाची रात्र मानली जाते. तर उत्तरायण हा देवांचा दिवस मानला जातो. कर्क संक्रांत आषाढ मासात येते. म्हणून आषाढ शु. एकादशीला ''देव शयनी'' एकादशी म्हटले जाते. या एकादशीला शेषशायी भगवान श्री विष्णु झोपी जातात म्हणून शयनी एकादशी म्हणतात. कार्तिक शु. एकादशीला देव झोप घेऊन जागेत होतात म्हणून तिला प्रबोधिनी किंवा देवोत्थानी एकादशी म्हटले जाते. चातुर्मासाला प्रारंभ आषाढ शुद्ध एकादशीलाच होतो आणि कार्तिक शुद्ध एकादशीला संपतो.

नवसृष्टी निर्मिती हे ब्रह्मदेवाचे कार्य सुरू असताना पालकत्वकर्ता श्री विष्णु निष्क्रिय असतो. म्हणून चातुर्मासात विष्णु शयन म्हटले जाते. यावेळी भगवान विष्णु क्षीरसागरात शयन करतात अशी मान्यता आहे.

***

कार्तिक वद्य ११ - उत्पत्ती एकादशी

कार्तिक मासातील वद्य पक्षातील एकादशी तिथीला **उत्पत्ती एकादशी** म्हणतात. एकादशी एक देवीचे रूप मानले जात असून, ती कार्तिक वद्य एकादशीला प्रगट झाली/उत्पन्न झाली, म्हणून तिला **उत्पत्ती एकादशी** असे संबोधिले जाते.

जी एकादशी देवी आपल्या भक्तांच्या मनातील गूढ प्रश्न आणि संशय नाहिसा करते आणि तिथे भगवंताच्या चरणलाभाची शुभ इच्छा निर्माण करते, तीच आहे उत्पत्ती अथवा उत्पन्ना एकादशीदेवी.

या एकादशीचे महात्म्य साक्षात् गोपाळकृष्णांनी सांगितले आहे. ते म्हणाले, शंखोद्धर तीर्थात स्नान करून भगवंताचे दर्शन घेतलेने जे फळ मिळते, तेवढेच फळ ही एकादशी केल्याने मिळते.

मूर नावाचा एक राक्षस होता. तो खूप बलवान आणि भयानक होता. त्याने इंद्र, आदित्य, वसू, वायू व अग्नि इ. सर्व देवांचा पराभव केला आणि त्यांना हाकलून लावले. हे बघून इंद्रदेवांसह सर्व देव भयभीत झाले व सगळे भगवान शंकरांकडे आले. शंकरांनी त्या सर्वांना भगवान विष्णुंकडे पाठविले. तेच तुमचे दुःख दूर करू शकतात असे सांगितले. हे ऐकल्यावर सर्व देव क्षीरसागरापर्यंत पोहोचले. भगवान विष्णु तेथे झोपलेले पाहून, हात जोडून त्यांची स्तुती करू लागले. त्यांनी मूर या राक्षसाची सर्व माहिती भगवान विष्णुंना दिली. भगवान विष्णुंनी या सर्व देवांना, मी या मूर राक्षसाचा नाश करीन असे आश्वासन दिले आणि सगळ्यांना 'चंद्रावती' नगरीकडे जाणेस सांगितले. यानंतर भगवान विष्णुंनी या मूर राक्षसाशी युद्ध करणेस प्रारंभ केला. त्यांचे युद्ध १०,००० वर्षे चालले. पण मूर हरला नाही. शेवटी भगवान विष्णु थकले आणि बद्रिकाश्रमाला गेले. तेथे हेमवती नावाची सुंदर गुहा होती. त्यात भगवान विष्णु विसाव्यासाठी शिरले. या गुहेला एकच प्रवेशद्वार होते. भगवान विष्णु योगनिद्रेच्या मांडीवर झोपले. हे बघून त्यांचे मागून मूर हा राक्षस पण आला. भगवान झोपलेले पाहून त्यांना मारण्याच्या तयारीत होता. तेव्हा भगवंताच्या शरीरातून तेजस्वी रूप असलेली देवी प्रगट झाली. देवीने मूर राक्षसाशी युद्ध केले आणि त्याला ठार मारले. हे बघून भगवान विष्णु म्हणाले, 'हे देवी तुझा जन्म आज एकादशीला झाला आहे, म्हणून तुझी **उत्पत्ती/ उत्पन्ना एकादशी** या नावे पूजा केली जाईल' असे सांगितले.

***

मार्गशीर्ष शुद्ध ११ - मोक्षदा एकादशी

मार्गशीर्ष महिन्याच्या शुद्ध पक्षातील एकादशी तिथीला **मोक्षदा एकादशी** म्हणतात.

जी एकादशी देवी आपल्याला अत्यंत अनुगत असलेल्या साधकांना सर्व सांसारिक कामना-वासनांपासून दूर ठेवते आणि परमपथावर (मोक्षलाभाच्या मार्गावर) पोहोचवून देते, ती मोक्षदा एकादशी होय.

या एकादशीलाच वैकुंठ एकादशी, मुक्कोटी एकादशी, धनुर्मास एकादशी या नावानेसुद्धा संबोधले जाते. या दिवशीच गीताजयंती असल्याने, गीतापठणास या दिवशी सुरवात करावी.

मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने या एकादशीला अनन्यसाधारण महत्व आहे. मोक्ष देणारी म्हणून मोक्षदा एकादशी असे तिचे नाव आहे. नरदेहातून सुटका झाल्यावर आत्म्याला मोक्ष मिळावा म्हणून या दिवशी भगवान विष्णुंची आराधना केली जाते. भगवान विष्णुंना तुळशी मंजिरी, धूप, दीप अर्पण करून मनोभावे पूजा केल्यास, सर्व पातकांचा नाश होतो. पातक नष्ट झाल्याने आपसुकच मोक्षाचे द्वार खुले होते.

मोक्षदा एकादशीचे व्रत मनापासून केल्यास मृत्यूपश्चात केवळ आपल्यालाच नव्हे, तर आपल्या पितरांच्या आत्म्याला सद्‌गती मिळते.

गोकुळ नामक नगरात वैखानस नावाचा राजा राज्य करत होता. त्याच्या राज्यात अनेक विद्वान होते. एके रात्री राजाला स्वप्न पडले की, त्याचे वडील नरकात गेले आहेत. दुसरे दिवशी उठल्यापासून राजा अस्वस्थ झाला. राज्यातील मान्यवर ऋषींसमोर त्याने आपले दुःख कथन केले. आपल्या वडिलांना नरकयातना भोगाव्या लागत आहेत, ही कल्पनाही मला सहन होत नाही असे त्याने सांगितले. ऋषींनी त्या राजाला पर्वत ऋषींकडे शंका निरसनासाठी पाठविले. त्याप्रमाणे राजा पर्वत ऋषींना भेटला. त्या पर्वत ऋषींनी ध्यानस्थ होऊन त्या राजाच्या वडिलांचे प्रारब्ध पाहिले आणि राजाला सांगितले की, 'राजा, तू पाहिलेले स्वप्न खरे आहे. तुझ्या वडिलांकडून अजाणतेपणी झालेल्या कुकर्माचे फलित म्हणून त्यांना नरकयातना भोगाव्या लागत आहेत.' हे ऐकून राजाने विचारले, 'गुरूदेव, त्यांच्या यातना कमी व्हाव्यात, म्हणून काहीच उपाय नाही का?' तेव्हा पर्वत ऋषींनी त्याला मोक्षदा एकादशीचे व्रत करायला सांगितले. त्याप्रमाणे त्या राजाने हे व्रत केले आणि त्याच्या वडिलांची कुकर्मातून मुक्तता झाली. त्यांनी स्वप्नात येऊन पुत्राचे आभार मानले. तेव्हापासून राजा दरवेळी हे व्रत श्रद्धेने करू लागला. मोक्षदा एकादशीची व्रत, कथा ऐकणाऱ्या आणि वाचणाऱ्याला पुण्य प्राप्त होते असे याचे महत्व आहे.

***

मार्गशीर्ष वद्य ११ - सफला एकादशी

मार्गशीर्ष मासातील कृष्ण पक्षातील एकादशीला **सफला एकादशी** म्हणतात. या दिवशी विधिवत पूजा करण्याने आपल्याला प्रत्येक कार्यात सफलता मिळते आणि आपली सर्व कार्ये निर्विघ्नपणे पार पडता असे या एकादशीचे फलित आहे. या दिवशी भगवान विष्णु आणि त्यांच्या सर्व अवतारांची पूजा केल्यास विशेष फळ प्राप्त होते. ''मासानां मार्गशीर्षोऽहम्'' या वचनाने भगवद्गीतेत मार्गशीर्ष महिन्याचा गौरव करण्यात आलेला आहे. मार्गशीर्ष मास हा केशवमास म्हणूनही ओळखला जातो. कारण या महिन्याचे पालकत्त्व भगवान महाविष्णु यांचेकडे असते. वर्षभरात येणाऱ्या सर्व एकादशी दिनी भगवान श्रीविष्णुंचे पूजन केले जाते. यामुळेच मार्गशीर्षातील वद्यपक्षात येणारी एकादशी ही महत्त्वाची मालनी गेली आहे.

सफला एकादशीचे व्रत आचरल्यास हाती घेतलेल्या कामात उत्तम यश मिळते. सफला एकादशी एकादशीच्या सर्व व्रतांमध्ये सफला एकादशीचे व्रत श्रेष्ठ मानले जाते. हे व्रत खऱ्या निष्ठेन आणि आस्थेने केल्यास सौभाग्य आणि सफलता प्राप्त होते. पद्मपुराणानुसार चंपावती नगरात महिष्मान राजा होता. महिष्मानचा मुलगा लुंभक वाममार्गाला लागला होता. तो नेहमी पापकर्म करायचा. ज्यामुळे जनता दुःखी होती. लुंभकाच्या कृत्यानी त्रस्त होऊन महिष्मान राजाने त्याला राज्याच्या सीमेबाहेर पाठविले. आता जंगलात राहण्याशिवाय लुंभकाकडे अन्य पर्याय नव्हता. कारण त्याच्या अत्याचारामुळे असेही त्याला कुणी आपल्या नगरात प्रवेश देणार नव्हता. लुंभक जंगलात राहून फळावर गुजराण करत होता. पौषमासाच्या कृष्णपक्षातील एकादशीच्या रात्री कडाक्याची थंडी पडल्याने लुंभक झोपू शकला नाही. रात्रभर जागून तो आपल्या पापकर्माचा पश्चात्ताप करत देवाची क्षमा मागत राहिला. यादरम्यान त्याने अन्नपाणीही घेतले नाही. अशाप्रकारे नकळत लुंभकाने सफला एकादशीचे व्रत केले. लुंभकाच्या मनात त्यावेळी कोणताही कपटविचार नव्हता. आणि तो खरच आपल्या कूकर्मासाठी दुःखी होता. व्रताचा परिणाम असा झाला की भगवान श्रीविष्णुंच्या कृपेने लुंभकाचे वडील राजा महिष्मान यांनी आपल्या मुलाला पुन्हा आणण्यासाठी सैनिक पाठविले व त्याला आपल्या राजमहालात मानाचे स्थान दिले. लुंभकात झालेले परिवर्तन पाहून पित्याने त्याला राज्य सुपूर्त केले आणि स्वतः तपःश्चर्येसाठी निघून गेला. लुंभकाने आयुष्यभर विष्णुची पूजा केली आणि आपल्या राज्यातील जनतेची काळजी घेतली. याप्रकारे सफला एकादशीचे व्रत केल्याने सर्व कार्यात सफलता प्राप्त होते.

सफला एकादशी व्रत विधी : अन्य एकादशी विधीप्रमाणेच सफला एकादशीची पूजा केली जाते. सकाळी उठल्यानंतर स्नान करून व्रताचा संकल्प करावा. नंतर देवघरात गंगाजल शिंपडून भगवान विष्णुची विधीवत पुजा करावी. तुळशीची पाने, अगरबत्ती, सुपारी, फळ आणि श्रीफळ या भगवान श्रीविष्णुंच्या प्रिय गोष्टी आहेत. पूजा केल्यानंतर या अर्पण कराव्यात. सफला एकादशीची कथा वाचावी आणि नैवेद्य अर्पण करावा. या शुभदिनी विष्णुसोबत कृष्णाची देखील पूजा केली जाते. काहीजण आपल्या घरी श्रीसत्यनारायणाचीही पूजा करतात. या दिवशी रात्री जागरणाचे देखील विशेष महत्त्व आहे.

व्रतपूजन विधी : सकाळी स्नानानंतर बाळकृष्णाची चौरंगावर स्थापना करावी. यानंतर बाळकृष्णाचे आवाहन करावे. यानंतर पंचामृत अभिषेक अर्पण करून त्याचा नैवेद्य दाखवावा. एक भरपूर पाणी असलेला नारळ फोडावा. नारळाचे सर्व पाणी एका चांदीच्या किंवा स्टीलच्या भांड्यात घ्यावे (तांबे किंवा पितळेच्या भांड्यात नको. कारण ते खराब होऊ शकते.) बाळकृष्णाच्या मूर्तीवर १६ वेळा पुरुषसूक्त म्हणत या नारळपाण्याचा अभिषेक करावा. पुरूषसूक्त येत नसेल तर ॐ नमो भगवते वासुदेवाय हा मंत्र सगळे पाणी संपेपर्यंत म्हणून पळीने अभिषेक करावा. अभिषेक झाल्यानंतर वस्त्र, गंध, अक्षता, तुळशीची पाने, ऋतुकालोद्भव फुले व फळे बाळकृष्णाला अर्पण करावी. धूप, दीप अर्पण केल्यानंतर खोबऱ्यात साखर मिसळून त्याचा बाळकृष्णाला नैवेद्य दाखवावा. यानंतर आरती करावी. मनापासून नमस्कार करून सर्वांना प्रसादाचे वाटप करावे. शक्य असल्यास विष्णुसहस्रनामाचे पठण करावे. या सफला एकादशीला अशी उपासना करणाऱ्याला भगवान श्रीकृष्ण चांगले फळ देऊन आशीर्वाद देतात असे सांगितले आहे. ***

पौष शुद्ध ११ - पुत्रदा एकादशी

पौष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला **पुत्रदा एकादशी** म्हणतात. पुत् धातूपासून पुत्र हा शब्द बनला आणि पुत्र या शब्दापासून पुत्रदा सारखे बरेच शब्द निर्माण झाले.

जी एकादशीदेवी नित्यानित्यवस्तु विचार करून आपल्यापाशी आलेल्या भक्ताच्या मनात वैराग्याला जन्म देते आणि मातेप्रमाणे नेहमी जवळ राहून अध्यात्मिक चढउतारापासून त्याचे रक्षण करून त्याला नित्यधामी पोहोचविते तीच आहे **''श्री पुत्रदा एकादशीदेवी''.** या एकादशीलाच वैकुंठ प्रभृती एकादशी असेही संबांधतात.

हे व्रत आपल्या मुलांचे दीर्घारोग्य, सुखसमृद्धी आणि याबरोबरच पुत्रप्राप्तीसाठी आचरले जाते. या दिवशी भगवान गोपाळकृष्णाच्या बालस्वरूपाची पूजा केली जाते. या पूजेला पिवळे फळ, पिवळे फूल, तुळशी आणि पंचामृत इत्यादि साहित्य लागते. या एकादशीला भगवान गोपाळकृष्णाचा जप करावा.

भद्रावती राज्यामध्ये सुकेतुमान नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या पत्नीचे नाव शैव्या होते. राजाजवळ सगळे ऐश्वर्य होते, पण पुत्रसंतान नव्हते. अशामुळे राजा व राणी कायम चिंतेत असायचे. राजच्या मनात देहत्याग करावा असा विचार येऊ लागला. परंतु याने पाप लागेल म्हणून त्याने हा विचार सोडून दिला. राजाचे मन आपल्या रोजच्या दरबारातील कामकाजामध्ये लागत नव्हते. त्यामुळे तो जंगलामध्ये रहायला गेला.

जंगलात फिरता फिरता त्याला एक तलाव दिसला. त्या तलावाच्या किनाऱ्यावर त्याला एका ऋषींचा आश्रम दिसला. राजा आश्रमात गेला. राजाला बघितल्यावर ऋषी प्रसन्न झाले आणि राजाला म्हणाले, 'राजा, काय इच्छा आहे' असा प्रश्न केला. राजाने आपली पुत्रप्राप्तीची इच्छा ऋषींना बोलून दाखविली. तेव्हा ऋषी म्हणाले, 'राजा, तू पुत्रदा एकादशीचे व्रत कर.' त्या दिवशीच पुत्रदा एकादशी होती. त्याने पुत्रदा एकादशीचे यथासांग व्रत केले आणि दुसरे दिवशी द्वादशीचे पारणे केले. या पुत्रदा एकादशीच्या व्रताने राणीला गर्भधारणा होऊन राजाला सुंदर पुत्र झाला.

ही एकादशी वर्षातून दोनदा असते. श्रावण शुद्ध एकादशी हीसुद्धा पुत्रदा एकादशी असते.

***

पौष वद्य ११ - षट्तिला एकादशी

पौष मासातील कृष्ण पक्षातील एकादशीला **षट्तिला एकादशी** म्हणतात. या पवित्र दिवशी तिळांचा वापर अनेक प्रकारच्या व्यवहारात करणे हा षट्तिला एकादशी या व्रताचा मुख्य आकर्षणाचा विषय आहे.

षट् म्हणजे सहा षट्तिला म्हणजे तीळ वापरण्याचे सहा प्रकार

१) तीलयुक्त जलाने स्नान २) दानपात्रात तीळ ३) आहारात तीळ ४) पिण्याच्या पाण्यात तीळ, ५) पूजा व होमात तीळ ६) तिळाची पूड करून अंगमर्दन करणे.

या सहा प्रकारांनी या दिवशी तिळाचा वापर करायचा असतो.

षट्तिला कादशी म्हणजे काय?

जी एकादशीदेवी आपल्या एकनिष्ठ भक्तांच्या अंतःकरणातील कामादी षट्गुणांना क्षणाक्षणाने (तिळा तिळाने) स्नेहभराने सत्वगुणात परिणत करते तसेच धर्म/अर्थ/काम/मोक्ष हे यतुर्वर्ग प्राप्तीसाठी सहाय्यक बनते तीच **षट्तिला एकादशी** होय.

एकदा भगवान श्रीकृष्ण आपल्या एका शरणागत भक्ताची परीक्षा घ्यायला गेले. भगवान श्रीकृष्णांनी कपिल या नावे ब्राह्मणाचे रूप धारण केले व त्या भक्ताला षट्तिला एकादशी व्रताचा उपदेश केला. या व्रताचा मुख्य विषय आहे स्नेह/त्याग/संयम.

निष्ठेने आणि एकाग्र चित्ताने जे या व्रताचे पालन करतील त्यांना इहलोकी आणि परलोकी दुःख, कष्ट आणि दुर्गतीच्या अधीन व्हावे लागत नाही आणि त्याला अंतिमकाळी चतुर्वर्गाचा लाभ होईल.

***

माघ शुद्ध ११ - जया एकादशी

माघ मासातील शुद्ध पक्षातील एकादशी तिथीला **जया एकादशी** म्हणतात.

जी एकादशी देवी आपल्या चरणाश्रित असलेल्या एकनिष्ठ भक्तांना साधना मार्गावरील अडथळे ओलांडण्याची शक्ती देते आणि जय मिळवून देते आणि अंतिमकाळी त्यांना वैकुंठ लोकाला पोहोचवून देते ती आहे जया एकादशीदेवी.

जया एकादशीच्या दिवशी रवियोग आणि त्रिपुष्कर योग एकत्र येत असल्यामुळे या तिथीचे महत्त्व जास्त आहे. जया एकादशीचे व्रत केल्यामुळे धनसंपत्तीत वाढ होते व आपल्या दैनंदिन कार्यात यश प्राप्त होते.

हे व्रत तीनप्रकारे केले जाते. उपाशी राहून, फलाहार करून किंवा फक्त पाणी पिऊन. परंतु आजच्या धकाधकीच्या जीवनात असे कठोर व्रत करणे शक्य होईल असे नाही. म्हणून शास्ताने नामस्मरणाचा पर्याय सुचवला आहे.

या दिवशी व्रत करणाऱ्याला शारीरिक आणि मानसिक व्याधींमधून मुक्तता मिळते व मन शांत रहाते. तसेच या व्रतामुळे भूत, पिशाच्च आदि योनीतून मुक्तता मिळते.

प्राचीनकाळी देवराज इंद्राच्या राजसभेत नृत्यगायनासाठी आलेला पुष्पदंत गंधर्वाचा पुत्र माल्यवान आणि चित्रसेन गंधर्वाची कन्या पुष्पवती यांचा नृत्यगायन करताना छंदोभंग झाला. या अपराधामुळे इंद्राने त्यांना तुम्हाला पिशाच्च योनी प्राप्त होईल असा शाप दिला आणि त्यांना राजसभेतून हाकलून दिले.

पण हे दोघे विष्णुभक्त होते. त्यांना पिशाच्चाचे रूप मिळूनही ते नेहमी भगवद्चिंतन करीत असत. असे बरेच दिवस गेले. एके दिवशी भगवान विष्णुंनी त्यांना दैवीवाणीने सांगितले की, तुम्ही दोघे जया एकादशीचे व्रत पालन करा. तुम्हाला पूर्वरूप प्राप्त होईल आणि दुःख दुर्दशेतून मुक्तता होईल.

याप्रमाणे या दोघांनी शास्त्रीय विधीनिषेधानुसार या व्रताचे पालन केले आणि ते सर्व पापातून मुक्त झाले व शेवटी ते वैकुंठ लोकाला प्राप्त झाले.

***

माघ वद्य ११ - विजया एकादशी

माघ महिन्याच्या वद्य पक्षात येणारी एकादशी **विजया एकादशी** म्हणून ओळखली जाते.

पद्मपुराणात सांगितले आहे की, या एकादशीचे व्रत केल्याने मनुष्याला सर्व क्षेत्रात विजय प्राप्त होतो आणि त्याच्या सर्व पापांचा नाश होतो. या व्रताचे पालन केल्याने वाजपेयी यज्ञाचे पुण्य फळ मिळते आणि शत्रूंचाही पराभव होतो. या उपवासाचा परिणाम पराभवाला विजयात बदलतो. युधिष्ठिराला या व्रताचे महत्व सांगताना भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'हे व्रत विजय मिळविण्यासाठी केले जाते. लंकेवर विजय मिळविण्यासाठी भगवान प्रभू रामचंद्राने या एकादशीचे व्रत केले आणि त्यामुळेच रावणाशी युद्धात रामाला विजय प्राप्त झाला. या व्रतामुळे जीवनातील नकारात्मकता दूर होते आणि सकारात्मकता वाढीस लागते. विजया एकादशीचे व्रत केल्याने अन्नदान, गोदान, सुवर्णदान आणि भूमीदान या सारखे पुण्य प्राप्त होते आणि मनुष्य, जन्माच्या बंधातून मुक्त होऊन, त्याला मोक्ष प्राप्त होतो.'

भगवान प्रभू रामचंद्रांना वनवास भोगावा लागला. या वनवासात रावणाने सीतेचे अपहरण केले. हे बघून श्रीराम आणि लक्ष्मण अस्वस्थ झाले. त्यांनी सुग्रीवाची भेट घेतली आणि त्याच्या वानरसेनेच्या मदतीने ते रावणाच्या लंकेवर युद्ध करण्यासाठी समुद्र किनाऱ्यावर आले. अथांग समुद्र असलेने लंकेवर चढाई कशी करायची या विचारात ते होते. शेवटी प्रभू रामांनी समुद्र देवाला मार्ग विचारला. पण मार्ग मिळाला नाही. तेव्हा तेथे बकदालभ्य ऋषी होते, त्यांनी प्रभू रामांना विजया एकादशीचे व्रत करणेस सांगितले. याप्रमाणे प्रभु रामांनी सगळ्या वानरसेनेसह माघ वद्य एकादशीला विजया एकादशीचे व्रत केले. या व्रतामुळे समुद्रदेवाने भगवान श्रीरामचंद्रांना लंकेला जाणेचा मार्ग दिला आणि रामांनी घनघोर युद्ध करून विजय मिळविला.

***

फाल्गुन शुद्ध ११ - आमलकी एकादशी

फाल्गुन मासातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला **आमलकी एकादशी** म्हणतात.

विशेष अर्थ :- जी एकादशीदेवी साधकाच्या मलीन आणि दुष्ट चित्तात पालट घडवून आणून चतुर्वर्ग लाभाचा मार्ग मोकळा करून देते ती आमलकी एकादशी होय.

या एकादशीला आवळा एकादशी असेही म्हणतात.

भगवान विष्णुंनी जेव्हा सृष्टिच्या रचनेकरिता ब्रह्मदेवाला जन्म दिला, त्यावेळेला आवळ्याच्या वृक्षाचा जन्म झाला. यामुळे भगवान विष्णुंनी या आवळ्याच्या झाडाला आदिवृक्ष म्हणून घोषित केले. म्हणून आवळ्याच्या प्रत्येक भागात ईश्वराचा वास आहे असे मानतात.

या एकादशीला काही ठिकाणी रंगभरी एकादशी असेही म्हणतात.

बृहद्धर्म पुराणात आणखी एक कथा आहे. देवी पार्वती आपल्या सख्यांसह एकदा प्रवासाला निघाल्या होत्या. तिथे त्या शिवाचे जयगान करू लागल्या. त्यावेळेस त्यांचे आनंदाश्रू भूमीवर पडले आणि कालांतराने त्यातून सर्वगुणसंपन्न वृक्ष निर्माण झाला तो आमलकी वृक्ष होय.

पद्मपुराणात भगवान विष्णुंच्या मुखातून या वृक्षाची उत्पत्ती झाली आहे. असे हे आमलकी एकादशीचे व्रत भक्तिभावाने पालन केल्यास साधक निःसंशयपणे विष्णुलोकी गमन करु शकतो.

***

फाल्गुन वद्य ११ -पापमोचनी एकादशी

फाल्गुन मासातील वद्य पक्षातील एकादशी तिथीला **पापमोचनी एकादशी** म्हटले जाते. जे पुण्य गोदान, सोनं दान, अश्वमेध यज्ञ केल्याने मिळते त्याहून अधिक पुण्य या एकादशीचे व्रत केल्याने मिळते अशी मान्यता आहे.

या एकादशीचे व्रत करणाऱ्यांचे पितर पापांपासून मुक्ती मिळवितात आणि त्या घरात सुखशांती नांदते.

या एकादशी व्रतामुळे जन्मांतरीच्या पापांपासून मुक्ती मिळत असल्यामुळे या एकादशीला पापमोचनी एकादशी असे म्हटले जाते. या दिवशी भगवान विष्णुंच्या चतुर्भुज रुपाची पूजा केली जाते.

पापमोचनी एकादशीचे व्रत करणाऱ्यांनी दशमीला म्हणजे एकादशीच्या आदल्या दिवशी सात्विक आहार घ्यावा आणि शक्य असल्यास रात्री भोजन करू नये. या एकादशी दिवशी धार्मिक ग्रंथानुसार तांदूळ वर्ज आहे. या दिवशी भात खाल्याने एक तांदळाचे शीत म्हणजे एक किडा खाल्याचे पाप लागते असे नमूद आहे.

पौराणिक कथेनुसार श्रीकृष्ण अर्जुनाला पापमोचनी एकादशीचे व्रत आणि कथा सांगतात. एकदा राजा मांधना यांनी लोमेश ऋषींना अनावधानाने झालेल्या पापातून मुक्ती कशी मिळेल असा प्रश्न विचारला होता. तेव्हा लोमेश ऋषींनी राजाला सुंदरवनातील च्यवन ऋषींचे पुत्र मेवाधी यांची कथा सांगितली.

मेवाधी ऋषी तपसाधनेत मग्न असताना मंजुघोषा नामक अप्सरा तेथे आली. ती ऋषींच्या रूपावर भाळली आणि तपोसाधना भंग करण्याचा प्रयत्न करू लागली. तेवढ्यात कामदेव तिच्या मदतीला धावून आले आणि या दोघांनी या ऋषींची तपोसाधना भंग केली. कामदेवांच्या प्रभावामुळे हे ऋषी देखील सुरवातीला त्या अप्सरेवर भाळले. पण नंतर या ऋषींना या अप्सरेचा राग आला. ते क्रोधीत झाले आणि त्यांनी तिला शाप दिला. ऋषींनी दिलेल्या शापामुळे अप्सरा दुखावली. शापातून मुक्ता व्हावी आणि केलेल्या कर्मापासून मला उपरती व्हावी म्हणून ती मोठ्यांना माफी मागू लगाली. याचवेळी देवऋषी नारद तेथून मार्गक्रमण करीत होते. नारदांनी ऋषी आणि अप्सरा या दोघांना पापमोचनी एकादशीचे व्रत करण्यास सांगितले. त्या दोघांनी पापमोचनी एकादशीचे व्रत यथासांग केले आणि या दोघांनाही, पापातून मुक्तता मिळाली.

***

अधिक मास शुद्ध ११ - पद्मिनी एकादशी

अधिक मासातील शुक्लपक्षात येणाऱ्या एकादशी तिथीला **पद्मिनी/ पुरूषोत्तमी/सुभद्रा एकादशी** म्हणतात. वेगळ्या मतानुसार या एकादशीला **कमला एकादशी** असेही संबोधतात.

जी एकादशीदेवी आपल्या पादपद्मी विराजित असलेल्या साधकाला पराज्ञान आणि परमगती (पद) देते ती **पद्मिनी एकादशी देवी** होय.

तीन वर्षांनी येणारी ही एकादशी अतिशय विशेष आणि महत्वाची आहे, कारण अधिक मास आणि एकादशी या दोन्ही गोष्टी भगवान विष्णुंना अतिशय प्रिय आहेत. अधिक मासातील एकादशीला भगवान विष्णुंचे व्रत आणि उपासना करण्याबरोबरच नियम आणि संयम पाळला तर, भगवान विष्णु प्रसन्न होतात.

त्रेतायुगात महिष्मतीपुरात हैहय वंशाचा कृतवीर्य नावाचा राजा राज्य करीत होता. या कृतवीर्याला १० पत्नी होत्या, पण त्यापैकी कोणासही मूलबाळ नव्हते. त्यामुळे आपल्या राज्याला आता वारस कोण? ही चिंता त्याला लागून राहिली होती. त्याने पुत्रप्राप्तीसाठी अनेक उपाय केले, पण उपयोग झाला नाही. शेवटी त्याने तपश्चर्या करण्याचे ठरविले आणि तो आपली पत्नी पद्मिनी हिला बरोबर घेऊन गंधमादन पर्वतावर कठोर तपश्चर्येकरिता गेला. तेथे त्या दोघांनी १० वर्षे कठोर तपश्चर्या केली आणि कर्दम ऋषींची कन्या अनुसूया हिची दृष्टी आकर्षून घेतली. अनुसूयेने या दोघांना अधिक मासाचे महत्व समजावून सांगितले आणि या एकादशीचे व्रत केले तर तुमची मनोकामना पूर्ण होईल आणि भगवान विष्णु प्रसन्न होऊन तुम्हाला पुत्ररत्नाचा आशीर्वाद नक्की देतील असे सांगितले. यानंतर अनुसूयेच्या सल्याने या दोघांनी अधिक मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला नियम व संयम पाळून उपवास केला आणि या व्रताने त्यांना पुत्रप्राप्ती झाली. या मुलाचे नांव 'कार्तवीर्य' असे ठेवणेत आले. पुढे तो एक महान योद्धा झाला.

***

अधिक मास वद्य ११ - परमा/कमला एकादशी

अधिक मासातील वद्य पक्षात येणाऱ्या एकादशी तिथीला **परमा किंवा कमला एकादशी** म्हणतात.

या एकादशीचा विशेष अर्थ सांगायचा झाल्यास, जी एकादशीदेवी तिच्या एकनिष्ठ भक्ताच्या मनातून अनित्य जगत् संसाराचे ज्ञान नाहिसे करते आणि त्या भक्ताला परम गती प्राप्तीला सहाय्यक होते, ती **परमा किंवा कमला एकादशी** होय.

परमा/कमला एकादशी ही अधिक मासात तीन वर्षातून एकदा येते. या तिथीला भगवान विष्णुंची उपासना केल्याने, सुख आणि ऐश्वर्य प्राप्त होते. त्याशिवाय आयुष्यातील दुःख आणि दारिद्र्य नष्ट होते. या तिथीचे व्रत करून कथा श्रवण केल्याने, १०० यज्ञाइतके पुण्य मिळते.

कांपिल्य नगरीत सुमेधा नावाचा एक गरीब ब्राह्मण रहात होता. त्याची पत्नी पवित्रा ही पतिव्रता होती. पूर्वजन्मीच्या कर्मानुसार त्यांना दारिद्र्य आले होते. सुमेधा हा भिक्षेकरिता गावात जायचा, पण त्याला भिक्षा मिळायची नाही. जी थोडीफार भिक्षा मिळायची, त्यावर या दोघांचा उदरनिर्वाह चालायचा. यातच एखादा अतिथी आला तर, स्वतः उपाशी राहून त्या अतिथीला तो अन्न देत असे.

या दारिद्र्याला कंटाळून तो दुःखी झाला आणि परदेशात जाण्याचा विचार करू लागला. यावेळी पत्नीने त्याला सांगितले की, 'स्वामी, पैसा आणि पुत्रप्राप्ती हे पूर्वदत्त आहे. पूर्वपुण्यानुसार ते प्राप्त होत असते. त्यामुळे चिंता करायची सोडून द्या आणि सगळे देवावर सोडा, तो बघून घेईल.'

पुढे एक दिवस कौंडिण्य ऋषी त्यांचे घरी आले. या दोघांनी त्यांची सेवा केली व या ऋषींचे कानावर त्यांनी आपली संसारिक परिस्थिती घातली. हे ऐकून कौंडिण्य ऋषी म्हणाले, 'दारिद्र्य दूर करण्याकरिता एक सरळ उपाय आहे, तो मी तुला सांगतो. तुम्ही दोघांनी मिळून अधिक मासातील वद्य पक्षातील परमा/कमला एकादशीचे व्रत करा आणि पंचरात्र जागरण करा. या एकादशी व्रताने तुम्हाला यक्षराज कुबेर धनाढ्य बनवतील. हरिश्चंद्र राजासुद्धा या व्रतानेच राजा झाला होता.'

याप्रमाणे या दोघांनी परमा/कमला एकादशीचे विधिवत् व्रत केले. व्रत झालेनंतर प्रातःकाळी एक राजकुमार घोड्यावर बसून आला आणि त्याने या व्रत करणाऱ्या दांपत्याला बघितले. त्याला दया आली व त्याने त्या दोघांना भरपूर साधनसंपत्ती दिली. सुख समृद्ध केले आणि एक चांगले घर रहायला दिले. याप्रमाणे या दांपत्याचे सर्व दुःख नाहिसे झाले.

***

अधिक मास

हिंदू कॅलेंडरमध्ये दर तीन वर्षांनी एकदा अतिरिक्त महिना येतो. ज्याला अधिकमास/मलमास/पुरूषोत्तममास किंवा धोंडा महिना म्हणतात. हिंदू धर्मात या महिन्याचे विशेष महत्व आहे. महिनाभर पूजा, देवाची भक्ती, उपवास, ध्यानधारणा, योग इ. धार्मिक कार्य करायचे असते. असे का करायचे तर इतर कोणत्याही महिन्यात केलेल्या उपासनेपेक्षा, अधिक महिन्यात केलेल्या उपासनेचे फळ दहापट अधिक मिळते.

वसिष्ठ तत्त्वानुसार भारतातील हिंदू कॅलेंडर सौर महिन्याच्या आणि चांद्र महिन्याच्या गणनेनुसार चालते. अधिकमास हा चांद्र वर्षाचा अतिरिक्त भाग आहे. जो दर ३२ महिन्यांनी येतो. त्यात १६ दिवस आणि ८ घटांचा फरक असतो. हे सौरवर्ष चांद्रवर्षातील फरक संतुलित करते.

भारतीय गणना पद्धतीनुसार प्रत्येक सौर वर्ष ३६५ दिवस आणि ५ तास ४८ मिनिटे आणि ४७.

५ सेकंदांचे म्हणजेच सुमारे ६ तासांचे असते, तर चांद्रवर्ष ३५४ दिवसांचे मानले जाते. दोन वर्षांमध्ये सुमारे (३६५ - ३५४ = ११) ११ दिवसांचा फरक आहे. हा फरक तीन वर्षांनी सुमारे १ महिन्याचा (३३ दिवस) होतो. हे दिवस भरून काढण्यासाठी दर तीन वर्षांनी एक चांद्रमास अस्तित्वात येतो. तो अतिरिक्त महिना म्हणजे अधिकमास होय. म्हणून ३०-३ असे म्हणणेची पद्धत आहे (३३ दिवस असलेने).

अधिकमास हा दर तीन वर्षातून एकदा येतो आणि तो प्रामुख्याने चैत्र महिन्यापासून, आश्विन महिन्यापर्यंत असतो. कार्तिक, मार्गशीर्ष, पौष आणि माघ हे चार महिने कधीच अधिक नसतात आणि फार क्वचित प्रसंगी फाल्गुन मास हा अधिकमास म्हणून आलेला आहे.

सूर्य एका वर्षात बारा राशींमध्ये संक्रमण करतो, म्हणजे एका महिन्यात तो एका राशीत असतो. सूर्याया राशी संक्रमणास संक्रांती म्हणून ओळखले जाते. अधिक मासाचे वैशिष्ट्य म्हणजे, या एकाच महिन्यात सूर्याचे संक्रमण होत नाही. म्हणजे ज्या दोन अमावस्यांमधील एका अमावस्येस संक्रमण होत नाही, त्या दोन अमावस्यांमधील कालावधीला अधिकमास म्हटले जाते.

आता अधिकमासालाच मलमास नांव का पडले ?

हिंदू धर्मात अधिकमासामध्ये सर्व पवित्र कृत्ये निषिद्ध मानली जातात. कारण या अधिक दिवसांमुळे वस्तुमानात मल म्हणजे घाण होते. म्हणून या अधिक महिन्यात नामकरण विधी, यज्ञ, विवाह, गृहप्रवेश, नवीन मौल्यवान खरेदी, तसेच इतर सामान्य धार्मिक विधी केले जात नाहीत. हा महिना अशुद्ध अशी समजूत असलेने या महिन्यास मलमास म्हणतात.

आता पुरुषोत्तम मास नाव कसे पडले?

भगवान विष्णु हे अधिक मासाचे अधिपती मानले जातात. पुरुषोत्तम हे नाव भगवान विष्णुंचे आहे. म्हणून अधिक मासाला पुरूषोत्तम मास म्हणतात. भारतीय ऋषींनी त्यांच्या गणना पद्धतीनुसार प्रत्येक चांद्र महिन्यास देवता निश्चित केली आहे. अधिक मास हा सौर आणि चांद्र महिन्यातील समतोल राखण्यासाठी प्रगट झाला आहे. या अतिरिक्त महिन्याचा अधिपती होण्यास कोणीही देवता तयार होईना. अशा परिस्थितीत ऋषींनी भगवान विष्णुंना या महिन्याचा भार स्वत:वर घेण्याचा आग्रह केला. या आग्रहाला मान देऊन भगवान विष्णुंनी या महिन्याचा भार घेतला आणि भगवान विष्णु याचे अधिपती झाले. म्हणून अधिक मासास पुरुषोत्तम मास असेही म्हटले जाते.

अधिक मास हा चांद्रवर्ष मानणाऱ्या महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यात पाळला जातो. या राज्यात चांद्रमास हे अमान्त म्हणजे अमावस्येला संपणारे मास असतात. वरील राज्ये सोडून इतर राज्यात म्हणजे आसाम, तामिळनाडू, केरळ, ओरिसा, प.बंगाल या राज्यात चांद्रमास पौर्णिमांत म्हणजे पौर्णिमेला संपणारे असतात. या राज्यात सौर वर्ष पाळले जात असल्याने अधिक मास पाळला जात नाही.

अधिक मासासंदर्भात एक पौराणिक कथा प्रसिद्ध आहे :-

हिरण्यकश्यपूने कठोर तपश्चर्या करून ब्रह्मदेवांना प्रसन्न केले आणि अमरत्वाचे वरदान मागितले. अमरत्वाचे वरदान देणे हे शास्त्राने निषिद्ध आहे. त्यामुळे ब्रह्मदेवाने त्याला दुसरे वरदान मागायला सांगितले. तेव्हा हिरण्यकश्यपूने ब्रह्मदेवांना असे वरदान मागितले की, जगातील कोणताही पुरुष, स्त्री, प्राणी, देवता किंवा राक्षस मला मारू शकणार नाही आणि वर्षातील १२ महिन्यात मला मृत्यू येऊ नये. तसेच मला कोणत्याही शस्त्राने आणि अस्त्राने मारता येवू नये, तसेच घरातही नाही व बाहेरही नाही, दिवसाही नाही व रात्रीही नाही. हे ऐकल्यावर ब्रह्मदेवाने त्याला तथास्तु म्हणून वरदान दिले. त्यामुळे हे वरदान मिळताच हिरण्यकश्यपू स्वत:ला अमर समजू लागला आणि स्वत:ला देवाच्या बरोबरीचा समजू लागला. तेव्हा भगवान विष्णुंनी अधिक मासात संध्याकाळी, अर्ध पशू व अर्ध मनुष्य असा नरसिंह अवतार घेऊन, उंबरठ्यावर हिरण्यकश्यपूला आपल्या नखांनी ठार केले.

***

माघ शुद्ध ७ - रथसप्तमी

माघ महिन्यातील शुद्ध सप्तमीस '**रथसप्तमी**' म्हणतात. हा दिवस सूर्यदेवाप्रित्यर्थ असणारी आदरभावना व्यक्त करणेसाठी आहे. सूर्यदेवापासून आपणास ऊर्जाव प्रकाश मिळत आला आहे. म्हणून अनादि कालापासून त्याला देव मानले गेले आहे. हा दिवस मन्वंतराचा पहिला दिवस असून या दिवशी सूर्यनारायणाची स्वारी सात घोडे जुंपलेल्या रथातून आकाशमार्गाने फिरावयास निघते. या समजुतीने या दिवसास रथसप्तमी हे नांव मिळाले आहे. या दिवशी सूर्योदयाचेवेळी उठून सूर्यनारायणाची प्रार्थना करावी. सूर्यासह सात घोड्यांच्या रथाचे चित्र काढावे व त्याची पूजा करावी. गोवऱ्या पेटवून त्यावर मातीच्या भांड्यात दुधाच्या खिरीचा सूर्यास नैवेद्य दाखवावा अशी प्रथा आहे.

या संदर्भातील पौराणिक कथा अशी :- एकदा कंबोज देशात यशावर्मा नावाचा राजा होऊन गेला. त्याला वृद्धापकाळी पुत्र झाला. तो रोगग्रस्त व अशक्त असल्यामुळे बरा होण्यासाठी कोणता उपाय करावा असे फलज्योतीषांचे मत घेतले. त्यांनी सांगितले की नवग्रहातील मुकुटमणी असलेल्या सूर्याच्या कृपाकटाक्षाच्या अभावी मुलास आरोग्य लाभत नाही. म्हणून रथसप्तमीच्या दिवशी व्रतस्थ राहून सूर्याची पूजा करावी व त्या देवतेस अनुकूल करून घ्यावे असा सल्ला दिला. त्याप्रमाणे हे व्रत आचरल्याने त्या मुलाची कांती तेजःपुंज झाली व त्याला निरारोग्य प्राप्त झाले.

रथसप्तमीचे अध्यात्मिक महत्व प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांनी खालील अभंगात सांगितले आहे.

आत्मसूर्य उपासन । ब्रह्मकर्म वर्म खूण ।।१।। नाम अहर्निश घ्यावे । ब्रह्मकर्म हे स्वभावे ।।२।।
संधिकाळी जपता पूर्ण । हेचि संध्या उपासन ।।३।। अ, उ, म चे देता पाणी । नाश मंदेहा लागोनी ।।४।।
नाम त्रिपदा गायत्री । असे व्यापुनी शरीरी ।।५।। देहरथी पिंडी सात । उल्लंघोनी ब्रह्मांडात ।।६।।
नामे जडता सप्तमस्थानी । दासा भेटे दिनमणी ।।७।।

या अभंगाचा थोडक्यात अर्थ असा :- सूर्य म्हणजे आत्म सूर्य आहे. याचीच उपासना, ब्रह्म म्हणजे कर्म व कर्म म्हणजे ब्रह्म हे दोन्ही जाणून जो करतो, त्याला आत्मसूर्याची उपासना घडते. संध्येच्यावेळी मंदेह राक्षस अर्ध्यदानाने मरतात. दुसऱ्या दिवशी संध्येच्यावेळी पुन्हा उठतात व पुन्हा अर्ध्य दिल्याने मरतात. म्हणून नित्य संध्या केली पाहिजे. मानव देह म्हणजे मंदेह. मंदेह व संदेह हे दोन राक्षस आहेत. त्यांचा नाश केल्याशिवाय आत्मसाक्षात्कार संध्या म्हणजे श्वास व उच्छ्वास यामधील असणाऱ्या संधीकाळात नाम जपणे होय. अशी संध्या साधली असता, संदेह म्हणजे संशय या राक्षसावर मात करता येते. अ उ म चे पाणी देणे म्हणजे शब्दाचे आत निःशब्दात गायत्री मंत्र जपात नामाशी तद्रुप होणे होय. नाम हीच त्रिपदा गायत्री आहे. आपल्या देहामध्ये पिंडातील ७ व ब्रह्मांडातील ७ अशी १४ चक्रे सांगितली आहेत. देहालाच रथ म्हटले जाते. अखंड नामाच्या योगाने पिंडातील ७ चक्रे उल्लंघून ब्रह्मांडात प्रवेश झाला असता, त्या साधकाला दिनमणी म्हणजेच आत्मसूर्याचे दर्शन होते.

***

मार्गशीर्ष शुद्ध १३ - श्रीमद् हनुमानव्रत

केळकरांचे घरात गेली चार पिढ्या मार्गशीर्ष शु.त्रयोदशी या दिवशी हनुमानव्रताची पूजा केली जाते. ही पूजा सहसा कोठे आढळत नाही. परंतु या हनुमानव्रताचे महात्म्य फार मोठे आहे. १३ हा अंक 'श्रीराम जयराम जयजयराम' या मंत्रातील अक्षरसंख्या दर्शवितो. श्रीहनुमंतांनी या मंत्राचाच नित्य जप केला व आपल्या अंतरी प्रभू श्रीरामचंद्रांचा साक्षात्कार प्राप्त करून घेतला. आमचे श्रीमामामहाराज म्हणतात, '**रामकृपा व्हावी जरी । हनुमान सेवा करी ।।**' म्हणजेच आपल्याला प्रभूरामचंद्रांची भेट व्हावी असे वाटत असेल, तर प्रथम श्रीहनुमंतरायांची उपासना करून त्यांना प्रसन्न करून घेतले पाहिजे. हा सारा दृष्टीकोन हे व्रत करण्यामागे आहे. या संदर्भात असणारी पौराणिक कथा व महात्म्य खाली दिले आहे :-

एकदा ऋषी, सूताला प्रश्न विचारतात, तुमच्या मुखाने आम्ही पुष्कळ व्रते ऐकली. हनुमानव्रताबद्दल मला ऐकायची इच्छा आहे. सूत सांगायला लागले. हे पावन व्रत चारीही वर्णांनी आचरण्यास योग्य आहे. हे व्रत आरोग्य, पुत्र-पौत्र देणारे आहे. संपत्तीही देणारे आहे आणि विद्याही देणारे आहे.

एकदा असे झाले की, व्यास महर्षी आपल्या शिष्यांना बरोबर घेऊन द्वैतवनात युधिष्ठिराकडे गेले. युधिष्ठिराचा आश्रम व्यासांनी कसा पाहिला तर ते ऋषीमुनी आपले शिष्य घेऊन आले होते आणि वातावरण वेदघोषांनी निनादित झाले होते. धर्मराजांनी व्यासांना दुरून येताना पाहिले आणि आपण उठून त्यांचे स्वागत केले. द्रौपदीनेही पूजन केले आणि धर्मराजानेही पूजेत भाग घेतला. व्यासांनी त्याला खुशाली विचारली. व्यास म्हणाले, अर्जुनाने पाशुपत्यास्त्र मिळविल्याचे कळले पण तुला एक गुप्त माहिती सांगायला आलो आहे. मी सांगितलेले हे हनुमान व्रत जर तू करशील तर, तुझे गेलेले राज्य तू शत्रूवर विजय मिळवून पुन्हा प्राप्त करशील. धर्मराज व्यासांना विचारते झाले. या व्रताची माहिती मला सांगावी. त्यावेळी व्यासांच्या मनात मारुतीचे चिंतन सुरू झाले. आता मी व्रत सांगतोय त्या व्रत उच्चारणामुळे कार्यसिद्धी होते, अनिष्ट ग्रहांची पीडा नाहिशी होते, शत्रूंचे उच्चाटन होते, रोगराईचे निवारण होते. किती सांगणार? सगळेच काही मिळते. पूर्वीची आठवण देतो. तुझ्या घरात हे व्रत चालू होते. ज्यावेळेला एकेकाळी भगवान श्रीकृष्ण द्रौपदीने प्रार्थिला होता त्यावेळी श्रीकृष्णाने द्रौपदीला हे व्रत सांगितले होते. त्या व्रतासंबंधी जो दोरक असतो तो तिने गळ्यात बांधला होता. तो दोरक अर्जुनाने तिच्या गळ्यात बघितला आणि अर्जुनाने त्याला मानले नाही. माझ्या रथावर बसणारा, झाडपाला खाणारा हा हनुमान मला काय देणार? बायकांची बुद्धिच हलकी असते. अशा प्रकारची व्रते सांगून अशी फसगत करू नको, असे अर्जुन द्रौपदीला म्हणाला. द्रौपदी अर्जुनाला म्हणाली, 'श्रीकृष्णाने हे मला सांगितले आहे म्हणून मी हे व्रत करते आहे.' त्यावर अर्जुन कृष्णावर आक्षेप घेऊन म्हणाला, 'कृष्ण माझ्या मुठीत आहे. तो काय सांगणार, तो माझ्या दासाप्रमाणे आहे. तेव्हा त्याने तुला पूजा सांगितली कशी? सर्वतोपरी तुझा मी गुरू आहे. तेव्हा तो गळ्यातील दोरक तोडून टाक.' तिने दोरक काढून टाकला. व्यास म्हणतात, 'धर्मराजा, तेव्हापासून तुमची द्युतात संपत्ती गेली. वनात राहण्याचा प्रसंग आला आणि तेरा गाठींचा हा दोरक तुम्हाला तेरा वर्षे वनवास देणारा होतो आहे.' हे सर्व द्रौपदीने श्रवण केले व पांडवाना म्हणाली, 'सर्व संकटे हा दोरक काढून टाकल्यामुळे आली. मी आता पुन्हा व्रत करण्याचा संकल्प करते.'

तेव्हा व्यास म्हणाले, 'मी या व्रतासंबंधी इतिहास सांगतो. पूर्वी राम, लक्ष्मणाला बरोबर घेऊन सीता शोधण्यासाठी निघाले होते. जाता जाता ऋष्यमूक पर्वतावर आले. तिथे त्यांना हनुमान पहिल्यांदा दिसला.

हनुमानाबरोबर रामांनी मैत्री केली. मारुती म्हणतो, 'रामा, माझे बोलणे ऐका. मी तुझा भक्त आहे. मला जी अनेक नावे मिळाली आहेत, त्याचा इतिहास तू ऐक.'

मी ज्यावेळी जन्माला आलो त्यावेळी आकाशातील सूर्य धरायला चाललो होतो. वाटेत इंद्राने वज्रप्रहार केला. तो माझ्या हनुवटीला लागला. तेंव्हापासून माझे 'हनुमान' असे नांव पडले. याप्रसंगी मी मूर्च्छा येवून खाली पडलो. तिथे माझे वडिल वायुदेव, ही बातमी समजल्यामुळे हजर झाले आणि त्यावेळी वायुदेवाने सर्वांचे श्वासोच्छ्वास बंद केले. त्यावेळी इंद्रादी देव जमले व त्यांनी वायुदेवाची प्रार्थना केली की, 'आम्ही मरायला लागलो आहोत, तू असे करु नको.' तेव्हा देवांनी हनुमानाला निरनिराळे वर दिले. त्यामुळे मला हे 'अंजनेय, चिरंजीव, इत्यादी निरनिराळी नावे मिळाली. त्याचबरोबर देवतांनी आशीर्वाद देता देता '**रामकार्य साधणारा हो**' असे म्हटले आहे आणि एक विशेष या मारुतीच्या महिम्याचे व्रत होईल असेही देवतांनी सांगितले आहे. हे व्रत जो आचरील त्याची सर्व कार्ये निर्विघ्नपणे पार पडतील असेही देवतांकडून मला सांगितले गेले आहे. हे तुला जर आवडले तर तूही हे व्रत करु शकतोस असे हनुमान बोलत असताना आकाशवाणी झाली. मारुती बोलत असलेले खरे आहे, खरे आहे, खरे आहे. तेव्हा राम विचारतात, 'हे मारुती, हे तुझे व्रत सांग.' तेव्हा मारुती सांगू लागला, 'त्रयोदशी दिवशी अभिजीत मुहूर्तावर हे व्रत करावे. त्याला जो दोरक घ्यावा तो तेरा गाठींचा घ्यावा. हळदी लावून केलेला दोरक असावा. पिवळे गंध, पिवळी फुले, पिवळे वस्त्र इ. असावे. आणि '**ॐ नमो भगवते वायुनंदनाय**' ह्या मंत्राने पूजा करावी. तेरा पुऱ्यांचे किंवा गव्हाचे वाण द्यावे. ब्राह्मण जेवायला सांगून दक्षिणा द्यावी. असे केल्यास हे व्रत वर्षाच्या आत फलद्रुप व्हायला लागेल. फळ मिळायला लागल्यापासून १३ वर्षे व्रत करून, व्रताचे उद्यापन करावे. उद्यापन करतेवेळी प्रतिमा, कलश, पूर्णपात्र इ. घेऊन, या शिवाय तूप व पायस द्रव्याने, मूलमंत्राने तदंगभूत वेदमंत्राने होमहवन करावे. अशी व्रत समाप्ती करावी.' अशाप्रकारे हनुमंतांनी व्रताची माहिती सांगितली. रामांनी हे व्रत करण्याचे मनात आणले. तसेच सुग्रीवानेही मनात आणले. कारण दोघेही समदुःखी होते. त्यांनी व्रताला सुरवात केल्यावर सुग्रीवाला व रामाला फलप्राप्ती झाली. बिभीषणाने रामाच्या सांगण्यावरून व्रत केले. त्यालाही राज्य मिळाले. तेव्हापासून ह्या लोकी हे व्रत सुरू झालेले आहे. हे रामभक्त हनुमानव्रत लोकांना आपल्या इच्छापूर्तीसाठी उपयोगी पडत आलेले आहे. तेव्हा व्यास म्हणतात, 'धर्मराज, तू हे व्रत सुरू कर. त्यामुळे तुझ्या सर्व अडचणी दूर होवून सर्व मनोरथ पूर्ण होईल.' हे व्यासांचे भाषण ऐकून धर्मराजा व द्रौपदीला खूप आनंद झाला. संध्याकाळची वेळ होती. व्यास वस्तीला राहिले आणि दुसरे दिवशी व्रताचा दिवस असल्याने धर्मराजाने व्यासांसमोर व्रतारंभ केला. तेरा वर्षांनी व्रत उद्यापन केले. साक्षात् मारुतीची पूजा पांचालीसह धर्मराजाने केली. त्यानंतर संवत्सराने पांडवांना राज्य मिळाले. त्यानंतर सूत ऋषींना म्हणतात, 'हे उत्तम व्रत करून, अभिष्ट मनोरथ पूर्ण करू शकाल हे त्रिवार सत्य आहे. हा हनुमत्कल्प (पोथी) ज्याने लिहिली अगर घरात ठेवली, तर त्यालासुद्धा व्रताप्रमाणे पुण्य मिळू शकते किंवा जो ही पोथी वाचेल अगर श्रवण करील त्यांचे मनोरथ पूर्ण करणारे हे अजब व्रत आहे. सर्व जातीय बांधवांचे वेगवेगळे मनोरथ पूर्ण करणारे आहे. हे जर सांगोपांग व्रत केले तर 'नमो भगवते वायुनंदनाय' ह्या मंत्राचा कार्यसिद्धीस उपयोग होईल. हा मंत्र म्हणून पिवळे गंध कपाळी लावावे, ज्यामुळे राजदरबारी गेलेल्या व्यक्तीस यश येईल. व्यवहार, वाक्सिद्धी यथायोग्य मिळेल. तसेच द्यूत, संकट, मृत्यूभयामध्ये या मंत्राचा वापर यशस्वी होईल. १३ गाठींचा हा दोरक जो रोज गळ्यात धारण करील किंवा उजव्या हातात बांधेल त्याच्या अखिल इच्छा पूर्ण होतील. शुद्रादी जातींनादेखील या व्रताचा अधिकार आहे. स्त्रियांनाही हे व्रत करता येईल.' अशाप्रकारे भविष्योत्तर पुराणातील हनुमानव्रत आहे. इति श्री भविष्योत्तर पुराणे हनुमद् व्रतकथा संपूर्ण ।

***

अ.क्र.	संतांचे नाव	जन्म तिथी व सन	निर्याण तिथी व सन
०१.	प.पू.महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का	शके १७६९, इ.स.१८४७	आश्विन शु.३ शके १८१९, इ.स.१८९७
०२.	प.पू. श्रीअण्णामहाराज केळकर	कार्तिक शु.५ शके १८६६ इ.स.१९४४	अधिकआश्विन शु.७ शके १९४२ इ.स.२०२०
०३.	प.पू.श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री	श्रावण व.८ शके १७७७, इ.स.१८५५	आश्विन व.३ शके १८२७, इ.स.१९०५
०४.	प.पू.श्रीराधाबाईअक्का	---	आश्विन व.३/४ शके १८०९ इ.स.१८८६
०५.	प.पू.श्रीदीक्षितस्वामी ऊर्फ श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज	चैत्र शु.१ शके १७८८, इ.स.१८६६	आश्विन व.७ शके १८४९ इ.स. १९२७
०६.	प.पू.श्रीगोपाळराव दीक्षित	---	आश्विन व.११ शके १८१४, इ.स.१८९२
०७.	प.पू.श्रीसिद्धरामेश्वरमहाराज	शके १८१०, ऑगस्ट १८८८	आश्विन व.११ शके १८५८, इ.स. १९३६
०८.	प.पू.वे.शा.सं. श्रीलक्ष्मणशास्त्री दीक्षित	---	कार्तिक शु.७ शके १८२८, इ.स. १९०६
०९.	प.पू.श्रीनीळकंठभारती महाराज	श्रावण व.८ शके १८०४, इ.स.१८८२	कार्तिक शु.११ शके १९०६, इ.स.१९८३
१०.	प.पू.श्रीआनंदमूर्ती ब्रह्मनाळकर	शके १५५०, इ.स. १६२८	कार्तिक शु.१४ शके १६१८, इ.स.१६९६
११.	प.पू.श्रीशिवलिंगव्वाअक्का	शके १७८९, इ.स. १८६७	कार्तिक व.१ शके १८५२, इ.स. १९३०
१२.	प.पू.श्रीगंगाधरसिंग दीक्षित	शके १८२०, इ.स.१८९८	कार्तिक व.११ शके १९०९, इ.स. १९८७
१३.	प.पू.कु.ज्योती चंद्रशेखर केळकर	आश्विन व.७ शके १८९४, इ.स.१९७२	मार्गशीर्ष शु.४ शके१८९६, इ.स. १९७४
१४.	प.पू.श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर	शके १८११, इ.स. १८८९	मार्गशीर्ष शु.६ शके १८५४, इ.स. १९३२
१५.	प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर (चिमडमहाराज)	ज्येष्ठ शु.१० शके १७७५, इ.स.१८३३	मार्गशीर्ष शु.११शके १८१३, इ.स. १८९१
१६.	प.पू.श्रीबाबासाहेब पाटणकर (मुजुमदार)	शके १७५८, इ.स. १८३६	मार्गशीर्ष व.१ शके १८१७, इ.स. १८९५
१७.	प.पू.श्रीनिरंजनमहाराज मौजे वडगांव	पौष शु.१ शके १८२३, इ.स.१९०२	मार्गशीर्ष व.७ शके १९१९, इ.स. १९९७
१८.	प.पू.श्रीरंगनाथस्वामी निगडीकर	मार्गशीर्ष शु.१० शके १५३४ इ.स.१६१२	मार्गशीर्ष व.१० शके १६०६, इ.स.१६८४
१९.	प.पू.श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज	शके १७६६, इ.स.१८४५	मार्गशीर्ष व.१० शके १८३५, इ.स.१९१३
२०.	प.पू.श्रीकबीरसाहेब ऊर्फ सय्यदअली सरकवास	----	मार्गशीर्ष व.१३ शके १८८६, इ.स.१९६४
२१.	प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर	वैशाख शु.९ शके १८०१, इ.स.१८८०	मार्गशीर्ष व.१४ शके १८८६, इ.स.१९६५

अ.क्र.	संतांचे नाव	जन्म तिथी व सन	निर्याण तिथी व सन
२२.	प.पू.श्रीशिवचिदंबर दीक्षित	कार्तिक वद्य ६ शके १६८० इ.स.१७५८	पौष शु. ४ शके १७३७, इ.स.१८१५
२३.	प.पू.श्रीअंबूरावमहाराज	भाद्रपद व.९ शके १७७८, इ.स.१८५६	पौष शु. ६ शके १८५५, इ.स.१९३३
२४.	प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस	कार्तिक शु.८ शके १७८६, इ.स.१८६४	पौष व. ६ शके १८४६, इ.स. १९२४
२५.	प.पू.श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज	मार्गशीर्ष व.१३ शके १८०८, इ.स.१८८६	पौष व. ८ शके १८९६, इ.स.१९७४
२६.	प.पू.श्रीकलावती आई	भाद्रपद शु.५, शके १८३०, इ.स. १९०८	माघ शु. १ शके १९००, इ.स.१९७८
२७.	प.पू.श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर	चैत्र शु.९, शके १७६५, इ.स.१८४३	माघ शु. ३ शके १८३६, इ.स. १९१४
२८.	प.पू.श्रीइंदिराबाई केळकर	---	माघ शु. ४ शके १८८४, इ.स. १९६३
२९.	प.पू.श्रीमामामहाराज केळकर	फाल्गुन शु.१० शके १८१०, इ.स.१८८८	माघ शु. ९ शके १८८४, इ.स.१९६२
३०.	प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर	ज्येष्ठ शु.१० शके १८०७, इ.स.१८८५	माघ शु. १० शके १८८८, इ.स.१९६६
३१.	प.पू.श्रीहरिबुवामहाराज, फलटण	आश्विन शु.१२ शके १७९७, इ.स.१८७५	माघ शु. ११, शके १८२०, इ.स.१८९८
३२.	प.पू.श्रीविष्णुबुवा जोगमहाराज	भाद्रपद व.१ शके १७८९, इ.स.१८६७	माघ व. १ शके १८४२, इ.स. १९२०
३३.	प.पू.श्रीप्रभाकरस्वामीमहाराज	---	माघ व. १ शके १८७९, इ.स. १९५७
३४.	प.पू.श्रीचांगदेवमहाराज	---	माघ व. ३ शके १२९८, इ.स. १३७६
३५.	प.पू.श्रीसमर्थरामदासस्वामी	चैत्र शु.९ शके १५३०, इ.स.१६०८	माघ व. ९ शके १६०३, इ.स.१६८१
३६.	प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर	शके १७६१, इ.स.१८३९	माघ व. ११ शके १८६४, इ.स.१९४२
३७.	प.पू.श्रीदत्तमहाराज अष्टे (श्रीदत्तं भडजी)	आश्विन शु.१ शके १८१६, इ.स.१८९४	फाल्गुन शु. ६ शके १८४७, इ.स.१९२५
३८.	प.पू.श्रीमामासाहेब देशपांडे	आषाढ शु.२ शके १८३६, इ.स.१९१४	फाल्गुन शु. ९ शके १९१२, इ.स.१९९०
३९.	प.पू.सौ.सीतावहिनी केळकर	---	फाल्गुन शु. १० शके १९०४, इ.स.१९८३
४०.	प.पू.श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी	आषाढ शु.१, शके १८४३, इ.स.१९२१	फाल्गुन व. ९ शके १९२५, इ.स.२००३
४१.	प.पू.श्रीरामानंदमहाराज बीडकर	माघ शु.८ शके १७६०, इ.स. १८३८	फाल्गुन व. १० शके १८३४, इ.स. १९१३
४२.	प.पू.श्रीअनंत दत्तात्रय कुलकर्णी तथा श्रीतात्या कुंभोजकर	आश्विन शु.२ शके १८२४, इ.स.१९०२	फाल्गुन व. १५ शके १९०८, इ.स.१९८६
४३.	प.पू.छत्रपती श्रीसंभाजीमहाराज	ज्येष्ठ शु.१२ शके १५७९, इ.स.१६५७	फाल्गुन व. १५ शके १६११, इ.स.१६८९

साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)

२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)

४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)

५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)

७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)

८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह

९. श्रीनित्यपाठामृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)

१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)

११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)

१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)

१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)

१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)

१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)

श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

क्रमांक	ग्रंथाचे नांव
१	नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका
२	श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
३	श्रीरामदासबोध (ओवीबद्ध)
४	संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
५	श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला (ओवीबद्ध टीका)
६	श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
७	ग्रंथत्रयी (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी)
८	श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग
९	श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन
१०	श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (३६५ वचने)
११	श्रीगुरुमहिमा
१२	श्रीदासरामगाथा पुरवणी
१३	श्रीदासराममहाराज आत्मचरित्र
१४	श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना
१५	श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह)
१६	रामदासस्वामीकृत आत्माराम (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)
१७	श्रीगुरुलिंगगीता (२२८ पदे)
१८	श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)
१९	श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे
२०	श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित)
२१	श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी
२२	श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन
२३	श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८)
२४	समर्थ रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)
२५	श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ)
२६	श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह)
२७	ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह)
२८	श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)

क्रमांक	ग्रंथाचे नांव
२९	श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह)
३०	परमार्थ प्रश्नोत्तरी
३१	श्रीदासराम चिंतनिका (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह)
३२	श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण)
३३	अक्षरे चैतन्याची भाग-१ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)
३४	अक्षरे चैतन्याची भाग-२ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)
३५	ज्ञानगंगा (श्रीदासराममहाराजांची प्रवचने)
३६	अक्षरधारा (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन)
३७	श्रीरामपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने)
३८	श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
३९	श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र (श्रीदासराम लिखित)

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची		
पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
१	**चिमड संप्रदाय**	२००५
२	**श्रीरामदासस्वामी चरित्र**	२००६
३	**श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग**	२००६
४	**श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन**	२००७
५	**श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र**	२००७
६	**दासबोधातील तत्त्वज्ञान**	२००७
७	**श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह**	२००८
८	**श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र**	२००९
९	**साधन संध्या**	२००९
१०	**अनंत अमृत स्मरण**	२००९
११	**श्रीगुरुमहिमा**	२००९
१२	**श्रीज्ञानेश्वरी प्रसाद** (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह)	२००९
१३	**श्रीदासरामगाथा पुरवणी**	२००९
१४	**श्रीदासराममहाराज आत्मचरित्र**	२०१०
१५	**श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०१०
१६	**श्रीदासराममहाराज श्लोकरचना**	२०१०
१७	**श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव**(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह)	२०१०
१८	**श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र**	२०१०
१९	**रामदासस्वामीकृत आत्माराम**(श्रीदासरामकृत गद्यार्थासह)	२०१०
२०	**श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत)**	२०१०
२१	**श्रीगुरुलिंगगीता (मराठी)**	२०१०
२२	**श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका)**	२०११
२३	**श्रीरामनिकेतनमधील आराधना**	२०११
२४	**ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी)	२०११
२५	**श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)	२०११
२६	**अभंगदरबार (आवृत्ती १)**	२०११
२७	**सद्बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण)	२०११
२८	**श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र**	२०११
२९	**श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०११
३०	**प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
३१	**पाठांतर सुलभ भगवत्गीता**	२०११
३२	**श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे**	२०११
३३	**श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह)	२०११
३४	**प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
३५	**महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र**	२०११

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
३६	**तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह)	२०११
३७	**श्रीदासराममहाराज चरितामृत**	२०११
३८	**श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र**	२०११
३९	**श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
४०	**श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित)	२०११
४१	**श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी**	२०११
४२	**श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन**	२०११
४३	**श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८)	२०१२
४४	**प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र**	२०१२
४५	**श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना)	२०१२
४६	**श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने)	२०१२
४७	**चैतन्यब्रह्म**	२०१२
४८	**श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह)	२०१३
४९	**स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)	२०१३
५०	**श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ)	२०१३
५१	**चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह)	२०१३
५२	**गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१**	२०१४
५३	**श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह)	२०१४
५४	**श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र)	२०१४
५५	**श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत**	२०१४
५६	**श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह)	२०१४
५७	**गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२**	२०१५
५८	**अभंग दरबार** (आवृत्ती २ री)	२०१५
५९	**श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध)	२०१५
६०	**आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण)	२०१५
६१	**ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह)	२०१५
६२	**श्रीमद्दासबोधातील प्रपंचयोग**	२०१५
६३	**अभंग दरबार भाग - २**	२०१५
६४	**श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)	२०१६
६५	**श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह)	२०१६
६६	**नासदीयसूक्त विवरण**	२०१६
६७	**श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण**	२०१७
६८	**पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी**	२०१९
६९	**दासबोधातील परमार्थ योग**	२०१९
७०	**चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह)	२०१९
७१	**परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण)	२०१९
७२	**चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह)	२०१९

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
७३	**श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह)	२०१९
७४	**श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण)	२०१९
७५	**अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)	२०२०
७६	**अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)	२०२०
७७	**ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने)	२०२०
७८	**अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन)	२०२०
७९	**श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका)	२०२०
८०	**श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने)	२०२०
८१	**नित्यकीर्तनानंदा**	२०२०
८२	**चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ)	२०२०
८३	**सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०२०
८४	**अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०२०
८५	**श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध)(द्वितीय आवृत्ती)	२०२०
८६	**आरती संग्रह** (द्वितीय आवृत्ती)	२०२१
८७	**संजीवन पाठ** (द्वितीय आवृत्ती)	२०२१
८८	**अमृतवाणी** (द्वितीय आवृत्ती)	२०२१
८९	**श्रीदासरामायण** (द्वितीय आवृत्ती)	२०२१
९०	**शांतीब्रह्म मामा** (श्री. गणपतराव कानिटकर लिखित)	२०२१
९१	**श्रीगोविंदचरितमानस** (ओवीबद्ध)(तृतिय आवृत्ती)	२०२१
९२	**कूटार्थ बोधिनी** (कूट अभंगांवरील टीपा व विवरण)	२०२१
९३	**अभंग तरंग** (प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर संग्राहित संतांचे अभंग)	२०२१
९४	**श्रीरामसुतामृत** (प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर चरित्र)	२०२२
९५	**श्रीदासरामरक्षास्तोत्र**	२०२३
९६	**श्रीतात्यासाहेबमहाराज चरित्र**	२०२४
९७	**पूर्णकळा**	२०२४
९८	**आम्ही वैकुंठीचे वासी भाग - १**	२०२४

।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ९९

ॐ

आम्ही वैकुंठीचे वासी - भाग २

(विविध संप्रदायातील संतांची संक्षिप्त चरित्रे)

लेखक

श्री.दीपक चंद्रशेखर केळकर

प्रकाशक

सौ. अंजली राहुल कुलकर्णी
श्री. नारायण रघुनाथ देशपांडे

आवृत्ती पहिली सांगली सन २०२४

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.९९

आम्ही वैकुंठीचे वासी - भाग २

(विविध संप्रदायातील संतांची संक्षिप्त चरित्रे)

लेखक - श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

प्रकाशक – सौ. अंजली राहुल कुलकर्णी
श्री. नारायण रघुनाथ देशपांडे

प्रथम आवृत्ती इ.स.२०२४

प्रकाशन दिन : १३ फेब्रुवारी,२०२४ माघ शुद्ध चतुर्थी
(श्रीगणेश जयंती) शके १९४५

© **सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

अक्षर जुळणी : **श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**

मुद्रक :

स्वागत मूल्य : रु.१००/-

प्रत मिळणेचे ठिकाण :
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
ईमेल - kelkarnana@gmail.com

प्रकाशकाचे दोन शब्द

'**आम्ही वैकुंठीचे वासी भाग - १ व भाग-२**' हे ग्रंथ कीर्तनशताब्दिचे पावन पर्वकाळामध्ये प्रकाशित होत आहेत, ही अत्यंत आनंदाची पर्वणी आहे. श्रीदीपकनानांनी हे संतचरित्र लेखनाचे कार्य अत्यंत निष्ठेने व सेवाभावाने केले आहे. ''**दुरितांचे तिमिर जावो ।**'' असे श्रीज्ञानदेवांनी म्हटले आहे. माणसाच्या मनातील आणि समाजातील 'अज्ञान तिमिर' घालविण्याचे सामर्थ्य संतचरित्रासारख्या पारमार्थिक वाङ्मयात विशेषत्त्वाने दिसून येते. गु.भ.प. श्रीदीपकनाना यांनी लिहिलेल्या '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग -२**' हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे भाग्य आम्हाला श्रीदीपकनानांमुळे लाभले.

या दोन्ही ग्रंथासाठी आमचे आदरणीय श्रीदीपकनाना यांनी सुंदर प्रस्तावना '**आम्ही वैकुंठीचे वासी भाग - १**' मध्ये लिहिली आहे. या ग्रंथाचे टाईप सेटिंगचे काम श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी अचुक व सुबक पद्धतीने केले आहे. या ग्रंथाचे प्रुफरिडिंगचे अत्यंत किचकट असे काम श्री. रमेश लाळे यांनी अचूकपणे केले आहे. मुखपृष्ठाचे डिझाईन श्री. सागर मोहिते यांनी आकर्षक असे केले आहे. तसेच या ग्रंथाची छपाई एस.बी.प्रिंटर्सचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्तम पद्धतीने केली आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

अशीच गुरूसेवा आमचे हातून घडत रहावी अशी प.पू. सद्गुरू श्रीदासराममहाराज व प.पू. सद्गुरू श्रीअण्णामहाराज यांचे चरणी प्रार्थना करतो व त्यांना मनोभावे वंदन करून प्रकाशकांचे हे दोन शब्द पूर्ण करतो.

सौ. अंजली राहुल कुलकर्णी
श्री. नारायण रघुनाथ देशपांड

अनुक्रमणिका

अ.क्र.	संतांचे नाव	निर्याण तिथी	पान नं.
०१.	प.पू.महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का	आश्विन शु.३	०१
०२.	प.पू. श्रीअण्णामहाराज केळकर	अधिक आश्विन शु.७	०४
०३.	प.पू.श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री	आश्विन व.३	०८
०४.	प.पू.श्रीराधाबाईअक्का	आश्विन व.३/४	११
०५.	प.पू.श्रीदीक्षितस्वामी ऊर्फ श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज	आश्विन व.७	१६
०६.	प.पू.श्रीगोपाळराव दीक्षित	आश्विन व.११	१९
०७.	प.पू.श्रीसिद्धरामेश्वरमहाराज	आश्विन व.११	२२
०८.	प.पू.वे.शा.सं. श्रीलक्ष्मणशास्त्री दीक्षित	कार्तिक शु.७	२४
०९.	प.पू.श्रीनीळकंठभारती महाराज	कार्तिक शु.११	२७
१०.	प.पू.श्रीआनंदमूर्ती ब्रह्मनाळकर	कार्तिक शु.१४	३१
११.	प.पू.श्रीशिवलिंगव्वाअक्का	कार्तिक व.१	३७
१२.	प.पू.श्रीगंगाधरसिंग दीक्षित	कार्तिक व.११	४०
१३.	प.पू.कु.ज्योती चंद्रशेखर केळकर	मार्गशीर्ष शु.४	४४
१४.	प.पू.श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर	मार्गशीर्ष शु.६	४७
१५.	प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर (चिमडमहाराज)	मार्गशीर्ष शु.११	४९
१६.	प.पू.श्रीबाबासाहेब पाटणकर (मुजुमदार)	मार्गशीर्ष व.१	५३
१७.	प.पू.श्रीनिरंजनमहाराज मौजे वडगांव	मार्गशीर्ष व.७	५६
१८.	प.पू.श्रीरंगनाथस्वामी निगडीकर	मार्गशीर्ष व.१०	६०
१९.	प.पू.श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज	मार्गशीर्ष व.१०	६४
२०.	प.पू.श्रीकबीरसाहेब ऊर्फ सय्यदअली सरकवास	मार्गशीर्ष व.१३	६७
२१.	प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर	मार्गशीर्ष व.१४	७३
२२.	प.पू.श्रीशिवचिदंबर दीक्षित	पौष शु. ४	७६
२३.	प.पू.श्रीअंबूरावमहाराज	पौष शु. ६	७८
२४.	प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस	पौष व. ६	८१
२५.	प.पू.श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज	पौष व. ८	८६
२६.	प.पू.श्रीकलावती आई	माघ शु. १	९०

अ.क्र.	संतांचे नाव	निर्याण तिथी	पान नं.
२७.	प.पू.श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर	माघ शु. ३	९३
२८.	प.पू.श्रीइंदिराबाई केळकर	माघ शु. ४	९६
२९.	प.पू.श्रीमामामहाराज केळकर	माघ शु. ९	१००
३०.	प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर	माघ शु. १०	१०५
३१.	प.पू.श्रीहरिबुवामहाराज, फलटण	माघ शु. ११	१०९
३२.	प.पू.श्रीविष्णुबुवा जोगमहाराज	माघ व. १	१११
३३.	प.पू.श्रीप्रभाकरस्वामीमहाराज	माघ व. १	११८
३४.	प.पू.श्रीचांगदेवमहाराज	माघ व. ३	१२१
३५.	प.पू.श्रीसमर्थरामदासस्वामी	माघ व. ९	१२४
३६.	प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर	माघ व. ११	१२७
३७.	प.पू.श्रीदत्तमहाराज अष्टे (श्रीदत्तं भडजी)	फाल्गुन शु. ६	१३०
३८.	प.पू. श्रीमामासाहेब देशपांडे	फाल्गुन शु. ९	१३२
३९.	प.पू.सौ.सीतावहिनी केळकर	फाल्गुन शु. १०	१३६
४०.	प.पू.श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी	फाल्गुन व. ९	१४२
४१.	प.पू.श्रीरामानंदमहाराज बीडकर	फाल्गुन व. १०	१४४
४२.	प.पू.श्रीअनंत दत्तात्रय कुलकर्णी तथा श्रीतात्या कुंभोजकर	फाल्गुन व. १५	१४७
४३.	प.पू.छत्रपती श्रीसंभाजीमहाराज	फाल्गुन व. १५	१५२